नामस्मरणानें घोर पातक्यांचेंहि असें कल्याण होतें. तेव्हा मानवानें नामाची उपेक्षा करूं नये असें समर्थ म्हणतात.

**महां भक्त प्रल्हाद हा दैत्यकूळी ।**
**जपे रामनामावळी नित्यकाळीं ।।**
**पिता पापरूपीं तया देखवेना ।**
**जनीं दैत्य तो नाम मूखें म्हणेना ।।९६।।**

दैत्याच्या कुळांत जन्माला आलेला प्रल्हाद हा अगदीं बालपणापासून, जन्मापासून म्हटलें तरी चालेल, भगवंताच्या भक्तींत रंगलेला होता. तो ईश्वराचें नाम सदैव मोठ्या प्रेमानें उच्चारीत असे. त्याचा बाप हिरण्यकशिपू जणूं मूर्तिमंत पातक होता. गीतेनें सांगितलेल्या आसुरी संपत्तीचें जणूं मूर्त प्रतीक होता. अत्यंत दुराचारी, अत्यंत सत्तालोलुप, उर्मट, अहंकारी असा हा हिरण्यकशिपू स्वत:वर तर देवाचें नांव घेत नसेच पण आपल्या मुलाला नामजपाचें वेड आहे, ईश्वरभक्तींत तो रंगून जातो, हेंहि त्याला पाहवत नसे.

आसुरी संपत्ति आणि दैवी संपत्ति हीं गीतेचीं वर्णनें कांहीं विद्वान् समजतात त्याप्रमाणे मनुष्याच्या संदर्भांत नसून देवकोटींतील आणि राक्षसकोटींतील व्यक्तींच्यासाठीं आहेत, असें समजूं नये. मनुष्याच्या हृदयांतील या दोन प्रकारच्या प्रवृत्ति आहेत, आणि त्या उण्या अधिक प्रमाणांत प्रत्येक माणसाच्या अंत:करणांत असतातच. या माणसाच्या प्रवृत्ति आहेत हें **''द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन् दैव आसुर एव च।''** (भ. १६।६) या शब्दांत गीतेनें स्पष्ट केलें आहे. जगाचा कुणी नियंता आहे हें नाकारणें, सृष्टीतील सर्व पदार्थांना केवळ उपभोगाचीं साधनें मानणें, कार्यकारणभावाची व्यापकता नाकारणें, अपघात वा योगायोग यांनाच तत्त्वज्ञान मानणें, स्वत:च्या सुखविलासासाठीं अन्यायानेंहि सत्ता-संपत्ति मिळविणें, हृदयामध्यें अहंकार, स्वत:च्या शक्तीची जाणीव, काम, क्रोध, मत्सर, दंभ, दर्प, या विकारांचें प्राबल्य असणें, हीं आसुरी प्रकृतीचीं लक्षणें आहेत. ज्यांची शक्ति कमी पडते ते हिरण्यकशिपु, रावण झाल्याचें दिसत नाहींत इतकेंच.

दैवी संपत्ति म्हणून सांगितलेल्या सद्गुणांच्या बळावर, माणसानें या दुर्गुणांवर मात करावयाची असते. पूजापाठादि धार्मिकतेचे संस्कार त्याला या दृष्टीनें सहाय्यक होतात. पण माणसाची उन्मत्तता आणि कृतघ्नता अशी विलक्षण आहे कीं तो ईश्वरच मुळांत नाकारतो, अर्थांतच ईश्वरी प्रसाद मिळवून देणारीं नामस्मरणादि साधनें झिडकारतो. हिरण्यकशिपूसारख्या सामर्थ्यसंपन्नाचें ठीक आहे. त्याचें उपद्रवमूल्य पुष्कळ असल्यानें त्याच्या विनाशासाठीं भगवंताला स्वत: यावें लागलें आणि

त्यामुळें त्या दुष्टाचाहि लाभच झाला. दुर्बलानें तो दर्प मिरविण्यांत कांहीं अर्थ नाहीं, त्यानें नम्र आणि आस्तिक असणेंच परमार्थांत लाभदायक आहे. पण माणसें हा विवेक करीत नाहींत, नामस्मरणाची उपेक्षा करतात. तसें करूं नये म्हणून तर संतांची तळमळ असते.

हिरण्यकशिपू, प्राप्त झालेल्या वराच्या योगानें फार समर्थ झाला होता, आणि म्हणून त्याचा उन्मत्तपणाहि टोंकाला गेलेला होता. कुणी ईश्वरभक्ति करीत असेल तर त्याला आपला स्वत:चाच अपमान होतो आहे असें वाटत असे. मत्सरी बुद्धीची ही परिसीमा झाली. त्यानें आपल्या मुलाला आधीं समजावून सांगण्याचे पुष्कळ प्रयत्न केले, पण तो ऐकत नाहीं असें पाहतांच त्याला नाना प्रकारांनीं ठार मारण्याचेहि प्रयत्न केले. आमच्या ती. दादांनीं वर्णन केलें आहे-

कड्यावरून लोटिला परि न मृत्यु आला मुळीं ।
तसाच स्थिर राहिला परम उग्र दावानळीं। ।
समर्थ नच जाहलें किमपि शस्त्र मारावया ।
खराच हरिभक्त तो गणित ना कशाच्या भया ।।

शेवटीं स्वत:च्या महापतिव्रता पत्नीकडून, प्रल्हादाच्या आईकडून, प्रल्हादाला विषहि देवविलें. त्याचाहि उपयोग झाला नाहीं. तेव्हां हिरण्यकशिपू फारच संतापला. त्यानें प्रल्हादाला दरडावून विचारलें, ज्याच्या आधारावर तूं एवढा निर्भय झाला आहेस तो तुझा रक्षणकर्ता कोण आहे? कुठें आहे? प्रल्हाद हंसून म्हणाले-तो सर्वत्र आहे. सदैव आहे. फार काय तो माझ्यांत आहे आणि तुमच्यांतहि आहे. **''सर्वत्रास्ति सदास्ति किंबहु गिरा त्वय्यस्ति मय्यस्ति च।''** मग या समोरच्या खांबातहि तो असलाच पाहिजे. असें म्हणून हिरण्यकशिपूनें आपली गदा त्या खांबावर हाणली आणि प्रल्हादवरद नरसिंह अत्यंत, उग्र, भयंकर अशा स्वरूपांत प्रगट झाले. त्यांनी हिरण्यकशिपूला, वरानें प्राप्त झालेल्या सर्व अटी पाळून, ठार केलें. त्या अत्यंत रौद्र स्वरूपानें सगळे देव थरकांपलें. भगवान् शंकरहि पुढें होईनात. प्रत्यक्ष लक्ष्मीलाहि पुढें जाऊन त्या रूपाचें शांतवन करण्याचें धैर्य होईना. शेवटीं भक्तराज प्रल्हाद प्रेमादरानें पुढें सरसावलें. त्यांनी नरसिंहाच्या चरणाला वंदनासाठीं स्पर्श करतांच भगवान शांत झाले. आतां तें दैवत उग्र राहिलें नाहीं. लक्ष्मीनृसिंहाच्या स्वरूपांत तें परममंगल झालेलें आहे. अनेकांचें तें कुलदैवत आहे.

नामाचें महात्म्य सांगत असतांना समर्थांना प्रल्हादाची ही कथा अभिप्रेत आहे. या श्लोकांतील वर्णनाच्या संदर्भांत कांहीं गोष्टी जाणून घेतल्या पाहिजेत.

समर्थांनीं अजामिळाला पापी असें विशेषण दिले आहे, आणि त्यानें उच्चारलेलें



नाम हे निर्धाराचें नव्हतें व भगवंताला उद्देशूनहि नव्हतें, पण योगायोगानें, अगदीं आकस्मिकपणें त्याला भगवंताच्या नामाचें महात्म्य लक्षांत आलें आणि पूर्वजीवनाचा पश्चात्ताप होऊन तो सन्मार्गाला लागला आणि उद्धरला.

समर्थांनीं प्रल्हादाला महाभक्त म्हटलें आहे. भक्तांची नामावली सांगितली जात असतांना महर्षि नारदांच्याहि आधीं प्रल्हादाच्या नांवाची गणना केली जाते. एवढा त्याचा अधिकार भक्तिमार्गांत आहे. अगदीं बालपणींच ते नामधारक झाले. शिक्षकांनीं धुळाक्षरें गिरवितांना शिकविलेल्या ॐच्या पहिल्या उच्चारानेंच जणूं त्यांची भावसमाधि लागली आणि भक्ति हेंच जीवन झालें. अजामिळ, प्रल्हाद, या दोघांच्या चरित्रांमध्यें आकाश-पाताळापेक्षांहि अधिक अंतर आहे. आणि तरी नाममहात्म्य सांगतांना उदाहरण म्हणून एकामागोमाग एक दोघांचेहि उल्लेख केले गेले यांतील मर्म ओळखले पाहिजे. नामाचें सामर्थ्य अलौकिक आहे. त्याच्या जपानें सर्व पापें नष्ट होतात, हें खरेंच आहे, पण नामजप म्हणजे दुर्वर्तनासाठीं संमतिपत्र नव्हें. अत्यंत दुराचारीहि उद्धरतात पण अनन्यभावानें भजल्यानंतर. हा अनन्य-भजनाचा आनंदहि त्यांना अनुतापतीर्थीं न्हाल्यानंतर प्राप्त होतो, असें श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात तें फार महत्त्वाचें आहे.

पातकांचें ओझें सोसेनासें झालें म्हणजे मग नामाचें महात्म्य ऐकून देवाचें नांव उच्चारावें, केवळ वाणीनें उच्चारावें, कारण तशी सवड असल्याचें संतांनींच सांगितलें आहे आणि पूर्वींचीं सगळीं पातकें नष्ट झालीं या भावनेनें नव्या उत्साहानें पुन्हां पातकें करूं लागावें, प्रत्यक्ष सर्वनाश ओढवेपर्यंत हाच क्रम चालूं ठेवावा. नाममहात्म्याचा असा अर्थ लावणें अगदीं चुकीचें आहे. नाममहात्म्याच्या आधारानें पुन्हां पुन्हां पातकें करीत राहणें हें योग्य नव्हे. यांत पातकांविषयीं अनुताप नाहीं आणि नामाविषयीं अनन्यताहि नाहीं ''मनीं नसे तरी नसो। परी वाचे तरी वसो।।'' ही सवड माणसाची अगतिकता, अपूर्णता, दुर्बलता लक्षांत घेऊन दिलेली आहे. त्याचा अर्थ दांभिकपणें करूं नये. नाम घेतो या बळावर अनाचारानें वागतो हें चालत नाहीं.

**''अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यति ।**
**पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति ।''**

हें या संदर्भांतहि लक्षांत ठेवलें पाहिजे. चुकून लागलेल्या संवयी एकदम नष्ट होत नसल्यानें, मोहानें पाप घडणें हें समजू शकतें, पण आवर्जून पातकें करावीं आणि नामोच्चारानें मोकळे झालों असें समजावें हा दंभ आहे. आणि परमार्थांत त्याला कधींच क्षमा नाहीं. या अशा दांभिकतेच्या नामस्मरणाला उद्देशून कबिराचे तें प्रसिद्ध वचन आहे.

**''रामनाम सब कोई लेत, ठक ठाकुर अरु चोर ।**
**जिस नामसे ध्रुव प्रल्हाद तरे, वह नाम कुछ और ।।''**

नामाच्या उच्चारांतील हा भेद अक्षरांचा, स्वरांचा व तालाचा नाहीं, तो मनोवृत्तीचा आहे, हें लक्षांत घेतले पाहिजे. इतरांना ठकविण्याकरतां चोरहि नामधारक म्हणून मिरवतो. गोसावी, बैरागी, वारकरी, रामदासी, यांची सोंगे घेऊन व त्यांच्या पद्धतीनें भजन करीत लुच्चे चोरहि आपला कावा साधत असतात.

**''अजित नाम वदो भलत्या मिसे''** चें सवडशास्त्र येथें काय कामाचें? तेव्हां दंभाला आणि वंचकतेला वाव नाहीं, हे लक्षांत ठेवलेंच पाहिजे. अजामिळ पूर्वायुष्यांत कितीहि पातकी असला तरी नाममहात्म्याचा साक्षात्कार झाल्यानंतर त्याने कोणतेंहि दुर्वर्तन केलें नव्हतें हें फार महत्त्वाचें आहे. भक्ताग्रणी प्रल्हादाच्या विषयांत तर दुर्वर्तनाचा प्रश्नच उरला नाही.

आणखीहि एक गोष्ट या अनुषंगानें लक्षांत घेण्यासारखी आहे. रामचंद्र हें समर्थांचें आराध्यदैवत, रामभक्तीचा प्रसार हें त्यांचे जीवितकार्य. तेव्हां नामाचें महात्म्य सांगत असतांना ''राम'' या नांवाचा उच्चार करणें अगदीं स्वाभाविक आहे. पण ईश्वराचें कोणतेंहि नाम, नामस्मरणाच्या दृष्टीनें सारखेंच महत्त्वाचें आहे, हेंहि समर्थांना मान्य आहे हें अजामिळाची आणि प्रल्हादाची कथा संदर्भासाठीं घेतली आहे, त्यावरून लक्षांत येईल. अजामिळाच्या संदर्भात त्यांनी नारायण हें वेगळें नाम स्पष्टपणेंच सांगितलें आहे. हरि किंवा श्रीहरि याहि नामाचा ते उल्लेख करतात. ''मना वासना वासुदेवीं वसो दे'' या चरणामध्यें वासुदेव हे नाम आले आहे. प्रल्हाद हा विष्णुभक्त. त्याचेंसाठीं नृसिंहावतार झाला. तेव्हां त्याचें तोंडीं जपासाठी राम हेंच नाम असेल असें समजण्याचे कारण नाहीं, येथें रामनाम या शब्दाचा अर्थ सामान्यपणें ''ईश्वराचें नाम'' असाच केला पाहिजे. साधुसंतांची ही अनाग्रही वृत्ति स्वत:च्या संप्रदायाचें आचार निष्ठेनें सांभाळीत असतानांहि कशी जागृत असतें, ते यावरून साधकानें लक्षांत घेण्यासारखें आहे. नाम अमुकच असावें असा आग्रह नाहीं. आपली आवड, कुलाचार, संप्रदाय वा गुरूचा उपदेश याप्रमाणें, प्रेमादरानें आणि आळस टाकून नाम घ्यावें हें महत्त्वाचें.

**मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैंची ।**
**अहंतागुणें यातना ते फुकाची ।।**
**पुढें अंत येईल तो दैन्यवाणा ।**
**म्हणोनि म्हणा रे म्हणा देवराणा ।।९७।।**

माणसाच्या एकूण परिस्थितीचा विचार करतां ईश्वरनिष्ठा आणि नामजप



यांविना त्याच्या उद्धाराचें खरें तर दुसरें साधन उपलब्ध नाहीं. पण या साधनांचा स्वीकार तो करीत नाहीं. अहंकाराला बळी पडतो आणि उगीचच नानाप्रकारच्या यातना भोगीत राहतो. ईश्वरावर श्रद्धा ठेवली नाहीं, नामस्मरणासारखें अतिशय सोपे, साधें, सोयीचें साधनहि केलें नाहीं तर जीवन निराधार होईल आणि मग त्याचा शेवटहि दीनवाणा झाल्याविना राहणार नाहीं. शरीराची कार्यक्षमता टिकून आहे, ऐहिक सुखोपभोगाची साधनें पुरेशी उपलब्ध आहेत, तोंवर ईश्वर मानीत नाहीं म्हणण्याची मूर्ख ऐट थोडी तरी निभते असें म्हणतां येतें, पण जेव्हा शरीर दुबळे होईल, विषयोपभोगाची शक्ति इंद्रियांना राहणार नाहीं, धनादि साधनें उणावतील, परिवारांतील लोक कंटाळा करूं लागतील, वेळ खायला उठेल, तेव्हां मग जीवन कसें यातनामय व दीन बनते तें नास्तिकाच्या लक्षांत येईल, पण तेव्हां फार उशीर झालेला असेल. हे होऊं नये म्हणून समर्थ म्हणतात-बाबा! देवाच्या नांवाचा प्रेमानें उच्चार कर असें आम्हीं तुला पुन्हां पुन्हां सांगतों आहों तें आतांच लक्षांत घे.

**हरीनाम नेमस्त पाषाण तारी ।**
**बहू तारिले मानवदेहधारी ।।**
**तया रामनामीं सदा जो विकल्पी ।**
**वदेना कदा जीव तो पापरूपी ।।९८।।**

कोणत्याहि प्रकारचे चेतना नसलेले अत्यंत निर्जीव असे दगड, तेहि नामाच्या बळाने निश्चयानें तरलें असें समर्थ सांगत आहेत. लंकेला जातांना नळानें समुद्रावर जो सेतु बांधला, त्याच्या संबंधीच्या कथेला उद्देशून हा चरण आला आहे. नळाच्या हातून दगड पाण्यात तरतील असा त्याला वर होता म्हणून सेतु बांधण्याचें काम नळाकडे आलें. आपल्या या कर्तृत्वाचा नळाला अभिमान वाटूं लागला आणि त्यामुळें सेतु बांधण्यासाठीं दगड स्थिरावेना. तेव्हां मारुतरायांनीं प्रत्येक दगडावर राम राम अशीं अक्षरें लिहिली आणि त्यामुळें दगड व्यवस्थितपणें तरंगून सेतु व्यवस्थितपणें पूर्ण झाला. हें शेवटीं रामनामाचेंच सामर्थ्य ठरलें. एका संस्कृत सुभाषितकारानें ही गोष्ट स्पष्टच केली आहे. तो म्हणतो-

**ये मज्जन्ति निमज्जयन्ति च परान् ते प्रस्तरा दुस्तरे ।**
**वाधौ वीर तरन्ति वानरभटान् सन्तारयन्तेऽपिच ।।**
**नैते ग्रावगुणा न वारिधिगुणा नो वानराणां गुणाः ।**
**श्रीमद्दाशरथेः प्रतापमहिमा सोयं समुज्जृम्भते ।।**

''स्वत: बुडणारे आणि जवळ केले तर दुसऱ्यालाहि बुडविणारे असे जड दगड, तरून जाण्यास अत्यंत कठिण असलेल्या समुद्रांत, स्वत: तरले आणि त्यांनीं वानरवीरांनाहि तारून नेलें. हें जें घडलें त्याला दगडाचे गुण कारण नाहींत, कोणा वानरांत ते सामर्थ्य नव्हतें. किंवा ती शक्ति समुद्राचीहि नव्हे. भगवान् दाशरथि रामाच्या सामर्थ्याचा तो महिमा आहे. हीच गोष्ट समर्थ ''हरीनाम नेमस्त पाषाण तारी'' या ओळींत सांगत आहेत. दगडसुद्धां तरतात, उद्धरून जातात, असा भाव या चरणांत आहे. दगडच तेवढे तरतात. तरून जायला आम्ही काय दगड आहों? असा तर्कटतीर्थी अर्थ कुणी काढूं नये. म्हणून समर्थ दुसऱ्या ओळींत लगेच ''बहू तारिले मानवदेहधारी'' असें सांगतात. मानवी देह धारण करणारेहि असंख्य जीव नामस्मरणाच्या बळावर उद्धरून गेले.

नुसतें मानव असें न म्हणतां मानव देहधारी असा शब्दप्रयोग करण्यांत कांहीं विशेष हेतु असण्याचीहि शक्यता आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा एक विशेष त्यांतून प्रगट होतो असें मला वाटतें. आपलें तत्त्वज्ञान प्रत्येक भूतजाताच्या ठिकाणीं वस्तूमात्राच्याठिकाणीं, चैतन्य भरून राहिलें आहे असें सांगतें. अद्वैत तत्त्वज्ञानाचा तर तो गाभाच आहे. तेव्हां मृत्तिका, पाषाण, वृक्षवल्ली, कृमिकीटक, पशुपक्षी हेहि देहच आहेत, आणि विशिष्ट विशिष्ट प्रसंगानें, कारणानें चैतन्य त्यांना धारण करतें असें आपला धर्म सांगतो. म्हणून भावावेशांत असलेल्या सद्‌भक्तांनीं, इतर कोठेंतरी वैभवशाली राजघराण्यांत पण भक्तिहीन असा माणसाचा देह मिळण्याच्या ऐवजी, आम्हांला नंदनंदन भगवान् गोपालकृष्णाच्या विहारभूमीवरील, त्याच्या चरणतलींचे धूलिकण होण्याचे भाग्य लाभलें तरी तें अधिक श्रेयस्कर आहे असें म्हटलें आहे. अशा अर्थाचें उद्‌गार प्रेमाची उत्कटता व्यक्त करणारे असले तरी मातीचे कण वा दगडगोटे हे देह आहेत आणि कारणपरत्वें जीव तें धारण करतो ही धारणाच त्यातून स्पष्ट होते. तेव्हां दगडाच्या रूपांत असलेले जडजीवहि उद्धरतात, तर चेतनेची पूर्ण अभिव्यक्ति असलेले, मनुष्यशरीर धारण करणारे जीव, नामस्मरणानें निश्चितपणेंच उद्धरतील असें समर्थांना सुचवावयाचें असेल.

मानव देहधारी असें म्हणण्यांत ज्यांचें शरीर केवळ माणसाचें आहे पण वागणें मात्र माणसाला शोभण्यासारखें नाहीं, असेहि जे कोणी पातकी, पतित आहेत त्यांचाहि उद्धार नामस्मरणानें होऊं शकतो असेंहि म्हणावयाचें असेल. महर्षि वाल्मीकींच्या संदर्भांत रूढ असलेली एक कथा यादृष्टीनें विचारांत घेण्यासारखी आहे.

वाल्मीकि हे पूर्वी हिंसक, घातकी असे निषाद होते. आल्यागेल्या वाटसरूला लुटून ते त्याचा घात करीत असत. एक माणूस मारला कीं त्याच्या नांवानें एक



खडा रांजणांत टाकून आपला पराक्रम मोजावयाचा अशी त्यांची पद्धति होती. अशा खड्यांनीं सात रांजण भरले होते म्हणे! दैवयोगानें एकदां या वाल्याची नारदांशीं गांठ पडली. नारदावर त्यानें आपलें शस्त्र उगारलें.

नारदांनीं विचारलें, अशी निष्पाप माणसाची हत्या तूं कां करीत आहेस? वाल्या म्हणाला-बायकापोरांच्या भरण-पोषणासाठीं.

पण तुझ्या पातकांत ते अंशभागी होणार आहेत कां?

कां नाहीं? मिळालेल्या संपत्तीचा जर ते उपभोग घेतात तर ती संपत्ति ज्यामुळें मिळाली त्यांतहि त्यांनीं वांटेकरी झालेच पाहिजे.

हें तुझें मत. त्यांना कधीं प्रत्यक्ष विचारलें आहेस काय? नारद हंसून म्हणाले-जा, पहा, विचारून ये. मी येथेंच थांबतो. माझ्या देवाची शपथ घेऊन सांगतों मी पळून जाणार नाहीं.

कर्दनकाळासारख्या वाल्याच्या उगारलेल्या शस्त्रापुढें इतक्या निर्भय प्रसन्नतेनें उभा राहणारा आणि सहजपणें प्रश्न करणारा, अद्‌भुत माणूस वाल्यानें प्रथमच पाहिला. तो प्रभावित झाला. हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे असें त्याला वाटलें. नारदांना थांबावयास सांगून तो आपल्या गढीवर आला. त्यानें बायका-मुलांना विचारलें. उत्तर सहजपणें नकारार्थी आलें. पातकें प्रत्यक्ष करूनहि पातकांचा परिणाम भोगण्याची सिद्धता माणसाची नसते, अशा परिस्थितींत ज्या पातकांशीं संबंध दूरान्वयानें आहे त्यांचे परिणाम भोगण्याचें कोण मान्य करणार? पण वाल्याच्या भावनांना मात्र धक्का बसला. त्याच्या हृदयाला तो आघात सहन झाला नाहीं. तो विषण्ण झाला. खालीं मान घालून परतला. कृतकर्माच्या पश्चात्तापानें त्याचें अंत:करण भरून गेलें. त्यानें येऊन नारदांचे पाय धरले आणि गहिंवरलेल्या कंठानें आपल्या उद्धाराचा मार्ग त्यांना विचारला. नारदांनीं त्याला धीर दिला आणि रामनामाचा जप करण्यास सांगितलें. वाल्या निष्ठेनें आणि निग्रहानें जप करूं लागला. त्याचें तें तप इतकें दिव्य होतें कीं त्याच्या हातांतील लाकडाच्या वाळलेल्या दंडाला कोंवळीं पालवी फुटली. वाल्याचें आमूलाग्र परिवर्तन झाले आणि तोच पुढें आद्यकवि महर्षि वाल्मीकि या नावानें प्रसिद्धीस आला.

ही कथा विश्वसनीय मानण्यासारखा कोणताहि पुरावा वाल्मीकि रामायणांत नाहीं. तेथें त्यांना प्रचेतस् प्रजापतीचे पुत्र म्हणून उल्लेखिलेले आहे. पण कांहीं पुराणांतून ही कथा वाल्मीकीच्या संबंधात आली आहे, आणि आपल्या परंपरेमध्यें अनेक संतांनीं जवळजवळ याच पद्धतीनें नाममहात्म्यासाठीं तिचा उपयोग केला आहे. तेव्हां ही कथा महर्षि वाल्मीकींच्या पूर्वीच्या जन्मांतील एकाद्या घटनेशीं संबद्ध असावी. मानवाचा देह धारण करणारीं वाल्यासारखीं दुष्ट, हिंसक, क्रूर

अशीं पातकीं माणसेंहि नामप्रभावानें उद्धरून जातात, त्याचें कल्याण होतें, त्यांचा भविष्यकाळ उज्वल होतो, तर मग सर्वसाधारण भलीं माणसें, जीं अशीं वा इतकीं वाईट नाहींत, असूं शकत नाहींत, तीं नामस्मरणाच्या बळानें तरतील यांत कांहींच नवल नाहीं.

संतमहात्म्यांनीं असे अनुभव अनेक प्रकारांनी सांगितले आहेत आणि नाममहात्म्य परोपरीने गायिलें आहे. तरीसुद्धा नामाविषयीं जर कोणाच्या मनांत संशय राहत असेल आणि नाम घ्यावें, नामस्मरण करावें, असें वाटत नसेल तर या दुर्दैवाला काय म्हणावें? समर्थ अगदी संतापून अशा संशयी माणसाला ''पापरूपी'' म्हणत आहेत. इतर प्रकारें पातकें करणारा हा खरा पापी नव्हे. कारण नामस्मरणासारखा त्याच्या उद्धाराचा मार्ग त्याला मोकळा आहे. पण हातून पातकें तर घडलीं आहेत, पुन्हां पुन्हां घडताहेत, परिणाम लगेच फळाला न आल्यामुळें ''आमचें काय बिघडलें, पुढें तरी काय बिघडणार आहे?'' हा अहंकार बळावतो आहे, त्यामुळें दुर्वर्तनाला उन्मत्त अशा स्वैरतेचें रूप येत आहे आणि नामावर विश्वास नसल्यानें उद्धाराचा मार्ग मात्र उरलेला नाहीं. आतां या व्यक्तीला ''पापरूपी'' मूर्तिमंत पाप असें म्हणणेंच योग्य आहे.

आमचा देवावर विश्वास नाहीं पण आम्ही न्यायनीतीनें वागतो, सदाचरणानें राहतो असें कांहीं लोक म्हणतात. अगदीं मर्यादित अर्थानें तें खरेंहि असतें. पण एकूण मानवी जीवनाचा विचार करतां नास्तिकाचें सदाचरण हें वरवरचें असतें. कारण चांगल्या वाईटाचा खरा निर्णय विज्ञानानें घेतां येत नाहीं, श्रेष्ठ-कनिष्ठतेची खरी परीक्षा केवळ बुद्धिवादावर तर्कानें करतां येत नाहीं, कोणत्याहि सदाचरणाला काय, नीतीला काय, वा न्यायाला काय, श्रद्धेचे, विश्वासाचेच अधिष्ठान असावे लागते. नास्तिक ही श्रद्धाच नाकारतो. आतां पायावांचून त्याचें सदाचरणाचें घर उभें कसें रहावयाचें? पाहूं नये तें डोळे पहातच नाहींत, बोलूं नये तें वाणी बोलतच नाहीं, करूं नये तें मनांतच येत नाहीं, अशी जीवनाची पवित्रतम अवस्था प्राप्त होणें हें साधारण काम नाहीं. त्यासाठीं अनेक जन्मांच्या पुण्याईची आवश्यकता आहे. सामान्य माणसानें हा अहंकार मिरवूं नये. त्याला मनबुद्धीवर नियंत्रण ठेवूनच वागावें लागतें. आणि तरी मोहवश इंद्रियें त्याला केव्हां आणि कसा सदाचारापासून दूर नेतील तें सांगता येत नाहीं. अशा स्थितींत ज्यांतून मनबुद्धिचा निश्चय दृढावतो, ध्येयावरचें लक्ष ढळत नाहीं, प्रयत्नाचें बळ वाढतें, उत्साहाला धैर्य लाभतें, तो देवावरील विश्वास, भ्रामक बुद्धिवादानें झुगारला तर पथभ्रष्ट होण्यावाचून, पातकांच्या दरींत कोसळण्यावांचून, अन्य गतीच उरणार नाही.



यासाठीं समर्थ म्हणतात-नामाविषयीं संशय बाळगूं नका; तसें केलेंत तर पापरूप व्हाल.

**जगीं धन्य वाराणसी पुण्यरासी ।**
**तयेमाजि जातां गती पूर्वजांसी ।।**
**मुखें रामनामावळी नित्य काळीं ।**
**जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी ।।९९।।**

काशी, वाराणसी, हें भागिरथीच्या तीरावरचें सर्व हिंदुस्थानांत अत्यंत प्रसिद्ध असलेलें पुण्यक्षेत्र. एक ज्योतिर्लिंग जेथें आहे तें पवित्र स्थान. भारतीय विद्वत्तेचें माहेरघर. ज्या ठिकाणीं जाऊन देह ठेवला असतां माणसाला मोक्ष मिळतो, अशी भारतीयांची दृढ श्रद्धा याहि काळांत टिकून आहे, तेथें गंगाकिनाऱ्यावर लहान लहान पर्णकुट्या आहेत. तेथें राहणाराला थोडेसें अन्न मिळण्याची सोय आहे. त्या झोपड्यांत राहून देहपाताची वाट पाहणारीं श्रद्धावंत माणसें आहेत. पंडित राजेश्वरशास्त्री द्रविडांच्या समागमें जाऊन, झोंपडींत राहणाऱ्या अशा एका वृद्धाला मी पाहिलें आहे. त्या सद्‌गृहस्थांचें वय ऐंशीच्या आसपास असावे. हातपाय दुर्बल, शरीर कृश, मुद्रा सुकलेली पण स्वर खणखणीत व डोळे तेजस्वी. गृहस्थ एक घोंगडी टाकून खाटेवर पडले होते. अक्षरशः चार घास अन्न आणि गंगाजल याशिवाय कांहीं घेत नव्हते. त्यांना घरीं करणारीं, विचारणारीं सगळीं, नातेवाईक मंडळीं होतीं. सांपत्तिक स्थितीहि चांगली. प्रापंचिक कर्तव्यें पार पडतांच ते वृद्ध येथें येऊन राहिले होते, मृत्यूची वाट पहात. औषध-पाणी घेत नसत. शुश्रूषेसाठीं कोणाला जवळ राहू देत नसत. मी फार आदरानें त्यांना नमस्कार केला. त्यांच्या सात्त्विक त्यागानें, अलोट धैर्यानें आणि असाधारण निष्ठेनें मी भारावल्यासारखा झालों होतो. परंपरागत श्रद्धा कशी टिकून आहे त्या संदर्भांत मी हें सांगतो आहे.

काशीवासाचें हें जें फळ आहे तेंहि वस्तुतः काशीवासाचें नाही. कामदहन भगवान, चंद्रमौली शंकर सर्वदाच अत्यंत हितकर असा रामनामाचा उच्चार, अशा मरत्या जीवाच्या कानांत करतात आणि अंतकालीं श्रवणीं पडलेल्या या रामनामाच्या बळानें जीव उद्धरून जातो. म्हणजे काशीमध्यें मोक्ष मिळतो हें सुद्धा नाममहात्म्यच आहे. जो सदैव नामस्मरणांत रमलेला आहे त्याला मग देह ठेवण्यासाठीं काशींतच गेले पाहिजे असें नाहीं. आदरानें केलेल्या नामस्मरणानें परमेश्वरच त्या भक्ताचा ऋणी होतो. **'ते ऋणवैपण देखोनि अंगीं । मी आपुलियाचि उत्तीर्णत्वा लागीं । भक्ताचिया तनुत्यागीं । परिचर्या करीं ।। म्हणोनि देहांतीचें साकडे । माझिया काहींचि न पडे । मी आपुलीयातें**

**आपुलीकडें । सुखेंचि आणी ।।''** (ज्ञा. ८।१३१, ३४) असा देवानें दिलेल्या आश्वासनाचा उल्लेख ज्ञानेश्वर महाराज करतात. यासाठीं जसें होईल तसें, जितके होईल तितकें, साधेल त्या पद्धतीनें नामस्मरण करीत असावे. तेंच सोयीचें आहे, श्रेयस्करहि आहे.

**यथासांग रे कर्म तें ही घडेना ।**
**घडे धर्म तों पुण्य गांठी पडेना ।।**
**दया पाहतां सर्व भूतीं असेना ।**
**फुकाचें मुखीं नाम तें ही वसेना ।।१००।।**

नाम तेंच तेवढें कशासाठीं घ्यावयास पाहिजे? सरळ पाहतांना त्यांच्याहिपेक्षां अधिक महत्त्वाच्या असणाऱ्या गोष्टी आम्हीं करतो, असें माणसाला वाटतें, व्यवहारांत तसें दिसतेहि. माणसे यज्ञयाग, पूजापाठ, तीर्थयात्रा, होमहवन, व्रतवैकल्यें, अशा अनेक गोष्टी करीत असतात. नास्तिक म्हणविणाराच्या घरांतहि हें होतें. त्यासाठीं, कधीं वडिलांची, कधीं पत्नीची, कधीं इतर आप्तेष्टांची, ढाल वापरली जातें. अन्नसंतर्पणें होतात, दक्षिणा दिली जाते, हें सर्व होतें पण तें यथासांग होतें काय? असें समर्थ विचारतात तें फार महत्त्वाचें आहे. खरोखरीच्या शारीरिक, आर्थिक दौर्बल्यानें वा परिस्थितीच्या प्रतिकूलतेनें जें उणें पडेल तें सोडून दिलें तरी आळस, उपेक्षा, तुच्छता, वंचना, अश्रद्धा, विपरीत धारणा, यामुळें जें चुकतें त्याचें प्रमाण किती असतें? हा विचार माणसानें कधीं केला आहे काय? पुण्याहवाचनाच्या सुपाऱ्या, होमाचें तूप आणि वाणासाठीं दिला जाणारा खण यांचें स्वरूप कसें असतें तें कधी लक्षांत घेतलें जातें कां? सुपाऱ्या इत्यादि वस्तू कशासाठीं पाहिजे आहेत तें वाणीच विचारतो. सन्माननीय पाहुण्याला देण्यासाठीं वा नवीन जांवयाच्या उपयोगासाठीं आणलेल्या वस्तूची जी प्रत असते, तीच धार्मिक कारणासाठीं आणलेल्या वस्तूंचीहि असली पाहिजे, असें कधीं वाटतें कां? लग्नासारख्या महत्त्वाच्या संस्काराचे वेळीं जीं धर्मकृत्यें करावयाचीं तीं नवरदेवाच्या आग्रहामुळें कशीतरी उरकलीं जातात. आणि स्वागत समारंभाचेवेळीं तोच नवरा मुलगा, मोठ्या आनंदानें पाश्चात्य पोषाखानें गुदमरलेला जीव सांभाळीत, चार चार तास ताटकळत बसतो. संपन्न घर, चांगलें सुसज्ज असतें. कपबशांचे अनेक प्रकारचे संच आणि नाना प्रकारचीं कांचपात्रें यांनीं कपाटें भरलेलीं असतात, पण संध्येसाठीं वा देवपूजेसाठीं साधें पळीपंचपात्री आणि ताम्हन कांहीं मिळत नाहीं. मंडप, वाजंत्री, पाहुण्यांचें आगत-स्वागत, विजेचा लखलखाट, फुलांचे साजशृंगार यांत कितीहि पैसा गेला तरी तो सुखसंतोषांनीं वेंचणारीं माणसें



दिवसभर राबणाऱ्या भटजीला ५-१० रुपये अधिक द्यावे लागले तर कुरकुरतात. आपण ज्याला अन्नदान समजतो त्या जेवणावळींत पन्नास पानें घातलीं असलीं तर त्यांतील पंचेचाळीस नातलगांचीं व हा ज्यांच्याकडें पूर्वीं अनेक वेळां जेवला आहे, ज्यांना परतफेडीसाठीं एकदां तरी जेवायला बोलाविलें पाहिजे अशांचीं असतात. एखादा दीन दरिद्री अगांतुक त्यावेळीं आला तर यजमानाचें पित्त वाढतें. आतां या सर्व गोष्टींना धर्मकृत्यें म्हणावयाचीं कां आपल्या विपरीत धारणेप्रमाणें लौकिक आणि प्रतिष्ठा संभाळण्याचें तंत्र म्हणावयाचें? आपण लौकिकासाठीं, प्रतिष्ठेसाठीं उदार असतो. धर्मकृत्यें कृपणपणानें संकोचलेलीं राहतात. सुखविलासासाठीं पैसे खर्च करतांना आपल्या हाताला हाड राहत नाहीं, परंतु देवापुढें, पोथीपुढें, रुपया तर राहो पांचदहा पैसे ठेवले तरी आपण कांहीं विशेष केलें असें आपणास वाटतें. मनुष्य जों जों श्रीमंत तों तों त्याचा हा कृपणपणा जास्तच व्यक्त होतो. **ह्रिया देयं, भिया देयं** हें लोक लक्षांत ठेवतात. पण **श्रिया देयं, संविदा देयं** हें मात्र लक्षांत ठेवीत नाहींत. सगळा आळस, सगळी वंचना, सगळी भागवाभागवी, धर्मकृत्यांच्या वाट्याला येते. केलीं जाणारीं कृशदुर्बल धर्मकृत्येंहि लौकिकासाठीं राबविलीं जातात. आदर, प्रेम, श्रद्धा, यांचें बळ त्यामागें नसतें.

या धर्मकृत्यासाठीं वेंचला जाणारा पैसाहि सरळ व्यवसायांतून मिळालेला नसतो. त्या संपत्तीची निर्मिति आणि वाढ तस्करी, काळा व्यापार, भ्रष्टाचार, अपहरण, शोषण यांतून झालेली असते आणि असाच पैसा देवधर्माच्या कामीं अधिक प्रमाणांत लावला जातो. उत्तम व्यवहारानें कुणी धन जोडीत नाहीं. आणि तसें जोडलेलें धन उदार विचारानें, धार्मिक कृत्यासाठीं, कुणी वेंचीतहि नाहीं. आतां या धनानें केलेली धर्मकृत्यें पुण्यसंचयाच्या दृष्टीनें लाभदायक कशीं ठरणार? अनेक छिद्रे असलेल्या भांड्यांत भरलेलें पाणी जसें साठवणीच्या उपयोगाला येत नाहीं तसेंच या धर्मकृत्यांचें होतें.

कांहीं माणसें स्वत:ला दयाळू समजतात, कधीं कधीं तसें दिसतेंहि. पण ही दया सर्वभूतीं असते कां? **''दया करणें जे पुत्रासी । तेंचि दासा आणि दासी ।।''** असें स्वरूप कोणाच्या दयेला प्राप्त होतें कां? रंजल्या गांजलेल्याला कोणी पोटांतून आपलें म्हणत नाहींत. त्याच्याविषयीं तिरस्काराची, निदान तुच्छतेची, तरी भावना अंत:करणांत असते. ती व्यक्त असते, सोयीची नसेल तेव्हां अव्यक्त राहते, पण दीनाविषयीं वाटणारा कनवळा खरा नसतो. त्यांत देखाव्याचा भागहि असूं शकतो. सर्व भूतजातांविषयीं तर तो नसतोच नसतो. दाखविल्या जाणाऱ्या कनवळ्याला, केल्या जाणाऱ्या दयेलाहि ''मी-माझें''ची मर्यादा पडलेली असते.

प्रत्येकवेळीं रंतिदेवासारखें वा रघुराजासारखें सर्वस्व समर्पण करावें लागतें असें नाहीं. आपलें जीवनच अडचणींत येईल इतकें दान द्यावें असें शास्त्रकारहि म्हणत नाहींत. **'न तद् दानं प्रशंसन्ति येन वृत्तिर्विपद्यते । दाधं यज्ञष्त कर्म लोके वृत्तिमतो यतः ।।'** असें वचन भागवतांत आहे. पण जें दिलें जातें तें श्रीमंतींला साजेसें असावें लागतेंच. तेंहि घडत नाहीं. त्यामुळें दयाळू स्वभावाचा म्हणून जो पारमार्थिक लाभ माणसाला मिळावयाचा, तोहि मिळत नाहीं. समर्थ म्हणतात- धार्मिकतेच्या नांवाखालीं या ज्या अनेक गोष्टी तुम्ही करतां त्या खऱ्या अर्थानें तुमच्या उपयोगी पडणाऱ्या नसतात. त्यांची प्रत चांगली नसते. औषधाचा जो गुण येतो तो औषधी द्रव्यांच्या नेमकेपणाचा आणि उत्कृष्टतेचा. बाटलीवरचें नांव, आकर्षक वेष्टण, बाटलीचा आकार वा खऱ्या औषधासारखें दिसणारें आंतील पदार्थाचें रंगरूप यांना कांहीं गुण नसतो. तेव्हा माणसानें अशा या यथासांग न घडणाऱ्या धर्मकृत्यांचा वा मुळींच व्यापक नसलेल्या दयाबुद्धीचा भरंवसा धरण्यांत अर्थ नाहीं. नामस्मरणाचाच विश्वास त्यांनी धरला पाहिजे. पण तें साधें-सोपें-फुकाचे म्हणून त्याला घ्यावेसें वाटत नाहीं. एका कारखानदारानें सांगितलें, 'एकाद्या वस्तूचें मूल्य स्वस्त ठेवलें तर गिऱ्हाइकाला ती वस्तू चांगल्या प्रतीची आहे असे वाटत नाहीं. मूल्य भरपूर ठेवलें आणि ती परदेशी बनावटीची आहे असें सांगितलें कीं मग गिऱ्हाईक त्या वस्तूवर तुटून पडतें.' इतर अनेक व्रतवैकल्याप्रमाणें नामस्मरणाचा खप नाहीं, त्याचें कारण असेंच आहे. हा गबाळेपणा माणसानें सोडला पाहिजे. चांगली वस्तू कधीं कधीं महाग असूं शकते पण जें जें महाग तें तें चांगलें समजणें भ्रमिष्टपणाचेंच आहे. माणसानें हा खुळेपणा करूं नये. नाम साधें, सोपे असले तरी त्यावरच विश्वास ठेवावा.

**जया नावडे नाम त्या येम जाची ।**
**विकल्पें उठे तर्क त्या नर्क ची ची ।।**
**म्हणोनी अती आदरें नाम घ्यावें ।**
**मुखें बोलतां दोष जाती स्वभावें ।।१०१।।**

नाममहात्म्याच्या प्रकरणाचा उपसंहार करतांना समर्थ रामदास स्वामी निक्षून सांगत आहेत कीं ज्याला नामस्मरणाची आवड नाहीं, त्याला यमाचा जाच सहन करावा लागतो. कांहींतरी विकल्प घेऊन व्यर्थ संशय धरून, जे नामाविषयीं तर्कटें रचीत बसतात, त्यांना नर्कास जावें लागतें. छी! छी! किती वाईट परिस्थिति हे संशयात्मे हातानें उगीचच ओढवून घेत आहेत.

समर्थांची जनकल्याणाविषयींची तळमळ या ओळींतून उत्कटतेनें व्यक्त



होत आहे. जशी ती श्रीतुकोबारायांच्या ''नाम न वदे ज्याची वाचा।'' या अभंगांतून प्रकट होते.

मनुष्याचें, अनेक प्रकारच्या विकारांनी भरलेलें जीवन, ज्या साधनाच्या योगानें हळूहळू पण निश्चितपणें सुधारत जातें, ज्याच्यासाठीं धन वेंचावें लागत नाहीं, शरीराला कांहीं कष्ट पडत नाहींत, अमुक प्रकारच्या आसनावर बसूनच घ्यावे असें जाचक वाटणारे कोणतेंहि नियम ज्यासाठीं आग्रहानें सांगितलें नाहींत, घेणाऱ्याच्या योग्यतेचा, पात्रतेचा, ज्याच्याशीं विशेष संबंध नाहीं, असे सरळ, साधें, सोपें नाम घेतांनाहि लोक आळस करतात, नामाविषयीं अश्रद्धा दाखवितात, तेव्हा लोककल्याणासाठींच अवतीर्ण झालेले संत दु:खानें कळवळतात, वात्सल्याने संतापतात आणि मग आईनें नाठाळ पोराला शिव्या घालाव्या तसे बोलतात.

यम नावाची कुणी देवता नाहीं आणि नर्क नावाचा कुणी लोक नाहीं. तेथे जीवाला कृतकर्मासाठीं मेल्यानंतर जावें लागतें व यातना सहन कराव्या लागतात हें खरें नाहीं, असें कोणाला बुद्धिवादाच्या बळावर म्हणावयाचें असेल तर म्हणावें. कारण हा विषय शेवटीं अगदीं थोडा अनुमानाचा आणि पुष्कळसा शब्द प्रामाण्याचाच आहे. कर्मविपाकाचा जो सिद्धांत आपल्या तत्त्वज्ञानानें निश्चितपणें स्वीकारला आहे, त्याचाच हा अनुषंगिक भाग आहे. पुराणासारख्या वाङ्मयामध्यें या नरककल्पनेचा पुष्कळच विस्तार आहे. पण पुराणें ही रोचनार्थ आहेत. त्यामुळें त्यांत अनेक गोष्टी प्रचारासाठीं वा परिणामकारक व्हाव्या म्हणून खुलवून फुलवून सांगितलेल्या असतात, असें बुद्धिवादी मानतात. पुराणांच्या मांडणींचा हा विशेष आहे असें मान्य केलें तरी पुराणें हीं कांहींतरी निराधार अशा असत्य गोष्टींचा पाठपुरावा करतात असें मात्र म्हणूं नये. आपल्या तत्त्वज्ञानांतील शास्त्रीय सिद्धांतच पुराणांनीं सर्वसामान्य लोकांनांहि पटावेत अशासाठीं आकर्षकपणें, परिणामकारक रीतीनें सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. पुराणें रंगवून सांगतात पण खोटें सांगत नाहींत. त्यांतील सारसिद्धांत प्रामाणिक असतो, सत्यच असतो.

पुराणांचा विषय बाजूला ठेवला तरी उपनिषदांसारख्या तत्त्वज्ञानाचा विचार गंभीरपणें करणाऱ्या अतिप्राचीन वाङ्मयांत आणि त्याच योग्यतेच्या महर्षि व्यासांनीं रचलेल्या ब्रह्मसूत्रांत पातकी जीवाला मरणोत्तर नरकवास भोगावा लागतो असें वर्णन आलेले आहे. **''संयमने त्वनुभूयेतरेषां आरोहावरोहौ तद्गतिदर्शनात्''** (३-१-१३) या व यापुढील तीन सूत्रांत हा नरकाचा विषय स्पष्टपणें मांडलेला आहे. कठोपनिषदांतहि उन्मत्त झालेले मूर्ख लोक पुन: पुन्हां यमाच्या तावडींत सांपडतात, असा विचार मांडला गेला आहे. (कठ-२-६) भगवान् शंकराचार्यांनींहि **''आत्मज्ञानविहीना मूढाः ते पच्यन्ते नरकनिगूढाः''** असे सांगितलें आहे आणि

उलट **''सकृदपि येन मुरारिसमर्चा क्रियते तस्य यमेन न चर्चा''** असे आश्वासन दिलें आहे. ज्ञानेश्वरमहाराजांनींहि अनेक संदर्भांत नरकाचा उल्लेख केला असून १३ व्या अध्यायांत अज्ञानाचें वर्णन करतांना ज्ञानोबाराय म्हणतात ''परि पाप मज होईल । कां नरकयातना येईल । हें कांहींच पुढील । देखे ना जो ।। तयाचेंनि आंगलगें । अज्ञान जगीं दाटुगें । जें सज्ञानाहि संगें । झोंबों सके ।। (१३।७७९-८०) ज्ञानेश्वरमहाराजांनीं येथें अलीकडच्या बुद्धिवाद्यांच्या विचारसरणीचाच जणूं उल्लेख केला आहे.

तात्पर्य हें की नरकाची कल्पना ही तुच्छ मानून फेंकून देण्यासारखी नाहीं. तिला कांहीं गंभीर अर्थ आहे आणि आपलें हित असावें असें वाटणाऱ्यांनीं तरी जीवनाच्या उपयोगाचा म्हणून त्यासंबंधी विचार केला पाहिजे.

उपनिषदांतील द्रष्टे ऋषि, महर्षि व्यास, श्रीशंकराचार्य, श्रीज्ञानोबाराय हे महापुरुष प्रज्ञेचे महासागर आणि पांडित्याचे हिमालय आहेत. त्यांच्यासमोर तथाकथित बुद्धिवादानें अहंकार न मिरवितां विनम्र भाव धारण करणेंच शोभेल. विज्ञानाला मान्यता देणाऱ्यानें नास्तिकवादी असलेंच पाहिजे असें समजण्याचें कारण नाहीं. कांहीं सुखसाधनें उपलब्ध होत असल्यानें जीवनांत विज्ञानाचा उपयोग आहे. यासाठीं विवाद असण्याचें कारणच नाहीं. विज्ञानाला मर्यादा आहे. तें समृद्धि निर्माण करील पण ती समृद्धि शापित असण्याची शक्यता आहे, नव्हे समृद्ध राष्ट्रांतील प्रत्यक्ष अनुभव तसा आहे. विज्ञानानें निर्माण केलेल्या सुखी जीवनांतील रिकामा वेळ, माणसाच्या मनांत अनेक प्रकारच्या विकृति निर्माण करतो हा अनुभव, आतां अनेक प्रगत देशांत, विचारवंतांच्या डोकेदुखीचा आणि राष्ट्रापुढील गंभीर समस्येचा विषय झाला आहे. या विकृतीनें लहान बालकेंहि पछाडलीं जात आहेत आणि त्यामुळें सामाजिक जीवन हें सर्व प्रकारची समृद्धि असूनहि संघर्षमय, भयग्रस्त आणि अस्वस्थ झालें आहे.

नरकाविषयींच्या अश्रद्धेनें जणूं मानवसमाजावर हा सूड उगवला आहे. तिनें इहलोकींच्या समृद्ध जीवनालाच अस्वस्थता व अशांततेच्या रूपानें नरकवासाची कळा आणली आहे. यांतून सुटावयाचें असेल तर तत्त्वज्ञानानें दाखविलेल्या, धर्मशास्त्रानें आखून दिलेल्या, संतांनीं उपदेशिलेल्या आणि थोर पुरुषांनीं आचरिलेल्या मार्गानेंच जावयास पाहिजे.

ईश्वरनिष्ठा, विहित कर्तव्याचें पालन, सदाचरण हाच तो मार्ग होय. नामस्मरण ही या मार्गावरच्या वाटसरूची शिदोरी आहे. तिचा अनादर करणें योग्य नव्हे. म्हणून समर्थ पुन्हां एकदां अत्यंत आदरानें नाम घ्या असें सांगत आहेत. समर्थ फार व्यवहारवादी आहेत. ते नाम प्रेमानें घ्या असें फारसें म्हणत नाहींत. कारण



प्रेम काय किंवा भक्ति काय हे भाव उत्पन्न होणें कोणाच्या स्वाधीन नाहीं. तें बळानें निर्माण करतां येत नाहींत. पूर्वसुकृत, संतसंगति आणि ईश्वरीकृपा यांचें पाठबळ त्यासाठीं असावें लागतें. प्रेमाची ज्योत मोठी अद्‌भुत आहे. ती स्वप्रयत्नानें पेटविताहि येत नाहीं आणि विझविताहि येत नाहीं. त्यासाठीं अगतिक होऊन अनन्यभावानें प्रार्थना करणें एवढेंच फार तर माणसाच्या स्वाधीन राहते. आदराचें तसें नाहीं. तो बाळगता येतो, ठेवतां येतो, आणि दाखवितांहि येतो. आपल्या धर्मांतील शिष्टाचारांत यासाठींच आदर दाखविण्याचें कांहीं नियम सांगितले गेले आहेत. स्वच्छता, शुद्धता, सत्कार, विनय, नम्रता यापद्धतीने तो दाखवितां येतो, आणि वाढवितांहि येतो. नामस्मरणाविषयीं हीच भावना ठेवावी. मनांतून प्रेम उत्पन्न होणें सोपें नाहीं आणि त्याचा फारसा आग्रहहि धरूं नये, मुखानें यथावसर, यथाशक्ति प्रामाणिकपणें देवाचें नांव घेत जावे. या अभ्यासाचा परिणाम जीवनावर निश्चितपणें होतो. कार्यक्षमता वाढतें. विवेक जागृत होतो, आसक्ति उणावतें, कामक्रोध इत्यादि विकारांचें बळ तुटते. निराशा, अस्वस्थता, विफलता दूर राहू लागतात. जीवन समाधानी, आनंदी होऊं लागतें. संतोष घर हुडकीत येतो. प्रसन्नता प्रसन्न होते. आणि हें सर्व न कळत होते, विनायास होतें. देवाचे नांव तोंडानें उच्चारले म्हणजे दोष स्वभावत: नाहीसें होतात असें समर्थांनीं यासाठींच म्हटलें आहे.

नामाचें सामर्थ्य वस्तुतंत्र आहे. कर्त्याच्या पात्रतेचा वा कौशल्याचा तेथें विशेष संबंध नाहीं. आपल्याला सुधारावयाचें आहे, दोष समजले आहेत तें टाळावयाचें आहेत, एवढें सामान्यपणें लक्षांत ठेवून नामस्मरण केलें तरी त्याचा लाभ हळूहळू, क्रमाक्रमानें पण निश्चितपणें होत जातो. बुद्धिपुरस्सर अवहेलना करूं नये. नाम घेतो आहे, आता पुन्हां पुन्हां पातके करीत राहिलें तरी काय भय आहे असें मानूं नये आणि आळस बाळगूं नये. एवढे संभाळलें म्हणजे झालें. इतर गोष्टींची दक्षता नाम स्वत:च घेईल.

**अती लीनता सर्व भावें स्वभावें ।**
**जना सज्जनालागि संतोषवावें ।।**
**देहे कारणीं सर्व लावीत जावे ।**
**सगूणीं अती आदरेंसी भजावें ।।१०२।।**

माणसांचें जीवन उन्नत कशानें होईल? त्याच्या आध्यात्मिक प्रगतींचा मार्ग कोणता ते समर्थ रामदासस्वामी या श्लोकांत सांगत आहेत. माणसानें विनयी असावें, नम्र असावें, अतिशय लीनतेनें वागावें. ही लीनता सर्वदृष्टींनी, सर्व

ठिकाणी असावी, आणि ती स्वभावानें असावी, पोटातून असावी. सोयीसाठीं दाखविण्याचा प्रकार तेथें नसावा. लीनता हा गुण महत्त्वाचा खरा पण दुर्मिळ आहे. त्याचा प्रामाणिक आविष्कार फारच क्वचित् आढळतो. स्वार्थासाठीं दुसऱ्याला प्रसन्न करण्याचे वा लोकप्रियता मिळविण्याचें एक साधन म्हणून माणसें लीनतेचा देखावा करतात. कमरेत वाकतात, हात जोडतात. मस्तक नमवितात, भेटीचें समाधान दाखविणारें उपरें हास्य ओठांवर आणतात, समोरच्यांची तोंडभरून स्तुति करतात, सत्कारपूर्वक मानपत्र अर्पिण्याचा समारंभहि होतो; पण हें सर्व वरवरचें असतें. सहेतुक असते. माणसाचा अहंकार आंत फार जागृत असतो आणि त्यामुळें स्वत:शिवाय दुसऱ्याला मोठे मानावयास मनापासून कुणी सिद्ध नसते.

जवळ विशेष कांहीं नसतानाहि ही स्थिति असते. मग ज्याच्याजवळ कला-कौशल्य, साहित्य, वक्तृत्व, विद्वत्ता, बुद्धिमत्ता, शक्ति, सत्ता, संपत्ति, सौंदर्य यांतील कांहीं असेल त्यांचें तर पहावयासच नको. ज्यांच्याजवळ कांहीं नाहीं त्यांची नम्रता ही एक प्रकारची लाचारी आहे. त्यांत कांहीं विशेष नाहीं, भूषण नाहीं. ज्यांच्याजवळ कांहीं आहे ते विनयी असतील तर तें खरें. परमेश्वर कशानें भेटतो ते सांगतांना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात- ''म्हणोनि थोरपण पऱ्हांचि सांडिजें। व्युत्पत्ति आघवी विसरिजे । जै जगा धाकुटें होईजे । तै जवळिक माझी ॥ (ज्ञा. ९।३७८). थोरपण, सद्गुणाच्या बळावर प्राप्त होणारा खरा लौकिक असला पाहिजे, पण तो दूर सारला पाहिजे. व्युत्पत्ति, विद्वत्ता असली पाहिजे, पण ती विसरली पाहिजे. मी म्हणजे कुणी विशेष आहे असें न वाटतां जगांतील वस्तुमात्रापुढें खऱ्या भावनेनें नम्र होता आलें पाहिजे. तरच परमात्मा भेटतो असे श्रीज्ञानोबाराय म्हणतात.

ही खरी नम्रता मोठी शक्तिशाली असते. कोणत्याहि अभिचार मंत्रापेक्षां तिचें वशीकरण सामर्थ्य फार मोठें असतें. गुणग्राहकता, प्रशंसा, स्तुति, हीं या लीनतेचीं बाह्यलक्षणें होत. मात्र त्यांचा उपयोग खऱ्या गुणग्राहकतेनें, नि:स्वार्थपणें सज्जनांना संतुष्ट करण्याकडे व्हावा. एका नाटकाविषयीं एका संपादकानें अत्यंत प्रतिकूल मत प्रत्यक्ष भेटींत व्यक्त केलें. पण त्यांच्या वृत्तपत्रांत मात्र चार स्तंभ भरून त्याच नाटकाची प्रशंसा प्रसिद्ध झाली होती. मी विचारले-अहो! हें कसे? ते म्हणाले-ही व्यवसायाची बांधिलकी आहे. आठ वेळां त्या नाटकाची जाहिरात करण्याचे पैसे आगाऊच मिळाले आहेत. व्यवहार हा असा चालतो. ''**चलनाहि बडा मुश्किल है गाढे दोनों काम । सांचेमें तो जग नहीं झूठा मिले न राम ।।**'' खरी उन्नति लाभावी अशी जर इच्छा असेल तर माणसानें सज्जन



मंडळीं संतुष्ट व्हावींत याच दृष्टीनें आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. ती. दादांनीं, ''संतोष संभावित सज्जनांचा । वक्तृत्वानें साधणें साचा । हलकटांच्या वाहवाचा । बाळा लोभ धरूं नको ॥'' असाच आदेश कीर्तनप्रवचनाचे नियम सांगतांना दिला आहे.

ज्यानें संतुष्ट करावयाचें तोहि स्वार्थी आणि ज्यांना संतुष्ट करावयाचें तेहि स्वार्थी; आतां तेथें सर्व खोटेपणाच भरलेला राहील यांत नवल काय? चांगल्यांना संतुष्ट करावयाचें असेल तर आपण आधीं चांगलें असलें पाहिजें. जीं माणसें खरींच सज्जन आहेत त्यांचा संतोष लाळघोटेपणा, हांजीहांजी, पुढें पुढें करणें, लांगूलचालन, भाट होणें यांनीं मिळत नसतो. सज्जन माणसें नि:स्पृह असतात. त्यांना केवळ सद्गुणांची आणि सदाचरणाचीच चाड असते. तेव्हां त्यांना संतुष्ट करण्यासाठीं वर्तन खरेंच चांगलें असावें लागतें. सत्ता त्यांना वाकवूं शकत नाही, संपत्ती त्यांना मोहवू शकत नाही. स्तुति त्यांना भुलवू शकत नाहीं.

निष्काम बुद्धीनें केलेली सेवा मात्र सज्जनांना संतोषवूं शकते. म्हणून समर्थ म्हणतात- ''देहेकारणीं सर्व लावीत जावे.'' सर्व कारणीं सर्वांच्या कामासाठीं, शरीर कष्टवीत जावें. शरीर हें माणसाचा एक नोकर आहे, एक साधन आहे. त्याला सुखासीन होऊं न देणें हें स्वत:च्या आरोग्याच्या दृष्टीनेंहि श्रेयस्कर आहे. नानाप्रकारच्या कामांमध्यें शरीराला गुंतवून ठेवणें हें मनबुद्धीच्या स्वास्थ्याच्या दृष्टिनेंहि हितकरच आहे. तेव्हां आजच्या भाषेंत ज्याला समाजाच्या सेवेचीं कामें म्हणतात अशीं परोपकारीं कृत्यें शरीरानें झटून करावी. निरनिराळ्या धार्मिक वा सामाजिक कामांमध्यें माणूसबळाची फार आवश्यकता असते. अशा कार्यांत अंग मोडून राबावें. अमुक एक काम प्रतिष्ठेचें आणि अमुक एक काम हीनता आणणारें असें कधींहि न मानतां जें वाट्यास येईल आणि जें आपणांस शक्य असेल तें आळस सोडून झटून करावें, दक्षतेनें करावें. भगवान् श्रीकृष्णानें धर्मराजाच्या राजसूय यज्ञांत उष्टीं काढलीं होतीं. तो आदर्श प्रत्येकानें डोळ्यापुढें ठेवावा आणि या प्रकारच्या सेवेंतून कशाचीहि अपेक्षा नसावी. न मानाची, न धनाची, न कौतुकाची. अशी अपेक्षा धरून कामें करणें ही सेवा नसून तो व्यापार आहे, धंदा आहे. ते परमार्थाचें साधन कधींहि होऊं शकणार नाहीं. उलट निष्काम भावनेनें काम करणें हे शारीरिक तप ठरेल. मग त्यांचें स्वरूप परिस्थितीप्रमाणें वा प्रकृतिभेदानें कोणतेंहि असू शकेल. आज ज्यांना समाजसेवा म्हणतात त्याप्रकारचीं कामें संतांनीं नाकारलीं नाहींत. ''अथवा प्रवासें कां पीडा । कां शिणले जे सांकडा । ते जीव सुरवाडा । आणिजती ॥'' (ज्ञाने. १७।२०५) या ज्ञानोबारायांच्या ओवींत सर्व प्रकारच्या समाजसेवेचा उल्लेख आहे असें म्हणतां येईल. धार्मिक

परंपरेंत रूढ असलेलीं यज्ञयाग, उत्सव-महोत्सव, देवपूजा, देवालयाची व्यवस्था, आईवडिलांना सुख देणें, सद्‌गुरूची वा संतांची सेवा करणें, इत्यादि कामें देह कारणी लावण्याच्या दृष्टीनें, विचारांत घेण्यासारखीं आहेत. आपल्या शक्त्यनुसार प्रामाणिकपणें ती करावींत.

ही सेवा प्रत्यक्ष घडली पाहिजे. शरीर त्या त्या कामीं वस्तुत: राबले पाहिजे. मनांत असलें म्हणजे झालें, मनानें करणेंच फार महत्त्वाचें आहे, असें म्हणून शरीराला कष्ट देणें टाळलें जातें. देहाचे श्रम वाचविले जातात. इंद्रियव्यापारांनाहि महत्त्व आहे हें दुर्लक्षिलें जातें. तसें होऊं नये म्हणून समर्थ ''सगूणीं अति आदरेसी भजावे'' असें म्हणतात.

मानसपूजाभ्यास श्रेष्ठ खरा, पण तो खऱ्या अर्थानें साधण्याकरितां साधकाची पुष्कळच प्रगति झालेली असावी लागते. मन गुंतून राहणें आणि एकाग्र होणें यासाठीं त्याचा उपयोग होतो. पण शरीर कष्टविणें आळसानें नको वाटते. सुखासीनतेचा मोह सोडवत नाहीं. आणि धार्मिक कृत्यासाठीं साधन-सामग्री जमवतांना जें धन वेचावें लागतें तें स्वाभाविकपणें वांचतें आणि मग तें चैनीसाठीं अधिक प्रमाणांत वापरतां येतें, म्हणून मानसपूजा कोणी करीत असेल तर तो दंभाचार ठरेल. तेव्हा संतरूपानें, सद्‌गुरुरूपानें, पूजनीय व्यक्तींच्या रूपानें वा आराध्य देवतेच्या मूर्ति इत्यादि प्रतीकानें, आपलें दैवत निवडून घ्यावें आणि त्याची अतिशय आदरानें, नम्रतेनें भागवाभागवी न करतां, नाना प्रकारांनीं सेवा करावी.

मनबुद्धीला वळण लावण्यासाठीं आधीं इंद्रियांना वळण लावावें लागतें आणि त्यासाठीं शरीराच्या प्रत्यक्ष हालचालींना महत्त्व असतें. आपल्याकडे आदरसत्काराची वा पूजा-अर्चेचीं कामें करावींत असें यासाठींच सांगितलें आहे. त्यात अधार्मिकता शिरली; तें नुसतें कर्मकांड झालें; त्यांतहि पळवाटा शोधल्या गेल्या, हें खरें, पण त्याच्या कंटाळ्यानें मूळ कृत्यच टाकून देणे इष्ट नाहीं. ऐकतों आहे, पाहतों आहे, देतों आहे, करतों आहे अशी नुसती कल्पना करण्यापेक्षां शक्य असेल तेव्हां व शक्य असेल तितकें ऐकणें, पाहणें, देणें, करणें, हें अधिक महत्त्वाचें आहे, तें टाळूं नये. निर्गुण निराकारामध्यें मन रमणें ही गोष्ट फार कठिण आहे. तें साधलें आहे असा भ्रम निदान साधकानें तरी बाळगूं नये. सगुणभक्ति हें शरीर, इंद्रियें, मन, बुद्धि यांना चांगलें वळण लावण्याचें सर्वश्रेष्ठ साधन आहे. तिच्याकडे पाठ फिरविणें हें आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे. ''मुक्त क्रिया प्रतिपादी । सगुणभक्ति उच्छेदी । स्वधर्म आणि साधन निंदी । तो एक पढत मूर्ख ॥ नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य



ना भजन । क्रियेवीण बोले ब्रह्मज्ञान । तो एक पढत मूर्ख ॥'' (दासबोध २।१०) ही समर्थांचीं वचनें साधकानें लक्षांत ठेवलीं पाहिजेत.

**हरिकीर्तनें प्रीति रामीं धरावी ।**
**देहेबुद्धि नीरूपणीं वीसरावी ।।**
**परद्रव्य आणीक कांता परावी ।**
**यदर्थीं मना सांडि जीवीं करावी ।।१०३।।**

सगुण भक्तीमध्यें कीर्तन ही एक महत्त्वाची भक्ति आहे. त्या कीर्तनामुळें स्वत:ची प्रगति होते आणि श्रोत्यांनाहि कल्याणाचा मार्ग दिसूं शकतो. कीर्तनाला महत्त्व आहे तें यामुळेंच. पण या कीर्तनांत ईश्वराविषयीं प्रेम असलें पाहिजे. कीर्तन हें करमणुकीचें स्वस्त साधन बनतां कामा नये ही गोष्ट कीर्तनकारानें आणि श्रोत्यांनीं दोघांनींहि लक्षांत ठेवली पाहिजे. श्रीएकनाथ महाराजांनीं संतांच्या घरची कीर्तनमर्यादा स्पष्टपणें आंखून दिली आहे.

सगुणचरित्रें परम पवित्रें सादर वर्णावीं ।
सज्जनवृंदें मनोभावें आधीं वंदावीं ॥
संतसंगें अंतररंगें नाम बोलावें ।
कीर्तनरंगीं देवासन्निध सुखेंचि डोलावे ॥
भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरां न कराव्या ।
प्रेमभरें वा वैराग्याच्या युक्ति विवराव्या ।
जेणें करूनी मूर्ति ठसावी अंतरीं श्रीहरीची ।
ऐसी कीर्तन मर्यादा आहे संतांच्या घरची ॥

जेणेंकरून श्रीहरीची मूर्ति अंतरंगांत ठसेल असे स्वरूप कीर्तनाचे असले पाहिजे. दुर्दैवानें हे लक्षांत घेतलें जात नाहीं.

माझ्या परिचयाचें एक सज्जन गृहस्थ एका कीर्तनाला गेले, आणि २-२॥ तास खालीं मान घालून बसले. कारण त्या कीर्तनामध्यें आचरट विनोद आणि अश्लील शृंगार यांवांचून दुसरें विशेष कांहीं नव्हतेंच. असें कां बोलतां असें कीर्तनकाराला त्यांनीं नंतर विचारलें– कीर्तनकार पक्का मुरलेला. तो म्हणाला– ''ज्ञानेश्वरींत शृंगार नाहीं काय? स्त्रीसौंदर्याचें लुसलुशित वर्णन त्यांनींहि केलें आहे. ''कीं प्रथमवयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी । प्रगटे जैसी आगळी । अंगनाअंगीं ॥'' (ज्ञाने. १।४२) या ओवींत तें स्पष्ट दिसतें. रामदासस्वामींनींहि ''नाना नव रसिक शृंगारिक । गद्यपद्याचें कौतुक । नाना वचनें प्रास्ताविक । शास्त्राधारें बोलावीं ॥'' असा आदेश दिला आहे. लोकांना तें आवडतें. तुम्हीं

टीका कां करता?'' श्रोताहि स्पष्टवक्ता होता. तो म्हणाला– ''बुवा! ज्ञानेश्वरीच्या ९००० ओव्यांत शृंगारिक म्हणता येतील अशा ९ ओव्याच फार तर सांपडतील, आणि त्याहि अतिशय सभ्य आणि सोज्वळ आहेत. तुमच्या २-२॥ तासांच्या कीर्तनांत पाच-दहा वाक्यें सुद्धां तशीं सोज्वळ नव्हतीं. रामदास स्वामींनीच ''शृंगारिक नवरसिक । यांमध्यें सांडावें एक । स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णू नये कीं ॥'' (दासबोध १४।५) असें म्हटलें आहे. तें तुम्ही लक्षांत घेतलेलें नाहीं. लोकांना आवडते म्हणून काय सांगता ?'' टवाळा आवडे विनोद । उन्मत्तास नाना छंद । तामसास अप्रमाद । गोड वाटे ॥ (दास-७९) असेंहि समर्थ म्हणतात. या आवडी कीर्तनकारांनीं पुरवावयाच्या नाहींत. आमच्या ती. दादांनीं ''नकला विनोद तमाशा । गायनाचा संगीत जलसा । आवडें लोकांच्या मानसा । परी तें पाप कीर्तनीं ॥ नेमस्त गायन करावें । विनोद सभ्य असावे । प्रौढ, गंभीर बोलावें । थिल्लरता न शिवो द्यावी ॥ लोकसंग्रहा लोकरंजन । कांहीं अंशीं अवश्य जाण । परी तें साधायाकारण । आपुली पायरी सोडूं नये ॥ असा उपदेश कीर्तनाच्या संदर्भांत छात्रबोधांत केला आहे.

कीर्तनांत कोणताहि रस वर्ज्य नाहीं हें खरें, पण सर्व रस ईश्वरभक्तीचीं अंगोपांगें असले पाहिजेत, आणि ते कीर्तनाच्या शांत, पवित्र, उदात्त, भूमिकेला शोभले पाहिजेत, पोषक झाले पाहिजेत. पंचपक्वानांच्या जेवणांतील, चटणी-मीठ-कोशिंबिरींसारखे ते असले पाहिजेत. शरीराचे पोषण हा आहाराचा मुख्य उद्देश लक्षांत न घेता केवळ रुचि आणि स्वादाकडे पाहून केलेलें जेवण जसें घातक ठरते, तसेंच ईश्वरभक्ति हा मुख्य विषय लक्षांत न घेता केलेल्या कीर्तनाचे होतें. कीर्तनाला जाणारांनीहि हे विसरता कामा नये. **''केनापि गीयमाने हरिगीते वेणुनादे वा । आनन्दाविर्भावो युगपत्स्यादष्टसात्त्विकोद्रेकः ।।''** असे श्रीशंकराचार्यांनीं प्रबोधसुधाकरामध्यें श्रोत्यांच्यासाठीं सांगितलें आहे. प्रेम ईश्वराच्या लीला ऐकण्याचें असावें, संतकथा ऐकण्याचें असावें, सांगणारा कोण आहे आणि तो कशा पद्धतीने सांगतो आहे याला श्रोत्यांनीं महत्त्व देऊं नये. कळावें, पटावें, ठसावें, आचरणांत उतरावें, म्हणून कीर्तन ऐकावयाचे असतें. आरंभीं आरंभीं ऐकावेसें वाटावें म्हणून रंजकतेचाहि अवलंब केला जातो. पण श्रवणाची भूक खरी असली पाहिजे. हें फार महत्त्वाचें आहे. खरी भूक चवीकडे लक्ष देत नाहीं, खोड्या काढीत नाहीं, अमुकच हवें असा हट्ट धरीत नाहीं. कीर्तनविषयांत तसेंच असावें.

ईश्वराच्या आणि ईश्वरनिष्ठांच्या कथा ऐकत असतांना मन रमून गेलें पाहिजे. सर्वांगाचे कान करून ऐकावें अशी ओढ निर्माण झाली पाहिजे, ऐकतांना हृदय उचंबळून आलें पाहिजे, वेळेचें भान सुटलें पाहिजे. ''कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरूप ।'' अशी अनुभूति आली पाहिजे. हें एकदम होणार नाहीं हें खरें. पण इच्छेची आणि प्रयत्नाची दिशा तीच असावी. नारदीय पद्धतींतील पूर्वरंगाचा उद्देश हाच असतो. वारकरी पद्धतीचें तेंच एकमात्र वैशिष्ट्य आहे. म्हणून नारदीय पद्धतीच्या पूर्वरंगाला आणि वारकरी कीर्तनाला 'निरूपण' हें नांव दिलें जातें.



माणसाच्या अंत:करणांत ईश्वराविषयीं प्रेम नसतें. ती ओढ त्याला लागत नाहीं. त्याचें खरें कारण असें कीं मनुष्याची देहबुद्धि फार जागृत असते. शरीराला सुख हवें असतें. इंद्रियें विषयांकडे ओढ घेतात, मन हवें-नकोमध्ये गुंतून राहतें. मानसन्मानाची अभिलाषा उत्कट असते आणि बुद्धीचे प्रयत्न त्या दृष्टीनें अनुकूल मार्ग शोधण्यासाठीं असतात. असेल-नसेल ती सर्व शक्ति याच कामीं वेंचली जाते. सगळा वेळ याच कारणीं लागलेला असतो. मी आणि माझें यापलीकडे विचार करण्यास कुणाला जणूं सवड नसते हीच देहबुद्धि. हिची पकड ढिली झाल्यावांचून ईश्वराविषयींचें प्रेम निर्माण होऊं शकत नाहीं. टणक, कठिण भूमींत बीज अंकुरत नाहीं तसेंच हे आहे. शेत नांगरून भुसभुशीत करावें लागतें. हें काम निरूपण करतें.

मी कोण? त्याचें स्वरूप काय? देह कसा आहे? अंत:करण म्हणजे काय? मी आणि माझें, ही भावना कां निर्माण होते? सृष्टीचें स्वरूप काय? तिचा कर्ता नियंता कोण? त्याचा माझ्याशीं काय संबंध? जगतांमध्यें माझें स्थान काय? कामक्रोधादि विकार कां बळावतात? त्यांना मर्यादा कां असली पाहिजे? सदाचरण कसें असतें? त्याचा अवलंब कां करावा? स्वैरवर्तन हिताचें कां नाहीं? इत्यादि विषय निरुपणांतून चर्चिले जातात. वक्ता अनुभवी, जाणता आणि श्रोता अवधान देऊन ऐकणारा व विचार करणारा असला म्हणजे मग त्याला एकेक गोष्ट उमगूं लागते, उदाहरणांनीं पटते, विवेकानें ठसते, निष्ठेनें आचरणांत उतरूं लागते. देहधारण हें साध्य नाहीं, साधन आहे, अवखळ इंद्रियांना संयमाचें बंधन असलें पाहिजे, मन हें विकारांच्या हातचें खेळणें बनतां कामा नये. बुद्धीला नेमके हिताचें आणि स्थिर निर्णय घेतां आले पाहिजेत. हें कळलें आणि वळलें कीं मग देहबुद्धि उरत नाहीं. अंत:करणाच्या क्षितिजावर ईश्वरी प्रेमाचा पूर्णचंद्र उगवतो आणि त्याच्या आल्हाददायक प्रकाशांत, साधक, जीवनांतील सुख-समाधान आणि वृत्तींची प्रसन्नता अनुभवू शकतो. कीर्तनांतील निरूपणानें हें व्हावें अशी समर्थांची अपेक्षा आहे.

देहबुद्धि सुटण्याच्या दृष्टीनें, समर्थ, वस्तुत: कोणालाहि शक्य असलेला एक साधा पण महत्त्वाचा उपाय सांगत आहेत. रामदासस्वामी म्हणतात-परद्रव्य आणि परस्त्री यांच्या विषयींची अभिलाषाहि अंत:करणांत येऊं देऊं नका.

धन मिळवूंच नये, न्याय्य-मार्गानें मिळणारे विषयोपभोग घेऊंच नयेत, संसारांत रमूं नये, बायको टाकावी असें समर्थ सांगत नाहींत. तसें सांगण्याची आवश्यकताहि नसते. उपभोगाच्या अतिरेकानें झालेलें अजीर्ण नाहींसे व्हावें म्हणून पथ्य सांगावें लागलें तर तो भाग निराळा. देहधारणेसाठीं प्रकृतिभेदानें उण्याअधिक प्रमाणांत विषयांचें सेवन करावें लागतें. त्यामुळें शरीराचें रक्षण होतें. मनाला प्रसन्नता लाभते. न्यायनीतीची मर्यादा ही त्यासाठींच निर्माण झाली आहे. संतमहंतांची तिला मान्यता आहे. त्यांनीं नाकारली आहे ती आसक्ति. निषेध केला आहे तो अतिरेकाचा. त्यांना त्याज्य वाटते ती स्वैरता.

परद्रव्य आणि परस्त्री यांच्याविषयीं सांगतांना प्रत्येक मनुष्य उघड उघड चोऱ्या करतो, दरोडे घालतो, किंवा व्यभिचाराचें जीवन जगतो असें संतांनीं गृहीत धरलेलें नाहीं. कारण हें असें दुर्वर्तन शरीरानें प्रत्यक्ष घडतें अशीं माणसें फार थोडीं असतात. ती इच्छा, तशी संधी व तेवढी शक्ति सर्वांना नसते हें उघडच आहे. बहुसंख्य माणसें सामान्यतः सज्जनच असतात. शरीरानें दुर्वर्तन करीत नाहींत, कारण सदाचरणाची, नीतिन्यायाची, त्यांना चाड असते. समाजाचा धाक तीं बाळगतात. त्यामुळें शरीर पवित्र राहतें. व्यवहाराच्या दृष्टीनें हें योग्य आहे आणि आवश्यकहि आहे. संतांची अपेक्षा यापेक्षां अधिक आहे. ती थोडी सूक्ष्म आहे. परद्रव्य आणि परस्त्री यांच्याविषयीं अभिलाषा मनांतहि येतां कामा नये, तरच परमार्थमार्गांत प्रवेश करण्याचा अधिकार प्राप्त होईल, असें संतांना सांगावयाचें असतें. अशी अभिलाषा जेव्हां अंकुरते, वाढते, क्रमानें बळावते, तेव्हांच पातकें जन्मास येतात. म्हणून सावध राहावें लागतें.

असे विचार आमच्या मनांतहि येत नाहींत असें म्हणण्याचें धाडस सामान्यांनीं सहसा करूं नये. तो अधिकार केवळ संतांचा आहे. इतरांनीं तसें म्हणणें वा मानणें अज्ञानाचें तरी आहे किंवा दांभिकतेचें तरी आहे. जर तसें खरेंच असतें तर स्वतःच्या संसारात माणसें सुखी आणि संतुष्ट दिसलीं असतीं. मिळालें तेवढें धन पुरेसें वाटत नाहीं, मिळाली ती बायको चांगली वाटत नाही. बाकी सगळें चांगलें असलें तरी जणूं लग्न होणें हाच एक दोष ठरतो. दुसऱ्याची बायको चांगली वाटते अशा अर्थाची एक परकीय भाषेंतील म्हण आहे ती मनुष्याच्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकणारी आहे.

चांगल्याला चांगलें म्हणणें, सुंदराला सुंदर म्हणणें, हें जर नाकारावयाचें तर तें रसिकतेला सोडचिठ्ठी देण्यासारखें आहे. असें परस्त्री सुंदर वाटण्याच्या मनोवृत्तीचें समर्थन कांहीं लोक करतात. तें खरें नाहीं. सुंदराला सुंदर म्हणण्यांत कांहींच दोष नाहीं. सौंदर्य कळण्यासाठीं रसिकता हवी असते हें निश्चितच. पण वस्तूचें सौंदर्य



जाणवतांच ती वस्तु मला प्राप्त व्हावी, असें वाटूं लागतें त्याचें काय? जपावें लागतें तें याला. म्हणून तर समर्थ ''परद्रव्य आणीक कांता परावी । येदर्थीं मना सांडि जीवीं करावी ॥'' असें निक्षून सांगत आहेत.

परद्रव्याविषयींचा विचार मागें नवव्या श्लोकावरील विवरणांत आलेला आहे.

परद्रव्य आणि परस्त्री यांच्याविषयींची अभिलाषा अंतःकरणांत निर्माण झालीच नाहीं, कीं आसक्तीचें एक क्षेत्र जिंकल्यासारखें होतें. विषयोपभोगाची जी ओढ असते तिचा पुरवठा तुटतो, बळ घटतें, शत्रुसैन्याची रसद तोडणें हा युद्ध जिंकण्याचा एक महत्त्वाचा मार्ग असल्याचें युद्धशास्त्र सांगतें. तेंच येथेंहि होतें. कारण यामुळें आहे त्यांत संतोष मानण्यास शिकावें लागतें आणि मग विषयोपभोगांतील हितकरतेची मर्यादा ही स्पष्टपणें लक्षांत येऊं लागते.

**क्रियेवीण नानापरीं बोलिजेतें ।**
**परी चीत दुश्चीत तें लाजवीतें ।।**
**मना कल्पना धीट सैराट धांवे ।**
**तया मानवा देव कैसेनि पावे ।।१०४।।**

समर्थांचा स्पष्टवक्तेपणा या श्लोकांत चांगल्या रीतीनें व्यक्त होतो. देव आहे या कल्पनेवर माणसाचा विश्वास असतो. देव भेटला तर हवा असतो, कांहीं थोडे त्या दृष्टीनें प्रयत्नशीलहि असतात, आणि तरी देव त्यांना भेटत नाहीं ही वस्तुस्थिती असते. त्याची कारण मीमांसा समर्थ या श्लोकांत करीत आहेत.

देवाचा अनुभव नाहीं म्हणून देव नाहीं असे म्हणणारे पुष्कळच आहेत, पण त्यांचे हे विचार अगदीं उथळ असतात. प्रत्यक्षवादाचें तत्त्वज्ञान उभें करणें वाटतें तेवढें सोपे नाहीं. कशावरहि श्रद्धा नसलेला असा शंभरीं शंभर नास्तिक माणूस अजून जन्मास यावयाचा आहे. एक चार्वाक तेवढा प्रत्यक्षवादी होऊन गेला, आणि त्यामुळें तो आकाश महाभूत मानीत नसे. पृथ्वी, आप, तेज, वायु ही चारच भूतें तो मानी. कारण प्रत्यक्षाच्या व्याख्येप्रमाणें आकाशाचें प्रत्यक्ष होऊच शकत नाहीं, म्हणून तें नाहीं असें त्यांचें मत होतें. प्रत्यक्षवाद स्वीकारला कीं चार्वाकाचें हें मत त्याच्याशीं प्रामाणिक आहे. पण आजच्या कांहीं बुद्धिवाद्यांनीं चार्वाकाचा हा प्रत्यक्षवाद व्यवहारांत अंगाशीं येतो म्हणून चार्वाकाचें प्रत्यक्ष हें व्यापक प्रत्यक्ष होतें, कांहीं प्रमाणांत अनुमानाचाहि त्यांत समावेश होता, वेदान्त्यांनीं चार्वाकाचें खंडण करणें सोयीचें जावें म्हणून, प्रत्यक्ष कल्पनेचा बुद्धिपुरस्सर संकोच केला आहे, आणि चार्वाक खरा काय होता तें समजूं नये म्हणून त्याचे ग्रंथ नष्ट केले आहेत असा बिनबुडाचा आरोप कुटिलपणें केला आहे. केवळ

प्रत्यक्षवादी राहतां येत नाहीं म्हणून प्रत्यक्षवादाचें तत्त्वज्ञान सिद्ध करण्यासाठीं वापरलेली ही फसवी युक्ति आहे.

सत्य जाणून घ्यावयाचें असेल, जीवनांत नीट जगावयाचें असेल तर, प्रत्यक्ष अनुमान आणि शब्द या तिन्हीं प्रमाणांचा स्वीकार करावाच लागतो. प्रत्यक्ष प्रामाणिक असावें लागतें, अनुमान यथार्थ असणे आवश्यक आहे आणि शब्द विश्वसनीय असला पाहिजे, यांत वाद नाहीं. त्यासाठीं हीं प्रमाणें मानणारांनीं पुष्कळ शास्त्रार्थ केलेला आहे. केवळ प्रत्यक्ष मानावयाचें ठरविलें तर आज आपणा सर्वांना मान्य असलेलीं अनेक शास्त्रीय सत्यें नाकारावीं लागतील. सूर्यमालेपुरता विचार करतां सूर्य स्थिर आहे आणि पृथ्वी फिरते हाच खगोलशास्त्राचा सिद्धान्त आहे, पण तसा अनुभव कोणालाहि नाहीं. अनुभव आहे तो पृथ्वी स्थिर व सूर्य फिरतो हाच. आतां केवळ प्रत्यक्ष प्रमाणाचें काय करावयाचें? या अशा अडचणींमुळेंच चार्वाकाचे तत्त्वज्ञान मान्य आहे असें मानणारा फार मोठा अनुयायी वर्ग चार्वाकाला मिळालेला नाहीं, तरी व्यवहारत: ९० टक्के लोक चार्वाकमतानुयायीच आहेत अशी टीप केतकरांनीं ज्ञानकोशांत दिली आहे, ती फार मार्मिक आहे.

ईश्वर आहे हें कुणी अमान्य करीत नाहीं पण त्याकरितां आवश्यक त्या सदाचरण, न्याय, नीति, संयम, एकाग्रता, पावित्र्य, मनाची शुद्धता या गोष्टी मात्र कोणी प्रत्यक्ष वर्तनांत उतरविण्याचा प्रयत्न करीत नाहीं. ईश्वरप्राप्ति आणि तदनुषंगिक गोष्टी या केवळ गोष्टीच राहतात. तो कीर्तनप्रवचनांचा आणि केवळ श्रवणाचा विषय राहतो. कीर्तन-प्रवचनें व्यवसाय म्हणून होतात आणि थोडे मनोरंजन व्हावे यासाठींच श्रवण घडतें.

**कलौ लुब्धा नरा नार्यो व्यग्राः संसारकर्मणि ।**
**क्षणं क्रीडन्ति विश्रान्त्यै सायं वेदान्तचर्चया ।।**

असें एका पंडितानें फटकळपणें म्हटलें आहे. तो म्हणतो-विषय-सुखाची अत्यंत ओढ असलेले स्त्री-पुरुष (लुब्धा), प्रपंचाच्या ऐहिक गोष्टींतच आपल्या सर्व शक्तीनिशीं गुंतून पडलेले असतात (व्यग्राः), आणि मग संध्याकाळी थोडा वेळ थोडी करमणूक म्हणून, कांहीं विरंगुळा म्हणून (विश्रान्त्यै), वेदान्ताची चर्चा करीत असतात. या कलियुगांत घडतें तें असें (कलौ).

विज्ञानांतील लहान-सहान गोष्टीमागचे नियम कळण्यासाठीं, सत्य आकळण्यासाठीं, फार कष्ट करावे लागतात, अगदी देहभान विसरून एकाग्र व्हावें लागतें. आर्किमिडीज, न्यूटन, मादाम क्यूरी या संशोधकांची चरित्रें या दृष्टीनें लक्षांत घेण्यासारखीं आहेत. या अशा कष्टांनाच आपल्याकडे तप म्हणतात. तप आचरावयाचें तर देहबुद्धि सोडून ध्येयनिष्ठा अंगिकारली पाहिजे. नुसत्या



बोलघेवडेपणाला साध्याची प्राप्ति होण्याच्या दृष्टीनें कांहीं मूल्य नाहीं. परमेश्वर हे तर अत्यंत सूक्ष्म, विज्ञानाच्या दृष्टीनें फार दूरचें, असें परम सत्य आहे. त्याची प्राप्ति सुखलोलुप बोलघेवडेपणानें कशी व्हावयाची?

माणूस नुसतें बोलतो. असे करावे, तसें करावें, हें श्रेष्ठ आहे, हें महत्त्वाचें आहें असे नुसते बोलतो, प्रत्यक्ष करीत नाहीं. याचें कारण मनाला ती ओढ नसते, मन शुद्ध नसतें, प्रसन्न नसतें, एकाग्र नसतें. तें भलभलत्या कल्पनेंत रंगलेलें आणि नको ती धावपळ उगीच करणारें असें असतें. मनाचें व्यापार विचारांत घेतले तर आपलें आपल्यालाच आश्चर्य वाटावे अशी स्थिति होते. **''हृष्टं कदापि रुष्टं शिष्टं दुष्टं च निन्दति स्तौति । चित्तं पिशाचमभवत् राक्षस्या तृष्णया व्याप्तम् ''** ।। हें शंकराचार्यांनीं केलेलें मनाचें वर्णनच समर्थांना दुश्चित आणि सैराट धांवें या शब्दांनीं अभिप्रेत आहे. मनाचे हे व्यापार खरोखरीच त्यांची लाज वाटावी अशा स्वरूपाचे असतात. माणूस चांगला देवघरांत असतो, पूजा करतो, पोथी वाचतो, कीर्तन ऐकतो, तोंडानें स्तोत्रपाठ म्हणत असतो, आणि त्या वेळेला मन मात्र नेमकें नको त्या गोष्टी आठवीत बसतें. बहुतेकांचा हाच अनुभव आहे. नीतीची मर्यादा राखण्यासाठीं, उर्वशीसारख्या त्रैलोक्यसुंदरीला सहजपणें नाकारणाऱ्या, अर्जुनासारख्या थोर महात्म्याचाहि अनुभव असाच आहे. अत्यंत चंचल आणि आडदांड अशा मनाला कसें आवरावें? हा प्रश्न त्यालाहि भेडसावत होता. मग सामान्यांचें काय होत असेल त्याची कल्पनाच केलेली बरी.

त्यादृष्टीनें अहर्निश प्रयत्न केल्यावांचून सर्वस्थळीं, सर्वकाळीं, सर्व दिशांनीं सावध राहण्यावांचून, मनाला योग्य तें वळण लागणें शक्य नाहीं.

कीर्तन-प्रवचनकाराला देव भेटतो हा भ्रम आहे. लोकहि तसें चुकीनें समजतात. बोलतो कसें? सांगतो काय? यापेक्षां, वागतो कसें? करतो काय? हें महत्त्वाचें आहे आणि हें ज्याचें त्याला नेमके समजतें.

ज्याचें मन चंचल आहे, वासना गेल्या नाहींत, वैराग्य बाणलें नाहीं, कामक्रोध आवरले नाहींत, अहंकार उणावला नाहीं, म्हणजेच मन निर्मल, शांत, प्रसन्न झालें नाहीं, त्याचें भाग्य कधीं उदयास येणारच नाहीं, आणि देव भेटण्याची तर शक्यताच नाहीं.

**विवेकें क्रिया आपुली पालटावी ।**
**अती आदरें शुध क्रीया धरावी ।।**
**जनीं बोलण्यासारिखे चाल बापा ।**
**मना कल्पना सोडिं संसारतापा ।।१०५।।**

मनाला आवरण्यासाठीं, मन शुद्ध, शांत, प्रसन्न करण्यासाठीं काय करावें त्याचा उपाय समर्थ रामदासस्वामी या श्लोकांत सांगत आहेत.

अर्जुनासारख्यालाहि मन आवरणें कठीण वाटलें तेथें आमची योग्यता ती काय? कसें जमणार हें आम्हाला? अपयश पदरीं येण्यापेक्षां त्या भानगडींत न पडलेलेंच बरे, असे कोणास वाटेल; पण तसें वाटूं देऊं नये म्हणून आईचे हृदय असलेले, संतजन सर्वांना साधले असे मार्ग दाखवित असतात, उपाय सुचवीत असतात.

योग्यता ही कांहीं आकाशातून पडणारी वा खाणींत सांपडणारी गोष्ट नव्हे. क्रमाक्रमानें, पायरीपायरीनें; प्रयत्नपूर्वक त्या त्या कार्यासाठीं योग्यता प्राप्त करून घेतां येते. ''नावेक विरक्तु । जाहला देवधर्मी नियतु । तरी तोचि नव्हे व्यवस्थितु । अधिकारिया ।।'' (ज्ञा. ६।३४२) असें ज्ञानेश्वरमहाराज सांगतात. आसक्ति सुटत नाहीं आणि इंद्रियांवर नियंत्रण नसतें हें मनाच्या चंचलतेचें कारण आहे. आणि मनाची चंचलता इंद्रियांना अधिकच स्वैर बनविते. एकमेकांपासून पोषण घेत दोन्हीं वाढत असतात. शरीर आवरणें त्यांतल्या त्यांत अधिक शक्य आहे. म्हणून क्रिया पालटण्यावर समर्थांनीं भर दिला आहे. चांगलें काय, वाईट काय, काय करावें, काय करूं नये, याची जाणीव धर्मानें, शास्त्रानें, परंपरेने, रूढीनें, थोरांच्या, वडीलधाऱ्यांच्या उपदेशानें, झालेली असते. पण त्याप्रमाणें वर्तन मात्र घडत नाही. विवेकानें असा पालट बुद्धिपुरस्सर घडवून आणावा लागतो.

बिघडलेली गोष्ट एकदम कधीं सुधारत नसते. कित्येक वेळां एकदम सुधारण्याचा प्रयत्न करणेंहि अनिष्ट ठरतें. विवेकाची आवश्यकता असते ती त्यासाठीं. कित्येक वेळां स्वतंत्रपणें विचार करतां-वा तात्त्विक भूमिकेवरून-एकादी गोष्ट वाईट असते, त्याज्य असते. पण तरी व्यवहारामध्यें वागतांना, तसें वागण्याची सवड ठेवावी लागते, देशकालपरिस्थितीचा, प्रकृति-प्रवृत्तीचा, अनुक्रमानें विचार करावा लागतो. आतांच, लगेच, नाहीं तर कधींच नाहीं, असें प्रत्येक वेळीं म्हणून चालत नाहीं. सगळेंच साधावयाचें असलें तरी तें एकदम कधींच साधत नाहीं हे लक्षांत ठेवावें लागते. विवेक करावा लागतो तो यासाठींच. शरीराला लागलेल्या संवयी व मनाला वाटणारें हवें-नको यांचा बारकाव्यानें विचार करून त्यांतील नको तें क्रमाक्रमानें टाळीत गेलें पाहिजे, इष्ट तें हळू हळू साधीत गेलें पाहिजे. चांगली भूक लागली तरी पानांत वाढलेल्या कढत खिचडींत मध्येंच हात घालून मोठा घांस घेणें इष्ट नसतें; त्यानें बोटे भाजतात व जिभेलाहि चटका बसतो. पानांत वाढलेली खिचडी कडेकडेनें, लहान लहान घास उचलीत, खाणेंच शहाणपणाचें ठरतें. दीर्घकालपर्यंत न घासलेलीं तांब्यापितळेचीं भांडीं एका घासण्यानें स्वच्छ होत नसतात. पाऱ्यांतील अशुद्धें काढून टाकण्यासाठीं त्याचें तीन वेळां ऊर्ध्वपातन



करावें लागतें. काय करावयाचें आहे हें निश्चित झालें तरी तें कसें करावें, कुठें करावें, किती करावें, केव्हां करावें याचें तारतम्य बाळगावेंच लागतें. हाच विवेक.

कंटाळा, आळस हा जसा चांगला नाहीं, तसा अत्युत्साहहि चांगला नाहीं. दीर्घसूत्रीपणा टाळणें जसें आवश्यक आणि हिताचें त्याप्रमाणेंच फार घाई करणे घातक हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. कितीही भूक लागली तरी अन्न घांसाघासानें खावें लागतें, कितीहि तहान लागली तरी पाणी घोटाघोटानें प्यावें लागतें. आणिकहि एक गोष्ट लक्षांत ठेवावी लागतें. करणें आणि न करणें, स्वीकारणें आणि टाकणें हें आपली स्वत:ची परिस्थिति, प्रकृति, पाहून ठरवावें लागतें. दुसऱ्याचें पाहून, तसें वागून चालत नाहीं. क्रिया पालटावी लागते, व्यसनें सोडावीं लागतात. दुर्वर्तन टाळलें पाहिजे. स्वैर वागणें चांगलें नाहीं, हें खरेंच, पण त्यासाठीं सर्वदृष्टीनें स्वत:चा विचार करावा लागतो. दुसऱ्याचें उदाहरण केवळ प्रेरक म्हणून उपयोगी पडतें. हें सर्व लक्षांत ठेवून वागणें म्हणजेच विवेक करणें होय.

पालटामागची प्रेरणा ही जें चांगलें म्हणून वाटतें, त्याच्याविषयींच्या आदरानें निर्माण होते आणि मग जें चांगलें, जें श्रेष्ठ, जें शुद्ध, जें पवित्र, तें क्रमाक्रमानें वर्तनांत मुरवीत गेले पाहिजे.

विषयोपभोग घ्यावयाचा तो आरोग्यशास्त्र लक्षांत ठेवून, शरीरधारणेच्या दृष्टीनें घेतला पाहिजे. व्यवहार-धंदा करतांना आपल्यापासून कोणाला कष्ट होणार नाहींत, कोणाची गांजणूक होणार नाहीं, कोणी लुबाडला जाणार नाहीं, कोणी फसविला जाणार नाहीं, याची दक्षता घेतली पाहिजे. पूजापाठ करतांना ते प्रेमानें व निष्ठेनें केले पाहिजेत. दानधर्म करतांना प्रामाणिकपणें उदार असलें पाहिजे. सामाजिक कामें करतांना स्वार्थाला दूर सारलें पाहिजे. कुटुंबात वागतांना सरळपणा नि कर्तव्यबुद्धि ठेवली पाहिजे. स्वाभिमानी असावें पण अहंकारी असतां कामा नये. अन्याय सोसूं नये, पण अन्याय करूंहि नये. आपण कोणाची निंदा करूं नये व आपली स्तुति इतरांनीं करावी अशी अपेक्षा करूं नये. दु:खितांविषयीं कनवळा असावा. दीनांच्या साह्यास धांवून जावें. आपण स्वत: चुकूं नये. इतरांच्या वागण्याचा विचार क्षमाशील होऊन करावा. ईश्वरावर विश्वास ठेवावा. स्वराष्ट्राशीं एकनिष्ठ असावें. समाजाचें व देशाचें ऋण मान्य करावें. तें फेडण्यासाठीं दक्ष असावें. थोरांचा आदर करावा. लहानांच्यावर प्रेम करावें. जें कांहीं दुसऱ्याचें आहे, त्याची अभिलाषा धरूं नये. द्वेष मत्सर करूं नये. ताठ्यानें वागू नये. कामक्रोधांना आळा घालावा. इंद्रियांना पीडा देऊं नये पण त्यांचें लाडहि करूं नयेत. स्वच्छता आणि पावित्र्य यांची आवड असावी. आणि हे सर्व देखाव्यासाठीं

नव्हें तर स्वभाव म्हणून, ओढ म्हणून प्रत्यक्ष वर्तनांतून प्रगट व्हावे. 'अती आदरें शुद्ध क्रिया धरावी' असें समर्थ म्हणतात ते या दृष्टीनें ध्यानांत घेतलें पाहिजे.

विकारांना बळी पडल्यामुळें, स्वैराचारामुळें, दुर्वर्तनामुळें माणसाचें नैसर्गिक सामर्थ्य उगीचच वांया जातें. शक्ति नियंत्रित असेल तरच ती प्रभावी ठरतें. आणि म्हणून शुद्ध क्रियेच्या रूपानें शक्तीचा संचय करण्यास समर्थ सांगत आहेत, आणि हे सर्व, शरीर समर्थ आहे, इंद्रियें कार्यक्षम आहेत, कितीहि विचार केला, चिंतन केलें तरी बुद्धीवर ताण येत नाहीं, डोके कलकलत नाहीं, मन चांगलें उत्साहि आहे, उभारी टिकून राहूं शकतें तोंच झाले पाहिजे.

सर्व दृष्टिनें चांगलें वागण्याचा उपदेश ऐकला म्हणजे माणसें म्हणतात– ''आम्हीं आपलें सामान्य. कुणी ज्ञानेश्वर-तुकाराम नाहीं लागून गेलो. आमचें वागणें असे आपलें इतपतच असावयाचें'' इ. पण हें खरें नाहीं. प्रत्येक माणसाची चांगल्या वाईटाची जाण चांगली तीव्र असते. सूक्ष्महि असते. स्वत:च्या कोणत्याहि चुकीच्या वागण्याचें समर्थन तो अनेक प्रकारानें करीत असला तरी तशीच किंवा त्यापेक्षांहि लहान चूक जेव्हां दुसऱ्याकडून घडते तेव्हां हे लक्षांत येतें. त्याच्या हातून चुकले यामागेंहि योग्य, समर्थनीय, क्षम्य कारण असू शकेल हें कुणी लक्षांत घेत नाही. त्यावेळीं माणसाच्या विचाराचा कांटा अगदीं धारवाडी होतो, नव्हे त्यावेळी त्यानें वापरलेला तराजू अगदी रासायनिक तराजूवर ताण करणारा असतो. चौथ्या दशमिकापर्यंतची नोंद (Fourth decimal) तेथें नोंदली जातें. आणि मग उपहास, अवहेलना, अधिक्षेप, निंदा या स्वरूपात ती व्यक्त होतें. हें लक्षात घेऊनच समर्थांनी बोलण्याप्रमाणें चालावें, वागावें अशी चेतावणी दिली आहे.

कीर्तनकार, प्रवचनकार, उपदेशक, पुढारी यांनाच केवळ उद्देशून हें वचन नाहीं. सामान्य माणसें व्याख्यानें देत नसलीं तरी निरनिराळ्या निमित्तानें व प्रसंगानें गप्पा, गोष्टी, चर्चा, वादविवाद करीतच असतात; थट्टा, टिंगल, निंदा, स्तुति यांत केव्हाना केव्हां तरी भाग घेतच असतात. ते सर्व बोलणेंच आहे. या अशा बोलण्यातून चांगल्या वाईटाचा विचार कोठें ना कोठें येतोच. तोच स्वत: वागतांना लक्षांत ठेवला पाहिजे. श्रीज्ञानेश्वर-तुकारामांच्या पातळीवर कोणाला एकदम जातां येणार नाहीं हें मान्य करता येईल. ते संत, उदात्त चरित्राचे गौरीशंकर आहेत. आपल्याला एकदम तसें होता येणार नाहीं हें खरें, पण सन्मार्गानें वागतां येणार नाहीं हे खरें नाहीं. माणसानें प्रयत्न केला, चांगले होण्याचा आग्रह प्रामाणिकपणें धरला, तर त्याला तो आहे त्या स्थितींतून अधिक प्रगत, अधिक उन्नत होणें मुळींच अवघड नाहीं. माणसाच्या जवळचें सुप्त सामर्थ्य अलौकिक आहे, प्रचंड आहे. त्याचा शोध लागला, योग्य वापर करतां



आला तर ''नरका नारायण बन जाय,'' पण ''नर करनी करे तो.'' चरणदास नांवाचे एक सत्पुरुष म्हणतात.

**करनी बिन कथनी इसी ज्यों ससिबिन रजनी ।**
**बिन साहस ज्यों सूरमा भूषण बिन सजनी ।**
**बाँझ झुलावै पालना, बालक नहि माहीं ।**
**बस्तु बिहीना जानिये जहाँ करनी नाहीं ।।**
**बहु डिम्भि करनी बिना कथिकथि करमूए ।**
**सन्तो कथि करनी करी हरिके सम हुए ।।**

करण्यावांचून बोलणें हे चंद्राविना असलेल्या रात्रीसारखें आहे. अंत:करणांत शौर्य-धैर्याचा लवलेश नसलेल्या माणसानें हत्यार घेऊन रणांगणात जावे तसें आहे. जिला मूल होत नाही अशा स्त्रीनें विरंगुळ्यासाठीं रिकाम्या पाळण्याला झोके देत बसणें जसें खुळेपणाचें आहे तसेंच हें आहे. दांभिक माणसें नुसतीच बोलत राहतात. आणि नुसतींच मरून जातात. संत मात्र बोलल्याप्रमाणें वागतात आणि परमेश्वराच्या पात्रतेंत जाऊन पोचतात.

वर्तनात उतरत नाहीं तें बोलणें समर्थांनाहि मान्य नाहीं. त्या दृष्टीनें प्रामाणिक प्रयत्न तरी निदान माणसाने करीत राहिलेंच पाहिजे. त्या दृष्टीनें माणसांत सुधारणा होण्यासाठी एक अगदी मूलभूत कल्पना समर्थ सांगत आहेत, ''मना कल्पना सोडि संसारतापा.'' 'कल्पना सोडी'आणि 'संसारतापा सोडी' किंवा 'संसारतापा कल्पना सोडी.' कल्पनांचा त्याग करून संसारतापातून मुक्त हो किंवा संसार हा तापदायक आहे ही कल्पना सोडून दे. उगीच कांहींतरी कल्पना करून संसाराच्या सुखदु:खात गुंतून राहू नकोस. हें त्यातील सार.

वेदान्त शास्त्राप्रमाणे संसार हा जर भ्रमात्मक आहे तर त्यांतील सुखदु:खें हीं सत्य असण्याची शक्यताच नाहीं. तीं खरीं आहेत असें मानून चालल्यामुळें तर मनुष्य त्या मोहांत गुंतून, नको तिथें, नको तसें, वागतो आणि मग त्याचें वागणें दुर्वर्तनाच्या, पातकाच्या पातळीवर उतरतें. यासाठीं शास्त्रीय सत्याचा स्वीकार केला पाहिजे. कल्पनांचा त्याग केला पाहिजे. समर्थांनीं हा विचार मनाच्या श्लोकांत अनेक प्रकारांनीं, अनेक ठिकाणीं, सांगितला आहे. ''मना कल्पना वाऊगी ते न कीजे'' (१२८) ''मना कल्पना ते नको वीषयाची'' (५) ''विवेकें कुडी कल्पना पालटीजे'' (४०) ''मना कल्पना कल्पितां कल्पकोटी । नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी'' (५९) ''मना कल्पना धीट सैराट धांवे । तया मानवा देव कैसेनि पावे'' (१०४) ''मनें कल्पितां कल्पना ते सरावी'' (१६४) ''स्फुरें वीषई कल्पना ते अविद्या'' (१७२) ''मिळे ना कदां कल्पनेचे नि मेळीं'' (५४) ''मना

कल्पनालेश तो ही नसावा'' (५८). वस्तुस्थिती बाधक नसते, वस्तुस्थितिसंबंधीं केल्या जाणाऱ्या कल्पना बाधक होतात. तत्त्वज्ञानानुसारी शास्त्रामध्यें यासाठींच सुखदु:खापेक्षां शोकमोहाला अधिक घातक मानलें आहे, कारण त्यांचा जन्म कल्पनेंतून होतो. परमार्थांत प्रगति करूं इच्छिणारानें तिचा त्याग करावा लागतो. येथीलहि त्याज्य म्हणून सांगितलेली जी कल्पना आहे, ती कविप्रतिभेचा विलास असलेली कल्पनाशक्ति मात्र नव्हे, हें लक्षांत घेतलें पाहिजे.

**बरी स्नानसंध्या करी येकनिष्ठा ।**
**विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा ।।**
**दया सर्व भूतीं जया मानवाला ।**
**सदा प्रेमळु भक्तिभावें निवाला ।।१०६।।**

माणसानें आपलें जीवन विकसित कसें करून घ्यावें, तें अधिकाधिक पारमार्थिक कसें घडवावें आणि अध्यात्म अधिकाधिक कसें आपलेंसें करावें, याचें सूत्र श्रीसमर्थ येथें सांगत आहेत.

स्वच्छतेकरितां स्नान व शुद्धतेकरितां संध्या असा क्रम येथें आहे. एक शरीराकरितां आहे, एक मनाकरिता आहे. शरीराची स्वच्छता स्नानानें होते, मनाची शुद्धता संध्येनें साधते. स्वच्छतेची जाणीव आपण व्यवहारामध्यें बऱ्याच प्रमाणांत ठेवतों. घराची झाडलोट करतों, कपडे धुतों, भांडीं घासतों, भाजीपाला धुवून घेतों, अंघोळही बहुधा प्रतिदिनीं होते. पूर्वीं जेवण-स्वयंपाकाच्या आधीं हें नियमानें होत असे. आता तो कटाक्ष ठेवला जात नाहीं. स्वयंपाकाच्या उष्णतेनें घामट वाटतें म्हणून नंतर स्नान करण्याची तऱ्हा अलीकडे आहे. अस्वच्छ शरीरानें केलेल्या स्वयंपाकाला अस्वच्छता येते, निदान अशुद्धता तरी येतेच, त्याचा विचार कुणी करीत नाहीं. पण हा विषय सूक्ष्म आहे.

माणसें संध्याहि करतात. वडीलधाऱ्यांचा धाक म्हणून, रूढी म्हणून, परंपरा म्हणून, कांहींतरी देवाचें केलेलें असावें तें बरें म्हणून. संध्या वा तत्सम कृत्यें माणसें करतात, खरें म्हणजे उरकून टाकतात. पूजा-पाठ, स्तोत्रें-महात्म्यें वाचणें, देवाला जाऊन येणें इत्यादि सर्व संध्येचींच उपलक्षणें आहेत. संध्या शब्दानें तींहि गृहीत धरावींत. हें सर्व घडतें पण तें बरें नसतें, एकनिष्ठेचें नसतें. आणि समर्थ तर 'बरी स्नानसंध्या करी एकनिष्ठा' असें सांगतात.

पूर्वी स्नानांतील स्वच्छतेकडे फारसें लक्ष नसे. अलीकडे तें थोडे अधिक आहे. पूर्वी बहुतेकांचें स्नान म्हणजे अंघोळ (अंग ओलं) असे. अंग आणि नेसतीं वस्त्रें ओलीं झालीं कीं अंघोळ झाली. स्नानाचा संबंध शरीराच्या स्वच्छतेशीं आहे हें लक्षांत



घेतलें तरच ते बरें स्नान. चांगल्या स्वच्छ स्नानानें मनहि टवटवीत, उत्साही, प्रसन्न, होवू शकतें. स्नान झालें नसेल तर कोणत्याहि धार्मिक कृत्यांत भाग घेण्याचा अधिकार प्राप्त होत नाहीं अशी आपली धारणा आहे. स्नान हें व्रत आहे, त्रिकालस्नान करणें धार्मिकतेच्या दृष्टीनें फार प्रशस्त मानलें जातें. मर्यादित अर्थानें त्यालाहि महत्त्व आहे. ज्यांना कशांतच उत्साह वाटत नाहीं अशा खिन्न मनोवृत्तीच्या लोकांनीं दोन वेळां, तीन वेळां स्नानाचा नियम करून पाहण्यासारखा आहे.

संध्या ही सूर्याची उपासना आहे. सर्व चैतन्याचा आणि सृष्टीच्या व्यापाराचा प्रेरक सूर्य आहे, तो परमेश्वराचे मूर्त प्रतीक आहे. संध्येच्या माध्यमांतून त्याच्याशीं संबंध प्रस्थापित होतो आणि मग चैतन्याचे प्रेरक अंश आपल्यालाहि लाभू शकतात. संध्येचा प्राणभूत असलेला गायत्रीमंत्र हा सर्व मंत्रांचा, चक्रवर्ती सम्राट आहे. त्याचें अनुष्ठान जितक्या निष्ठेनें होईल तितकें तें लाभदायक होतें. जो संध्या करीत नाहीं तो पूजा करतो, जप करतो, पोथी वाचतो. आपल्याकडे अधिकारभेद स्वीकारला असल्यानें अशी विविधता होते. म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनीहि ''द्विजासीच ब्रह्मसूत्र । येरां स्तोत्र कां नाम मंत्र ।'' अशी विभागणी करून स्वाध्याय सांगितला आहे.

हें जें सर्व करावयाचें तें बरें केलें पाहिजे, एकनिष्ठेनें केलें पाहिजे, कसेंतरी उरकण्याची, टाकणें टाकल्याची भावना, त्यामागें असूं नये. संध्यापूजादि गोष्टी करण्यांत आस्था पाहिजे, श्रद्धा पाहिजे. कोण काय करतो, हें महत्त्वाचें आहेच पण कसें करतो, किती करतो, याला त्याहूनहि अधिक महत्त्व आहे. करण्यामागें आवड, प्रेम, अधिकस्य अधिकं फलं ही भावना असणें आवश्यक आहे. जें करणें तें मनापासून केलें पाहिजे, लक्ष लावून केलें पाहिजे, सावध राहून केलें पाहिजे, हें सगळे लक्षांत घेऊन करणें म्हणजेच एकनिष्ठेनें करणें आहे. आपण असे करतो कां याचा विचार प्रत्येकानें करावा.

कोणाकोणाला कीर्तनप्रवचनांत हटकून झोप येते. झोप ही कुंभकर्णाची बायको. कुंभकर्ण मेला तेव्हां ती बापडी रिकामी झाली आणि तेव्हांपासून वेळ घालवण्यासाठीं म्हणून कीर्तनप्रवचनाला येऊं लागली, अशा अर्थाचें एक संस्कृत सुभाषित आहे. यांतील विनोद सोडून द्या. पण पुष्कळजण असे झोंपतात हें खरें. कीर्तन कांहीं कुणी त्यांच्यावर लादलेलें नसतें. आपण होऊन थोडा त्रास सोसून आलेले असतात. तरी त्यांना झोप लागते. एक वेळ अंथरुणावर पडून झोप येणार नाही. पण कीर्तनांत येते. आतां हें चांगले नाहीं. तरीपण त्यांत झोंप घेणारांचा दोष थोडा आहे. ही गोष्ट नकळत होते. अगतिकपणे होते. पण अशा झोंप घेणाराकडे पाहून झोंप न येणाऱ्या ज्या अन्य कुणाला उपहासानें हंसू येतें ते

जास्त दोषी आहेत, कारण ते सावध आहेत आणि कीर्तनांत त्यांचें लक्ष नाहींच. ज्याला झोंप येते तो निदान दांभिक तरी नाहीं. असें सर्वत्रच होतें. श्रवण, पूजा, स्तोत्रपठण, पोथीवाचन हें सर्व माणूस करतो पण बरें करीत नाहीं. अंत:करणांत खरी निष्ठा नसते, प्रेमादर नसतो. हा आपल्या उद्धाराचा मार्ग आहे हें मनापासून पूर्णपणें पटलेलें नसतें. करतो ते गतानुगतिक म्हणून, नाहीं केलें तर पाप लागेल, संकटें भोगावीं लागतील असें भय वाटतें म्हणून. या कृत्यामध्यें मन लागत नाहीं, बुद्धि स्थिरावत नाहीं; हात, डोळे, जीभ, यांची तेवढी हालचाल होत राहते. एक हिंदी कवि म्हणतो–

**माला तो करमें फिरै, जीभ फिरै मुखमाहि ।**
**मनुवा तो दस दिसि फिरै, यह तो सुमिरन नाहि ।।**

जप करायला म्हणून बसतो तेव्हां हातांतली माळ फिरते, तोंडांतली जीभ हालते आणि त्याचवेळीं मन मात्र दाही दिशांना भटकत असते याला नामस्मरण किंवा जप हें नांव कसें देतां येईल? मनबुद्धीचीं केंद्रें वरच्या पातळीवरचीं आहेत, सूक्ष्म आहेत. हाताची, डोळ्याची, जिभेची हालचाल ज्याच्यामुळें होतें तीं प्रेरक केंद्रें स्थूल आहेत, खालच्या पातळीवरचीं आहेत. या वेगळेपणामुळें मनाला वा बुद्धीला करीत असलेल्या कामांत रमविणें, एकाग्र करणे अवघड जातें. गाडीवानानें गाडीला जुंपलेल्या बैलाला एकदां हाकावें आणि मग कासरा खाली ठेवून झोंपी जावे तसें या कृत्यांचें होतें. असें होऊं नये म्हणून समर्थांनीं ''विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा'' अशी दुसरी ओळ सांगितली आहे. मनाला गोडी वाटावी, मन रमावें, नंतर ते एकाग्र व्हावें, स्थिर व्हावें असा उत्तरोत्तर वरचा वर्ग आहे. नुसतें करणें हा अगदीं बालवर्ग. एकेका इयत्तेंत, त्यांतहि बालवर्गांत किती वर्षें बसावयाचें त्याचा विचार गंभीरपणें करावयास नको कां?

अनेक विकारांमुळें चंचल होऊन, करीत असलेल्या धर्मकृत्यांतून पुन्हां स्थानभ्रष्ट होणाऱ्या मनाला, विवेकानें आवरून, वरचेवर मार्गी लावण्याचा, वळविण्याचा, स्थिर करण्याचा, प्रयत्न करावा लागतो. या पुन्हां पुन्हां करण्याचा कंटाळा बाळगून चालत नाहीं. मनाला वळविण्याचा त्यापेक्षां दुसरा मार्गहि नाहीं. नाटकांत किंवा सर्कशींत अभिनय किंवा कसरत पुन्हां पुन्हां करीत रहावें लागते. गायकाला एकेक स्वर गळ्यांत बसावा म्हणून कित्येक दिवसपर्यंत त्याचा रियाज करावा लागतो. गणित करण्याची रीत समजली म्हणजे तेवढ्यानेंच भागत नाहीं, त्या जातीचीं निरनिराळीं उदाहरणें वारंवार सोडवावीं लागतात. मनाच्या प्रकरणींहिं तेंच करावें लागतें. मन फार चुकार आहे. पूजेला बसल्यावर वा डोळे मिटल्यावर त्याच्या नाठाळपणाला जणूं ऊत येतो. एरवी मनात कधीं आलें नसतें तें त्यावेळीं



नेमकें येतें. यासाठीं मनाला माकडाची उपमा दिली आहे. पण एकदां गोडी लागली कीं मग तें रमते आणि स्थिरावते हा त्याचा गुणहि आहे. त्यासाठीं त्याला सामदामादींनीं वरचेवर वळवीत राहावें, आवरीत राहावें. लौकर उठणें, गोष्टी वेळच्यावेळीं करणें, व्यवस्थित आणि टापटिपीनें करणें, याची संवय जशी प्रयत्नपूर्वक लावून घ्यावी लागते तसेंच मन रमविण्यासाठींहि करावें लागतें.

श्रवणाची परिणति मननांत, मननाची निदिध्यासनांत व्हावी लागते. तसेंच पूजादींची परिणति एकाग्रतेंत आणि एकाग्रतेची प्रसन्नतेंत झाली पाहिजे. मन हें त्याचें साधन आहे. तें सारखें भटकतें. केव्हां निसटतें तें कळत नाहीं. त्याला आवरावें लागतें तें कसें त्याचा एक मार्ग समर्थ सुचवीत आहेत. ''दया सर्वंभूतीं जया मानवाला.'' तो निवतो, शांत होतो, प्रसन्न होतो असे समर्थांनीं म्हटलें आहे. सर्व भूतमात्रांच्या ठिकाणीं साधकांच्या अंत:करणांत दयाभाव असला पाहिजे. दुसऱ्यांचें दु:ख पाहून कळवळा येतो कां? सर्व सोडून कोणत्याहि परिस्थितींत त्याच्या साह्यास जावें असें वाटतें कां? हा माझा, हा परका, हा शत्रु, हा मित्र. हा माझ्या उपयोगी पडला किंवा पुढें कधीं पडेल अशा भावनेनें दया येते कां? सर्व ठिकाणीं, कोणताहि भेदाभेद न करतां, स्वभाव म्हणून, दया येते याचा विचार केला पाहिजे.

भीम तापट होता. गंधर्वांनीं दुर्योधनाला पकडून नेलें हे ऐकून त्याला बरें वाटले. पण युधिष्ठिराला तसें वाटलें नाहीं. दुर्योधनाचीहि त्याला दया आली. म्हणून युधिष्ठिर संत ठरला.

ज्याच्या अंत:करणांत दया नसते, त्याच्या अंत:करणांत प्रेम, भक्ति निर्माण होऊं शकत नाहीं, त्याकरितां अंत:करणाची कोवळीक पाहिजे. दया हे अंत:करणाच्या कोवळिकेचें बाह्य रूप आहे. ती दाखववावयाची म्हणजे सुखासीनतेचा त्याग करावा लागतो, विषयोपभोगाला आळा घालावा लागतो, स्वार्थाला मुरड घालावी लागते, कर्तव्य भावनेनें, निष्काम बुद्धीनें, सहाय्याला धावावें लागतें. त्यासाठीं होणारे कष्ट सोसावे लागतात. हें असें असलें कीं मग त्या अंत:करणात प्रेमभक्ति उत्पन्न होऊं शकते, ईश्वरनिष्ठेनें ती वाढत जाते, आणि मग अशा प्रेमळ मनाला शांति मिळते, प्रसन्नता प्राप्त होते.

**मना कोप आरोपणा ते नसावी ।**
**मना बुद्धि हे साधुसंगीं वसावी ।**
**मना नष्ट चांडाळ तो संग त्यागीं ।**
**मना होई रे मोक्षभागीं विभागी ।।१०७।।**

मागच्या श्लोकांत निवाला, शांत झाला, प्रसन्न झाला असें वर्णन आलें आहे. ही शांति, प्रसन्नता, स्थिरावली पाहिजे. याचे उपाय सांगितले आहेत.

राग, संताप, येऊ देऊ नये हा पहिला उपाय. संसारामध्यें तशी परिस्थिति भोंवती बहुतेक वेळीं असतेच. जें हवें असतें, आवडतें, तें मिळत नाहीं, जें घडूं नये असें वाटतें, तें घडत असतें. संबंधित लोक, बोलू नये, वागूं नयें, तसें वागत असतात, बोलत असतात. प्रतिकूल प्रसंग ओढवत असतात अशावेळींहि शांत राहण्याचा अभ्यास केला पाहिजे. कांही वेळा कर्तव्यबुद्धीनें रागावणें आवश्यकहि असेल पण तो क्रोध आलेला असतां कामा नये, आणलेला असला पाहिजे. 'कोप आरोपणा ते नसावी' याचा अर्थ राग उपजू देऊं नयें, उत्पन्न होऊं देऊ नये हा जसा आहे तसाच रागाला चढूं देऊं नये, त्यानें आपल्या डोक्यावर बसूं नये, असाहि अर्थ करता येईल. कुणी रागवत नाही, संतापत नाही असें जर एकदा कळलें तर त्या माणसाची जीवनात परवड झाल्याविना राहणार नाहीं. म्हणून संतापाच्या आधीन होऊ नये हें जितकें खरें, तितकेंच प्रसंगविशेषीं कर्तव्यबुद्धीनें क्रोध आणतां आला पाहिजे हेहि खरेंच. 'कोप आरोपणा नसावी' म्हणण्यांत समर्थांना तेंच अभिप्रेत असावें.

रागाच्या स्वाधीन झाल्यामुळें माणसाचें वागण्या-बोलण्यांतले तारतम्य सुटतें. स्वत:च्या प्रकृतीवरही दुष्परिणाम होतात. परिस्थितींत सुधारणा होत नाहीं ती नाहींच. यासाठीं सावध राहून विचार केला पाहिजे. राग यावा असें दुसरे वागतात असें जें वाटतें त्यामागें तसें वागणाराच्या दृष्टीनेंहि कांही योग्य कारणें असूं शकतात तीं विचारांत घेतली गेली पाहिजेत. आपणाला आवडत नाहीं, पटत नाहीं असें जें वाटतें, तेहि योग्यच असतें असें नाहीं. आपल्या स्वभावामुळें रजोगुणाच्या, तमोगुणाच्या, प्राबल्यामुळें आपली आवड हीच मुळांत अनिष्ट असण्याची शक्यता आहे हेंहि विचारात घेतलें गेलें पाहिजे. बाहेरच्या घटनांमुळें आपल्या मनात उत्पन्न होणाऱ्या प्रतिक्रियांची अशी चिकित्सा करतां आली तर क्रोध माणसाच्या डोक्यावर चढणें शक्य नाहीं. तो त्याचा आज्ञाधारक सेवक होऊन राहील.

मनाला शांत राखण्याचा दुसरा उपाय, संत सज्जनांच्या संगतीत राहणें हा. संतांचे आचार-विचार-उपदेश यांचा परिणाम परमार्थाच्या दृष्टीनें फार चांगला होऊ शकतो. मात्र त्यासाठी माणसाचे मन संस्कारक्षम असावें लागतें, नम्र साधकाचें असावें लागतें. यासाठींच समर्थांनीं सज्जनांच्या संगतीत राहावें असें नुसतेंच न म्हणतां बुद्धीहि साधूंच्या संगतीत राहिली पाहिजे असें आवर्जून म्हटले आहे. संगतीचा, वातावरणाचा माणसावर परिणाम होतो हें निश्चितच. सहवासांत



असलेल्या लोकांचें आचार-विचार हे परिणाम करीत असतात. त्याचें चांगले किंवा वाईट संस्कार माणसांवर कांहीं प्रमाणांत तरी होतात. सज्जनांच्या सहवासामुळे वाईट संस्काराचें भय टळते आणि चांगल्या संस्काराचा संभव वाढतो.

पण यासाठीं सहवासांत राहणाऱ्या व्यक्तीची वृत्ति अनुकूल असावी लागते. त्या वृत्तींत स्वार्थ, अहंकार, आळस, उपेक्षा, तुच्छता, असतां कामा नये. ध्येय निश्चित असलें पाहिजे, त्या दृष्टीनें प्रगति करून घेण्याची इच्छा उत्कट असली पाहिजे. विवेक जागृत असला पाहिजे. जे पाहिलें, ऐकलें, त्यांचें मूल्यमापन करता आले पाहिजे. उपदेशाप्रमाणें वागण्यासाठीं प्रयत्नशील असले पाहिजे. ही बुद्धि जर नसेल तर सज्जनांच्या संगतीचा काही विशेष लाभ होणार नाहीं. मोठमोठ्या संतमहात्म्यांचें–त्यांच्या सेवेत, सहवासांत, दीर्घकालापर्यंत राहिलेले–शिष्यहि आपल्या गुरुच्या समोरच किंवा माघारी संपत्तीसाठीं, अधिकारपदासाठीं आपसांत भांडल्याची उदाहरणें प्राचीन-अर्वाचीन काळींहि काहीं थोडीं नाहींत. **सत्संगतीचा महिमा कळेना । सत्संग कोठे श्रमल्या मिळेना । सत्संगीने तुटते कुबुद्धि । सत्संग झाल्या बहुसाल सिद्धि ।।''** या प्रसिद्ध श्लोकांतील शेवटच्या दोन ओळी अगदी यथार्थ आहेत; पण त्यांची अनुभूति येण्याच्या दृष्टीनें पहिली ओळ महत्त्वाची आहे. सत्संगतीचा महिमा कळावा लागतो. तेंच होत नाही ही अडचण आहे. आणि त्यामुळें संतांची संगति दुर्लभहि होतें. माणसें संतांचा आदरसत्कार करतात. अगदीं पायांवर डोके ठेवून नमस्कार करतात. सहवासात राहतात. पण बहुधा तीर्थातल्या गोट्यासारखी जशीच्या तशीच असतात.

यासाठी निषेध रूपानें समर्थ तिसरा उपाय सांगत आहेत.

विषयांचा संग, आसक्ति, फार घातक आहे. अत्यंत दुष्ट आहे. ती टाळावी, तिच्यापासून दूर राहावें, त्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. संग हाच शेवटी बुद्धिनाशापर्यंत नेऊन पोंचवितो असें भगवंतांनी स्पष्टच सांगितले आहे. त्यासाठीं तर समर्थांनीं त्याला चांडाळ म्हणून शिवी घातली आहे. संग घातक आहे पण त्याचें स्वरूप घातक वाटत नाहीं, उलट लोभनीय वाटतें, आकर्षक वाटतें. संगाचा हा कपटीपणा अधिक घातक आहे. सत्त्वगुण ही मनाची प्रकृति खरी, पण वृत्तींत प्रभावी असतो तो रजोगुण. आणि तो या संगाची, आसक्तीची भलावण करीत असतो आणि मग माणूस मोहाने बळी पडतो. म्हणून सावध राहिलें पाहिजे. कारण या विषयसंगानेंच अहंकार वाढतो, स्वार्थ बळावतो, विकार उन्मत्त होतात. आरंभीं सुखासीनतेची चटक लागते, ती निरुपद्रवी वाटते आणि त्यांतूनच पुढें अनर्थ ओढवतो.

महर्षि नारदांनीहि आपल्या भक्तीच्या प्रकरणांत संगाविषयीं पुष्कळच सांगितलें

आहे. भक्तीचें साधन सांगत असतांना त्यांनीं प्रथम संगत्यागाचा उल्लेख केला आहे. काम, क्रोध, मोह, स्मृतिभ्रंश, बुद्धिनाश अशी सर्वनाश करणारी कारणे आरंभी अगदी लहान वाटली तरी संगामुळें तीं सर्व समुद्रासारखीं प्रचंड होतात आणि माणसाला बुडवतात, असें देवर्षि नारदांनीं म्हटलें आहे. मायेंतून कोण तरतो त्याचें उत्तर देतांना त्यांनीं **यःसंगांस्त्यजति यो महानुभावं सेवते यो निर्ममो भवति ।** असें दिलें आहे. समर्थांच्या या श्लोकांत उलट्या क्रमानें तोच विचार आला आहे, आणि हे तीन ज्याला साधले तो तरून जातो, उद्धरून जातो म्हणजेच मोक्षाचा वांटेकरी होतो असें समर्थ सांगतात. श्लोकाच्या चौथ्या ओळीतून तें स्पष्ट होतें.

'मोक्षभागी विभागी हो' याचा अर्थ मोक्षांत तुझा भाग आहेच, तो तू मिळव असा आहे. प्रत्येक मनुष्य मोक्षभागी म्हणजे मोक्षाचा अधिकारी आहेच. तो मनुष्य म्हणून जन्माला आला त्याक्षणींच त्याचें नांव पटावर लिहिलें गेलें आहे, पण त्यानें तो अधिकार प्रस्थापित केला पाहिजे. ही भाषा व्यवहारांतील गोष्टी उपमेसाठीं गृहित धरून केलेली आहे. मोक्ष हा कांहीं स्थावर जंगम संपत्तीसारखा इंद्रियगम्य विषय नाहीं. त्याची वाटणी होते, म्हणजे चतकोर, अर्धा वाट्याला येतो, तो पूर्ण राहत नाहीं. असें त्यामुळे मानतां येत नाहीं. मोक्षाचें स्वरूप समजावून सांगतांना, **''न मोक्षो नभसः पृष्ठे न पाताले न भूतले । मोक्षो हि चेतो विमलं सम्यक्ज्ञानविबोधितम् ।''** असें वर्णन आलेलें आहे. म्हणजे शुद्ध, निर्मळ, प्रसन्न चित्त हाच मोक्ष. तो प्राप्त करून घेतला पाहिजे. मन त्या पातळीवर कसें पोंचवावें यासाठी तर मनोबोधाचा, मनाच्या श्लोकांचा अवतार आहे.

शुद्ध, निर्मल, शांत, प्रसन्न, असणें हेंच मनाचें मूलभूत स्वरूप आहे व तेंच त्यानें प्राप्त करून घ्यावयाचें आहे. कापूस, मुळांत स्वभावतः शुभ्र पांढरा असतो, म्हणून वस्त्रहि मुळांत शुभ्र पांढरें असतें तें मळतें, तें संसर्गानें. भट्टींत घातलें व धुतलें कीं उपरा मळ नाहींसा होतो आणि वस्त्राची मूळची स्वच्छता प्रगट होते. पांढरेपणा कांहीं बाहेरून त्याच्यावर लादला जात नाहीं. मनाचेंहि तसेंच समजावे. उपाधीमुळें तें विकारी होतें. साधनेनें उपाधि नष्ट करावयाच्या असतात.

**सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें ।**
**क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ।।**
**क्रियेवीण वाचाळता ते निवारीं ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।१०८।।**

मनुष्य जात्याच बुद्धिमान् असल्यानें तो विचार करतो. ऐकणे, वाचणे, अनुभवणे, पाहणे, यामुळें त्याच्या विचारांना चालना मिळते. बुद्धीची मर्यादा, प्रकृति, स्वभाव, यांतील भिन्नता, परिस्थितीचें स्वरूप यामुळें विचारांना निरनिराळ्या दिशा लागूं शकतात. वेगवेगळीं मतें बनतात. तीं कधीं सत्याच्या जवळ असतात. कधीं दूर, कधीं असत्याला सत्य व सत्याला असत्य मानणारीं अशीं भ्रांत, कधीं निश्चित, कधीं आग्रही, कधीं दुराग्रही, कधीं चंचल, सरड्याच्या रंगाप्रमाणें पालटणारीं, अशींहि तीं असतात. त्यामुळें दोन भिन्न मताच्या व्यक्ति एकत्र आल्या, तर चर्चा होते, आणि प्रकृतिभेदानें या चर्चेला वादविवादाचें स्वरूप प्राप्त होतें. या वादविवादाचेंहि कांहीं लाभ निश्चित आहेत. बुद्धीला चालना मिळते, विचाराला नेमकेपणा येतो. आपलें मत मांडण्याचें कौशल्य लाभतें, वाढतें, पण कांहीं तोटेहि होतात. हट्टीपणा, दुराग्रह, प्रतिपक्षावर मात करण्याचा अभिनिवेश, हे अनिष्ट गुणहि वादामुळें वाढीस लागतात. नुसताच बोलभांडपणा येतो. विद्वतेचे प्रदर्शन करण्याची अहंता वाढते. हें सर्व साधकाच्या दृष्टीनें अनिष्ट आहे. म्हणून समर्थ येथून पुढें ५+३ अशा आठ श्लोकांनीं वाद हितकारी असावा, सुखसंवाद हें त्याचें स्वरूप असावें असें उपदेशीत आहेत.

मनुष्य जें वागतो, त्याच्यामागे त्याच्या काहीं धारणा असतात, कांहीं संस्कारहि वागण्यावर परिणाम करीत असतात. समाजहिताच्या दृष्टीनें समर्थांना सदाचारी, सद्वर्तनी असा माणूस अपेक्षित आहे. त्यानें चांगले काय तें समजून घेतलें पाहिजे, त्याचे विचार निश्चित असले पाहिजेत. तो निष्ठावंत झाला पाहिजे, एकूण माणसाचें वागणेंहि चांगल्या अर्थानें सुधारलें पाहिजे, असें समर्थांना वाटतें आणि म्हणून ते त्या दृष्टीनें काय करावें तें सांगतात.

माणसाच्या धारणा आणि त्याचें वागणें यावर सभोंवतीच्या वातावरणाचा परिणाम मोठा असतो.अन्यथा एरवीं अचरटपणाच्या ठरल्या असत्या अशा वा परिणामीं अनिष्ट असलेल्याहि अनेक गोष्टी अद्ययावत्पणाच्या नांवाखालीं शिक्षित वर्गांतहि रूढ झाल्या नसत्या. म्हणून समर्थांनीं साधकाला सज्जनाच्या संगतींत राहण्यास सांगितलें आहे.

येथील सज्जन शब्दानें संत, सत्पुरुष अभिप्रेत आहेत. सर्वसामान्य भला माणूस एवढाच मर्यादित अर्थ येथें सज्जन शब्दाचा नाहीं. मनाला सज्जन म्हणतात, तेव्हां तो अर्थ अभिप्रेत असतो. ज्याची क्रिया पालटावयाची तो, म्हणजेच ज्याचें वर्तन सुधारणें आवश्यक आहे तो आणि ज्याच्या संगतींत राहून क्रिया पालटते, वागणें सुधारते, वर्तनाला भक्तीचा भावार्थ लाभतो तो, हे दोन्ही एका पातळीवरचे असणें शक्य नाहीं.

या दृष्टीनें माणूस समजून घेण्यासाठीं माणसाचे तीन वर्ग मी कल्पिले आहेत.

जो शरीरानेंहि नको तसा वागत असतो, दुर्वर्तन करतांना, अनाचार करतांना ज्याला लाज वाटत नाहीं तो अधम. त्याला दुर्जन म्हणावें. ज्याच्या मनांत कांही वेळांतरी नको त्या गोष्टी करण्याची इच्छा होते पण शरीरानें जो तसा कधीं वागत नाहीं, क्वचित् एखाद्या वेळीं मोहानें वागतांना चूक झाली तर लगेच ज्याला खंत वाटते, पश्चात्ताप होतो, तो मध्यम. त्याला सज्जन म्हणावें. आणि वाईट वागावें, अनाचार करावा असें ज्याच्या कधीं मनांतहि येत नाहीं मग शरीरानें घडण्याची गोष्ट दूरच राहिली, असा जो, तो उत्तम. त्याला सत्पुरुष म्हणावें.

समाजामध्यें मध्यम वर्गांतल्या, सज्जन म्हणावें अशा लोकांची बहुसंख्या असते, आणि ते मध्यम असल्यामुळें, मध्यस्थ असल्यामुळें परिस्थितिवशात् ते इकडे किंवा तिकडे कलूं शकतात. म्हणून संरक्षणाची किंवा संस्काराची आवश्यकता त्यांनाच असते.

सभ्य हा आणखी एक वर्ग आहे. प्रतिष्ठितपणा मिळविण्यासाठीं दुसऱ्याला प्रभावित करण्यासाठीं, वागण्याची एक विशिष्ट पद्धति कांहीं लोकांची असते. वरवर पाहतांना ते अतिथ्यशील, नम्र, आर्जवी, आपुलकी, जिव्हाळा असलेले असें वाटतात. त्यांचे वागणें, बोलणें, नेमस्त, टापटिपीचें असतें. मुरलेले धूर्त राजकारणी आणि व्यवहार-चतुर व्यापारी ही या वर्गांतलीं उदाहरणें. पण ही जी सभ्यता आहे ती वरवरची आहे, उपरी आहे, देखाव्याची आहे. स्वार्थ तर साधावा पण तो कोणाला फारसा बोचूं नये किंवा आपल्या स्वार्थीपणाकडे कोणाचें लक्ष जाऊं नये वा तो कोणाच्या लक्षांत येऊं नये, अशासाठीं सभ्यतेचें पांघरूण घेतले जातें. या सभ्य वागण्यांत जर कांहीं प्रामाणिकपणा असेल तर तो मध्यम वर्गात म्हणजे सज्जनांच्या गटांतच घालावा लागेल.

सत्पुरुषाच्या वागण्या-बोलण्यांत पोषाखी सभ्यता असण्याची शक्यताच नाहीं. म्हणून तर संत ओळखणें अवघड जातें. नारदांनीं यादृष्टीनेंच सत्संगाला अगम्य म्हटलें आहे.

चांगलें वागणें हेंच मुळांत नैसर्गिक आहे, निसर्गाला जवळचें आहे. या नैसर्गिकतेमुळेंच, स्वाभाविकतेमुळेंच चांगलें हें चांगलें ठरतें. वासना-संस्कारांनीं विकृती निर्माण होतात. विकृती वाईटाला रूढवितात. अनवधानाने त्यांत दीर्घकाल जातो, त्याची संवय लागते. मग पुढें त्याचे दुष्परिणाम दिसूं लागलें की माणूस सावध होतो. पण संवयीमुळें चांगलें हेंच दुष्कर होऊन बसलेले असतें. तें पुन्हा सुकर व्हावें यासाठीं सज्जनांच्या संगतीनें लाभ होतो. चांगलें काय आणि तें कसें शक्य आहे हें सज्जनांच्या संगतींत अनुभवास येतें. त्यांच्या सद्‌भावाची उत्कटता जाणवते. देखाव्याचें सभ्य वर्तन आणि प्रामाणिक शुद्ध चारित्र्य यांतील अंतर



सत्पुरुषांच्या जीवनांत प्रत्ययास येतें. त्यांचा वेदान्त कीर्तन-प्रवचनापुरता नसतो. त्यांच्या विद्वत्तेला अहंकाराचा दर्प येत नाहीं. त्यांच्या धर्माचरणाला प्रसिद्धीची हांव असते. त्यांच्या आर्जवाच्या पोटांत स्वार्थ असत नाहीं. त्यांची नम्रता धूर्त नसते. विकाराचे ते दास नसतात. स्वामी असतात. त्यांची ईश्वरभक्ति अर्थार्थी नसते. साधनेचें आडंबर ते करीत नाहींत. त्यांच्या कोमल हृदयांत ईश्वराचें प्रेम भरून राहिलेलें असतें. विवेक हा त्यांचा सहचर असतो. दुसऱ्याच्या कल्याणाची त्यांची इच्छा प्रामाणिक असते. विचारी माणूस उघड्या डोळ्यानें अशा सत्पुरुषाच्या संगतींत दीर्घकाल राहतो. तेव्हां आपण कसें होतो, कसें आहोत, आणि कसें व्हावयास पाहिजे हें त्याला उमगतें आणि मग त्याची क्रिया पालटते, वर्तन सुधारतें. अंत:करणांत भक्तीचा जिव्हाळा उत्पन्न होतो. कृतीला भावाचा सुगंध लाभतो.

कृतीच्या मागची भक्तिभावाची भूमिका हीच महत्त्वाची. कृतीमध्यें पालट झाला आहे कीं नाहीं, सुधारणा झाली कीं नाहीं, हें भक्तिभावावरून ठरवावयाचें असते. बाह्यत: कृती वेगवेगळ्या असूं शकतात. प्रकृति-प्रवृत्तीच्या वेगळेपणामुळें, कोण कशांत रमेल तें सांगणें कठिण आहे. कोणी पूजेंत, कोणी पोथींत, कोणी कथेंत, कोणी जपांत, कोणी ध्यानांत, कोणी तीर्थयात्रेत, कोणी सेवेत, कोणी व्रत-नियमांत, कोणी दानांत, कोणी परोपकारांत असा जीवाभावानें निष्ठेनें रंगला असेल. या कृत्यांत एकरूपता नाहीं, तरी अंतरंगांतील भक्तिभावामुळें त्यांचें पारमार्थिक महत्त्व सारखेंच श्रेष्ठ असूं शकतें. निष्ठा, प्रेम हें त्यांतील मूळ तत्त्व आहे.

माणसाचें आहार प्रांत भेदानें वेगवेगळें आहेत. काश्मिरी, सिंधी, पंजांबी, महाराष्ट्रीय, कर्नाटकी, तामिळी यांच्या आहारांतील पदार्थ अगदीं वेगवेगळे आहेत. ते एकमेकांना आवडणार नाहींत, कदाचित् मानवणार नाहींत. म्हणून एक प्रकारचें अन्नच सगळ्यांनीं घेतलें पाहिजे असा आग्रहहि धरतां येत नाहीं. पण या विविध आहारांतलीं, शरीराचें पोषण करणारी मूलतत्त्वें मात्र, एकरूपच आहेत. वर्तनाचें, उपासनेचेंहि तसेंच असलें पाहिजे.

श्रीनारदांनी म्हटल्याप्रमाणें ''**तद्विस्मरणे परमव्याकुलतेति ।**'' अशी उत्कटता प्राप्त झाली पाहिजे. संतांच्या सहवासाचा लाभ त्यादृष्टीनें फार होतो.

जो नुसताच बोलघेवडा नाहीं, त्याला हें सर्व जाणवतें व त्यादृष्टीनें तो प्रयत्नशीलहि असतो. केवळ बोलघेवडे असूं नये असें समर्थांनी सांगितलें आहे. जें जें श्रेष्ठ, चांगलें, आदरणीय म्हणून सांगितलें जातें, बोललें जातें, मानलें जातें, तें तें सर्व वर्तनांत उतरविण्याच्या दृष्टीनें माणसानें आग्रही असलें पाहिजे.

'क्रियेवीण वाचाळतेचें' वादविवाद हें व्यक्त स्वरूप असतें. समजावून सांगणें आणि जाणून घेणें, यासाठीं होणारें संभाषण समर्थांना इष्टच आहे. तोच तर या

प्रकरणाचा विषय आहे. पण वादविवादाची भूमिका तशी नसते. प्रतिपक्ष्यावर मात करण्याच्या इच्छेनें केला जाणारा वाद हा न संपणारा आहे. गीतेनें वाद हें भगवंताचें स्वरूप सांगितलें आहे तेव्हां तो न संपणारा असणें स्वाभाविकच आहे. बुद्धिमत्ता, विद्वत्ता आणि कौशल्य हे गुण असले की वादविवादामध्यें कोणालाहि विजय मिळवतां येतो. ज्याचें हे गुण सरस आहेत तो जिंकतो. त्याहून श्रेष्ठ कोणी भेटला कीं पराजित होतो. दोघे तुल्यबळ असतील तर तणातणी वाढते आणि कंठशोष पदरीं येतो. म्हणून चर्चा जी आहे ती स्वमतप्रतिष्ठापनेसाठीं न होतां, सत्य काय आहे तें जाणून घेण्यासाठीं व्हावी. म्हणजे ज्ञान वाढतें, मतपरिवर्तन होऊं शकतें. वाद मिटतो. प्रामाणिक जिज्ञासा आणि निरहंकारी नम्र वृत्ति ही जर चर्चेची अंगें असतील तर वाद हा सुखसंवाद ठरतो. आणि तेव्हांच तो हितकरहि होतो.

शब्दानें आणि तर्कानें वाद तुटत नाहींत कारण जें जाणून घ्यावयाचें आहे तें तत्त्व श्रीज्ञानोबारायांनी म्हटल्याप्रमाणें ''हें शब्दें विण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे । बोला आधीं झोंबिजे । प्रमेयासी ।।'' (ज्ञाने. १।५८) अशा स्वरूपाचें असल्यानें तें जाणून घेण्यासाठीं हृदयांत मार्दव असलें पाहिजे. ''ऐसें हळुवारपण जै येइल । तरीच हें उपेगा जाईल । येरव्हीं आघवी गोठि होईल । मुकया बहिरियाची ।।'' (ज्ञाने. ६।२६)

**जनीं वादवेवाद सोडूनि द्यावा ।**
**जनीं सूखसंवाद सूखें करावा ।।**
**जगीं तो चि तो शोकसंतापहारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।१०९।।**

वादविवादामुळें प्रश्नाची तड लागेल, सत्याचा निर्णय होईल, या कल्पनेनें कुणी चर्चा करूं म्हणेल तर त्यांत बहुधा यश येत नाहीं. (एकेकाळीं मला या गोष्टीची फार हौस होती, मी अनेक गोष्टींवर अनेकांशीं वाद केला आहे.) पण निरुत्तर होऊनहि आपलें म्हणणें कोणी सोडीत नाहीं. एखाद्या गोष्टींतील सत्य समजून घेण्यासाठी ज्या दोघांचा त्याच्याशीं संबंध आहे, त्यांना समोरासमोर आणून, खरें जाणून घेण्याचा प्रयत्नहि यशस्वी होत नाहीं. दोघेहि परस्परांना तूं खोटें बोलतोस असेंच म्हणतात. कोणाची साक्ष काढावी तर तीहि उपयोगी पडत नाहीं. कारण तोच असत्य बोलण्याचा आरोप पुन्हां होतो. शेवटीं चिडाचिड आणि क्वचित् रडारडहि होते. ज्यांत कोणाचे स्वार्थसंबंध गुंतले असण्याची शक्यता नाहीं, अशा तात्त्विक चर्चेंतहि यापेक्षां वेगळें घडत नाहीं. एका विद्वान्, निष्ठावंत सद्गृहस्थाशीं ज्ञानोत्तर भक्तीच्या संबंधांत एकदां मी तोंडी आणि लेखी



पुष्कळ वाद केला पण आमचें कोणाचेंच मतपरिवर्तन झाले नाहीं. महाभारताच्या संबंधात मी असाच एकदां एका प्रसिद्ध विद्वान व्यक्तीशी बोलण्यासाठी गेलों होतो. मुख्य विषय बाजूलाच राहिला आणि त्या विद्वानांनीं शिवाजीराजांच्या मृत्यूनंतर संभाजीनें काय केलें तेंच विस्तारानें सांगितलें. म्हणून समर्थ म्हणतात– 'लोकामध्यें वादविवाद करणें सोडून द्या. त्या भरीस पडूं नका.'

श्रीनारदांनींहि **''वादो नावलम्ब्यः बाहुल्यावकाशित्वात् अनियतत्वाच्च''** असेंच सांगितलें आहे. शंकानिरसनासाठीं जिज्ञासू बुद्धीनें सुखसंवाद अवश्य करावा पण गंमत अशी आहे कीं माणसें तिथेंच मौन पाळतात. एरवीं व्यर्थ वादविवादांत मात्र त्यांचा उत्साह असतो. अगदी क्षुल्लक गोष्टहि वादाचा विषय बनते. सरकारी यात्री-निवासांतील खोलीचें भाडें अधिक आहे कां योग्य आहे यावरहि हमरीतुमरी होते. आणि त्यानिमित्तानें उखाळ्यापाखाळ्याहि निघतात. असे वाद काय कामाचे? आपल्या मताविषयीं ईर्ष्या अंत:करणांत असेल तर निरुत्तर होण्याचा प्रसंग आला तरी तुमच्या सारखें आम्हांला बोलतां येत नाहीं, पण तुमचें म्हणणें पटत नाहीं असेच म्हणणार. आपला आग्रह सोडणार नाहीं. ज्ञानलालसा नसते, जिज्ञासा नसते, केवळ अहंकार असतो, म्हणून हें असें होतें. ज्याला गुरु म्हणून आदरणीय मानावयाचें त्याच्याहि संबंधात हें असें घडतें. गुरूशीं बोलतांनाहि मोकळ्या मनानें बोलत नाहींत व ऐकत नाहींत. ती. दादांचें एक सुभाषित आहे. ते म्हणतात–

**आज्ञाधारक आपणा म्हणवुनी वादाविवादा करी ।**
**खंडाया गुरुवाक्य तत्पर जणूं वादाटवींचा हरि ।**
**तोंडी बोलून सद्गुरु, मनीं धरी त्याच्यासवें तेढ ती ।**
**कोण्या देशिहि लक्षणें न बुधहो सल्लक्षणीं मोडतीं ।**

या अशा वादविवादामुळें डोकें उगीच तापतें, कंठशोष पदरीं पडतो, तत्त्वबोध होतच नाहीं. म्हणून असे वादविवाद करूं नयेत. जिज्ञासू वृत्तीनें सुखसंवाद करावा. ऐकलें, वाचलें, पाहिलें, तर शंका आल्या पाहिजेत. विचार केला, मनन केलें, तर त्या येतातहि. प्रश्न उत्पन्न होतात, ते घोटाळ्यांतहि पाडतात. म्हणून संकोच न करितां कुणी जाणता भेटला तर त्याला विचारलें पाहिजें, शंकांचें निरसन करून घेतलें पाहिजे, प्रश्न सोडवून घेतलें पाहिजेत. अशा प्रामाणिकाशी बोलतांना ज्ञान्यालाहि आनंद होतो. अर्जुनाचें जिज्ञासूबुद्धीने प्रश्न विचारणें भगवंतालाहि फार आवडत होतें असें ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात– ''पै अर्जुना आम्हांही वाडेकोडे ।

अखंड बोलूं आवडे । परी काय कीजें न जोडे । पुसते ऐसे ।। आजी मनोरथासी फळ । जोडिलासी तू केवळ । जे तोंड भरोनि निखळ । आलासी पुसो ।।'' (ज्ञा. १५।४४८-४४९) पण असा योग क्वचितच येतो. केवळ करमणूक म्हणून ऐकणारेच फार.

**तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें ।**
**विवेकें अहंभाव यातें जिणावें ।।**
**अहंतागुणें वाद नाना विकारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।११०।।**

जेथें वाद मिटतो तो संवाद. निर्णय लागतो, सत्य उमजतें, म्हणणें पटते, आचरणांत आणण्यासारखी गोष्ट असेल तर तसें वागण्याचा प्रयत्न करावासा वाटतो, केला जातो, असें जिथें घडतें तो संवाद. पण असें होत नाहीं. कारण अहंभाव. अहंकार हाच सुखसंवादांतला मुख्य अडथळा आहे. न पटण्याची मुख्यत: दोन कारणें असतात. पहिलें कारण अज्ञान, दुसरें कारण अंहकार. पहिलें कारण सर्वसामान्य आहे. दुसरें कारण मुख्यत: विद्वानांच्या आश्रयानें राहतें.

एका चर्चेसाठीं दोन प्रतिष्ठितांना आमंत्रण होते. त्यांतले एक थोडें आधीं आलें. आतां दुसरे आले तर त्यांच्या स्वागताकरितां मला उठून उभें राहावें लागेल हीच आपत्ति पहिल्याला वाटली. त्यांनीं तसें स्पष्ट बोलूनहि दाखविलें, अशा अहंकारी भूमिकेंतून निर्माण झालेली चर्चा निर्णयास कशी येणार?

अज्ञानी माणसाजवळहि अहंकार नसतो असें नाहीं. आपल्या बुद्धीची शक्ति किती? आपला अनुभव केवढा? आपला अभ्यास वाचन काय आहे? यांतलें कांहींच विचारांत न घेतां माणूस ताडकन् हें मला पटत नाहीं असें म्हणतो. कां पटत नाहीं. त्याची मीमांसाहि तो करूं शकत नाहीं कारण अज्ञानामुळें तें सामर्थ्यच त्याच्याजवळ नसतें.

विद्वानांचा अहंकार अधिक उग्र असतो. गेल्या दहा हजार वर्षात कोणाला जें कळलें नाही. तें मला समजले आहे आणि तेंच मी तुम्हाला सांगणार आहे, असें म्हणणें हें उर्मट अहंकाराचें द्योतक आहे. अहंकारामुळें वादांतहि विकृति निर्माण होते. मग आपले म्हणणें सिद्ध करण्यासाठीं फसवीं उदाहरणें दिलीं जातात. खोटे पुरावें दाखविण्यांत येतात. बोलणारा बहुश्रुत असला, शरीराची ढब छाप पडणारी असली, वक्तृत्व प्रभावी असलें कीं कोणतेंहि मत कांहीं वेळ तरी भारावून गेलेल्या श्रोत्यांच्या गळीं उतरवितां येतें. पण हितकारक सत्य तेव्हाही दूरच राहते. स्वार्थासाठी ज्यांना आपल्या मताचा प्रचार करावयाचा आहे त्यांना ही



साधने उपयोगी पडत असलीं तरी त्यामुळें साधकाची हानी होते. त्यानें जागरूक राहून आपल्या कल्याणासाठी हितकर संवाद कोणता तें ओळखलें पाहिजे.

**हिताकारणें बोलणें सत्य आहे ।**
**हिताकारणें सर्व शोधूनि पाहे ।।**
**हिताकारणें बंड पाषांड वारी ।**
**तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।१११।।**

हित हेच सत्य आहे. हिताकरितां सत्याचा शोध घेतलाच पाहिजे. हित आणि सत्य हे एकाच नाण्याचे दोन पृष्ठभाग आहेत. यथार्थपणें सत्य असलेल्या वस्तुस्थितीचा प्रामाणिकपणें स्वीकार केला कीं त्याचा परिणाम हितसाधनांत होतो. आपल्याला आपल्या अडाणीपणामुळें, बुद्धीच्या दौर्बल्यामुळें, अनुभवाच्या तोटकेपणामुळें, कधीं सत्याचें, तर कधीं हिताचें, तर कधीं दोन्हींचेहि वास्तव स्वरूप कळत नाहीं.

आपल्याला जें योग्य वाटतें त्याला आपण सत्य म्हणतो. पण या योग्यायोग्याचा निर्णय देणारी बुद्धि रजोगुणानें, तमोगुणानें व्यापिलेली नाहीं ना, हें पाहिलेलें नसतें. ज्याच्या डोळ्याला रंग नेमका ओळखण्याचें सामर्थ्य नाहीं, त्यानें चित्राचें सौंदर्य आणि रंगसंगति यावर मत द्यावें किंवा ज्याला सुरेलपणा ही काय वस्तु आहे हें ऐकूनहि माहित नसते त्यानें सतारीच्या वा तंबोऱ्याच्या तारा जुळवण्याचा प्रयत्न करावा म्हणजे जसें होतें, तसेंच राजस तामस बुद्धीनें सत्य ठरवूं गेल्यास होतें. विषयलोलुप इंद्रियांचा दास असलेला माणूस, त्याला त्या त्या वेळीं सुखावह वाटणाऱ्या वस्तूला, हितकर समजूं लागला तर योग्य ठरेल काय? म्हणून सत्य काय याच्यासंबंधी पुष्कळ ऐकले पाहिजे. थोर थोर तत्त्ववेत्ते, नि:स्पृह महात्मे, जगत्कल्याणासाठीं अवतरलेले सत्पुरुष, जनहितासाठींच सत्याचें प्रतिपादन करीत असतात. हिताकरितांच ते सत्य बोलत असतात. त्यांचें बोलणें सत्य आणि हितकारकच असते.

आपण आपल्या हितासाठीं, सत्याची हीं प्रतिपादनें नीट शोधून पाहिलीं पाहिजेत. अमूक एकजण सांगतो म्हणून ते खरें मानावें असें कुणीच सांगत नाहीं. एखाद्याचा स्वत:च्या निर्णायक बुद्धीवर पूर्ण विश्वास असेल तर त्यानें अगदीं शंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर यांचेंहि सांगणें अमान्य केलें तरी चालेल, पण तो निर्णय प्रामाणिकपणें, त्याचा स्वत:चा असला पाहिजे, आणि अभ्यासपूर्वक पूर्ण विचार करून तो घेतला असला पाहिजे. पण कुणीतरी प्रभावी व्यक्तिमत्व आणि वक्तृत्व असलेला एखादा भगवान सांगतो वा वशिल्यानें नेमला गेलेला एखाद्या

विद्यापीठाचा विभाग-प्रमुख सांगतो, पुष्कळ खप असलेल्या वृत्तपत्राचा संपादक सांगतो, लटपटी खटपटीनें अखिल भारतीय परिषदेचा अध्यक्ष झालेला साहित्यिक सांगतो, प्रसिद्धीच्या मागें लागलेला आणि नाना प्रकारानें खुर्चीला चिकटून राहिलेला पुढारी सांगतो, तें मला बरें वाटतें, मी मानतों, असें मात्र असता कामा नये.

मार्क्स आणि फ्रॉईड हे अलीकडच्या काळांत मोठे विचारवंत होऊन गेले. बुद्धिमंतांच्या वैचारिक जगतांत त्यांनी आपला प्रभाव निर्माण केला. ललित वाङ्मयाचें कलाक्षेत्रहि त्यांच्या सिद्धान्तानें प्रभावित झालें आणि 'कलेकरितां कला'वादीहि कळून न कळून त्या विचारांचे प्रचारक बनले. आणि असे असतांनाहि पन्नास पाऊणशें वर्षांत मार्क्स आणि फ्रॉईडचें अनेक सिद्धान्त असत्य ठरले, कालबाह्य ठरले, अपूर्ण ठरले. मार्क्सवाद्यांनाहि मार्क्सला गुंडाळून ठेऊन वाटचाल करावी लागली. फ्रॉईडच्या प्रत्यक्ष शिष्यानेंच आपल्या गुरूचीं विधानें खोडून काढलीं. ख्यातनाम विचारवंतांच्या बाबतींत जर हें असें होतें, तर मग वर उल्लेखिलेल्या अनेक स्वयंभू पुढाऱ्यांच्या शब्दावर विश्वासून श्रीज्ञानेश्वरांसारख्या थोर महात्म्यांच्या वचनांना अप्रमाण मानणें योग्य नाहीं, हिताचें नाहीं, हें लक्षांत घेतलेंच पाहिजे. समर्थ हिताकरितां सर्व शोधून पहावें असें म्हणतात. तसें शोधून पाहिलें म्हणजे शंकराचार्य-ज्ञानेश्वरादि महात्मे किती थोर आहेत, तें कळेल. त्यांच्या चरणावर मस्तकच ठेवले पाहिजे असें मी मी म्हणणाऱ्या प्रज्ञावंतालाहि वाटेल. शोधून पाहणें हिताकरितां असेल तर हेंच घडेल.

नीट शोध घेणाऱ्या प्रज्ञावंताच्या हें लक्षांत येईल कीं उपनिषदांतील द्रष्टे ऋषि, शंकराचार्यादि तत्त्ववेत्ते, ज्ञानेश्वरादि महात्मे तुकाराम-रामदासांसारखे जगत्कल्याणासाठीं तळमळणारे सत्पुरुष हे जें सांगतात-तेच सत्य आहे आणि हिताचें आहे. त्याच्याविरुद्ध जो कोणी सांगतो तो पाखंडी आहे. त्याचें हें लोकांना फसविणारें बंड मोडून काढलेंच पाहिजे. हे पाखंडी मोठे धूर्त असतात. आपला स्वार्थ साधावयाचा तर कसें वागलें पाहिजे हें त्यांना चांगलें कळतें, आणि त्यामुळें जुन्या तत्त्ववेत्त्यांच्या विचारांची उसनवारी करीत, त्याच्या माध्यमांतून आपली पाखंडीं मतें ते लोकांच्या गळीं उतरवीत असतात. निवड करण्याची दृष्टि नसलेले वा व्यापक अभ्यासाचें साधन नसलेले तथाकथित बुद्धिवादीहि ही भेसळ कौतुकानें स्वीकारतात. पाखंड्यांचे बंड माजतें तें यामुळेंच. निष्ठुरपणें तें मोडून काढलें पाहिजे. कडक शब्दांनीं त्यांचा निषेध केला पाहिजे. पुराव्यानिशीं त्याचें खंडन केले पाहिजे. जाऊं द्या कीं म्हणून उपेक्षा करणें, कुठें या वाचाळांच्या तोंडाला लागा म्हणून आळस करणें, हें शोभणारें नाहीं. उद्धटासी उद्धट आणि खटनटासी खटनट झालेंच पाहिजे. वैयक्तिक आणि सामाजिक हिताकरितां



त्याचीहि फार आवश्यकता आहे. म्हणून ज्याला ज्याला कांहीं कळतें त्या प्रत्येकाचें हें कर्तव्य आहे. म्हणून समर्थ स्पष्टपणें आदेश देत आहेत कीं, ''हिताकारणें बंड पाषांड वारी ।।''

नेसूची लंगोटीहि देऊन टाकण्याइतके उदार असलेले तुकाराम महाराजहि **''धर्माचें पालन । करणें पाषांडखंडन । हेंचि आम्हा करणें काम । बीज वाढवावें नाम ।। तीक्ष्ण उत्तरें । हातीं घेऊनि बाण फिरे ।। नाहीं भीडभार । तुका म्हणे साना थोर ।।''** असेंच म्हणतात. एकाद्या लहानशा चोपड्याला, शासकीय पारितोषिक मिळालेला कोणी सामान्य साहित्यिक असेल वा लोकांना भुलवून त्या लोकप्रियतेच्या बळावर स्वत:ला भगवान् म्हणवून घेणारा कोणी थोर वक्ता असेल, त्याच्या सांगण्यांतील असत्य, त्याच्या बोलण्यातील पाखंड मोडून काढलेंच पाहिजे. त्याच्यासाठीं तीक्ष्ण शब्दांचीं शस्त्रें पाजळून सज्ज असलें पाहिजे. परमार्थ-सिद्धीचें बीज असलेल्या नामस्मरणासारख्या पवित्र, सोज्वळ साधनाचा पुरस्कार केलाच पाहिजे. सौजन्याचें आणि सात्त्विकतेचें मुकुटमणि असलेले श्रीज्ञानोबारायहि ''येऱ्हवीं प्राप्तें मतांतरे । थातंबूनी आंग भरे । बोलिजैल ते न सरे । तुम्हांपासी ।। (ज्ञाने. १३-३१८) असेंच म्हणतात. भ्रांत मतांचें खंडन आवश्यक आहें असें त्या आईपेक्षांहि वत्सल हृदय असलेल्या महापुरुषाला वाटतें. शुद्ध प्रमेयाभोंवतीचें शंकाकुंशकांचें गदळ काढून टाकलेंच पाहिजे. पाण्यावरील शेवाळ दूर करणें हें जसें आवश्यक असल्यानें कष्टाचें मानतां कामा नये, तसेंच पाखंड्यांनीं माजविलेलें बंड दूर करण्यासंबंधींहि मानलें पाहिजे. या वादानें पाखंडी सुधारण्याची शक्यता नाहीं, तशी अपेक्षाहि नाहीं, पण त्याच्या बोलण्याच्या प्रभावामुळें सामान्यांचा जो बुद्धिभेद झालेला असतो तो नाहीसा होऊं शकतो. म्हणून हा वादहि शेवटीं हितकारी संवादच ठरतो. तोहि आवश्यक तेथें केला पाहिजे.

**जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला ।**
**परी वादवेवाद तैसाचि ठेला ।।**
**उठे संशयो वाद हा दंभधारी ।**
**तुटे वाद संवाद तो हितकारी ।।११२।।**

अगदीं वाल्मीकि-व्यास यांच्यापासून ते ज्ञानेश्वर-तुकाराम-रामदास यांच्यापर्यंत वा त्यानंतरहि झालेल्या रामकृष्ण परमहंस, रमणमहर्षि, स्वरूपानंद, दासगणूमहाराज, यांच्यापर्यंत अनेक थोरामोठ्यांनीं चांगलें काय, हिताचें काय तें सांगितलें. तर्ककर्कश, बौद्धिक वाद करून सांगितलें, वा काव्यरसानें ओथंबलेल्या मधुर-रसाळ शब्दानें

सांगितलें. आग्रह, कठोरपणा यांचा अवलंब केला, तसेच समजूत घालणें, अनुनय करणें, यांचाहि अवलंब केला. कधीं रागानें फटकारलें तर कधीं वात्सल्यानें हनुवटी धरून समजाविलें. पण कांहीं थोडे अपवाद वगळले तरी मनुष्यजात सुधारली असें झालें नाही. माझें कोणी ऐकत नाहीं असा उद्वेग व्यासानींहि प्रगट केला. आणि श्रीधरस्वामींनाहि अंतकाळीं तेंच दु:ख होतें. सांगता-ऐकतांना जन्म गेला, पण शंका आणि प्रश्न, आणि त्यांच्या निरसनाकरितां केलेले वादविवाद जिथल्या तिथें, जसेच्या तसेच राहिले.

थोर महात्मे स्वत:पुरते तरी मुक्त होते, कोणी बद्ध जीव नव्हते. ते लोककल्याणासाठीं अवतार घेऊन आले होते. आपलें कार्य संपताच निघून गेले. भगवंताशीं एकरूप झाले. इतर बापडे ऐकणारे तर काय पण सांगणारेहि ठिकच्याठिकाणीं राहिले. कीर्तनकार, प्रवचनकार, पुराणिक, व्याख्याते उभें आयुष्य व्याख्यान-प्रवचनांत घालवितात. त्यांच्या शक्तीप्रमाणें, पात्रतेप्रमाणें त्यांना श्रोतेहि मिळतात. ते ५-१०हि असतात आणि सहस्रावधीहि असतात. पण शेवटीं परिणाम काय? जवळ-जवळ कांहींच नाहीं. सांगणारा तांदळाच्या ढिगावर दृष्टी ठेवून सांगणार व ऐकणारा फुकटात चांगला वेळ जातो वा बरी करमणूक होते म्हणून ऐकणार. सांगणाराला अनुभव नाहीं. ऐकणाराला जिज्ञासा नाहीं. हें असें सांगणें-ऐकणें काय कामाचें?

फार जुनी गोष्ट आहे. मी एकदा शंका व त्या विचारणारा यांची जंत्री ठेवली होती. एकदा एका शंकेचें निरसन झालें म्हणजे त्यानंतर पुन्हां त्याच व्यक्तीनें तरी दुसरी कांहीं नवीन शंका विचारावी कीं नाहीं. परंतु मला असें आढळलें आहे कीं तीच तीच व्यक्ति पुन्हां पुन्हां त्याच त्याच शंका विचारते. एकच शंका, एकाच व्यक्तीनें, एका वर्षांत, तीनदां विचारली असेंहि आढळलें. शंका त्याच असतात. ईश्वर आहे कां? आहे तर अनुभव कां येत नाहीं? चांगलें वागूनहि दु:ख कां भोगावें लागतें? प्रारब्ध असेल तर प्रयत्नाला अर्थ काय? पूजापाठांत मन लागत नाहीं काय करावें? धार्मिक दिसणारा मनुष्यहि सदाचारी कां नसतो? मन एकाग्र कां होत नाहीं? जीवब्रह्माचें ऐक्य कसें? इत्यादि. सांगणारा बहुधा नुसता पुस्तकीपंडित असतो. त्याला अनुभव नसतो, अनुभवासाठीं जें करावें लागतें तें त्याच्याहि जीवनांत नसतें. तो पुस्तकें पाहून संदर्भ गोळा करून सांगणार, आणि आपण काय विचारलें होतें, कशा करितां विचारलें होतें हेंहि न आठवणारा, श्रवणांत अवधान नसलेला असा श्रोता ऐकणार. आतां संशय तसेच येत राहिले तर नवल नाहीं. अनुभव नसल्यामुळें सांगणाराचा, आणि प्रामाणिक जिज्ञासा नसल्यामुळें ऐकणाराचा सांगणें आणि ऐकणें हा केवळ दंभाचार ठरतो.



**'अकरणात् मंदकरणं श्रेय:'** या न्यायानें कांहीं करा पण नांदा असें म्हणून तेंहि बरें म्हणावयाचें इतकेंच.

सांगणारा कृष्णासारखा असला पाहिजे कीं जो विश्वासानें सांगेल. **''अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच:''** (भ. १८।६६) आणि ऐकणारा अर्जुनासारखा पाहिजे, जो पुन्हां पुन्हां विचारील, अगदीं फटकळपणें विचारील, पण शेवटीं म्हणेल **''स्थितोऽस्मि गतसंदेह: करिष्ये वचनं तव ।''** (भ. १८।७३) हा वाद खरा संवाद, आणि तोच हितकारी म्हणून तर म्हटले आहे कीं **गीता सुगीता कर्तव्या किमन्यै: शास्त्रविस्तरै:।**

**जनीं हीत पंडीत सांडीत गेले ।**
**अहंतागुणें ब्रह्मराक्षेस जाले ।।**
**तयाहूनि वित्पन्न तो कोण आहे ।**
**मना सर्व जाणीव सांडूनि राहे ।।११३।।**

''तुटे वाद संवाद तो हीतकारी'' हें पालुपद नसलें तरी हे ११३-१४-१५ असें तिन्हीं श्लोक आशयाचा विचार करतां वादविवादासंबंधीचेच आहेत. ११५ व्या श्लोकावरून तें स्पष्ट होतें.

शास्त्रकारांनीं, संतांनीं, स्वत:च्या वाङ्मयांतून माणसाच्या हिताचें तें काय हें पुष्कळ सांगितलें आहे. विद्वानांना तें चांगलें अवगत असतें. त्याच्या आधारें ते प्रवचनें करतात, व्याख्यानें देतात, वादविवाद करतात, खंडनमंडन करीत फिरतात, पण स्वत: वागतांना मात्र त्या शास्त्राचा उपयोग करीत नाहींत, स्वत:च्या हिताचें जें तें नेमके टाकून देतात, आणि असें वागण्यालाहि पुन्हां शास्त्राधार आहे असें सांगतात.

एका तज्ञानें एका रोग्याला एक औषध लिहून दिले. रुग्णानें विचारलें-कसें वापरावयाचें? चिकित्सक गडबडींत होता. तो म्हणाला त्या बाटलीवर लिहिलें असेल तसें करा. औषध आणलें. बाटलीवर लिहिलेलें होतें की 'keep the bottle tightly corked.'' हें चांगलें ठळक होतें. वीस पंचवीस दिवसानंतर भेट झाल्यावर वैद्यानें विचारले-''काय म्हणते प्रकृति?'' ''आहे तशीच आहे.'' ''औषध आणलं नाहींत कां?'' ''आणलं कीं.'' ''मग घेतलंत ना!'' ''कसे घेणार?'' ''म्हणजे?'' ''तुम्हीच सांगितलं होतं कीं बाटलीवर सूचना असेल तसं करा. बाटलीवर ठळक अक्षरांत लिहिलेलें होतें, बाटली घट्ट बूच लावून ठेवा. मी बाटली तशीच ठेवली.'' ''असें कसे?'' असें वैद्यानें म्हणतांच तो फार शहाणा रोगी वैद्याशीच भांडू लागला कीं तुम्हींच सांगितलें होतें म्हणून.

विद्वानांचे, पंडितांचें असेंच होतें. सगळें पांडित्य प्रक्रियेचें. प्रक्रिया कशासाठीं

तें कुणी लक्षांतच घेणार नाहीं. हें म्हणजे बूच घट्ट लावून ठेवणेंच आहे. अहंकारामुळें हें असें होतें. ते आपणहून हिताकडें जाणार नाहींत. योगायोगाने क्वचित् हितच यांच्यासमोर आलें, तर हे त्याला डावलून दुसरीकडे जाणार आणि तरी आपलें चुकलें असें त्यांना वाटणार नाहींच. हीच अहंता. माझ्यासारखा दुसरा कोणी शहाणा नाहीं, मला वाटतें तेंच योग्य, माझ्या विरूद्ध कोणी असतां कामा नये. कोणी तसा असेल तर तो मूर्ख. मीच कसा योग्य आहे, तें त्याला पटवून दिलेंच पाहिजे, या विचारानेंच सदा वागणार. आयुष्य असेंच जाते. असे पंडित मेले म्हणजें त्यांच्या अहंकाराच्या दोषामुळें तें ब्रह्मराक्षस होतात, असे समर्थांनी म्हटले आहे. भूतपिशाच्चापैकी ब्रह्मराक्षस हा एक वर्ग आहे. या योनींतून लौकर सुटका होत नाहीं असें मानलें जातें.

श्रीवामनपंडितांची एक गोष्ट प्रसिद्ध आहे. त्यांना वादविवाद करण्याची फार आवड. ते ठिकठिकाणीं जाऊन वादामध्यें पंडितांना हारवीत आणि अजिंक्यपत्रें मिळवीत. त्यांना दिवसा मशाली लावून हिंडण्याचा मान होता असें म्हणतात. हा मान देणारा मोठा विनोदी असला पाहिजे. असो. वामनपंडित दिग्विजय करीत हिंडत असतांना त्यांना कांहीं अडचणीमुळें एका पिंपळाच्या पारावर रात्र काढण्याचा प्रसंग आला. अपरात्रीं तिथें दोन भुतें एकमेकांशीं बोलत होतीं. एक त्या पिंपळावरच राहत होतें. दुसरें पाहुणे आलें होतें. तें पाहुणे भूत म्हणत होतें, ''चांगला आहे रे हा पिंपळ ! तुझ्या शेजारच्या दुसऱ्या फांदीवर मी राहूं कां?'' ''छे ! छे ती फांदी राखून ठेवलीं आहे.'' ''कोणा करितां?'' ''वामनपंडितांकरिता. हा अहंकारी विद्वान जयपत्रें मिळवीत हिंडत असतो. तो मेल्यावर ब्रह्मराक्षस होणार आहे. तो येणार आहे या फांदीवर. तूं आपली सोय दुसरीकडे पहा.''

हें ऐकून वामनपंडितांना फार पश्चाताप झाला. ते अहंकार टाकून श्रीरामदासस्वामींना शरण गेले. सर्व इतिवृत्त त्यांनी त्यांना कळविलें आणि अभय मागून बोध करण्याची विनंति केली. ते पुढें मोठे भगवद्भक्त म्हणून प्रसिद्ध झाले.

अहंकारामुळें पांडित्य निरूपयोगी ठरतें. पूर्वी जीविकेसाठीं ब्राह्मण वर्गाला पांडित्य संपादन करावें लागत असे. आणि मग विद्वत्तेचा अहंकार त्यांना उर्मट बनवी. सर्वांकडे तें तुच्छतेनें पाहत. परिणामी ते अधोगतीला जात. म्हणून श्रीतुकोबाराय आपल्या एका अभंगात म्हणतात– **''बरा देवा कुणबी केलों । नाहीं तरी दंभेचि असतो मेलों ।। भलें केले देवराया । नाचे तुका लागे पायां ।। विद्या असती कांहीं । तरी पडतों अपायीं ।। सेवा चुकतो संतांची । नागवण हे फुकाची ।। गर्व होता ताठा । जातो यमपंथे वाटा ।। तुका म्हणे थोरपणें । नरक होती अभिमाने ।।''** विद्वत्तेशी, विद्येशीं, थोरपणाशीं विरोध



नाहीं. त्याज्य आहे तो अभिमान, गर्व, ताठा.

विद्वत्तेनें खरे म्हणजे नम्र असावयास हवें. विद्या विनयानें शोभते असें म्हणतात. विद्या म्हणजे ज्ञान. ज्ञान ईश्वराचें अस्तित्व पटवून देतें. त्याचें सामर्थ्य, त्याचे सर्वज्ञत्व सांगते. त्याच्या स्वरूपाचा बोध करतें. आतां या ईश्वरी सत्तेपुढें कोणी मोठा, श्रेष्ठ, थोर, विद्वान् ठरणें शक्य आहे काय? वेद हीं ज्याचीं निश्वसितें आहेत त्याच्याहून अधिक शहाणपण कोणाजवळ असणें शक्य आहें? सर्वसमर्थ ईश्वराच्या या अनंत अपार सृष्टींत मीच एक तेवढा कुणी पंडित असें म्हणणें हे डबक्यांतल्या मासोळीनें प्रचंड देवमाशाचें अस्तित्व नाकारण्यासारखें आहे. **मल्ल नको अतिमल्ल घने रे । घर नहीं तो बाहर बहुतेरे ।।** हे शहाणा म्हणविणारानें तरी विसरतां कामा नये.

माणसाजवळ शहाणपण, विद्वत्ता, चातुर्य, बुद्धिमत्ता, वक्तृत्व हे सर्व गुण असावेत. नसले तर ते मिळविण्याचा प्रयत्न करावा, त्याकरितां श्रम करावेत, अभ्यास करावा. परिश्रमपूर्वक पांडित्य मिळवावें. इतरांनीं वाटले तर या गुणांची जाणीवहि ठेवावी. पण हे गुण ज्याच्याजवळ आहेत त्याला मात्र त्याची अहंतापूर्वक जाणीव नसणें हेंच भूषणाचें आहे, पण तसें क्वचितच आढळते. गुण नसणाराहि स्वत:ला सद्गुणांचा पुतळा समजतो, असणारा तर काय बिडाच्या लोखंडासारखा ताठ असतो. माणसाला पाय असावेत. ते बळकटहि असावेत. असतातहि. पण त्यांचा उपयोग स्वत:च्या मार्गानें चालण्याकरिता करावयाचा असतो. दुसऱ्याला लाथा मारण्यासाठी नाहीं. स्वत:च्या जवळच्या गुणांचें तसेंच असावे. दुसऱ्या कोणाच्या लक्षांत आणून देण्यासाठीं वा त्याला हिणवण्यासाठीं गुणांची जाणीव ठेवू नये. 'बोलणाराची गाजरे विकली जातात, न बोलणाराची कस्तुरीहि विकली जात नाही', असें म्हणतात. व्यापारधंद्यांत प्रसिद्धी अपरिहार्य मानली जाते, पण ते निदान धंद्यापुरते तरी असावे. तो स्वभाव होऊं नये, त्याला लोकेषणेचे स्वरूप येऊं नये, पण तेवढें तारतम्य राहत नाहीं.

अलिकडे तर आपल्या गुणांची दुसऱ्याला जाणीव करून देणें हेंच महत्त्वाचें मानलें जाते. एका लेखकानें स्वत:चे एक नवीन लिहिलेलें पुस्तक वृत्तपत्राकडे अभिप्रायाकरितां पाठविलें. एक संपादक त्याला वाटेंत भेटले आणि आपणहून म्हणाले.

'अहो! बरेच दिवस झाले तुमच्या पुस्तकावर अभिप्राय द्यायचा राहिला आहे.'

'ठीक आहे. येऊ द्या सावकाश.'

'का असें करता?'

'काय?'

'तुम्हीच लिहून पाठवा ना!'

'अहो, असें कसें? हे योग्य नाही.'

'सगळे असेंच करतात. आम्ही ते काटछाटून प्रसिद्ध करतो. अभिप्राय देणारी अधिकाराचीं माणसें तरी कुठें आहेत? आमच्याकडे अलीकडे पुस्तकें येतात ती प्रशंसापर अभिप्रायाचे कागद घालूनच. तुमचेंच एक नुसते आले म्हणून मागें पडलें.' त्या लेखकानें आपलीं पुस्तकें पुन्हां अभिप्रायाकरिता कुठें पाठवलींच नाहींत.

हें आत्मप्रसिद्धीचें युग आहे. असें केलेंच पाहिजे नाहींतर मागें पडावें लागेल असें लोक मानतात. स्वत:ला ते करतां येत नसेल तर कोणा प्रशंसा करणाराची नियुक्ति केली पाहिजे. त्याकरितां सध्यां पुष्कळ विद्वान् भाड्यानें मिळण्यासारखे असतात. 'येथें विद्वान् भाड्यानें मिळतील' असा एक लेखच ३०-३५ वर्षांपूर्वी प्रकाशित झाला होता. आतां हें प्रमाण आणखीनच वाढलें असेल. निवडून यायचें असेल तर दोन गोष्टींची आवश्यकता आहे. खूप पैसा, कोणत्याहि मार्गानें मिळवलेले दोन-पांच लाख रुपये आणि स्वत:ची प्रशंसा करीत आपला मोठेपणा सांगत अखंड हिंडणें. हें अलीकडे आवश्यकहि असेल, पण योग्य आहे असें मला वाटत नाहीं. लोकसत्तात्मक व्यवस्थेचा एरवीं चांगला असलेला शासनप्रकार अयशस्वी झाला, भ्रष्टाचारांनीं किडला, तो यामुळेंच. ज्याच्याजवळ चांगले गुण आहेत त्याला लोकांनीं आपणहून निवडून दिलें असतें तर लोकराज्य कल्याणकारी ठरलें असतें. आज ते स्वत:चें असले-नसले गुण मिरवणाऱ्या, प्रचारतंत्रें आत्मसात केलेल्या, स्वयंमन्य, स्वार्थी पुढाऱ्यांमुळें, स्वाहाकारी ठरलें आहे. ऐहिकांतहि स्वत:च्या गुणांची प्रशंसा परिणामीं लाभदायक ठरत नाहीं, परमार्थांत तर ती फारच घातक ठरते. म्हणून समर्थ आवर्जून सांगत आहेत 'मना सर्व जाणीव सांडूनि राहे.'

**फुकाचें मुखीं बोलतां काय वेंचे ।**
**दिसेंदीस अभ्यंतरीं गर्व सांचे ।।**
**क्रियेवीण वाचाळतां वेर्थ आहे ।**
**विचारें तुझा तूं चि शोधूनि पाहे ।।११४।।**

शाब्दिक पांडित्य मिळविणें सोपें आहे. त्या बळावर लोकांना आकर्षक वाटेल असें बोलणेंहि सोपें आहे. आजकाल मुद्रण विपुल असल्यामुळें निरनिराळे सूचिकोश, संदर्भकोश, विषयवारीनें संग्रहित सुभाषितें, संतांच्या वचनांचे संग्रह, कोणालाहि सहज उपलब्ध आहेत. आणि त्यांच्या सहाय्यानें, त्यामानानें अगदीं थोडे श्रम करून वक्तृत्व रंगविणें सोपें आहे. पण हें सर्व बोलणें फुकट आहे; नुसतें बोलायला काय लागतें? त्याचा कांहीं उपयोग नाहीं.



थोडे बरें बोलतां आले, कांहीं पाठांतर असलें, विषयानुरोधें संतवचनांचें पुरावे एकामागून एक दिले कीं, सामान्यजन आकृष्ट होतात, वाहवा मिळते, लौकिक वाढतो, व्याख्याने-प्रवचनांकरितां आमंत्रणे येतात. लोक भजनीं लागतात. मानसन्मान मिळतो, महंती वाढते. पण हा सर्व व्यवहार झाला, व्यवसाय झाला, धंदा झाला. पारमार्थिकदृष्ट्या पदरांत कांहींच पडलें नाहीं, उलट हानि झाली. कारण थोडी वाहवा मिळूं लागली, मानमान्यता वाढली कीं माणसाचा अहंकार पुष्ट होऊं लागतो आणि मग या अहंकाराची भूक वाढत जाते. दिवसादिवसांनीं, क्रमाक्रमानें, हा अहंकार स्वसंतोषासाठी पैसा, उपभोग, कीर्ति यांच्यामागें अधिकाधिक प्रमाणांत लागतो. सरळपणा, साधेपणा, सौजन्य यांचा लोप होतो. माणूस माणूसहि राहत नाहीं. म्हणून समर्थ म्हणतात– 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे.' ज्या सांगण्या बोलण्याचा प्रत्यक्ष आचरणांशीं कांहीं संबंध नाहीं, असें बोलणें नुसती वाचाळता आहे. व्यर्थ बडबड आहे, तिचा कांहीं उपयोग नाहीं.

या संदर्भात ज्ञानेश्वर महाराजांनीं फार छान सांगितलें आहे. ते म्हणतात– **''पै तोंड भरो कां विचारा । आणि अंत:करणीं विषयांसी थारा । तरी नातुडें धनुर्धरा । त्रिशुद्धी मी ।। हां गा वौसणतयाचिया ग्रंथी । काई तुटती संसारगुंती । कीं परिवसिलेया पोथी । वाचिली होय ।। ना ना बांधोनिया डोळे । घ्राणीं लाविजती मुक्ताफळें । तरी तयांचें काय कळे । मोलमान ।। तैसा चित्तीं अहंते ठावो । आणि जिभे सकळशास्त्रांचा सरावो । ऐसेनि कोडी एक जन्म जावो । परी न पविजे माते ।। ''** (ज्ञा. १५।३९३-९६) ''तोंडातून नाना प्रकारचे विचार जणूं गंगेच्या ओघासारखे खळाळून वाहताहेत पण अंत:करणांत मात्र विषयसुखाची अभिलाषा भरून राहिली आहे. अशा स्थितींत अर्जुना तुला निश्चयानें त्रिवार सांगतों, त्या व्यक्तीला माझी प्राप्ति होण्याची कांहींच शक्यता नाहीं. झोंपेंत बडबडावें तसें बाष्कळ असलेले ग्रंथ आधाराला घेतले तर त्यानें संसारांतील गुंतागुंत सुटण्यात सहाय्य होतें काय? पोथीला नुसताच स्पर्श केला, अगदीं तिच्यावर डोकें ठेवून नमस्कार केला, तर न वाचतांच तिच्यांतील ज्ञान कधीं डोक्यांत शिरतें काय? एखाद्याचे डोळे घट्ट बांधले आणि सुंदर तेजस्वी असे गोल मोठे मोती त्याच्या नाकाला लावले तर त्या मोत्यांची किंमत त्याला करतां येते काय? हे जसे कधींहि शक्य नाहीं, तसेंच कर्म, भक्ति, ज्ञान, योग, सांख्य, तर्क, मीमांसा, पुराणें, संतवचनें, स्मृति आणि धर्मशास्त्रें यांच्यावर वक्तृत्वाच्या दृष्टीनें, व्याख्यान-प्रवचनांच्या दृष्टीनें कितीहि प्रभुत्व असलें, सहस्त्रावधि श्रोत्यांना ३-३ तासपर्यंत वेळेचा विसर पाडून रंगवून, खिळवून ठेवण्याचें सामर्थ्य जरी वाणीला असलें, तरीपण अशा विद्वान प्रभावी वक्त्याच्या अंत:करणांत

अहंकारच भरून राहिला असेल, सौजन्य, नम्रता, भक्तिभाव यांचा लवलेशहि तेथें नसेल तर हें सर्व पांडित्य असून नसल्यासारखें आहे. या पंडितानें कोट्यवधि जन्म जरी घेतले तरी तो माझ्यापर्यंत येऊन पोंचण्याची थोडीहि शक्यता नाहीं.''

नुसती वाचाळता कां नसावी तें यावरून स्पष्ट होते. चारी वेद मुखोद्‌गत असलेल्या अहंकारी ब्राह्मणापेक्षां, केवळ एक गायत्री मंत्र तेवढा येत असलेला पण सदाचारी ब्राह्मण श्रेष्ठ आहे असें मनूनेंहि म्हटलें आहे.

निरहंकारी सद्वर्तन, नम्र सदाचरण परमार्थात तर काय पण सुखी, समाधानी संसारासाठीं, भलेपणा मिळविण्यासाठीं, व्यवहारांतहि उपयोगी आहे.

आपण तसें आहों कीं नाहीं हें ज्याचें त्याला नक्की कळतें. इतरांचे अभिप्राय दोन्हीं दृष्टीनें फसवे असूं शकतात. दुसऱ्यांनीं केलेली निंदास्तुति यथार्थ नसते. निंदा द्वेषमत्सरांतून जन्माला येते. स्तुतीच्या मागें दंभ वा स्वार्थ असूं शकतो. म्हणून मी कसा आहे तें माझें मलाच ठरविलें पाहिजे **''सत्य असत्याशीं मन केले ग्वाही । मानीयले नाहीं जनमतां ।।** असें संतांनी म्हटलें आहे तें यासाठींच. थोडे तटस्थपणानें पाहतां आलें कीं आपले दोष, आपल्या चुका, आपल्या लक्षांत येऊं शकतात. देह-इंद्रिय-मन यांच्याशीं आपलें तादात्म्य झालेलें असतें आणि म्हणून आपलें जें आहे तेंच आपल्याला योग्य वाटत राहतें. शांतपणानें, थोडा साधक-बाधक विचार केला तर आपलें खरें-खोटें आपल्याला कळूं शकतें आणि तेंच प्रामाणिक असतें. म्हणून समर्थ ''तुझें तूंच पहा पण विचाराने शोधून पहा.'' असे सांगतात.

**तुटे वाद संवाद तेथें करावा ।**
**विवेकें अहंभाव हा पालटावा ।।**
**जनीं बोलण्यासारखें आचरावें ।**
**क्रियापालटे भक्तिपंथें चि जावें ।।११५।।**

१०८ व्या श्लोकापासून ८ श्लोकांचें हें प्रकरण चालू आहे. त्याचा उपसंहार या श्लोकानें होत आहे. सर्व प्रकरणाचें सार या श्लोकांत ग्रथित झालेलें आहे.

जिथें वाद तुटतो, निर्णय लागतो, ज्ञानांत भर पडते, शंकाकुशंकांचें निरसन होतें, खरें काय तें समजून येतें तें आचरणांत कसें उतरवावें त्याची पद्धति कळते, इत्यादि लाभ ज्या चर्चेतून पदरीं पडतात, त्या चर्चेला संवाद म्हणतात. हा संवाद तेवढा करावा. एरवीं खंडनमंडनाच्या भरीला पडून वादविवाद करूं नये. त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. अहंकार चांगलाच उद्दाम असतो. तो आपली चुकीची मतेंहि दुराग्रहानें सोडीत नाही. कदाचित निरुत्तर होईल. पण



मतपरिवर्तन होणार नाही. वादानें मतपरिवर्तन हा काळ शंकराचार्य-मंडनमिश्रांच्या बरोबर संपला आहे. तेव्हां साधकानें अहंकाराचा त्याग करावा आणि जिज्ञासू भावानें श्रवण करावे.

केवळ वक्तृत्वानें प्रभावित होऊं नये. आपली विवेकशक्ति जागृत ठेवावी. आपलें बोलणें आणि आचरण यांत मेळ असावा. आपल्याशीं कोणी खोटें बोलू नये, आपल्याला कोणी फसवू नये, आपल्याला कोणी त्रास देऊं नये, छळू नये, एवढें तरी आपल्याला कळतें ना? भले इतर शास्त्रांतील विधिनिषेध न कळोत. हें जें आपल्याला कळतें, तें तरी दुसऱ्याशी वागतांना आपण लक्षांत ठेवून नीट चांगलें वागावें. हाच सदाचार. हाच धर्म. **''आत्मवत् सर्व भूतेषु यः पश्यति स पश्यति''** असें शास्त्रवचनच आहे. ज्ञान, ज्ञान म्हणतात तें हेंच. असें जो वागतो त्याचेंच ज्ञान साक्षात्काराला येते. क्रियेमध्यें पालट व्हावयाचा असतो तो याच दृष्टीनें. पालट झाला नाहीं तर भक्तिमार्गाला लागण्याचा अधिकारच प्राप्त होत नाहीं. हें सगळें एकदम साधणार नाहीं; पण प्रयत्न तरी त्या दृष्टीनें सातत्यानें करीत राहिले पाहिजें. तेथें आळस नसावा, आत्मवंचना नसावी.

दुर्वर्तनासह 'हरे राम' उपयोगी पडत नाहीं. अधमपणानें वागतो आणि समाधि लागते हें संभवनीय नाही. अनाचार करीत असलेल्या व्यक्तीची कुंडलिनी कोणत्याहि मार्गानें जागृत होण्याची शक्यता नाहीं. परमार्थमार्गात कोणत्याहि दिशेनें प्रगति करून घ्यायची असली तरी क्रियेमध्यें पालट व्हावाच लागतो. वर्तन सुधारावेंच लागते. इंद्रियांचे विषयोपभोग सन्मार्गींच असावे लागतात. त्यादृष्टीनें स्वत: प्रयत्नशील असावें लागते.

एका गृहस्थानें आपल्या घरांत जिकडे तिकडे हिमालयांतील पवित्र तीर्थक्षेत्रांचीं, मंदिरांचीं आणि मनोहर निसर्गदृश्यांचीं सुंदर सुंदर चित्रें लावून ठेवलेलीं होतीं. 'असे कां' म्हणून विचारल्यावर गृहस्थांनीं उत्तर दिलें. 'मला हिमालयाची फार आवड आहे. चित्रांमुळें तेथें गेल्याचा आनंद मिळतो.' स्वत: गृहस्थ कधीं ऋषिकेशलाहि गेला नव्हता. दिनदर्शिकावरील चित्रें हाच त्याचा हिमालय. माझें घर हिमालयमय आहे असें वर भूषण. चित्रदर्शनानें हिमालयांत जाण्याची प्रेरणा निर्माण व्हावी. तसें जर घडलेंच नाहीं तर ते केवळ शोभेचें झालें, प्रदर्शन ठरलें. समर्थांचा भर क्रियेच्या पालटावर आहे तो यासाठीच. मनाच्या श्लोकांत अगदीं आरंभापासून त्यांनीं हा विषय पुन:पुन्हा ठांसून सांगितला आहे. 'जनीं वंद्य तें सर्व भावें करावें.' (२) 'सदाचार हा थोर सांडूं नये तो' (३) 'मना धर्मता नीति सोडूं नको हो' (४) 'देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी । मना सज्जना हे चि क्रीया धरावी ।' (८) 'मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें' (१९) 'स्वधर्मे चि चाले सदा उत्तमाचा' (४८)

'क्रिया भक्ति उपासना नित्य नेमें, (५७) 'देहे कारणीं सर्व लावीत जावें' (१०२) 'विवेकें क्रिया आपुली पालटावी' (१०५) 'क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे' (१०८) 'जनीं चालणें शुद्ध नेमस्त राहो' (१३२) 'क्रियेवीण वाचाळता ते चि मोठी' (१८२) अशा रीतीनें प्रत्यक्ष आचरणाचा महिमा समर्थांनीं अनेक प्रकारांनीं गायिला आहे. कोणत्याहि साधनेच्या दृष्टीनें त्याचें फार महत्त्व आहे.

क्रियेंत पालट होऊन वर्तन सुधारून भक्तिमार्गाला लागावें असें सांगितल्यानंतर, भक्तीची थोरवी कळावी, त्यामार्गानें जाण्याचें आकर्षण उत्पन्न व्हावें म्हणून समर्थ निरनिराळ्या अवतारलीला वर्णन करून भक्ताच्या रक्षणासाठीं देव कसा तत्पर असतो, तें पुन्हां एकदां पुढील १० श्लोकांतून सांगणार आहेत. हें प्रकरण पुराणकथांवर आधारित आहे.

**बहू श्रापितां कष्टला अंबऋषी ।**
**तयाचें स्वयें श्रीहरि जन्म सोशी ।।**
**दिल्हा क्षीरसिंधू तया उपमानी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११६।।**

वैवस्वस्त मनूच्या पोटीं नभग नांवाचा एक पराक्रमी राजा झाला. त्याचा मुलगा नाभाग. कांहीं ठिकाणीं याचा मनूचा पुत्र म्हणूनच उल्लेख आहे. हा नाभाग राजा मोठा धार्मिक होता. त्यानें कधीं मांसाहार केला नाहीं असें त्यांचें वर्णन आहे. हा मोठा शूर, फार पराक्रमी, असा राजा होता. अंबरीष हा त्याचा पुत्र. हा आपल्या बापाप्रमाणेंच मोठा पराक्रमी व धार्मिक असा होता. सहस्रावधि राजांच्या सवें एकट्यानें लढून त्यानें विजय प्राप्त करून घेतले, असें त्याचें वर्णन महाभारतांत आहे. यानें दीर्घकाळपर्यंत अत्यंत चांगल्या रीतीनें राज्य चालवलें असा त्याचा उल्लेख कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत केला आहे. हा अंबरीष एकादशीचें व्रत मोठ्या निष्ठेनें करीत असे. द्वादशीला सूर्योदय होतांच व्रताची पारणा करी. एकदां महासंतापी दुर्वास ऋषि अतिथि म्हणून त्याचेकडे आले. द्वादशीचे दिवशीं सकाळीं ते स्नान-संध्यासाठीं नदीवर म्हणून गेले. त्यांची संध्या लांबली. सूर्योदय होऊन गेला तरी ऋषि परत आले नाहींत. अतिथींच्या आधीं भोजन करतां येईना आणि सूर्योदय होतांच पारणा केली पाहिजे असें एकादशीचें व्रत मोडतां येईना. राजा धर्मसंकटांत पडला. शेवटीं त्यानें विष्णूच्या अभिषेकाचे तीर्थ घेऊन पारणा केली. भोजन मात्र केलें नाहीं. पण तेवढ्यानेंहि दुर्वास संतापले आणि त्यांनीं तुला कांहीं पशुयोनींत आणि कांहीं मनुष्ययोनींत असे दहा जन्म घ्यावे लागतील असा शाप दिला. तेव्हां विष्णूंनीं तो शाप स्वत:वर घेतला आणि



आपला भक्त अंबरीष याचें संरक्षण केलें.

दुर्वासांनीं संतापून अंबरीषावर कृत्या सोडली. अशीहि एक कथा आहे. पण विष्णूनीं सुदर्शन सोडून कृत्येचा नाश केला. नंतर तें सुदर्शन चक्र दुर्वासांच्याच मागें लागलें. दुर्वास ब्रह्मलोक, कैलास, वैकुंठ येथेंहि आश्रयांसाठीं गेलें पण उपयोग झाला नाहीं. नारदांच्या सांगण्यावरून ते शेवटीं अंबरीषालाच शरण आले, आणि मग अंबरीषानें सुदर्शन चक्राला नमस्कार करून तें परतविलें. ही कथा अधिक प्रसिद्ध आहे. भागवतांत तिचा उल्लेख आहे. समर्थांनीं मात्र पहिली अवतारविषयक कथाच गृहीत धरली आहे. आपल्या एकनिष्ठ भक्ताकरितां भगवंत त्याची संकटें स्वत: सोसतो. आई मुलाकरितां हवें ते कष्ट उपसते, तसेंच वात्सल्य भक्ताविषयींहि ईश्वराच्या अंत:करणांत असते. म्हणून भक्तिमार्गाला लागावें.

दुसरी कथा उपमन्यूची. हा वसिष्ठ कुलोत्पन्न एक मंत्रद्रष्टा ऋषि. लहानपणीं हा आपल्या मामासवें एका यज्ञांत गेला असतांना तेथें त्याला उत्तम असें गायीचें दूध प्यावयास मिळालें. घरीं परत आल्यावर त्यानें आईजवळ दुधाकरितां हट्ट घेतला. घरीं दारिद्र्य होतें. आईनें आपल्या मुलाच्या समजुतीसाठीं पाण्यांत पीठ कालवून त्याला दिलें. जिभेला खऱ्या दुधाची मधुर चव कळली असल्यानें बालकानें तें पीठ-पाणी नाकारलें आणि दुधासाठीं तें आक्रोश करूं लागलें. आई म्हणाली– बाळ, आपण दरिद्री आहोंत. माझ्याजवळ रडून काय होणार! तुझें वडील अयाचित वृत्तीनें राहतात तेहि तुला दूध देऊं शकणार नाहींत. तुला दूध पाहिजे असेल तर देवाजवळ माग. तो सर्वसमर्थ आहे. उपमन्यू आईला नमस्कार करून ध्रुवाच्या निश्चयानें बाहेर पडला, आणि त्यानें भगवान् शंकरांना आपल्या उग्र तपश्चर्येनें आणि उत्कट भक्तीनें प्रसन्न करून घेतलें. भगवान् शंकरांनीं त्याला दुधासाठीं म्हणून क्षीरसागरच भेट म्हणून दिला. याच उपमन्यूनें श्रीकृष्णाला शिवसहस्रनामाचा उपदेश केला असें वर्णन महाभारतात आहे.

भगवान् फार उदार आहे. भक्तीनें तो प्रसन्न झाला तर **''अनंत हस्ते कमलावरानें देतां किती घेशील दो करानें''** अशी स्थिति माणसाची होते. म्हणून भक्तिमार्गाला लागा. देव आपल्या भक्ताची कधीं उपेक्षा करीत नाहीं असें समर्थ सांगतात.

**धुरू लेकरूं बापुडे दैन्यवाणें ।**
**कृपा भाकिता दीधली भेटि जेणें ।।**
**चिरंजीव तारांगणीं प्रेमखाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११७।।**

सूर्यवंशामध्यें उत्तानपाद नांवाचा राजा होऊन गेला. ध्रुव हा त्याचा पुत्र. त्याच्या आईचें नांव सुनीति. हा मोठ्या प्रेमानें आपल्या वडिलांच्या मांडीवर बसला असतांना त्याच्या सावत्र आईनें, सुरुचीनें राजाच्या लाडक्या राणीनें, त्याला उत्तानपादाच्या मांडीवरून मत्सरानें खालीं ओढलें, आणि लाथ मारून हाकलून दिलें. लाडक्या बायकोच्या मुठींत गेलेला बाप कांहीं बोलूं शकला नाहीं. ही अगतिकता ध्रुवाला फार बोचली. त्याची आई सुनीति त्याला म्हणाली– बाळ, असा शोक करूं नकोस. भगवंताला आपलासा कर. तो अनाथांचा नाथ आहे. पांच वर्षाचा ध्रुव आईला नमस्कार करून घराबाहेर पडला. महर्षि नारदांच्या उपदेशाप्रमाणें त्यानें श्रीनारायणाची आराधना केली. त्यांच्या निष्ठेनें भगवान् प्रसन्न झाले. शामसुंदर चतुर्भुज अशा रूपांत त्याच्यापुढें प्रकट झाले. ध्यानासाठीं डोळे मिटलेले असतांनाहि परमात्म्याचें आल्हाददायक, शीतल तेंज ध्रुवाला जाणवले. ध्याननिमग्न ध्रुवानें चकित होऊन आपले नेत्र उघडले आणि पाहिले तो त्या सगुणरूपाचे स्मित हास्य ध्रुवावर प्रसन्नतेचा अमृतवर्षाव करीत होतें. ध्रुवानें हात जोडले, मस्तक नमविलें, पाय धरले, पण किती वेळ गेला तरी काय बोलावें तें त्याला सुचेना. तेव्हां श्रीनारायणानें आपल्या दिव्य शंखाचा स्पर्श ध्रुवाच्या गालाला केला, आणि ध्रुवाच्या जिभेवर जणूं प्रेमभक्तीनें न्हालेली सरस्वती प्रगट झाली.

**योऽन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्तां ।**
**संजीवयत्यखिलशक्तिधरः स्वधाम्ना ।।**
**अन्यांश्च हस्तचरणश्रवणत्वगादीन् ।**
**प्राणान् नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ।।**

भागवतकारांनीं संग्रहित केलेली ही ध्रुवस्तुति उदात्त भक्तिभावानें ओथंबलेली आहे. भगवान् प्रसन्न झालेलेच होते. त्यांनीं चरणीं लीन झालेल्या ध्रुवाला उचलून हृदयाशीं धरलें. वात्सल्यानें त्याचें मुख कुरवाळलें, त्याच्या कपाळाचें चुंबन घेतलें. आणि त्याला मधुरवाणीनें म्हणाले–बाळ ध्रुवा! काय पाहिजे तुला? माग. तुझ्या भक्तीनें संतुष्ट होऊन मी तुला वर देण्यासाठीं आलों आहे. ध्रुव म्हणाला, ''भगवन् आपलें दर्शन झालें. आपल्या कमलाहून कोमल असलेल्या वरदहस्तांनीं आपण मला कुरवाळलें याहून मागावयासारखें काहीं उरतें काय? माझें जीवन कृतार्थ झालें, धन्य झालें.''

या निष्काम भक्तीनें परमात्मा नारायण अधिकच संतुष्ट झाले. ध्रुवाला आवश्यक वाटलें नव्हतें तरी सुरुचीसारख्या स्वार्थी, अहंकारी वृत्तीच्या लोकांना जाणवावें म्हणून, ध्रुवाची योग्यता म्हणून वा ध्रुवाच्या भक्तीच्या ऋणांतून थोडें



तरी उतराई व्हावें म्हणून देवांनीं त्याला समुद्रवलयांकित पृथ्वीचें साम्राज्य आणि नंतर नक्षत्रमंडळांतील केंद्रस्थानीं असलेल्या सप्तर्षींनींहि, त्याच्याभोंवती प्रदक्षिणा घालावी अशा अढळ ध्रुवपदाचें वरदान दिलें. देव आपल्या भक्ताची उपेक्षा करीत नाहीं, तें लक्षांत यावें म्हणून समर्थ ध्रुवाच्या कथेचा उल्लेख अगदीं बालबोधपणें करीत आहेत.

**गजेंद्रू महां संकटीं वास पाहे ।**
**तयाकारणें श्रीहरी धांवताहे ।।**
**उडी घातली जाहला जीवदानीं ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११८।।**

पांड्य देशाचा, इंद्रद्युम्न म्हणून एक राजा होता. तो एकदां पूजासाधनेंत ध्यानस्थ असतांना अगस्ति ऋषि तेथें आले. राजा आपल्या साधनेंत निमग्न असल्यानें त्यानें उठून त्या थोर ऋषींचें आतिथ्य केलें नाहीं. ऋषि रागावले. आणि त्यांनीं राजाला तू उन्मत्त झाला आहेस म्हणून मदोन्मत हत्ती होशील असा शाप दिला. राजानें नंतर प्रार्थना करून क्षमा मागितली. तेव्हां ऋषींनीं उःशाप दिला कीं तूं कांहीं संकटांत सांपडून भगवंताचा धावा करशील तेव्हां भगवंत प्रत्यक्ष धांवून येऊन तुझा उद्धार करतील. हा हत्ती झालेला इंद्रद्युम्न गजेंद्र या नांवानें ओळखला जातो. तो हत्तींच्या एका कळपाचा नेता होता.

एकदा त्रिकूट पर्वतावर संचार करीत असतांना जलक्रीडेसाठीं तो एका सरोवरावर आला. तेथें एका मगरानें या गजेंद्राचा पाय पकडला. हा मगरहि देवलऋषींच्या शापानें क्रूर जलचर म्हणून जन्माला आलेला हुहू नांवाचा गंधर्व होता. गजेंद्रानें आपला पाय सोडवून घेण्याचा प्रयत्न केला, पण त्याच्या त्या प्रयत्नास यश आलें नाहीं. कळपांतील इतर हत्ती-हत्तीणीहि आपल्या या नेत्याला, अनेक प्रकारें प्रयत्न करूनहि, संकटमुक्त करूं शकले नाहींत. श्रम करूनहि आपणांस यश नाहीं असें आढळल्यावर, गजेंद्रास त्या संकटांत तसेंच सोडून, कळप परत फिरला. आपलें म्हणावयास गजेंद्राला कोणी उरलें नाहीं. ज्यांच्या रक्षणासाठीं गजेंद्रानें त्यापूर्वीं अनेक झुंजी दिल्या होत्या ते सर्व त्याला सोडून निघून गेले.

गजेंद्र थकला, हताश झाला आणि शेवटीं त्यानें कळवळून भगवंताचा धावा केला. भगवंताचें स्वरूप, नांव त्याला कांहींच माहीत नव्हतें. पूर्वजन्माच्या संस्कारानें, जगताचा कोणी धनी आहे आणि तोच दीन-अनाथांचा त्राता असणार, या कल्पनेनें गजेंद्रानें त्याहि स्थितींत सरोवरांत फुललेल्या कमळापैकीं एक कमळ सोंडेने उपटलें आणि तेंच भगवदर्पणबुद्धीनें आकाशामध्यें फेंकून त्यानें अत्यंत

आर्ततेनें ईश्वरास हाक मारली. त्यासरशीं भगवान् विष्णु तातडीनें धावून आले व त्यांनीं चक्र फेकून नक्राला ठार केलें आणि गजेंद्राचा उद्धार केला. त्याला नक्रमुखांतून व पशुदेहांतूनहि सोडवलें. वैकुंठलोकामध्यें भगवंतांचा सेवक म्हणून राहण्याचें भाग्य इंद्रद्युम्नाला लाभलें. पद्मपुराणांत आणि भागवतांत ही कथा सविस्तरपणें आलेली आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीहि या कथेचा उल्लेख केला आहे. **''पाहें पां सावजें हातिरूं धरिलें । तेणें तया काकुळती मातें स्मरिलें । कीं तयाचें वावो पशुत्व जाहलें । तेणें पातलिया मातें ।।** (ज्ञा. ९।४४२). भक्तिमहात्म्यामध्ये या कथेचा उल्लेख अनेकांनीं अनेक प्रकारांनीं केला आहे. ही फार लोकप्रिय कथा आहे. अनन्यभावानें आर्त होऊन ईश्वराचा धांवा करतांच तो आपल्या भक्ताची उपेक्षा कशी करीत नाहीं, हांकेसरसा कसा धांवून येतो, ते या कथेच्या आधारें समर्थांनीं व्यक्त केलें आहे.

**अजामेळ पापी तया अंत आला ।**
**कृपाळुपणें तो जनीं मुक्त केला ।।**
**अनाथासि आधार हा चक्रपाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।११९।।**

अजामिळाची कथा आणि तत्संबंधी विवेचन ९५ व्या श्लोकांत सविस्तरपणें आले आहे. **''अपि चेत् सुदुराचारो भजते मां अनन्यभाक् । साधुरेव स मन्तव्यः सम्यग् व्यवसितो हि सः।।''** (भ. ९।३०) अशी भगवंतांची प्रतिज्ञाच असल्यामुळें पातक्यालाहि उद्धरून जाण्याचा मार्ग मोकळा आहे. भक्तिमार्गाचें तें वैशिष्ट्य आहे असेंहि म्हणतां येईल मात्र **''यालागि दृष्कृती जऱ्ही जाहला । तरी अनुतापतीर्थीं न्हाला । न्हाऊनी मजआंतु आला । सर्वभावें ।।''** (ज्ञाने. ९।४२०) ही ज्ञानोबारायांची ओवी (या संदर्भात असलेलीच) सावधपणें लक्षांत घेतली पाहिजे. पश्चात्तापानें अत्यंत तप्त होऊन भगवंताची करुणा भाकेल, भक्तिमार्गाला लागेल तर तो निश्चितच उद्धरून जाईल. जसें अजामिळाचें झालें. अजामिळहि चुकून मुलाचें नारायण हें नांव घेतलें त्याक्षणीं उद्धरला नाहीं. त्या अद्‌भुत योगायोगानें त्याला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला, त्यानें भक्तिसाधना केली व मग तो उद्धरला. 'पातकी होता' असा भूतकाळाचा प्रयोगच असला पाहिजे. आतां मी भक्ति करतो, नाम घेतों, मग मला पातकेंहि करीत राहायला अडचण नाहीं, असा अपसमज कुणीहि आपल्या मनाशीं बाळगू नये. अजामिळासारखे परिवर्तन झालें असेल तरच भगवंत आपल्या भक्ताची उपेक्षा करीत नाहीं हें अनुभवास येईल.



**विधीकारणें जाहला मछ वेगीं ।**
**धरी कूर्मरूपें धरा पुष्टिभागीं ।।**
**जना रक्षणाकारणें नीच योनि ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२०।।**

या श्लोकामध्यें दहा अवतारांपैकीं मत्स्य, कूर्म, वराह अशा पहिल्या तीन अवतारांचा उल्लेख समर्थांनी केला आहे.

२५व्या कल्पाच्या शेवटीं ब्रह्मदेवाची रात्र आणि सृष्टीचा प्रलय चालू झाला होता. ब्रह्मदेव निद्राधीन असतांना, हयग्रीव नांवाच्या एका महाबलाढ्य दैत्यानें सृष्टीच्या उत्पत्तीचें साधन असलेले वेद पळविले आणि तो त्या प्रलय-सागरांत कोठेंतरी लपून बसला. ब्रह्मदेव जागा झाला आणि वेद पळविले गेले आहेत असें पाहिल्यानंतर किंकर्तव्यमूढ होऊन त्यानें भगवान् विष्णूची प्रार्थना केली व वेद सोडवून आणण्यास विनविलें. त्याप्रमाणें भगवंतांनीं मत्स्यावतार धारण करून हयग्रीव दैत्याचा नाश केला. वेद सोडवून आणले, अशी कथा आहे. तीच येथें ''विधीकारणें जाहला मछ वेगीं'' म्हणतांना समर्थांना अभिप्रेत आहे.

मनूच्या संदर्भांत मत्स्यावताराची आणखी एक कथा सांगितली जाते ती येथें अभिप्रेत नाहीं.

दुसरा कूर्मावतार. समुद्रमंथनाच्या वेळीं क्षीरसागर घुसळण्यासाठीं रवी (मंथा) म्हणून घेतलेला मंदराचल, घुसळतांना स्थिर राहीना, खालीं खालीं जाऊं लागला, तेव्हां देवांनीं प्रार्थना केल्यावरून विष्णूनें कासवाचें रूप धारण केलें, आणि तो पर्वत आपल्या पाठीवर धारण केला. तेव्हां समुद्रमंथन यशस्वीरीत्या पार पडलें. त्यांतून नाना प्रकारचीं रत्नें व अमृत लाभलें अशी प्रसिद्ध कथा आहे. पण ती येथें समर्थांना अभिप्रेत नाहीं असें दिसतें. निर्माण झालेली सृष्टी आपल्याच भारामुळें समुद्रांत बुडूं लागली. तेव्हां परमेश्वरानें कासवाचें रूप धारण करून पृथ्वीला आपल्या पाठीचा आधार दिला व ती तोलून धरली, बुडूं दिली नाहीं. ज्यांत कोणाहि दैत्याचा वध करण्याचा प्रसंग आला नाहीं असा हा एकच अवतार दिसतो. जयदेवानें आपल्या अष्टपदीत

**क्षितिरतिविपुलतरे तव तिष्ठति पृष्ठे ।**
**धरणिधरणकिण चक्र-गरिष्ठे ।**
**केशव धृतकच्छपरूप, जयजगदीश हरे ।**

असाच या अवताराचा उल्लेख केला आहे.

समर्थांनींहि 'धरी कूर्मरूपे धरा पुष्टिभागी' असेंच वर्णन केलें आहे.

तिसरा अवतार वराहाचा. कश्यपाच्या, दिती नांवाच्या पत्नींच्या पोटीं जन्मलेल्या, हिरण्याक्ष नावांच्या एका दैत्यानें सर्व पृथ्वींचेच हरण करून तिला पातांळात नेली. तेव्हां विष्णूनें वराहरूपानें प्रगट होऊन हिरण्याक्षाचा वध केला व पृथ्वी आपल्या सुळ्यावर घेऊन बाहेर काढली. पृथ्वीच्या रक्षणासाठीं नीच पशूचें रूप धारण करतानांहि भगवंतांनीं संकोच बाळगला नाहीं, यावरून त्यांचें कर्तव्याविषयीचें प्रेम सूचित होतें. वराह रूपामध्यें भगवंतांची आराधना करण्याची पद्धति एके काळीं भारतवर्षांत विशेष प्रमाणांत प्रचलित होती असें अनेक ठिकाणी सांपडलेल्या वराहाच्या प्राचीन मूर्तीवरून आढळतें.

जगत्कल्याणासाठीं वा भक्तसंरक्षणासाठीं परमेश्वर किती तत्पर असतो ते या तिन्हीं कथांवरून व्यक्त होते. महाप्रचंड अशा पृथ्वीचा उद्धार ज्यानें लीलया केला, त्याला आपल्या भक्तांचें रक्षण करण्यांत कांहींच श्रम नाहींत हें सांगावयास नकोच. मग तो भक्ताची उपेक्षा काय म्हणून करील?

**महां भक्त प्रल्हाद हा कष्टविला ।**
**म्हणोनी तया कारणें सिंह झाला ।।**
**न ये ज्वाळ वीषाळ संन्नीध कोण्ही ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२१।।**

मागील ९६ व्या श्लोकांत प्रल्हादवरद नरसिंहाची कथा सविस्तरपणें सांगण्यांत आलीच आहे. प्रल्हादासंबंधी एक गोष्ट तेथें उल्लेखिण्याची राहिली. प्रल्हादाला महाभक्त असें समर्थांनी कां म्हटलें तें तेथें सांगितलें आहे. येथे प्रल्हादाला महाभक्त म्हटलें आहे. प्रल्हादाचें अलौकिक मोठेंपण असें कीं त्यांनी भगवान् नरसिंह प्रसन्न झाले असतांना आपल्या एकट्याच्या उद्धाराची अपेक्षा केली नाहीं. ते म्हणतात-भगवान्! सगळेच जण मोक्षाच्या अपेक्षेनें साधना करतात. माझी एकट्यानें मुक्त होण्याची इच्छा नाहीं. संसारसुखाच्या मोहांत गुरफटून तुला अंतरलेल्या या दीन जनांचाहि उद्धार व्हावा अशी माझी इच्छा आहे. **''नैतान् विहाय कृपणान् विमुमुक्षु एकः''** या अपार करुणेमुळेच प्रल्हाद महाभक्त ठरले. श्रीतुकाराम महाराजांनीहि **''बुडत हे जन देखवेना डोळा । म्हणून कनवळा येतो मज ।''** असेंच म्हटलें आहे. संतांच्या हृदयाची ही विशालता, ही उदारताच त्यांच्या असामान्य मोठेपणाचें कारण आहे.



**कृपा भाकितां जाहला वज्रपाणी ।**
**तयाकारणें वामनु चक्रपाणी ।।**
**द्विजांकारणें भार्गव च्यापपाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२२।।**

बली हा पराक्रमी असुर राजा, विरोचनाचा पुत्र आणि भक्ताग्रणी प्रल्हादाचा नातू होता. प्रल्हादाच्या संस्कारामुळे कदाचित् तो वृत्तीनें धार्मिक असला तरी तसा तो उदार आणि निष्काम भक्त नव्हता असें दिसतें. यज्ञयागादि धार्मिक कृत्यांनी सामर्थ्य मिळवावें आणि त्याचा उपयोग सत्ता-संपत्ति मिळविण्याकडे करावा असें त्यांचें धोरण होते. त्यानें एकदां इंद्रपदाची अभिलाषा धरून मोठें यज्ञसत्र मांडलें. तेव्हां घाबरलेल्या इंद्रानें भगवान् विष्णूंची प्रार्थना केली आणि बलीपासून माझें रक्षण करा असें विनविले. त्याप्रमाणें विष्णूंनी, कश्यप-अदितीच्या पोटी वामन रूपानें अवतार घेतला आणि ते बटूच्या वेषांत यज्ञमंडपात उपस्थित झालें. बलीनें त्यांचा सन्मान करून अर्घ्यपाद्य अर्पण केलें आणि दान मागण्यास सांगितले. त्या तेजस्वी ब्रह्मचाऱ्यानें तीन पावलें भूमि मागितली. बलीला ती हास्यास्पद वाटली तरी बटूच्या आग्रहामुळें त्यानें त्रिपाद भूमीचें उदक सोडलें. शुक्राचार्यांनीं यांतील धोका ओळखून अडथळा आणण्याचा प्रयत्न केला पण त्यांना यश आलें नाहीं. हातावर उदक पडतांच वामनानें विराट् रूप धारण केलें. पहिल्या पावलानें सर्व पृथ्वी व्यापली, दुसऱ्या पावलानें द्युलोक व्यापला आणि तिसरें पाऊल कुठें ठेवावें अशी पृच्छा केली. बलीनें सर्व जाणलें आणि त्यानें स्वतःचें मस्तक पुढें वाकवून तेथें तिसरा पाय ठेवण्यास सांगितलें. बली शेवटीं प्रल्हादाचा नातूच होता. विष्णू प्रसन्न झाले व पुढील मन्वन्तरीं तूं इंद्र होशील असा वर देऊन त्यास पाताळांत नेले आणि विष्णू स्वतः बलीचे द्वारपाल होऊन राहिले असेंहि वर्णन येतें. आजच्या राज्यकर्त्यांप्रमाणें आपल्या माणसांना संतुष्ट करण्यासाठीं अधिकारपदें वाढविण्याचें तंत्र देवानें वापरलें नाहीं. नाहीं तर त्यालाहि आतां जसे दोन उपपंतप्रधान, त्याप्रमाणें दोन इंद्र नेमून दोघांनाहि संतुष्ट करतां आलें असतें. पण ईश्वरी राज्य न्यायानें चालते, तेथें कोणाच्या तरी स्वार्थासाठीं घटनेंत पालट केला जात नाहीं. ईश्वरानें इंद्राचेंहि रक्षण केलें आणि बलीचेंहि शेवटीं कल्याणच झालें. कोणत्याहि पातळीवरच्या भक्ताची उपेक्षा होत नाहीं ती अशी. मग तो भक्त आर्त असो कीं अर्थार्थी असो. कोणत्याहि अवस्थेंतील भक्तिभाव हा श्रेयस्करच आहे.

सत्ता-संपत्तीनें उन्मत्त झालेल्या क्षत्रिय राज्यकर्त्यांनीं शांत-तपस्वी अशा विद्याव्यासंगी ब्राह्मणांवरहि अनन्वित अत्याचार केले. त्यांच्या पारिपत्यासाठीं

भगवान् विष्णूनें जमदग्नीच्या पोटीं परशुरामरूपानें अवतार घेतला. उन्मत्तांचा संहार केला. ही कथा प्रसिद्ध आहे. दुर्दैवानें या परशुरामकथेचें अलीकडे फार विकृतीकरण झालें आहे. कुणी त्याला ब्राह्मण विरुद्ध क्षत्रिय अशा जातीयवादाचें रूप दिलें, तर कोणी परशुरामाच्या कृत्यांचें, राक्षसीवृत्तीनें घेतलेला आंधळा अविवेकी सूड, असें मूल्यमापन केलें. या दोन्हीं प्रकारचें वर्णन ही विकृति आहे, अतिशयोक्ति आहे. परशुरामाचा पराक्रम वर्णन करण्याच्या मागें, ब्राह्मणांचा विशेषत: भृगुवंशीयाचा जातीय अहंकार असता तर, पुढें क्षत्रिय रामानें ब्राह्मण परशुरामाचा पराभव केल्याचें वर्णन परंपरेंत सन्मान पावलें नसतें, ब्राह्मण कवींनींहि रसाळपणें गायिलें नसतें. संतकवी श्रीतुलसीदासांनीं आपल्या ''रामचरित मानस'' या अत्यंत लोकप्रिय असलेल्या महाकाव्यांत हा प्रसंग फार रसाळपणें वर्णन केलेला आहे. असें असतांना परशुरामाच्या कृत्याला एक सूडाचा प्रवास म्हणावें हें अविवेकाचें आहे. राष्ट्रीय पातळीवर सोशिकपणा हा दुर्गुण आहे. अन्यायाचा प्रतिकार आपल्या सर्व शक्तीनिशीं उग्रपणानें केला पाहिजे. त्या दृष्टीनें आक्रमण हेंच खरें संरक्षण आहे असें ज्यांचें मत आहे, त्या संपादकांनींहि परशुरामाविषयीच्या या विकृत दृष्टिकोनाला प्रसिद्धी द्यावी हें न समजणारें आहे. भाविकांनी पुराणकथेंतील इतिहास विकृत केला असें म्हणणाऱ्या बुद्धिमंतांनीं नवीन दृष्टिकोन व संशोधन या नांवाखालीं प्रसिद्ध होणाऱ्या प्राचीन घटनांच्या आणि व्यक्तींच्या घातक विकृतीकरणाचा खरें म्हणजे खरपूस समाचार घ्यावयास हवा होता. पण तसें झालें नाहीं. परंपरेनें मान्य असलेल्या प्राचीन मूल्यांवर तर्क आणि न्याय गुंडाळून आघात करणें हेंच जणूं बुद्धिमत्तेचें आणि प्रगत विचारांचें गमक ठरलें आहे. घरामध्यें ढेकूण आणि पिसवा फार झाल्या असल्या तर त्यांचा नाश करण्यासाठी तीक्ष्ण औषधें फवारावींत, पण घरच पेटवून देणें शहाणपणाचें नाही ही गोष्ट प्रगतीपर विचारांचे आधुनिक बुद्धिमंत लक्षांत घेतील तर बरें. समर्थांसारख्या राष्ट्रीय विचारानें भरलेल्या, समाजकल्याणाची तळमळ असलेल्या, नि:स्पृह महापुरुषाला सतत शस्त्र उगारून उभा असलेला परशुराम आदरणीय वाटतो आणि देव भक्ताची उपेक्षा करीत नाहीं, या संदर्भांत उल्लेखनीय वाटतो हें फार महत्त्वाचें आहे. स्वच्छ मनाने आपण तें समजून घेतलें पाहिजे.

**अहिले सतींलागि आरण्यपंथें ।**
**कुढावा पुढें देव बंदी तयातें ।।**
**बळें सोडितां, घाव घाली निशाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२३।।**



इंद्राच्या संसर्गानें भ्रष्ट झालेल्या, गौतमपत्नी अहल्येच्या उद्धारासाठीं रामचंद्र अरण्यांतील तिच्या निर्मनुष्य आश्रमामध्यें आवर्जून आले आणि तिचा उद्धार केला अशी कथा आहे. ती सर्वांना परिचित आहे. मागें ३२ व्या श्लोकांत हा उल्लेख आला आहे.

रामचंद्रानें रावणाच्या बंदीतून देवांना सोडविले. या प्रसंगाचा उल्लेखहि ३१ व्या श्लोकांत आहे. ईश्वराच्या भक्तसंरक्षक या ब्रीदाचा सर्व इतिहासपुराणांतून जणूं डंका वाजतो आहे. हें जाणून माणसानें तो आपली उपेक्षा करणार नाहीं या भरंवशानें भक्तिमार्गाला लागावें.

अनेक ठिकाणीं या श्लोकाचा चवथा चरण ''नुपेक्षी कदा राम दासाभिमानी'' असा आलेला आहे. कांहीं ठिकाणीं तर हें सर्व प्रकरणच नुपेक्षी कदा रामदासाभिमानी या २८ ते ३७ येथें एकवार येऊन गेलेल्या पालुपदानेंच आलेलें आहे. समर्थांना केवळ रामावताराचें नव्हे तर परमात्म्याचेंच भक्ताची उपेक्षा न करण्याचें ब्रीद आहे असें सांगावयाचें असल्यानें या प्रकरणांत त्यांनी राम हें विशिष्टतावाचक नांव टाळून देव हें सर्वसाधारण ईश्वरवाचक नांव स्वीकारलें आहे. या संदर्भांत येथें रामावतारातील घटनेच्या वर्णनापुरतें ''नुपेक्षी कदा रामदासाभिमानी'' हें पालुपद घेणें म्हणजे राम हा ईश्वरापेक्षां कुणी वेगळा आहे असें समर्थांना वाटत असल्याचा अपसमज गृहीत धरणें आहे. तसा संभव राहूं नये म्हणून 'नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी' हेंच पालुपद स्वीकारणें बरें असें मला वाटतें.

**तये द्रुपदीकारणें लागवेगें ।**
**त्वरें धांवतु सर्व सांडूनि मागें ।।**
**कळीलागि जाला असें बोध्य मौनी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२४।।**

आर्त भक्तीचा आदर्श म्हणून द्रौपदीचें चरित्र लक्षांत घेतलें पाहिजे.

मोहाला बळी पडून युधिष्ठिर कौरवांच्या सभेंतील कपटद्युतांत डावामागून डाव हरला. वैभव, राज्य गेलें. द्यूतांत भावांना आणि स्वत:ला पणाला लावून तो हरला. पांडव कौरवांचे दास झाले. द्युताचा अभिनिवेश आतां युधिष्ठिराच्या डोक्यांत चढला होता. शकुनीनें खिजवल्यामुळें त्यानें साध्वी द्रौपदीलाहि पणाला लावले आणि तो पुन्हां हरला. दुर्योधनाचा उन्मत्तपणा आता शिगेला पोंचला होता. कुत्सित भाषण करून, कर्णानें अधमपणानें त्यांत भर घातली. रज:स्वला, एकवस्त्रा, द्रौपदी फरफटत ओढून सभेंत आणली गेली. स्वसंरक्षणासाठीं द्रौपदीनें बुद्धिवाद केला. पण त्या तेजस्विनीचें चातुर्य निष्फळ ठरलें. भीष्म-द्रोण उत्तर देऊं

शकले नाहींत. विदुराचें आणि विकर्णाचें भाषण अरण्यरुदन ठरलें. धर्मपाशानें हात बांधले गेलेले पांडव खालीं माना घालून बसलेले होते. नराधम दु:शासन वस्त्राला हात घालून खेंचू पाहत होता. तेव्हां खाटकाच्या सुऱ्याखालीं गाय हंबरावी, तशी द्रौपदी हंबरली. अगतिक होऊन अनन्यभावानें तिनें कृष्णाचा धांवा केला. ''**गोविन्द द्वारकावासिन् कृष्ण गोपीजनप्रिय । कौरवैः परिभूतां मां किं न जानासि केशव ।। हे नाथ हे रमानाथ व्रजनाथार्तिनाशन । कौरवार्णवमग्नां मामुद्धरस्व जनार्दन ।। कृष्ण कृष्ण महायोगिन् विश्वात्मन् विश्वभावन । प्रपन्नांपाहि गोविन्द कुरुमध्येऽवसीदतीम् ।।** भगवान् धांवत आले आणि जणूं त्यांनीं वस्त्रावतार धारण केला. अगणित वस्त्रें द्रौपदीला पुरविलीं. वस्त्रें ओढतां ओढतां थकलेला दु:शासन शेवटीं गलितगात्र होऊन कोंसळला. द्रौपदीचें रक्षण झालें. ''**हा अंबरावतार श्रितलज्जारक्षणार्थ अकरावा । प्रभुमत असे सदवनीं आग्रह वेषीं कदापि न धरावा**'' ।। असें पंडितांनीं केलेलें वर्णन अगदीं यथार्थ आहे. नंतर आतां कलियुग लागलें असल्यानें ईश्वर बौद्धावतार धारण करून मौन घेऊन बसला आहे. कलियुगामध्यें भक्तींतील दांभिकपणा वाढला, निष्ठा उणावली, उत्कटता उरली नाहीं, म्हणून देव मौनी झाला आहे असें वाटतें. वस्तुत: भक्तांचा ईश्वर होता तसाच आहे ''**पालिता गोपसुंदर्यः स कृष्णः क्वापि नो गतः**'' असें एक वचन आहे तें आशयाच्या दृष्टीनें यथार्थ आहे. गोपींचा कृष्ण, भक्तांचा कृष्ण कुठें गेला नाहीं. तो आहेच. भक्तांकरितां तसाच दक्ष आहे. आपली भक्ति अव्यभिचारी नसते, पतिव्रतेच्या निष्ठेची नसते, म्हणून अनुभव येत नाही. परीक्षा व्हावी लागते. परीक्षेला उतरावे लागते. तेव्हां देव पावतो. शासनाकडून अनुदान मिळवावयाचें असेल तर मान्य कक्षेंतील योजना नीट आंखून विनंति करावी लागते तरी दोन दोन वर्षें उत्तर येत नाहीं. एकानें असें कां याची चौकशी केली तेव्हा सचिवाने सांगितलें-अहो! पोकळ फसव्या योजना अलीकडे फार येतात. तेव्हां सगळीं प्रकरणें सगळ्या दृष्टीनें नीट पारखून घ्यावीं लागतात म्हणून वेळ लागतो. तुमची विनंति प्रामाणिक आहे असें आढळून आलें आहे. लौकरच मार्गी लागेल, चिंता करू नका. तात्पर्य, मौन धारण केले असेल तर तो परीक्षा पाहतो आहे असें समजावें. पण भूमिका प्रामाणिक असेल तर दुर्लक्ष होतें हें भय बाळगण्याचें कारण नाहीं. देव आपल्या भक्ताची कधीं उपेक्षा करीत नाहीं असा दृढ विश्वास साधकाने बाळगावा.

समर्थांनी या दृष्टीनें या दहा श्लोकांच्या प्रकरणांतून निरनिराळ्या स्वरूपाचीं उदाहरणें देऊन, अवतारकार्यांतील घटना सांगून भगवंताची भक्तवत्सलता पुन्हां पुन्हां गौरवून सांगितली आहे.



**अनाथां दिनांकारणें जन्मताहे ।**
**कलंकी पुढें देव होणार आहे ।।**
**जया वर्णितां सीणली वेदवाणी ।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी ।।१२५।।**

अशारीतीनें भगवंतांनी आजवर दीन-अनाथांच्या रक्षणासाठीं अनेक अवतार घेतले आहेत. दहा अवतार प्रसिद्ध आहेत. त्यांतील नऊ झाले आहेत. कल्की किंवा कलंकी हा दहावा अवतार अजून व्हावयाचा आहे. तो कलियुगाच्या शेवटीं शेवटीं होईल असें म्हणतात. त्यात आर्य-संस्कृतीच्या, वैदिक संस्कृतीच्या विरोधी असणाऱ्या, स्वैराचारी, अनाचारी, अत्याचारी म्लेंच्छांचा नाश भगवंत करतील आणि मग पुन्हां सत्ययुगाला आरंभ होईल. भगवंताचें हें उज्ज्वल चरित्र, अलौकिक सामर्थ्य, षड्गुणैश्वर्य वर्णन करणें व्यासांसारख्या अलौकिक प्रज्ञेच्या आणि प्रतिभेच्या महापुरुषालाच काय, पण वेदांनाहि साधणारें नाहीं, तेव्हां श्रुति-स्मृति-संतांनी जें सांगितलें आहे त्यावर विश्वास ठेवावा आणि सन्मार्गानें, भक्तिमार्गानें चालावें. देव त्याची कधीं उपेक्षा करणार नाहीं.

**जनाकारणें देव लीळावतारी ।**
**बहूतां परीं आदरें वेषधारी ।।**
**तया नेणती ते जन पापरूपी ।**
**दुरात्में महां नष्ट चांडाळ पापी ।।१२६।।**

परमेश्वर अवतार घेतो तो भक्तासाठीं, जनकल्याणासाठीं, लोकांच्या उद्धारासाठीं. त्याच्या ठिकाणीं कसली उणीव नाहीं, त्याला कसली अडचण नाहीं, त्याला कशाची अपेक्षा नाहीं. तो सर्वार्थानें पूर्णकाम आहे. तरी अनन्य भक्ताची, अव्यभिचारी भक्ताची, ज्ञानी भक्ताची त्याला ओढ आहे. भक्तांचा योगक्षेम वाहणें हें त्याचें व्यसन आहे. संतांचे संरक्षण आणि धर्माचें संस्थापन हें त्यानें आपलें कर्तव्य म्हणून ठरविलें आहे. भक्तजनांसाठी तर भगवान् वेडा होतो. ज्ञानोबाराय म्हणतात– ''**तो पाहवा हे डोहळे । म्हणून अचक्षूंसी मज डोळे । हातींचेनि लीलाकमळें । पूजूं तयाते ।। दोनीवरी दोनी । भुजा आलों घेऊनि । आलिंगावयालागुनी । तयाचे आंग ।।**'' (ज्ञा. १२।२२३-२४) अशी भगवंताची स्थिति असते. श्रीनामदेव, चोखोबाराय, जनाबाई, दामाजी, एकनाथ इत्यादि संतांच्या चरित्रामध्यें ईश्वराची भक्ताविषयींची ही ओढ, हें वात्सल्य, हा जिव्हाळा अनेक रूपांनीं प्रगट झाला आहे. ''**तयाचें आम्हा व्यसन । तो आमुचें निधिनिधान । किंबहुना**

**समाधान । तो मिळे तैं ।।'** (ज्ञा. १२।२३७) असें भगवंतांचें म्हणणें ज्ञानेश्वर माऊलींनीं उद्‌धृत केलें आहे. तें अनेक स्थळीं, प्रकारांनीं वारंवार, साक्षात्कारास आलें आहें. भगवंताची तीहि एक लीलाच आहे. त्याला कोणत्याहि रूपानें प्रगट होण्याची आणि भक्तासाठीं कोणतीहि कामें करण्याची जणूं हौस असते. ''संतसंरक्षणार्थाय संभवामि क्षणेक्षणे ॥'' असे माझा ज्येष्ठ बंधु तुकाराम यानें गीतेचें अनुकरण करीत म्हटलें आहे तें मोठें मार्मिक आहे.

माणकोजी बोधल्यांचे शिष्य गोपालनाथ यांची परीक्षा पाहण्यासाठीं तो वाघाच्या रूपानें प्रगट झाला. **जें जें भेटे भूत । तें तें मानिजें भगवंत** (ज्ञा. १०।११८) या अवस्थेंत नामदेवराय आले कीं नाहींत हें पाहण्यासाठीं श्वानरूपानें त्यानें गाकर पळविले. नाथांच्या घरी श्रीखंड्या म्हणून राबला. दामाजीसाठीं महाराच्या वेषानें गेला. संतसखूसाठीं कऱ्हाडांत तिच्या सासरीं सखूच्या भूमिकेंत स्त्रीवेषानें नांदला. अशा हृदय भरून आणणाऱ्या अनेक कथा आहेत. म्हणून समर्थ म्हणतात– बहूतांपरी आदरें वेषधारी होऊन, देव लोकांसाठी अनेक प्रकारच्या अवतारलीला करतो. आई जसे मुलांसाठीं कष्ट उपसते आणि तरी शिणत नाहीं, तेंच वात्सल्य भगवंताच्याहि हृदयांत आहे. मात्र हें सर्व भक्तांसाठीं आहे. ईश्वराची अनेकरूपें आहेत. तीं सर्व लोकांच्यासाठींच आहेत. शासन गौरव करतें, अनुदान देतें, सोयी पाहतें, शुश्रूषा करतें, शिक्षण देतें, न्याय करतें, शिक्षाहि ठोठावतें. ईश्वराचें अवतारकृत्यहि असेंच आहे. ईश्वर सहाय्यास धावला असें वर्णन ऐकलें कीं माणसें हुरळल्यासारखीं होतात, पण भगवंत आपल्या प्रिय भक्तासाठीं तें करतो त्याला कोणते भक्त प्रिय आहेत ते त्यानेंच स्वत: गीतेच्या १२ व्या अध्यायांत **''यो मद्‌भक्तः स मे प्रियः''** असें वारंवार म्हणून स्पष्ट केलें आहे तें लक्षांत घेतलें पाहिजे.

हें सर्व पहावयास पाहिजे तसें कुणी पहात नाहीं आणि मग समर्थांसारखे संत रागावतात, कळवळून शिव्या घालतात. अनेक तर्कटी आहेत ते ईश्वर नाहींच म्हणतात. अनेक पंडित आहेत, ज्ञानी आहेत ते ईश्वराच्या सगुण साकार रूपाला मान देत नाहींत. अनेक विद्वान आहेत ते ईश्वराच्या भक्तवात्सल्याला अर्थवाद मानून दूर सारतात. अधिकारभेदानें सर्व संभवनीय आहे हा विवेक मात्र कुणी करीत नाहीं त्यामुळें सर्वसामान्य जीवन एकीकडे नास्तिकांच्या स्वैराचारानें तर दुसरीकडे तथाकथित धार्मिकांच्या दंभाचारानें बुजबुजलेलें राहतें. सामान्य माणूस मात्र खरें काय तें न कळल्यानें भांबावलेला राहतो. मग मानसिक समाधानासाठीं कांहींतरी थोडें करून देवाचें यथाशक्ति केलें या समजुतीखालीं प्रपंचाच्या नव्या नव्या व्यापांत गुरफटून जातो.



सामान्य मनुष्य आत्मकल्याण करून घेऊं शकत नाहीं वा उद्धरून जावें अशी उत्कट इच्छाहि त्याच्या मनांत उत्पन्न होत नाहीं. याला कारण आहेत ते ईश्वराचें अवतारकृत्य न जाणणारे तर्कटी-नास्तिक वा ढोंगी-धार्मिक. म्हणून समर्थ त्यांना मूर्तिमंत पापरूप असें म्हणतात. आणि चिडून जाऊन, संतापून दुरात्मे, महानष्ट, चांडाळ अशा शिव्या घालतात. समर्थ इतके रागावतात त्याचे कारण असें कीं तर्कटी वा ढोंगी माणसें स्वत: तर आपली हानी करून घेतातच, पण तेवढेंच केवळ घडतें तर ते अज्ञानी ठरले असते, मूर्ख ठरलें असते. पण एवढ्यानें भागत नाहीं. हे तर्कटी, हे ढोंगी, स्वैराचाराचें, अनाचाराचें एक फसवें तत्त्वज्ञान उभे करतात, आणि सामान्यांना भुरळ पाडून विनाशाच्या मार्गाला नेतात. समर्थ त्यांना पापी, नष्ट, दुरात्मे, चांडाळ म्हणतात ते यामुळें.

**जगीं धन्य तो रामसूखें निवाला ।**
**कथा ऐकतां सर्व तल्लीन झाला ।।**
**देहेभावना रामबोधें उडाली ।**
**मनोवासना रामरूपीं बुडाली ।।१२७।।**

मागच्या श्लोकांत समर्थांनीं त्याज्य कोण, ज्याचा धि:कार करावा असा कोण, तें सांगितलें. आतां या श्लोकांत ते, अभिनंदनीय कोण, ज्याचें वळण घ्यावें असा कोण, तें सांगत आहेत.

समर्थ म्हणतात– तो धन्य होय, ज्याचें सुख राममध्यें आहे. श्रीरामचंद्राच्या नामस्मरणांत, चिंतनांत, कथाश्रवणांत, सेवेंत ज्याला अतिशय सुख होते, आणि त्या अलौकिक दिव्य अशा भक्तिसुखानेंच जो तृप्त होतो, शांत होतो, आणखी वेगळें कांहीं पाहिजे अशी हांव त्यामुळें ज्याला उरलेली नसते, तोच धन्य होय.

सत्पुरुषांचें, संतमहात्म्यांचें, धन्यतेचें हें मापच कांहीं वेगळें आहे. ते ज्याला धन्य म्हणतात, भाग्यवान् म्हणतात, त्याचें तें मोठेंपण आपल्याला पटेल कीं नाहीं आणि क्वचित् पटलें तरी मानवेल कीं नाहीं कोणास ठाऊक? आणि त्यामुळेंच तर संत, संत असतात आणि आपण आपणच असतो. श्रीशंकराचार्य म्हणतात, **''कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः''** ज्याच्याजवळ नुसती लंगोटीच लज्जारक्षणापुरती आहे तो भाग्यवान्, तोच भाग्यवान्. मात्र हा लंगोटीवाला दरिद्री नाहीं, पामर नाहीं, बापुडवाणा भिकारी नाहीं. हा आहे- **''वेदान्तवाक्येषु सदा रमन्तः। देहादिभावं परिवर्जयन्तः । आत्मानमात्मन्यवलोकयन्तः । कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ।।''** श्रीतुकाराम महाराज म्हणतात, ''भाग्यवंत म्हणो तया । शरण गेले पंढरीराया ।'' त्यांचाच दुसरा एक अभंग आहे त्यांत ते

म्हणतात–''विठोबाचे अखंड चिंतन ज्यांच्या अंत:करणांत असतें, जे गीता आणि भागवत प्रेमानें ऐकतात, अशा रीतीनें आपल्या हितासाठीं जे सदैव जागृत असतात, हीच सात्विक आवड असलेले कन्यापुत्र त्यांच्या कुळीं जन्माला येतात, त्यांचे आईवडीलहि धन्य होत. मग तें स्वत: धन्य असतात हें सांगावयास नको.''

श्रीशंकराचार्यांचें धन्याष्टक म्हणून एक लहानसें प्रकरणच आहे. त्यात कुठेंही ज्यांच्याजवळ मोठा बंगला आहे, पैसा-आडका विपुल आहे, खाण्यापिण्याची चंगळ आहे, अधिकार पदावर आरूढ आहे, मुलें चांगली मिळवतीं आहेत, बायको सुंदर आहे, सुगरण आहे, पुष्कळ लोक पुढे उभे राहून हांजी हांजी करीत आहेत, चांगला वक्ता आहे, विद्वत्तेच्या पदव्या मिळविलेल्या आहेत, कीर्तन-प्रवचन उत्तम करतो इत्यादि गोष्टींचा मुळींच उल्लेख नाहीं. आपली धन्यतेची कल्पना आणि या थोर पुरुषांची धन्यतेची धारणा यांत आकाश-पाताळाइतकें अंतर आहे. आम्ही फार तर लोकप्रिय ललित साहित्य लिहिणाराला व त्यामुळेंच समाजामध्यें वाहवा मिळतें अशाला धन्य समजूं. नाट्य-नृत्य-गायन यांत ज्याला विशेष रस आहे त्याला धन्य मानूं. पण सत्पुरुष धन्यतेच्या दृष्टीनें यांतील कोणालाहि मोजीत नाहींत. ते म्हणतात–रामभक्तींत ज्याला सुख आहे, ईश्वराच्या लीला ऐकताना जो तल्लीन होऊन जातो, तो धन्य. आपण ऐकतांना तल्लीन होतो. पण ते वक्ता चांगला रसाळपणें बोलणारा, खुसखुशीत विनोद करून हसविणारा, नकला करणारा इत्यादि असला तर. उत्तम गाणें आणि थट्टा टिंगल हें आपलें कीर्तनांतील आकर्षण. ईश्वराच्या अवतारलीला किंवा संतांची चरित्रें ऐकण्याचेंच प्रेम आपणास खरोखरी असते काय? सांगणारा काय सांगतो हे खरे म्हणजे महत्त्वाचे. त्यांत आपण तल्लीन होत नाहीं. आपल्या तल्लीनतेला कोण सांगतो आणि कसें सांगतो ही कारणें असतात. आपण भक्ति प्रधान मानीत नाहीं, भावाला मानीत नाहीं, करमणूक हेंच जणूं आपल्या श्रवणाचें प्रयोजन असतें. आणि ती जेव्हां होत नाहीं तेव्हां श्रोता बहुधा झोपेंत लीन होतो. समर्थांना धन्यतेसाठीं रामाची कथा ऐकतांना होणारी तल्लीनता अभिप्रेत आहे.

मी एक गोष्ट ऐकली आहे. एक शास्त्रीबुवा रामकथा सांगत असत. आणि श्रोत्यांमधला एक भाविक ठाकूर मोठ्या प्रेमानें ती ऐकत असे. शास्त्रीबोवा मनानें फार कोमल होते. ते सीताहरण आणि त्या पुढचें रामायण कधीं सांगत नसत. सीतावियोग आणि त्यामुळें रामचंद्रांना झालेलें दु:ख त्यांना वर्णवत नसें. एकदा शास्त्रीबुवांना कांहीं महत्त्वाच्या कामानिमित्त बरेच दिवस परगावी जाणें भाग होते, म्हणून शिक्षण संपून नुकत्याच परत आलेल्या आपल्या मुलाला त्यांनी ८-१० दिवस रामायण सांगण्यास सांगितलें. मुलगाहि चांगला वक्ता होता, विद्वान होता, त्यामुळें श्रोते टिकून राहिलें, थोडे वाढलेहि. पण मुलानें रामायण कथा सरळपणें पुढें नेली, सुवर्णमृग, मारीचवध, त्यानें 'लक्ष्मणा! धाव' म्हणून मारलेली हाक, लक्ष्मणाच्या हृदयाला घरें पडणारीं, सीतेनें केलेलीं अविवेकी दुरुत्तरें, लक्ष्मणाचे रामाकडें येणें, रावणानें गोसाव्याच्या रूपानें प्रगट होणें, सीतेला पळवून नेणें, इत्यादि प्रसंग त्यानें खुलवून सांगितले. श्रोते त्या नवीन भागामध्यें रंगून गेले होते. रावण आपल्या मूळरूपात प्रगटला व त्यानें सीतेला उचलून नेलें, ती आक्रोश करू लागली, असा उल्लेख येताच तो भाविक ठाकूर ताडकन् उभा राहिला. त्यानें आपल्या कमरेची तलवार उपसली आणि तो ओरडून म्हणाला, ''माझ्यासारखा रामभक्त इथें उपस्थित असताना रावण सीतामाईला नेतो म्हणजे काय? कुणीकडे गेला तो ! सांगा.'' या आवेशानें पुराणिक गांगरला व तो चांचरत म्हणाला दक्षिणेकडे, तेवढें ऐकताच हा ठाकूर मंदिराबाहेर उभ्या असलेल्या आपल्या घोड्यावर बसला आणि त्याला टांच मारून दक्षिणेकडे दौडत निघाला. खांचखळगे, नदी-नाले, झाडें-झुडपें, दगड-गोटें कशाचीहि क्षिति न बाळगतां तो घोडा पळवीत होता. शेवटी एका कड्याच्या टोंकावरून कोसळण्याचा प्रसंग आला. तरी या निष्ठावंताला भान नव्हतें. त्याचा तो उत्कट भाव पाहून स्वत: भगवान् रामचंद्र प्रगट झालें, त्यांनी घोडा अडवला आणि त्या ठाकुराला म्हणालें, ''अरे! रावणाचा संहार करून मी स्वत:च सीतेला सोडवून आणले आहे'' आतां तुला कष्ट करण्याचें कारण नाही.



मला वाटतें बहुतेक श्रोते त्या ठाकुराला वेडा म्हणून हसले असतील, कारण ते सर्व देहावर होतें, आणि हाच तेवढा देहभान विसरला होता. ठाकुराचे हें वेड खरेंच. पण तें नवस करून मागून घ्यावें असें आहे. रामाच्या नुसत्या कथाश्रवणानें त्याचें देहभान हरपलें, त्याला स्थलकालाची जाणीव उरली नाहीं. असे जे असतात त्यांना समर्थांनीं धन्य म्हटलें आहे.

देहाच्या पलीकडे 'मी' ला अस्तित्व आहे हें समजल्यावांचून देहभाव जाणार नाहीं. मृत्यूनें हा देह जाईल. जातोच. पण त्यानें देहभावना नष्ट होत नाहीं. ती तशीच राहते, म्हणून तर जन्ममरणाचे फेरे मागे लागतात. संसारांतून मुक्त होतां येत नाहीं. रामकथेनें तल्लीनता आली कीं देहाचे बंध शिथिल होतात, आणि मग जीव कसा? ईश्वर कोण? यांचे संबंध काय? इत्यादि बोधानें देहाविषयींची अहंता नाहींशीं होते, होऊं शकते. पण त्यासाठीं माणसाच्या सर्व आशाआकांक्षा रामरूपांत बुडाल्या पाहिजेत. मनामध्ये केवळ ईश्वराचेंच प्रेम असलें पाहिजे. वासना एवढीच असावी कीं ईश्वराचा साक्षात्कार व्हावा, ईश्वराची भक्ति लाभावी.

आपल्याला केव्हांतरी देवधर्मांतलें काही श्रवण घडावें, पूजा करावी, पाठ वाचावा असें वाटतें. मुळींच वाटत नाहीं, असें नाहीं म्हणून तर कीर्तन-प्रवचनकारांचें बरें चालतें. मठाचें उत्पन्न वाढते. महंतांना भाव येतो. मंदिरें, तीर्थक्षेत्रें गजबजून जातात. पण एवढेंच होतें. आपल्या मनांतल्या वासना पुन:पुन: अनेक प्रकारच्या सांसारिक विषयांकडे धांव घेत राहतातच. त्या रामरूपांत, देवभक्तींत, अध्यात्मांत बुडून जात नाहींत. देवधर्माच्या गोष्टी या तात्पुरत्या, वरवरच्या, उत्कटतेचा स्पर्श नसलेल्या अशाच राहतात आणि म्हणून धन्यतेला पात्र होत नाहींत. चित्तवृत्ति ईश्वरचरणीं तल्लीन होईल तरच धन्य म्हणता येईल.

**मना वासना वासुदेवीं वसों दें ।**
**मना कामना कामसंगीं नसों दें ।।**
**मना कल्पना वाउगी ते न कीजे ।**
**मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे ।।१२८।।**

समर्थांनीं या श्लोकांत वासनांना परमार्थामध्यें कसें बुडवावें याचें साधन प्रत्यक्षपणें सांगितलें आहे, पर्यायानें सांगितलेलें, लक्षणेनें सांगितलेलें, ध्वन्यर्थानें सुचविलेलें, सगळ्यांच्याच लक्षांत येतें असें नाहीं. सर्व वेळीं तें उपयोगीहि पडत नाहीं. म्हणून कांहीं वेळां तरी स्पष्टपणें आदेश द्यावा लागतो तसा तो येथें दिला आहे.

वासना पूर्णपणें परमार्थांत बुडून जातील तेव्हां जातील; पण त्यासाठीं आरंभी तरी त्या कुठें ठेवाव्या तें सांगितलें पाहिजे. लग्न झाल्यावर पातिव्रत्यधर्माची अपेक्षा करावी हें योग्यच आहे. पण वर शोधतांनाहि दक्षता घेतलीच पाहिजे. स्त्री पतिव्रता असावी. ती पतिव्रताधर्माला बळी जाणें योग्य नाहीं. म्हणून समर्थ वासनेसाठीं एक उत्कृष्ट अधिष्ठान सांगत आहेत. मनोवृत्तीला आकर्षक विषय पुरवीत आहेत.

समर्थ म्हणतात–मना ! तुझ्या सर्व वासना, सर्व हवें वाटणें, सगळ्या आशा-आकांक्षा वासुदेवाच्या ठिकाणीं राहूं देत.

समर्थांच्या लेखी राम आणि कृष्ण यांत उपासनेच्या दृष्टीनें भेद नाहीं, हें येथील वासुदेव या कृष्णवाचक शब्दाच्या उपयोगावरून सिद्ध होते. समर्थ स्वत: रामोपासक आहेत. पण कृष्णभक्ति करणारा वांया जातो असा सांप्रदायिक दुराग्रह त्यांचे ठिकाणीं नाहीं. त्यांतून ओढ लागण्यासाठीं आवश्यक असलेल्या प्राथमिक आकर्षणाचा विचार करतां सर्वसाधारणां करितां तरी कृष्णचरित्र हें अधिक आकर्षक आहे हें निश्चितच. रामचरित्र ऐकतांच रामाविषयीं आदर वाटतो. प्रेम निर्माण होण्यासाठीं तेथें निष्ठेनें उपासना करावी लागते. कृष्णचरित्रामध्यें कोणालाहि



जिव्हाळा वाटावयाला लावतील असे गुण अधिक आहेत. तेव्हां वासनेचा विषय म्हणून समर्थांनीं कृष्णाचा उल्लेख केला आहे हें ठीकच झालें.

काय करावें तें सांगून झाल्यानंतर, काय करूं नये तें सांगितलेंच पाहिजे, तरच आदेशाला पूर्णता येते. सामान्यांकरितां तरी तें फारच आवश्यक आहे. म्हणून समर्थ सांगतात-बा मना! तुझ्या कामना कामाच्या संगतींत नसाव्या म्हणजे माणसाच्या हवें-नकोला आसक्तीचें, विषय-लोलुपतेचें स्वरूप येऊं नये. सर्वच हवें नको संपणें ही फार कठीण गोष्ट आहे. देह आहे तोपर्यंत भूक लागावयाचीच, लागलीच पाहिजे. पण भूक योग्य ते अन्न मागते. भाजी-भाकरी मिळाली तरी शांत होते, चिवडा हवासा वाटतो, लाडू खावेसे वाटतात. ही खऱ्या अर्थानें भूक नाहीं. म्हणून समर्थ कामनाच नको. कल्पनाच नको, असें म्हणत नाहींत. पण भुकेला आसक्तीचें स्वरूप येऊं नये, कामनेनें चैनीलाच गरज मानूं नये, असें त्यांना सांगावयाचें आहे. म्हणून वावग्या कल्पना नसाव्या, विकृत कल्पना करूं नये, विचारांना भरकटूं देऊं नये, असें समर्थाचें सांगणे आहे.

यासाठीं वासना-कामना-कल्पनांना चांगलें वळण लागणें आवश्यक आहे. नैसर्गिक प्रेरणा जेव्हां सुसंस्कार घेतात तेव्हां माणसाच्या उन्नतीचा मार्ग मोकळा होतो. म्हणून समर्थ सांगतात कीं तूं सज्जनाच्या संगतीत रहा म्हणजे चांगले संस्कार होतील आणि सुधारशील. पण सज्जन हो आणि मग सज्जनाच्या संगतीत रहा. सुधारण्यासाठींहि, सुधारणें हें चांगलें आहे, आवश्यक आहे आणि तसें झालेंच पाहिजे अशी प्राथमिक धारणा तरी असावी लागते. हाच मनाचा सज्जनपणा. तसे झाले म्हणजे मग तें मन सज्जनाच्या संगतीनें, तेथील पवित्र सात्त्विक वातावरणांत शुद्ध होतें, उन्नत होतें.

मंदिर मोठें आहे, शांत आहे, स्वच्छ आहे, सुंदर आहे, मूर्ती आकर्षक आहेत, शृंगारलेल्या आहेत, पुजारी भाविकपणें पूजाअर्चा नीटनेटकी आणि शास्त्रशुद्ध रीतीनें करतो आहे. या सर्व वातावरणाचा माणसाच्या मनावर चांगला परिणाम घडतो. पण गर्दींत खिसे कापावयास मिळतील याच भावनेनें जो तिथें जातो त्या चोराला मंदिराचें पावित्र्य काय उपयोगी पडणार? म्हणून संतांच्या संगतीचा लाभ व्हावा यासाठींहि मनाला सज्जनतेचा कांहीं स्पर्श असलाच पाहिजे.

**गतीकारणें संगती सज्जनाची ।**
**मती पालटे सूमती दुर्जनाची ।।**
**रतीनायिकेचा पती नष्ट आहे ।**
**म्हणोनी मनातीत होऊनि राहें ।।१२९।।**

सज्जनांच्या संगतींत राहण्याचा खरा लाभ, परमार्थाच्या दृष्टीनें बुद्धींत इष्ट तो पालट होणें, हा आहे. बुद्धि ज्या रीतीनें विचार करते त्याचरीतीने माणसाची प्रगति-परागति, उन्नति वा अधोगति होत असते. ईश्वराने माणसाला बुद्धि दिली, विचार करण्याचें सामर्थ्य दिलें, घटनेमागील कारणें शोधून काढण्याची जिज्ञासा दिली, बुद्धीला स्वातंत्र्य दिलें, आणि हवें तसें वागण्यासाठीं माणसाला मोकळें सोडलें.

माणसानें मात्र या इतक्या चांगल्या संधीचा फारसा सदुपयोग करून घेतला नाहीं. विषयोपभोगांतील आवश्यकतेचें भान न ठेवतां तो सुखाला लालचावला, विषयाधीन झाला आणि मग क्रमाक्रमानें शरीर-मन-बुद्धि यांनाहि अनिष्ट वळण लागलें, शरीर सुखासीन झालें, मन विषयाच्या ओढीनें चंचल बनलें, आणि भाड्यानें घेतलेल्या विद्वानांप्रमाणें बुद्धीहि शरीर-मनाला अनुकूल असेच निर्णय देऊं लागली. याचीच संवय लागली, व्यसन जडलें आणि जन्मजन्मांतरीच्या या दीर्घकालीन संस्कारानें तेंच योग्य आहे असेंहि वाटूं लागलें. प्रत्यक्षांत वेगळेंच घडत होतें, अनुभव चांगला नव्हता, पण तरी त्याची मीमांसा मात्र योग्य रीतीनें करतां येत नव्हती. बुद्धीचा भ्रम दूर व्हावा असें वातावरणच नव्हतें. तें मिळावें म्हणून समर्थांनीं सज्जनांच्या संगतींत आदरानें रहा, त्यामुळें अगदीं दुर्जन असला तरीहि त्याची बुद्धि पालटते, कुबुद्धीची सुबुद्धि होते, चांगले आणि वाईट नेमकें कळूं लागतें, चांगलें स्वीकारले पाहिजे हें कळूं लागतें असा उपदेश केला आहे.

पण या मार्गांत एक अडथळा आहे. तो म्हणजे रतिपति मदनाचा, कामाचा, विषयासक्तीचा. हा काम दुष्ट, दुरात्मा आहे, नष्ट चांडाल आहे, घातक-फसवा आहे. अनेक प्रकारचीं प्रलोभनें तो निर्माण करतो. सुखालाच हित भासवतो. असत्यालाच सत्याचें पुट देऊन माणसाची वंचना करतो. या कामानें जर बुद्धि प्रभावित झाली तर स्वैराचाराची तत्त्वज्ञानें निर्माण होतात, आणि मग माणसाचें काय होईल, समाज कुठें जाईल तें सांगणें कठिण होतें. एऱ्हवी बरीं वागणारीं निरुपद्रवीं माणसेंहि, अस्वास्थ्य आणि संघर्षाचीं बळी ठरतात. अनन्वित संकटें त्यांच्या वांट्याला येतात. दु:खांतून, दैन्यांतून कोणाचीच सुटका होत नाहीं. दु:खाचा विसर पडण्यासाठीं माणसें व्यसनाधीन होतात आणि मग अध:पाताला सीमा रहात नाहीं. विषयासक्तीला आवर न घातल्याचे हे परिणाम आहेत. कामाला नष्ट म्हटलें आहे तें यासाठींच.

या नष्ट कामाच्या, अतिरिक्त आसक्तीच्या तावडींतून सुटण्याचा मार्ग एकच आहे आणि तो म्हणजे मनाच्या अतीत होऊन राहणें हा. मनाच्या अतीत होणें म्हणजे कोणत्याहि वृत्ती मनांत उठणार नाहींत अशी स्थिति होणें. या स्थितींत सर्व प्रकारचें हवें-नको संपलें पाहिजे. मन पूर्णपणें निर्विकार झालें पाहिजे.



**मना अल्प संकल्प तो ही नसावा ।**
**मना सत्य संकल्प चित्तीं वसावा ।।**
**जनीं जल्प वीकल्प तो हीं तजावा ।**
**रमाकांत येकांत काळीं भजावा ।।१३०।।**

मनातील होऊन राहणें काय व तें कसें घडावें याचा उपाय समर्थ या श्लोकांत सांगत आहेत.

मनानें कोणत्याहि रीतीचा संकल्प करूं नये. अनवश्यक असे कोणतेहि विचार मनांत येऊं देऊं नयेत. भोंवती अनेक प्रकारच्या घटना घडत असतात, मन त्याविषयीं उगीचच विचार करतें. नानाप्रकारचें अपघात घडतात, वादळें होतात, कडे कोंसळतात, अष्टग्रही, पंचग्रही कोणत्यातरी राशीला येते. पुढारी भांडतात, विद्वानांचीं वक्तव्यें प्रसिद्ध होतात, सभा-परिषदा भरतात. वृत्तपत्रें त्यांच्या वार्ता ठळकपणें प्रसिद्ध करतात. वाचकांच्या पत्रव्यवहारांतून अनुकूल-प्रतिकूल मतांचें रण माजतें. आतां या सर्व गोष्टींचा आपणांशीं किती संबंध असतो? तरी यासंबंधींचे विचार उगीचच मनामध्यें घोळत राहतात. आणि कधींकधीं त्यावर व्यर्थ चर्चाहि होत राहतात. याच्याच जोडीला भर म्हणून माणसाला नाना प्रकारचीं स्वप्नें पडत असतात आणि तोहि चिंतनाचा विषय होतो. भोंवती घडणाऱ्या प्रत्यक्ष घटनांच्या सुखदु:खाचाहि माणसानें विचार करूं नये. त्यापासून अलिप्त राहावें असें शास्त्र सांगते. आणि माणसें तर स्वप्नें हीं भविष्यसूचक आहेत हे गृहीत धरून विचारांचा घोळ घालीत बसतात. ज्याला मनातीत व्हावयाचें आहे, त्यानें यांतलें कांहीं करूं नये.

मन अगदीं रिकामें राहणें फार कठिण आहे. त्याला जर कांहीं चांगला उद्योग लावून दिला नाहीं, तर तें जणूं पिशाच्चाच्या स्वाधीन होतें म्हणून मनानें सत्यसंकल्प करावा. चांगले विचार करावेत, चांगल्या संबंधीं विचार करावेत. ईश्वराच्या लीलांचें, संतांच्या चरित्रांचें स्मरण करावें. सदुपदेशांचें चिंतन करावें. तत्त्वज्ञानाचा विचार करावा. सन्मार्गाचा शोध घ्यावा. साधना बळावेल असें पहावें. ब्रह्मासंबंधीचें ज्ञान तेंच सत्य, सर्वदा त्याच अनुसंधानांत असावें, उगीच बडबड करूं नये. घोळ घालीत बसूं नये. अपसमज करून घेऊं नये.

आहे त्यापेक्षां कांहीं वेगळें मनांत येणें हा विकल्प. अनुकूल घडावे असें वाटत राहणें हा संकल्प. मन घड्याळाच्या लंबकाप्रमाणें या संकल्प-विकल्पांत हेलपाटत राहतें. मी एकादीं बरी वस्तु एखाद्याला दिलीं, एखाद्याकरितां कांहीं थोडेसे केलें कीं त्याने मजविषयीं कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे, 'मी तुमचा आभारी आहे' असे म्हटले पाहिजे, असें मला वाटते हा संकल्प. त्यानें तसें

म्हटलें नाहीं, कीं तें जाणवतें. साधा शिष्टाचारहि याला कळत नाहीं. हा शिष्ट आहे, अहंकारी आहे, उर्मट आहे, असें वाटते हा विकल्प. ओळख राहत नाहीं. ओळखत नाहीं, ओळख देत नाहीं. आमंत्रण दिलें जात नाहीं, अतिथ्यात उणीव पडते, वृत्त कळत नाहीं, कळविलें जात नाहीं. या अशा गोष्टींतून अपसमज वाढतात. या विकल्पांमुळेंच अगदीं जवळच्या नातेवाईकांत व मित्रांमित्रांतहि वितुष्ट येतें. अगदीं पती-पत्नीहि समाधानानें नांदू शकत नाहींत. असेंच दुसऱ्या विषयी झालेले अपसमज चार चौघांत बोलून दाखविण्याचीहि माणसाला फार घाई होते. निदान असें बोलणें तरी माणसानें टाळावें. फारच बोचले असेल तर प्रत्यक्ष त्या व्यक्तिलाच विचारून निराकरण करून घ्यावें. पण कोणाच्या पाठीमागे त्याच्याविषयीं कोणत्याही प्रकारची निंदा करणें माणसानें टाळावें. या अशा निंदेमुळें विकल्प करण्याची प्रवृत्ति अधिकाधिक बळावतें, ते टाळावें.

मन निर्विकार व्हावें, मनामध्यें नेहमी चांगलेच विचार यावेत. विकल्पाची शक्यता उणी होत जावी, यासाठीं समर्थ उपाय सांगतात की ''एकांतांत जाऊन ईश्वराचें भजन करा.''

मन निर्विकार होत नाहीं, रिकामें मन पिशाच्चाचें क्रीडांगण होतें. ईश्वरी भजन हा त्यावरचा उत्तम उपाय. मन कोणत्या ना कोणत्या प्रकारानें ईश्वरी भजनांत गुंतलें तर संकल्प-विकल्पाची गडबड शांत होऊं शकते. मन पूर्ण रिकामें, पूर्ण निर्विकार होईल तर मनाचें मनपणच जाईल, मन अमन होईल; उन्मनी अवस्था प्राप्त होईल. पण हें सोपें नाहीं. अनेक विषयांची आसक्ति असलेल्या मनाला अमन तर काय पण एकाग्र करणेंहि कठिण आहे. पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या कक्षेंत कोणतीहि वस्तु अधर ठेवतां येत नाहीं. फार दूर अंतराळांत वस्तु तशी राहूं शकते म्हणतात. पृथ्वीच्या कक्षेंत मात्र वस्तु टांगून ठेवायची झाल्यास खुंटी हवी असते. मन संकल्प-विकल्प करतें तें विषयाच्या ओढीनें. ईशभजनाच्या खुंटीला तें यासाठीं अडकवून ठेवलें पाहिजे.

जेव्हां जेव्हां एकांत मिळेल तेव्हां तेव्हां ईशस्मरण करावें किंवा शक्यतों एकांतांत जाऊन ईशस्मरण करावें, असा दोन्हीं प्रकारानें चौथ्या ओळीचा अर्थ करता येईल.

एकांतामध्यें एकाग्रता वाढण्यास मदत होते. विषय प्रत्यक्ष समोर नसल्यामुळें इंद्रिये शांत राहतात. स्वाभाविक मनहि मोकळें राहू शकतें. वास्तविक एकांताचा विचार थोडा दूर ठेवला तरी, एका गोष्टीचा आपल्यापैकीं बहुतेकांना चांगला अनुभव असेल. आपण तीर्थयात्रा उत्सव-महोत्सव याला जातो. घरचें नित्याचे व्याप त्यावेळीं भोंवती नसतात त्यामुळें तेथील कार्यक्रमांत मन अधिक रमतें, बरें



वाटतें. काहीं लोक कौतुकानें म्हणतात कीं घरची आठवणसुद्धां इतके दिवस झाली नाहीं. हें कांहींसे खरेंहि असतें. कारण घराच्या दृष्टीनें हा एकांतच मिळालेला असतो. एकांत जों जों सर्वांगीण होत जाईल तों तों मनाची एकाग्रता वाढत जाईल आणि तें भजनांत रमूं लागेल.

साधकानें सुखासाठीं अरण्यांत जावें असें समर्थांनीं मागें एका श्लोकांत सांगितलें आहे. त्याचाहि उद्देश एकांत मिळावा हाच आहे. पण घरांत कुणी नसलें कीं घर खायला उठतें अशी ज्यांची वृत्ती आहे, त्यांना पूर्ण एकांताचा लाभ होण्याची शक्यता नसते. त्यांनीं क्रमाक्रमानेंच एकांतवासाची संवय लावून घेतली पाहिजे.

**भजाया जनीं पाहतां राम येकु ।**
**करीं बाण येकु मुखीं शब्द येकु ।।**
**क्रिया पाहतां उधरे सर्व लोकु ।**
**धरा जानकीनायकाचा विवेकु ।।१३१।।**

समर्थ रामदास स्वामी हे रामभक्त आहेत. आपल्या आराध्यदेवतेचें महात्म्य अनेक प्रकारांनीं गावें असें स्फुरण त्यांना होत असतें. साधकाला आकर्षण वाटावें, त्याची श्रद्धा दृढ व्हावी, असाहि, उद्देश या वर्णनाच्या मागें असतो.

समर्थ म्हणतात- ज्याचें भजन करावें अशा योग्यतेचें रामचंद्र हें एकच दैवत या जगतांमध्यें आहे. रामचंद्रासारखा एकबाणी, एकवचनी अवतार दुसरा नाहीं. एकबाणी म्हणजे धनुष्यावर एक बाण एकदां लावला कीं नेम लागलाच पाहिजे. हें उपलक्षण आहे. यावरून एक गोष्ट साधण्यासाठीं जें करावयाचें तेंच नेमकें आणि योग्य रीतीनें केलें जातें हा गुण एकबाणी या विशेषणांतून सुचविला जातो. एकवचनी म्हणजें एकदांच बोलणारा, जें बोललें त्या शब्दांना धरून राहणारा, शब्द न पालटणारा. मी असें बोललोंच नव्हतों, माझ्या बोलण्याचा अर्थ तसा नव्हता, त्यावेळच्या परिस्थितींत म्हणून तसें बोललो, इत्यादि स्पष्टीकरणें देण्याचा प्रसंग ज्याच्यावर येत नाहीं असा माणूस. हे दोन्हीं गुण नेत्याच्या अंगी असणें आवश्यक आहे. त्यामुळें अनुयायांच्यावर पश्चाताप करण्याचा प्रसंग कधीं येत नाहीं. हे गुण असले तरच पुढारी विश्वासार्ह ठरतो. रामचंद्राच्या ठिकाणीं हे दोन्हीं गुण आहेत, असें त्यांचें चरित्र सांगतें.

रामचंद्रांचें सर्व वर्तन हें पूर्णपणें नि:स्वार्थी होतें, लोकांच्या कल्याणासाठीं होतें, लोकांच्या मार्गदर्शनासाठीं होतें. विश्वामित्रांच्या यज्ञरक्षणापासून ते सीतात्यागापर्यंत सर्व घटनांचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला म्हणजे रामचंद्रांच्या कृतीमागची दिव्य

उदात्तता जाणवल्यावांचून राहत नाही. म्हणून समर्थ म्हणतात-जानकीनायकाचा, भगवान रामचंद्राचा आश्रय करा, तुमच्या भजनाचा, स्मरणाचा, चिंतनाचा विषय तोच एक असूं दे. जानकी नायकाचा विवेक धरा म्हणण्यांत हेंच अभिप्रेत आहे.

येथील विवेक शब्दावरून आणखीहि एक गोष्ट जाणून घेतली पाहिजे. फार थोर व्यक्तींचें मोठेंपण सामान्य मापानें मोजून चालत नाहीं. थोरांचीं चरित्रें वाचतांना असा मोह फार वेळां होतो. पुष्कळ वेळां भली माणसेंहि या मोहाला बळी पडतांना दिसतात. राज्यत्याग, शूर्पणखेची विटंबना करणें, सुवर्णमृगाच्या मागें लागणें, सीतेच्या विरहानें शोकाकुल होणें, वालीवध, सीतात्याग, शंबूक-दंडन, इत्यादि प्रसंग वस्तुत: रामचंद्रांच्या थोरवीचें अनेकानेक पैलू प्रगटविणारेच आहेत. पण हें नीट समजून घेतलें पाहिजेत म्हणूनहि समर्थ विवेक शब्दाचा उपयोग करतात.

**विचारूनि बोले विवंचूनि चाले ।**
**तयाचेनि संतप्त ते ही निवाले ।।**
**बरें शोधल्यावीण बोलों नको हो ।**
**जनीं चालणें शुध नेमस्त राहो ।।१३२।।**

समर्थांचें समर्थपण, ज्या कांहीं श्लोकांतून विशेष रीतीनें व्यक्त होतें, त्यांच्या अनुभव-क्षेत्राची विशालता लक्षांत येते, आदेशांतील नेमकेपणा पटतो, त्यांतील हा एक श्लोक आहे. आमचे ती. दादा समर्थांना अध्यात्माच्या विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणत. मुख्याध्यापकाकडे अध्यापनविषयक कामांपेक्षां व्यवस्थापनविषयक कामेंच अधिक असतात. समर्थांनीं या श्लोकामध्यें ज्याला भले व्हावयाचें आहे, भलेपणा मिळवावयाचा आहे, त्याच्या जीवनाचें व्यवस्थापन सांगितलें आहे.

जीवन सुखानें आणि समाधानानें जावें अशी सामान्यत: सर्वांचींच अपेक्षा असते. फार मोठ्या अपेक्षा आणि महत्त्वाकांक्षा सामान्यांच्या पुढें सहसा नसतात. अर्थात् तशा असल्या तरी या श्लोकांतील आदेश त्यालाहि उपयोगीं पडणाराच ठरेल.

जीवनामध्ये संतुष्ट होण्याचा प्रसंग येऊं नये. असे वाटत असेल तर आणि दुसरा कुणी असा संतप्त असेल त्याला कसें शांत करावें हें जाणून घ्यावयाचे असेल तर हा श्लोक उत्तम मार्गदर्शन करील. समर्थ दोन गोष्टी स्पष्टीकरणासह सांगत आहेत.

'विचारूनि बोले'चें स्पष्टीकरण तिसऱ्या ओळींत आणि 'विवंचूनि चाले'चें स्पष्टीकरण चवथ्या ओळींत आहे.

'विचारूनि बोले' याचेंहि दोन भाग आहेत. विचार करून बोल आणि तज्ज्ञाचा किंवा शास्त्राचा विचार घेऊन बोल.



जेव्हां केव्हां बोलावयाचें, लिहावयाचें तेव्हां तें नीटपणें सर्व प्रकारचा साधक बाधक विचार करून, तज्ज्ञांचीं मतें चांगलीं पारखून, शास्त्रवचनें चांगलीं शोधून, थोरांच्या वाक्यांचा आधार घेऊन, मगच लिहावें वा बोलावें. लिहिण्यापेक्षां बोलणें कमी गंभीरपणाचें आहे, तेव्हां बोलतांना विशेष काळजी घेतली नाहीं तरी चालेल, असें समजूं नये. लिहिण्याइतकेंच बोलणेंहि महत्त्वाचें आहे, असेंच समजून वागलें पाहिजे. खरें म्हणजे बोलणें हेंच महत्वाचें आहे. लिहिणें हा त्याचा आनुषंगिक पर्याय आहे. म्हणूनच समर्थांनी लिहिण्याचा उल्लेखच केला नाहीं, केवळ कसें बोलावे तेवढेंच सांगितलें आहे. परंतु अलीकडच्या मुद्रणसुलभतेच्या काळांत लिहिण्यालाच अधिक व्यापकता येत असल्यानें बोलण्याच्या संदर्भांत लिहिणेंहि गृहीत धरावें, असें मला वाटतें.

विचार करून, विचार घेऊन बोललें म्हणजे तें सत्याच्या अधिक जवळचें असतें आणि हितकारक ठरतें. दुर्दैवानें आजकाल विद्वान् म्हणणारीं मंडळींहि त्याकडे दुर्लक्ष करतात. केवळ आधुनिक म्हणून जशी एकादी गोष्ट वाईट नसते, त्याप्रमाणेंच केवळ, परंपरेनें स्वीकारलेली म्हणूनहि एकादी गोष्ट असत्य नसते, त्याज्यहि नसते. पण हा विचार विद्वान लिहितां-बोलतांना करीत नाहींत. परंपरागत धारणांवर आघात करतांना त्यांना विलक्षण स्फुरण येतें, आणि त्या अभिनिवेशांत मग दुष्ट तर्काचा आणि असत्याचाहि पुरस्कार केला जातो. रामायण महाभारतावरचें लिहिलेलें आधुनिकांचें विविध प्रकारचें लिखाण या गोष्टीची साक्ष देईल. महाभारताची वा रामायणाची कोणतीहि प्रत प्रमाण मानली तरी या आधुनिकांनीं केलेल्या अनेक विधानांना त्यांत आधार मिळणें शक्य नाहीं. त्यांच्या विधानाच्या उलट वचनेंहि अनेक आहेत तरी लेखक आपला स्वैराचार सोडीत नाहींतच.

भारतीय परंपरेंत पुरोहितांची सर्वंकष सत्ता कधीं नव्हतीं, आजहि नाहीं, आणि तरीं ब्राह्मणांविरुद्ध आक्षेप घेताना हा विचार कुणी करीत नाहीं. एकदां एका आधुनिक समाजवादी विद्वानानें माझ्या बैठकींतच माझ्यासमोर म्हटलें कीं 'हिंदू धर्मांत पुरोहितशाही अशी कधींच नव्हती. पण आम्ही असें म्हटलें तर या सनातनी लोकांना बळ मिळेल म्हणून आम्हीं तें बोलत नाहीं.' संघर्ष वाढता राहावा अशीच ज्यांची वृत्ति असेल ते असेंच वागणार. पण हें "बरें शोधल्यावीण"चें बोलणें झालें. त्यामुळें लाभ कोणाचाच नाहीं. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातलें अस्वास्थ्य तेवढें वाढणार, वातावरण संतप्त राहणार स्वत:च्या पोळ्या भाजून घेण्यासाठीं तेंच कोणाला इष्ट वाटत असेल तर वेगळें. शांतता, स्वास्थ्य हवें असेल तर असें बोलतां कामा नयें.

समर्थांचा दुसरा आदेश संतापशमनासाठीं आहे, तो विवंचूनि चालण्याचा, विवेकपूर्वक वागण्याचा, कृति करण्यापूर्वीं पूर्णपणें सावध राहण्याचा. ज्या गोष्टीचा पश्चाताप करावा लागेल असें माणसाच्या हातून कांहीं घडतां कामा नये. जों जों माणसाचें अधिकारपद उंच आणि कार्यक्षेत्र व्यापक, तों तों त्यानें सावध राहण्याची दक्षता अधिकाधिक घेतली पाहिजे. विचार करतांना साधकबाधक विचार करावयाचे असल्यानें अगदीं टोकावर जाऊन विचार केले तरी एकवेळ चालतात, पण वागतांना मात्र असें टोक गांठून चालत नाहीं. तेथे नेहमीं मध्यमक्रमच अवलंबिला पाहिजे. समर्थांनीं यासाठींच 'विवंचूनि चाले' या आदेशाला 'जनीं चालणें शुद्ध नेमस्त राहो' अशी पुस्ती जोडली आहे.

व्रतें-वैकल्यें, पूजा-पाठ, सोवळें-ओवळें, खाण्यापिण्यासंबंधीं नियम, कंजूषपणा वा उधळपट्टी, वेषभूषा, आदरातिथ्य, विषयसेवन या सर्व प्रकरणात माणसानें नेमस्तपणा धरावा, मध्यमक्रम अवलंबावा मात्र मुळांत हें वागणें शुद्ध, निर्मळ, सदाचारी असावें. या दृष्टीनें एक संस्कृत वचन मार्मिक आहे. ''**अनाचारस्तु मालिन्यं अत्याचारस्तु मूर्खता । विचाराचारसंयोगः स सदाचार उच्यते ।**'' वर्षानुवर्ष न धुतलेली धाबळी वा कद हें जसें सोवळें नाहीं तसेंच रस्त्याचीं पायतणें घालून घरांत हिंडणें ही सुधारणाहि नव्हे.

शुद्ध, सात्त्विक राहतां येत नाहीं, पण केवळ तामस होऊं नये. वर्तनामध्यें सात्त्विकतेचें प्राधान्य राहील अशी दक्षता घ्यावी. ही शुद्धताहि आहे आणि नेमस्तताहि आहे. जीवनांत नेहमींच तोल राखून चालावें लागतें. तेंच या नेमस्त शब्दानें सुचविलें आहे. ध्येय निश्चित असलें व पवित्र असलें कीं हा नेमस्तपणा शुद्ध ठरतो.

**हरीभक्त वीरक्त विज्ञानरासी ।**
**जेणें मानसीं स्थापिलें निश्चयासी ।।**
**तया दर्शनें स्पर्शनें पुण्य जोडे ।**
**तया भाषणें नष्ट संदेह मोडे ।।१३३।।**

हरिभक्त कसा असतो ते या श्लोकांत समर्थ सांगत आहेत, आणि त्याच्या संगतीनें साधकाला कोणता लाभ मिळतो तेंहि समर्थांनी स्पष्ट केलें आहे.

समर्थ म्हणतात-हरिभक्त म्हणजे सत्पुरुष. हा विरक्त असतो, वैराग्ययुक्त असतो. त्याच्या अंत:करणांत विषयसेवनाची आसक्ति लव-मात्र नसते. तसेच तो ज्ञाननिधि असतो, ज्ञानाचा सागर असतो. त्याच्याजवळ ज्ञानविज्ञानांपैकीं आवश्यक तें सर्व पुरेपूर असतें. खरें म्हणजे ज्ञान हें एकरूप आहे. ब्रह्माचें किंवा



आत्म्याचें यथार्थ ज्ञान हें त्याचें स्वरूप आहे. तेव्हां खऱ्या अर्थानें त्याला ज्ञाननिधि किंवा ज्ञानसागर अशीं संग्रहवाचक विशेषणें देणें तितकेसें योग्य नव्हें. विज्ञानाच्या प्रकरणांत तसें म्हणणें एकवेळ चालेल. समर्थांनीं येथें विज्ञान शब्द वापरला आहे. मात्र या विज्ञानामधें त्यांना ज्ञान म्हणजे अध्यात्मज्ञान हेंहि गृहीत आहे. कारण ही हरिभक्तीची लक्षणें आहेत. विज्ञान या शब्दाचा अर्थ कांहीं ठिकाणी प्रपंचासंबंधींचें ज्ञान असा न करता अध्यात्मज्ञान असाच केला आहे. श्रीज्ञानदेवांनीं मात्र ज्ञान म्हणजे आत्मज्ञान, विज्ञान म्हणजे प्रपंचविषयक ज्ञान आणि प्रपंचाला सत्य मानणें म्हणजे अज्ञान असें म्हटलें आहे. ''**तैसी जाणीव जेथ न रिघे । विचार मागुतां पाऊलीं निघे । तर्कु आयणी नेघे । आंगीं जयाचां ।। अर्जुना या नांव ज्ञान । येर प्रपंचु हें विज्ञान । तेथ सत्यबुद्धि तें अज्ञान । हेंहि जाण ।।**'' (ज्ञाने. ७।५-६) अशा त्यांच्या ओव्या आहेत.

गीतेच्या तेराव्या अध्यायांत अमानित्व-अदंभित्वादि ज्ञानाचीं अठरा लक्षणें सांगितली आहेत. हीं सर्व ज्याच्या ठिकाणी व्यक्त असतात तो ज्ञानराशी. गीतेच्या चौदाव्या अध्यायामध्यें आत्मज्ञानाचे सविस्तर वर्णन करून झाल्यानंतर पंधराव्या अध्यायाचें प्रयोजन सांगतांना ज्ञानेश्वर महाराजांनीं ''**तरी विरक्तीवांचून केंही । ज्ञानासी तगणे नाहीं । हे विचारूनि ठाई । ठेंविलें देवे ।।**'' (ज्ञाने. १५।३६) असें म्हटलें आहे. ज्ञान होईल कदाचित, पण ते टिकले पाहिजे, तरच उपयोगाचें. आणि ज्ञानाचें टिकणें हें अंत:करणाच्या शुद्धतेवर म्हणजेच विरक्तीवर, वैराग्यावर अवलंबून आहे. यासाठीं समर्थांनीं हरिभक्त आधीं विरक्त आणि मग ज्ञानराशी असतो असें म्हटलें आहे.

विरक्त वा वैराग्य ही अंत:करणाची स्थिति आहे. जवळच्या संग्रहावरून वा परिग्रहावरून त्यांचें स्वरूप वा प्रमाण ठरविता येणार नाहीं. जवळ कांहीं नसलेला एखादा अकिंचन भिकारी विरक्त नसेल. उलट ऐश्वर्याने संपन्न असलेला राजा जनक विरक्त होता. शुकाचार्यांनींहि त्यांचे शिष्यत्व पत्करावे असा त्याचा अधिकार होता. श्रीरंगनाथस्वामी निगडीकर हे सत्पुरुष खरे, पण बैरागी नव्हते. अधिकारपदावरील एखाद्या श्रीमंताप्रमाणें ते थाटांत राहत, घोड्यावरून हिंडत, भारी कपडे वापरीत, अलंकार धारण करीत. तेव्हा विरक्त हा शब्द आपण समजतो त्या वरवरच्या अर्थानें उपयोजिणें वास्तव ठरणार नाहीं. आपली मापें प्रामाणिक असतातच असें नाहीं. या संदर्भात ती. वै. सोनुमामा दांडेकर एक उदाहरण गमतीनें सांगत असत. ते म्हणत-एक गृहस्थ माझ्याकडे आला आणि चार आणे द्या म्हणाला. मी ते दिले. लगेच तो माझ्याविषयीं सांगत फिरू लागला कीं सोनापंत म्हणजे काय ! लाख माणूस ! पुन्हां एकदां तो गृहस्थ माझ्याकडे आला. त्यानें असेंच दोन चार

आणे मागितलें. मी ते दिलें नाहींत. तेव्हां त्यानें सांगावयास सुरूवात केली कीं सोनापंत ! हे: !! त्यांचें ज्ञानेश्वरी सांगणें काय जाळायचें, कांहीं उपयोग नाहीं! चार आणे देणें किंवा न देणें हें माणसाची योग्यता ठरवण्याचें माप असू शकतें काय?

माणूस कसा वागतो, कसा राहतो, काय नेसतो, काय खातो, एवढ्यावरून त्याचें खरें स्वरूप कळणार नाही.

हरिभक्ताचे आणखीं एक लक्षण समर्थ सांगत आहेत. त्याच्या मनातील निश्चय दृढ असतो. धरसोड, चंचलपणा, सरड्याच्या रंगाप्रमाणें पालटणारें विचार असें त्याच्याजवळ नसतात. अर्थातच अशा हरिभक्ताच्या संगतीत माणसाला बरें वाटतें. त्याची भेट झाली, त्यानें पाहिले, दोन वाक्यें तो बोलला, त्यानें प्रेमळ हातानें कुरवाळले, त्याच्या वरदहस्ताचा थोडासा स्पर्श मस्तकाला झाला, तरी माणसाचा संताप, खेद नाहींसा होतो, मन शांत होतें, वृत्तींना प्रसन्नता लाभते. अशा थोर हरिभक्तानें चार वाक्ये जरी उच्चारलीं तरी माणसाच्या अंत:करणांतील नाना प्रकारचें संदेह दूर होतात, श्रद्धा बळावतें, बुद्धि स्थिरावते. मात्र यासाठीं हरिभक्ताच्या संगतीत जाणाऱ्याचें मन सरळ असलें पाहिजे, प्रांजळ असलें पाहिजे तो विनयी असला पाहिजे, अहंकारी असतां कामा नये. नाहीतर पाण्यात अखंड भिजूनहि सुसरीच्या पाठीला मऊपणा जसा येत नाहीं, ती तशीच कठोर, खडबडीत राहते, तसेंच याचेंहि व्हावयाचें.

**नसे गर्व आंगीं सदा वीतरागी ।**
**क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी ।।**
**नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।**
**इहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा ।।१३४।।**

समर्थ या श्लोकांत योग्याचीं, सत्पुरुषाचीं, पूर्ण पुरुषाचीं, लक्षणें सांगत आहेत. योगी आढळावा, सत्पुरुष भेटावा, असें बहुतेकांना वाटते. आपण आपल्या मापानें कोणाकोणाला योगी, सत्पुरुष, महाराज, भगवान् ठरवितो? लोकविलक्षण वेषभूषा, वाढलेल्या दाढीजटा, गंधांचे टिळे, माळांचे वेढे, कीर्तनप्रवचनांतील रंगढंग, मोठा वैभवी मठ, हजारोंची जेवणावळ असलेले उत्सव महोत्सव, मनांतलें ओळखणें, भूतभविष्य सांगणें, रोग घालविणें, अद्भुत रीतीनें भस्म, कुंकू, प्रसाद काढून देणें, संततिसंपत्तीची इच्छा पूर्ण करणें, संकटांतून सोडविणें इत्यादि इत्यादि पाहून आपण साधू ठरवितो. हें रत्नाचा तोल करतांना वखारींतला कांटा वापरण्यासारखें आहे.



वर उल्लेखिलेल्या गोष्टी कोणाजवळ असतील तर त्याला फार तर तंत्रज्ञ समजावें. कामापुरता त्याचा उपयोगहि पाहिजे तर करून घ्यावा. त्या धंदेवाईकाचें कांहीं शुल्क असेल तर तेंहि द्यावें. काम झालें तर सौजन्यानें त्याचे आभारहि मानावेत, पण त्याला कोणी साधु, महात्मा, योगी समजून त्याचेपुढें ''घालीन लोटांगण वंदीन चरण'' असे करूं नये. हीं अशीं माणसें बहुधा स्वार्थसाधू असतात, परमार्थाचीं अधिकारी नसतात. खऱ्या साधूची ओळख आपणाला पटणें कठिण आहे. बहुधा आपली फसगतच होते. ''योगियांच्या खुणा योगी जाणें'' असें म्हणतात. यासाठीं या प्रकरणीं समर्थांसारख्या अधिकारी पुरुषांचेच विचार एकून घेतले पाहिजेत.

निरहंकारी असणें हें सत्पुरुषाचें पहिलें लक्षण. आपल्या योग्यतेची, मोठेपणाची, आपल्या अंगीच्या सामर्थ्याची, सद्गुणाची त्याला जाणीव नसते. आपली थोरवी, आपली योग्यता, इतरांच्या लक्षांत आणून देण्यासाठीं तो प्रयत्न करीत नाहीं, हस्ते-परहस्तें स्वत:ची ख्याति वाढवीत नाहीं, भोंवती स्तुतिपाठकांचा मेळा जमवीत नाहीं. आपला मानसन्मान व्हावा असें त्याला वाटत नाहीं. त्याला सत्काराची अपेक्षा नसते. स्तुतीनें तो खुलत नाहीं, चढत नाहीं, कारण या सर्व गोष्टी अहंकाराच्या पोटीं जन्माला येतात, आणि साधूजवळ अहंकार नसतोच. अहंकाराचा स्पर्शच ज्याला नाहीं, त्याच्याजवळ ताठा, दर्प, मद, गर्व, हीं अहंकाराची अवस्थांतरें असण्याची शक्यताच नाहीं.

वीतराग म्हणजे आसक्तीच्या पार गेलेला. निरहंकारी मनुष्य स्वभावत:च अनासक्त असतो. ज्याचें 'मी' सुटलें त्याच्याजवळ 'माझें' म्हणून कांहीं उरतच नाहीं. त्याला विषयोपभोगांची अभिलाषाच नसते. खाणें, पिणें, लेणें, राहणें यासाठीं अमुकच पाहिजे, इतकेंच पाहिजे, असा त्याचा आग्रह नसतो. ऐश्वर्याची, वैभवाची, संपत्तीची कामना तो करीत नाहीं.

साधु हा उपभोग घेतो पण क्षमेचा आणि शांतीचा. त्यामुळें निंदा, अवहेलना, अपमान, तिरस्कार, उपेक्षा कितीहि जरी झाली, नाना प्रकारचीं संकटें कोसळलीं, आपत्ती आल्या, तरी त्याची चित्तवृत्ति निवांत जागीं तेवणाऱ्या नंदादीपाप्रमाणें प्रसन्न आणि शांत असते. तो क्षमाशील असतो, सहनशील असतो. पण तो अगतिक नसतो, दुर्बल नसतो. लाचार, दुबळा माणूस निरुपायानें सहन करतो, पण त्याचे मन चरफडत असतें. याचें मन शांत असतें, आणि ह्यामुळें क्षमाशीलता त्याला उपभोगाचें सुख देते.

क्षमा, शांति हे वैयक्तिक सद्गुण आहेत. व्यक्तिजीवनाचें ते आदर्श आहेत, हा व्यष्टिधर्म आहे. आपण हिंदू माणसें मात्र नेमके उलटे वागतो. सामाजिक

पातळीवर, राष्ट्राच्या पातळीवर आपण सोशिक, शांत, उदार आहोत. हिंदू म्हणून आमच्यावर अनेक आपत्ती आल्या, आमचे न्याय्य अधिकारहि लुबाडले गेले, आमच्या देशाचीं छकलें उडालीं, स्वार्थी उन्मत्तांनीं क्रूरपणें आपला लाभ करून घेतला, आणि तरी आम्हीं शांतच राहिलों. वैयक्तिक पातळीवर मात्र आमचा मत्सर जागृत असतो. आम्ही सूडबुद्धीनें वागतों. बांधाच्यामुळें गेलेल्या वीतभर जागेसाठीं न्यायालयांत भांडत बसतों. संत असे असत नाहींत. ते वैयक्तिक लाभहानीचा विचार करीत नाहींत. आणि म्हणूनच ते शांत आणि क्षमाशील राहण्यात आनंद अनुभवू शकतात. अगतिकपणें तडफडणारें स्वार्थी मन हें सुख मिळवू शकत नाहीं.

दयाशीलता आणि अखंड दक्षता हीच सत्पुरुषाची योगसाधना असते. नाना प्रकारच्या आपत्तींनीं रंजले गांजलेले लोक विषयसुखालाच सर्वस्व मानून त्यांत रंगलेले पामर, यांच्याविषयीं सत्पुरुषाच्या अंत:करणांत दया असते. उन्हाळ्यामध्यें तहानेनें तडफडणारें गाढव पाहून श्रीएकनाथ महाराजांचे अंत:करण द्रवलें आणि त्यांनी काशीहून रामेश्वराला घालण्यासाठीं वाहून आणलेली, गंगेची कावड त्या दीन मुक्या प्राण्याच्या मुखांत ओतली. आपल्या हातून हें घडलें नसतें. सत्पुरुषांच्या अंत:करणांतील दया ही पूर्णपणें निरपेक्ष आणि व्यापक असते. आपत्तीत सांपडलेल्या आप्तांविषयीं आपणाला जें वाटेल तें संतांना भूतमात्राविषयी वाटत असते.

सत्पुरुष दक्ष असतो. आवश्यक गोष्टी तो वेळच्यावेळीं, योग्य रीतीनें करणारच. समर्थांचा या दक्षतेवर फार भर आहे. मनुष्याचें जीवन हा एक प्रवास आहे, आणि प्रवाशानें दक्ष राहिलेंच पाहिजे, नाहींतर तो लुटला जाईल, जायचें तिथें तो योग्य रीतीनें पोचणार नाहीं. वेंधळेपणा, गबाळेपणा, दीर्घसूत्रीपणा हा कांहीं सद्‌गुण नाहीं आणि सत्पुरुष आंतून तरी तसा कधींच नसतो. आळशी माणसानें आपला नाकर्तेपणा लपविण्यासाठीं परमार्थाची ढाल वापरावी आणि ईश्वराची इच्छा असेल तसें होईल म्हणावे. हा लुच्चेपणा आहे. आम्हीं चित्रपटाचें, नाटकाचें आसन लांब ओळीत उभे राहून आधीं आरक्षित करणार, नुसता खेळ पाहण्यासाठीं लांबचा प्रवास करणार; आणि यात्रेला कां गेला नाहींस असें म्हटलें तर ईश्वराची इच्छा असेल तेव्हां घडेल असें सांगणार, ही लबाडी आहे. सत्पुरूष कर्तव्याला ओझें मानीत नाहीं. शारीरिक कष्टाला कंटाळत नाहीं. श्रमानें कधीं वैतागत नाहीं. विहितकर्म तो कधीं टाळीत नाहीं. तो परमार्थासाठीं सर्वदा दक्ष असतो.

सत्पुरुष निर्लोभी असतो. वीतरागतेचे, वैराग्याचे, हे दृश्य रूप आहे. ज्याच्या अंत:करणांत अनासक्ति नांदते, त्याचे ठिकाणी लोभ संभवतच नाहीं. उपाधि तो वाढवीत नाहीं. संग्रहाची त्याला हौस नसते. जो वीतराग आहे, निर्लोभी आहे, तो स्वाभाविकपणेंच निश्चिंत असतो. त्यामुळें त्याचे ठिकाणीं कोणत्याहि प्रकारचा क्षोभ नसतो. ज्याला कशाची फिकिर नाहीं तो फकीर. संत खऱ्या अर्थानें असा असतो.



ज्याच्या अंत:करणांत स्वार्थ नाहीं, अहंकार नाहीं, ज्याला कशाची अभिलाषा नाहीं, ज्याचें हवें-नको संपलेलें असतें, त्याला क्षुब्ध होण्याचें कारणच नसतें. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें जीवन त्या दृष्टीनें आदर्श आहे. समाजानें अनेक प्रकारचा छळवाद केला असूनहि ते कधीं क्षुब्ध झाले नाहींत. चीड, संताप, भय, उद्वेग, यांपासून ते पूर्ण मुक्त होते. लोकांकडून इतकी गांजणूक सोसूनहि जनकल्याणाविषयींची त्यांच्या अंत:करणांतील भावना कधीं उणावली नाहीं. प्रेमळ आईच्या वात्सल्यानेंहि लाजावें, अशी जीवाआगळी माया त्यांनी लोकांच्यावर केली. जन्मदात्री माताहि इतके प्रेम करूं शकत नाहीं. थोडा प्रकृतिभेद असला तरी सर्व संत असेच असतात. आपण मात्र एवढ्या तेवढ्या कारणांनीं भडकून उठतों. अगदीं फुसक्या निमित्तानेंहि आम्हीं अस्वस्थ होतों. आमचा संताप अनावर होतो. सूडाच्या भावनेनेंहि आम्ही पेटतों. आमच्या तोंडांतून अपशब्दांची बरसात झडते. आणि संत अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि शांत-प्रसन्न राहतात. परमेश्वराचें 'अक्षोभ्य' हें नांव त्यांनाहि पूर्णपणे शोभतें.

संताच्या ठिकाणची ही दया, क्षमा, शांति सत्त्वगुणाचा परिणाम असतो. त्यात अगतिकता नाहीं, लाचारी नाहीं, दैन्य नाहीं. तो अल्पसंतुष्ट असतो. अयाचितवृत्तीनें राहील, कदाचित् भिक्षा मागेल, पण तो दीनवाणा भिकारी नाहीं. उलट आत्मतृप्त असल्यानें ईश्वरी प्रेमांत रंगून गेल्यामुळें परमेश्वरावरील दृढ विश्वासानें, संतांच्या ठिकाणीं कांहीं वेगळ्या प्रकारची मस्तीच पुष्कळवेळां दिसून येते. आत्मानंदांत ते धुंद असतात. जगाचे पाश त्यांना खेचूं शकत नाहींत. कबिरांचे एक मोठें सुंदर पद आहे. ते म्हणतात- ''हमन है इश्क मस्ताना हमनको होशियारी क्या । रहे आजाद या जगमें हमन दुनियासे यारी क्या ।।'' संत दीन नाहींत, बापुडवाणें नाहींत. कारण त्यांच्याजवळ कोणत्याहि दृष्टीनें परस्वाधीनता नसतें, ते पूर्णपणें स्वतंत्र असतात. कोणावरहि त्यांचें जीवन अवलंबून नसते. त्यांच्या संबंधांत जें कांहीं घडत असते तें सर्व भगवंताच्या प्रेरणेनें होत असतें आणि म्हणून समर्थ स्वत:च एके ठिकाणीं ''आम्ही काय कुणाचें खातो रे । तो राम आम्हांला देतो रे ।।'' असें म्हणतात. हा डौल सामान्य नाहीं.

समर्थांनीं सत्पुरुषाचीं लक्षणें सांगतांना योगी शब्द वापरला असूनहि या श्लोकांत वा अन्यत्रहि, अलिकडे फार सोप्या झालेल्या कुंडलिनीच्या जागृतीचा वा सिद्धींचा, चमत्कारांचा उल्लेख केला नाहीं. उदात्त अशी अंत:करणाची

अवस्थाच अनेक सद्‌गुणांच्या माध्यमानें सांगून या लक्षणावरून संत, योगी ओळखावा असें समर्थ म्हणतात, हें लक्षांत घेतलें पाहिजे.

**धरी रे मना संगती सज्जनाची ।**
**जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची ।।**
**बळें भाव सद्‌बुद्धि सन्मार्ग लागे ।**
**महां क्रूर तो काळ विक्राळ भंगे ।।१३५।।**

सज्जनाच्या संगतीचें हें महात्म्य थोड्या निराळ्या शब्दांत १२९व्या श्लोकांत आलें आहे.

कस्तुरीच्या संगतीनें मातीलाहि सुगंध लागतो. तसें सज्जनांच्या संगतीनें माणसाचें होते. येथील सज्जन हा सत्पुरुष आहे. सामान्य सभ्य गृहस्थ नव्हे. सत्पुरुषाच्या संगतीनें मनुष्याच्या अंत:करणांतील सद्‌भाव वाढतात. चांगलें काय ते बुद्धीला पटतें. बुद्धि सत्याचा निश्चय करूं शकते. सन्मार्गानें जाण्याची, सदाचरणानें वागण्याची प्रेरणा निर्माण होते. हें जणूं सत्पुरुषाच्या प्रभावानें, बळानें घडविल्याप्रमाणें विनायास घडतें, सहजपणें घडतें.

माणसें सत्य सोडतात, तें कोणत्यातरी भयापोटीं. क्रौर्य काय किंवा पळपुटेपणा काय, दोन्ही भय या भावनेचेच आविष्कार आहेंत असें मानसशास्त्र सांगतें. संतांच्या संगतीनें माणसाच्या ठिकाणीं निर्भयपणा येऊं शकतो. अत्यंत क्रूर असा विक्राळ काळहि जणूं मोडून पडतो, म्हणजे मृत्यूचेंहि भय वाटेनासें होतें. कारण सत्पुरुषाजवळ उत्कट रीतीनें वास करणाऱ्या दैवी संपत्तीचें अभय हें पहिलें लक्षण असल्याचें गीतेनें सांगितलें आहे.

**भयें व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे ।**
**भयातीत ते संत आनंत पाहें ।**
**जया पाहतां द्वैत कांहीं दिसेना ।**
**भय मानसीं सर्वथाहि असेना ।।१३६।।**

सर्व ब्रह्मांड भयानें व्यापलेले आहे. मनुष्याच्या जीवनांत एकहि वस्तु अशी नाहीं कीं जिला कशाचेंहि भय नाहीं. भर्तृहरीनें एका श्लोकात कांहीं भयांचा उल्लेख केला आहे आणि शेवटीं निर्भय काय तेंहि त्यानें सांगितलें आहे.

**भोगे रोगभयं कुले च्युतिभयं वित्ते नृपालाद्‌भयम् । माने दैन्यभयं बले रिपुभयं रूपे तरुण्या भयम् । शास्त्रे वादभयं गुणे खलभयं काये कृतान्ताद्‌भयम् । सर्वं वस्तु भयान्वितं भुवि नृणां विष्णोः पदं निर्भयम् ।।** 'वैराग्यमेवाभयम् ।'



असाहि एक पाठ आहे.

असे असल्यामुळें सामान्याला निर्भय होता येत नाहीं. कारण आसक्तीनें तो सृष्टीशीं जोडला गेलेला असतो. सृष्टीच्या मागें असलेल्या मूलतत्त्वाकडें तो झेंप घेऊं शकत नाहीं, त्यामुळें भयातीत होऊं शकत नाहीं. संतांनीं मात्र या दिसणाऱ्या, प्रत्ययास येणाऱ्या, व्यवहाराला आधार होणाऱ्या, जगतामागचें अनादि, अनंत, अव्यय, अखंड, अनिर्वचनीय असें तत्त्व साक्षात्कारानें जाणलेलें असतें आणि त्यामुळें ते भयाच्या अतीत होतात, भयाच्या पलीकडे जातात. ''द्वितीयात् वै भयं भवति'' असें शास्त्र सांगतें. जेथें जेथें द्वैत आहे, भिन्नतेची, वेगळेपणाची, भावना आहे, तेथें तेथें भय राहतें. संतांच्या लेखीं सर्व द्वैत संपलेलें असतें; सर्व, द्वंद्वें मिटलेलीं असतात आणि त्यामुळें त्यांना कशाचेंहि भय उरत नाहीं. सर्व भूतजात त्यांना आत्मरूप झालें असल्यानें मनामध्यें भय वाटण्याचें कांहीं कारण उरतच नाहीं, ते सर्वथा निर्भय होतात.

आपल्याला एकट्याला करमत नाहीं म्हणून आपण द्वैत गोळा करतो. त्यानें आरंभीं थोडें बरें वाटतें. पण हें बरें वाटणेंच माणसाला मोहांत पाडून विवेकभ्रष्ट करतें, आणि मग सर्व जीवन भयानें ग्रस्त होतें. त्यासाठीं तात्पुरते उपाय शोधले जातात, पण तें पुवाळलेल्या घावाला वरून मलमपट्टी केल्यासारखें होतें. तत्त्वाचें ज्ञान हाच त्याच्यावरील खरा उपाय असतो. संतांच्या संगतींत तद्‌विषयक जिज्ञासा जागृत होते आणि त्यांच्या उपदेशानेंच तृप्त होते.

**जिवां श्रेष्ठ ते पष्ट सांगोनि गेले ।**
**परी जीव अज्ञान तैसे चि ठेले ।।**
**देहेबुधिचें कर्म खोटें टळेना ।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।।१३७।।**

उपदेश करतांना जें जें माणसाच्या हिताचें तें श्रेष्ठांनीं म्हणजे थोरांनीं, संतांनीं अगदीं स्पष्टपणें सांगून ठेवलेलें आहे.

या श्लोकांतील श्रेष्ठ शब्द हा जीवाला जें श्रेष्ठ म्हणजे हिताचें, ते श्रेष्ठ म्हणजे संत स्पष्टपणें सांगून गेले आहेत अशा दोन्हीं अर्थानीं वापरतां येईल. श्रेष्ठ शब्द हितवाचक मानला तर संत शब्द अध्याहृत मानावा लागेल आणि श्रेष्ठ शब्द संतवाचक मानला तर हित शब्द अध्याहृत मानावा लागेल.

कांहीं लोक आपला मोठेपणां टिकविण्यासाठीं सगळ्या गोष्टी स्पष्ट सांगत नाहींत, उघड करीत नाहींत. कांहीं हिताचें राखून ठेवतात, चोरून ठेवतात. आपली आवश्यकता भासावी अशा रीतीनें, अर्धवटपणें, सांगतात. धंद्याची

गुपितें कुणी उघड करीत नसतो; पण सत्पुरुष नि:स्वार्थी आहेत, त्यांना कशाचीच हांव नसते. लौकिक मिळवावा, प्रख्याति व्हावी, अनेकांनीं भोंवती भोंवती असावे, असें त्यांना कधीं वाटत नाही. त्यामुळें त्यांचें सांगणें अगदीं स्पष्ट, उघड आणि रोकठोक असतें.

अशा स्थितींत असंख्य लोकांनीं आपलें हित साधून घेतलें पाहिजे कीं नाहीं? कारण हित म्हणजे काय? तें कसें ओळखावें? हित साधनाचा मार्ग कोणता? साधनें कोणतीं? हें अगदीं स्पष्टपणें, सहज समजावें, अशा रीतीनें, अनेकांनीं, अनेक प्रकारांनीं, वारंवार पुढे मांडून ठेवलें असूनहि, माणसें बहुधा जिथें होतीं, जशीं होतीं, तशींच आहेत, तिथेंच आहेत. त्यांचें अज्ञान आणि तज्जन्य अहंकार, विषयलोलुपता, स्वार्थांधता इत्यादि दुर्गुण जसेच्या तसेच आहेत.

कोणी संत समाजाला मार्गदर्शन करण्यासाठीं आज पुढें येत नाहीं, तसा कुणी श्रेष्ठ संत दिसत नाहीं, म्हणून माणसें उद्धरून जात नाहींत, हित साधून घेऊं शकत नाहींत, असें रडगाणें गाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सृष्टीचें व्यापार होत आहेत त्याअर्थी कोणी संत अस्तित्वांत नाहींत या म्हणण्याला कांहीं अर्थ नाहीं. ते आपल्याला ओळखतां येत नसतील हें शक्य आहे. पण ते मुळांतच नाहींत हे संभवतच नाहीं. संत प्रत्यक्ष समोर दिसत नसले तरी आपली अडचण होण्याचें वास्तविक कारण नाहीं. श्रीसमर्थांच्या चरित्रांतीलच एक प्रसंग आहे.

समर्थांचा देह सुटण्याचा काळ जवळ आला. त्यांनीं आपल्या परिवारांतील मंडळींना तसें सांगितलें, तेव्हां सर्वदा सहवासांत असलेलीं ती मंडळीं कासावीस झालीं, विलक्षण दु:ख करूं लागलीं. त्यांच्या डोळ्याचें पाणी खळेना, उरांत हुंदके मावेनात. शोकानें त्यांना कांहीं सुचेनासें झालें. तेव्हा समर्थ त्यांना हांसून म्हणाले-अरे ! शोक कशाचा करतां? माझ्याजवळ इतके दिवस राहून हेंच शिकलात कां ? माझें जड शरीर म्हणजे ''मी'' कां ? मी शरीरानें आहे कीं नाहीं याला काय महत्त्व आहे? आत्माराम आणि दासबोध हें माझें स्वत:सिद्ध रूप आहे. तें कोठें जाणारें नाहीं. तें तुमच्याजवळ आहे, तुमच्या स्वाधीन आहे. मग खुळ्यासारखा शोक कां करितां? मातीच्या शरीराचा लोभ कां धरतां ?

हा प्रसंग फार उद्‌बोधक आहे. भारतीय संस्कृति या दृष्टीनें फार संपन्न आहे. महाभारत, श्रीमद्‌भागवत यांच्या रूपानें भगवान् व्यासमहर्षि आपणांमध्यें वावरत आहेत. अमृतानुभव, ज्ञानेश्वरी या रूपानें श्रीज्ञानेश्वर महाराज आईच्या वात्सल्यानें आपणास भरवीत आहेत. गाथेच्या रूपानें श्रीतुकोबाराय सन्मार्ग दाखवीत आहेत. दासबोध, मनोबोधाच्या रूपानें श्रीसमर्थ रामदासस्वामी नाना प्रकारानें पढवीत आहेत. कबीर आहेत, नानक आहेत, तिरुवल्लूर आहेत, शंकराचार्य आहेत,



रामकृष्ण आहेत, रमण आहेत. आपल्या रसाळ आणि उद्‌बोधक वाङ्मयाच्या रूपानें अजरामर असलेलीं ही मंडळीं आमच्या अंवतीभोवतीं आहेत, आम्हांला जागवीत आहेत, सावध करीत आहेत.

आम्ही मात्र त्यांचेकडे लक्ष देत नाहीं. नाठाळ, आळशी पोरानें, ऐन परीक्षेच्या दिवसातहि सकाळीं लौकर उठूं नये, घड्याळाचा गजर थप्पड मारून बंद करावा, पुस्तकें केवळ उशी म्हणून उपयोगांत आणावीत, आईनें जागें केलें तरी कुरकुरून पुन्हा मुरगुट मारावी, फार तर 'हो उठतो' म्हणून नव्या दमानें ताणून द्यावी, असेंच आमचेंहि होत असतें. त्या अज्ञानी पोराला झोंपेचा मोह आवरत नाहीं, आळसांत सुख वाटते. आम्हाला विषयाचां मोह सुटत नाहीं. इंद्रियांना होणाऱ्या सुखापलीकडे कांहीं चांगलें आणि हिताचें आहे हें पटत नाहीं. आमची ही देहबुद्धि फारच उत्कट असते. मी म्हणजे देह आणि देहाचें सुख तें माझें सुख, ही धारणाच देहबुद्धि या शब्दानें अभिप्रेत आहे. केवळ देहबुद्धीनें जखडलेला मनुष्य कांहीं चांगलें करूं शकत नाहीं, कांहीं हिताचें साधूं शकत नाहीं.

ईश्वर नाहीं, परलोक ही खोटी कल्पना आहे, पुनर्जन्म हें थोतांड आहे, असें ज्यांना म्हणावयाचें असेल त्यांचें हें तर्कट गृहीत धरूनहि असे लोक केवळ शरीरसुखापुरतें पाहतील तरी त्यांचें कांहीं भलें होण्याची शक्यता नाहीं. शरीराचें हित जें आरोग्य, तें विचारांत घ्यावयाचें ठरविलें तरी शरीरसुख प्रधान मानता येणार नाहीं. तिथेंहि संयम, त्याग, सातत्य, प्रयत्न, कष्ट कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत स्वीकारावेच लागतील. इंद्रियांना वाटणारें सुख हें खरें सुख नाहीं हें मान्य करावेंच लागेल. वैयक्तिक हिताचा विचार करतांनाहि हें लक्षांत घ्यावें लागतें. मग कुटुंब, समाज, राष्ट्र या अधिकाधिक व्यापक क्षेत्राचा विचार करतांना संयमादींचें महत्त्व लक्षांत घेणें भागच आहे. पण देहबुद्धि हा विचारच करूं देत नाहीं. म्हणून तर तिचें कर्म खोटें आहे असें समर्थ म्हणतात.

या देहबुद्धीमुळेंच, सत्यस्वरूपाच्या अज्ञानाचा परिणाम असलेल्या या देहात्मवादामुळेंच, हिताचें जें काय तें आधीं ऐकावेसेंच वाटत नाहीं, ऐकलें तरी कळत नाहीं, कळलें तरी वळत नाहीं.

हित ही वस्तु कांहीं पालटणारी नसते. देशकालपरिस्थितीचा तिच्यावर खऱ्या अर्थानें कांहीं परिणाम होत नाहीं. विज्ञानयुगांतहि पालटलीं आहेत ती सुखसाधनें. हित कांहीं नवीन व्हावयाचें नाहीं, नवीन कळावयाचें नाही. हिताचें ठेवणें हें जुनेंच आहे. मीपणानें, देहबुद्धीच्या अहंकारानें त्याचें आकलन होत नाही इतकेंच.

समर्थांनीं देहबुद्धि ही चांगली नाहीं तिचा निरास केला पाहिजे, ती टाकली पाहिजे, तीच मनुष्याच्या सन्मार्गसाधनेतील मोठा अडथळा आहे, तिच्यामुळेंच

अनेकप्रकारच्या आपत्ती माणसाला भोगाव्या लागतात, असें या मनोबोध प्रकरणांत, आरंभापासून शेवटपर्यंत अनेक प्रकारांनीं, अनेक श्लोकांतून, सांगितलें आहे. विवेके देहेबुधि सोडून द्यावी (१२), देहेबुधि नीरूपणीं वीसरावीं (१०३), देहबुधिचा निश्चयो ज्या टळेना (१३८), देहेबुधि ते आत्मबुधी करावी (१६३), उपाधी देहेबुद्धि ते वाढविते (१६८), देहेबुधिचा आठऊ नाठवावा (१६९), देहेबुधि हे ज्ञानबोधें तजावी (१७०), देहेभान हें ज्ञानशस्त्रे खुडावें (१८८), देहबुधिचा निश्चयो ज्या टळेना । तया ज्ञान कल्पांतकाळीं कळेना (१९१), तया पाहता देहबुधी उरेना (१९७) या व्यतिरिक्त प्रत्यक्ष देहबुद्धि असा शब्द वापरला नसला तरी देहासंबंधीची उपेक्षा धारण केली पाहिजे अशा अर्थाचीं वचनें इतरहि श्लोकांतून आलेलीं आहेत. देहाला सर्वस्व मानण्याच्या वृत्तीवर परिणाम व्हावा व माणसानें विवेक करावा, हाच हेतु या पुन्हां पुन्हां सांगण्याच्या मागें आहे.

**भ्रमें नाडळे वीत ते गुप्त जालें ।**
**जिवां जन्मदारिद्र ठाकूनि आलें ।।**
**देहेबुद्धिचा निश्चयो ज्या टळेना ।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।।१३८।।**

मागच्या १३७ व्या श्लोकापासून ''जुनें ठेवणें मीपणें आकळेना'' अशा पालुपदाचें पाच श्लोकांचें प्रकरण आरंभलेलें आहे. सध्यांच्या काळांत या विचाराचें अधिकच महत्त्व आहे. प्रगति-उन्नति हे आजचे परवलीचे शब्द आहेत. काळ पालटत असतो. परिस्थिति नित्य नवें रूप धारण करीत असते. आपण तिच्याशीं जमवून घेतलें पाहिजे, काळानुरूप परिवर्तन केलें पाहिजे, असें सारखें ऐकविलें जातें. असें सांगणें, मानणें हेंच बुद्धिवादाचें गमक ठरलें आहे. विचारवंत म्हणविणारे याच मताचा सातत्यानें प्रचार करीत असतात. आणि समर्थ मात्र ''जुनें ठेवणें मीपणें आकळेना'' असें म्हणून अहंकार सोडा, तुमच्याजवळ तुम्हांला ऐश्वर्यसंपन्न, सुखी, समाधानी करणारा, उन्नत विचारांचा, उदात्त चारित्र्याचा बहुमोल ठेवा पुरातन काळापासून आहे तो ओळखा, जाणून घ्या, असा आग्रह धरीत आहेत. तेव्हां एकदां शांत मनानें, साधक बाधक विचारानें, पूर्ण जागृत विवेकानें प्रगति, परिवर्तन, पालट, काळासवें धांवणें या शब्दांच्या मागची भूमिका नीट जाणून घेतली पाहिजे.

प्राप्त होणें शक्य असा जो आदर्श, तो मिळत नाहीं तोंपर्यंत त्याच्या दिशेनें पुढें पुढें पावलें टाकीत राहणें ही प्रगति आहे. पर्वताच्या पायथ्यापासून पर्वताच्या शिखराकडे जातांना कष्टाचे चढउतार धैर्यानें पार पाडावे लागतात. चालत रहावें



लागतें. तें प्रगतीचें असतें. शिखरावर पोंचल्यानंतर पुढें टाकलें जाणारें प्रत्येक पाऊल हें अधोगतीचें लक्षण असतें.

जन्माला आलेलें मूल वाढूं लागतें. वीसपंचवीस वर्षांपर्यंत त्याच्या शरीरांत, हालचालींत, अवयवांच्या सामर्थ्यांत, क्रमानें परिवर्तन होत राहतें, विकास होत राहतो. पंचविसाव्या वर्षी व्यक्तिमत्त्वाला सर्वदृष्टीनें पूर्णता येते, आणि शरीराच्या पातळीवर तरी पुढें १०-१२, वर्षे तें नैसर्गिकपणें जसेंच्या तसें टिकून राहतें. पुढें नकळत उतार लागतो. पन्नाशीनंतर तें थोडें जाणवू लागतें, आणि पुढें-पुढें तें चांगलेंच व्यक्त होतें. म्हातारपणाची लक्षणें प्रगट होतात. शरीराचें बळ उणावतें. इंद्रियांची कार्यक्षमता जाते. आणि पुढें जीवन राहिलेंच तर तें भारभूत झालेलें असतें. सामान्यत: हें असें घडतें. व्यक्तिपरत्वें ५-१० वर्षांचें अंतर राहतें इतकेंच. आता जन्मापासून वयाच्या पंचविशीपर्यंत होणारें परिवर्तन हें परिवर्तनच आणि पस्तिशीनंतर अनुभवास येणारा पालट हेंहि परिवर्तनच. दोन्हींहि सारखीच इष्ट आणि आवश्यक मानावींत काय? पस्तिशीनंतर अनुभवास येणारें परिवर्तन हें होत नसेल किंवा लांबत असेल तर तें व्हावें म्हणून वा त्याचा वेग वाढवावा म्हणून माणसानें प्रयत्नशील असावें काय? पन्नाशीं उलटलेलाहि एकादा माणूस केंस काळेभोर असलेला, एकहि दांत न पडलेला, पांच-दहा कोंस चालण्याचा प्रसंग आला तरी न डगमगणारा, दांत बळकट, दृष्टि भेदक, कान तिखट, हात सशक्त, अशा कार्यक्षम शरीराचा, पंचविशीतल्या तरुणालाहि लाजविणाऱ्या उत्साहाचा असला तर त्याला अप्रगत, मागासलेला म्हणावें काय? आणि तिशींतच ज्याच्या शरीरावर म्हातारपणाची अवकळा दिसू लागली आहे त्याला प्रगत समजावें काय?

फार पूर्वीं, धूर ओकणाऱ्या चुलीवर, कदाचित् मातीच्या भांड्यांतून तांदूळ शिजवून, पत्रावळीवर वाढून जेवीत असत. आज वैज्ञानिक संशोधनामुळें साधनें वेगळीं आहेत. ज्वलनशील वायूंच्या शेगड्यांवर अत्याधुनिक अशा दाबाच्या पाचनपात्रांत (प्रेशर-कुकर) अन्न शिजविलें जातें. जेवणासाठीं उच्चासनें व भोजनमंच, कांचपात्रें, चकचकीत थाळ्या आणि कांटेचमचे यांची सोय असते. पण या आधुनिक साधनसंभारांत शिजविले जातात ते डाळ-तांदूळच. त्यांत कांहीं परिवर्तन झालें नाहीं.

मनुष्य, मनुष्य म्हणून या सृष्टींत वावरूं लागला तेव्हांपासून त्याची शरीररचना आणि शरीरक्रिया जशी होती तशीच आहे. सहस्त्रावधि वर्षांचा काळ लोटला तरी इंद्रियांचीं स्थलें पालटलीं नाहींत, अवयवांच्या क्रिया वेगळ्या झाल्या नाहींत. परिवर्तन ही नैसर्गिक आवश्यकता असती तर येथेंहि परिवर्तन अपेक्षित होतें.

परिवर्तनवाद्यांनीं, सतत प्रगतीचा धोषा लावणारांनीं, या गोष्टीचा गंभीरपणें विचार केला पाहिजे.

**न मे स्तेनो जनपदे न कदर्यो न मद्यपः ।**
**नानाहिताग्निर्नाविद्वान् न स्वैरी स्वैरिणी कुतः ।।**

उपनिषद्कालीन एका राजानें माझ्या राजवटींत कोणी चोर नाहीं, कृपण नाहीं, दारुडा नाहीं, अधार्मिक नाहीं, अशिक्षित नाहीं, कोणी स्वैराचारी पुरुष नाहीं तर दुर्वर्तनी स्त्री असणें कसें संभवनीय आहे, असें म्हटलें आहे. यांत कौटुंबिक, आर्थिक, वैयक्तिक, सामाजिक सुखस्वास्थ्याचें जें स्वरूप आहे त्यापेक्षां अधिक चांगली समाजरचना कल्पनेनें तरी सुचविणें शक्य आहे काय? सतत पालटत राहिलें पाहिजे असें सांगून आपणांस काय मिळवावयाचें आहे? संघर्ष, अस्वास्थ्य आणि प्रदूषण हींच आपलीं ध्येयें आहेत काय?

सृष्टीमध्यें विविधता निश्चित आहे. सर्वच सृष्ट पदार्थांत ती आहे. अचेतनांत आहे तशी ती सचेतनांतहि आहे. त्या विविधतेचें मूल्यांकन प्रकृति, प्रवृत्ति, परिस्थितीप्रमाणें वेगवेगळें होतें, आणि त्यांतून जन्मास आलेली विषमता कधीं कधीं फार जाचक होते व ती संघर्ष आणि अस्वास्थ्याला जन्म देतें. भारतीय संस्कृतीनें या विविधतेचा समतोल रहावा, विविधतेच्या आश्रयानें असणाऱ्या सामर्थ्याचें केंद्रीकरण होऊं नये, निरनिराळ्या शक्ति विकेंद्रित रहाव्या, सर्वांना आपले हित साधतां यावें, प्रत्येकाला समाधान लाभावें, कुणी उपेक्षित राहूं नये, लुबाडला जाऊं नये, आक्रमक होऊं नये, म्हणून एक विशिष्ट समाजव्यवस्था निर्माण केली. या व्यवस्थेंत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण; ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास असे चार आश्रम; धर्म, अर्थ काम, मोक्ष असे चार पुरुषार्थ; कर्म, भक्ति, योग, ज्ञान असे चार मार्ग; यांचा समावेश केला आणि सहस्रावधि वर्षांच्या दीर्घकालापर्यंत समाज ऐश्वर्यशाली, संपन्न, सुखी, संतुष्ट, सुस्थिर आणि समाधानी राहील अशी व्यवस्था केली. हें ठेवणें जुनें असले तरी शिळें नाहीं, म्हणूनच कुजकें नाहीं, सडलेलें नाहीं, अर्थातच त्याज्य नाहीं, तिरस्कारार्ह नाहीं. कांहीं दोष, कांहीं मलिनता कोणत्याहि व्यवस्थेंत शिरू शकते. प्रत्येक रचनेच्या, कांहीं स्वाभाविक उणीवाहि असतात. दोष, मळ काढून टाकावे लागतात. कांहीं अपरिहार्य उणीवा संतोषानें सोसाव्या लागतात. समाजव्यवस्थेच्या दृष्टीनें सर्वदाच शत प्रतिशत उत्तम, चांगलें वा निर्दोष असें कांहीं असूं शकत नाहीं. तेथें कमी वाईट आणि अधिक चांगलें, हा निकष लावूनच पर्याय शोधावा लागतो. समाजव्यवस्थेची भारतीय धारणा ही या दृष्टीनें समाजरचनेच्या कोणत्याहि पद्धतीपेक्षां, कल्पनेपेक्षां, वादापेक्षां अधिक चांगली



आहे, कमी वाईट आहे आणि म्हणूनच नि:शंकपणें श्रेयस्कर आहे.

दुर्दैवानें गेल्या अनेक शतकांच्या पारतंत्र्यामुळें जाणून, नेणून भ्रष्ट झालेल्या वा भ्रष्ट केलेल्या, भ्रांत बुद्धीला हें पटेनासें झालें आहे, म्हणून समर्थ ''भ्रमें नाडळें वींत ते गुप्त जालें'' असें म्हणतात. संपत्ति जवळ आहे, पुढें आहे, भव्योदात्त संस्कृतीचें धन हाताशीं आहे. तें सर्व सुखाचें साधन आहे. पण तें तसें आहे हें भ्रमानें आपण जाणून घेत नाहीं आणि त्यामुळें गर्भश्रीमंताच्या उदरीं येऊनहि संपत्तीचा ठेवा कुठें आहे तें निश्चित न समजल्यानें जन्मदारिद्र्य भोगावें लागावें, तशीं स्थिति आपली झाली आहे. दाराशीं आलेल्या कामधेनूला कुणी भाकड गाय समजला, चिंतामणि कोणाला गारगोटी वाटली, कल्पवृक्षाखालीं बसून कुणी संकटाचीच कल्पना केली तर तो दोष त्याचाच आहे. सर्व अनुकूलता असतांना दुर्दैन्याच्या रूपानें त्याची शिक्षा आपण भोगीत आहोंत.

देहबुद्धि सोडल्यावांचून आपणांत सुधारणा होणार नाहीं. इंद्रियसुखांना सर्वस्व समजणाऱ्या देहात्मवादाचा, भौतिक प्रगति म्हणजेच सगळें कांहीं असें मानणाऱ्या जडवादी तत्त्वज्ञानाचा, त्याग केल्यावांचून जें हिताचें आहे, आपल्या स्वाधीन आहे, तें आपण जाणूं शकणार नाहीं. देहबुद्धीचा निषेध समर्थांनीं ठायीं ठायीं केला आहे तो यासाठींच.

'जुनें ठेवणें' हिताचें असून दिसत नाहीं. तें कांहीं तें खऱ्या अर्थानें गुप्त आहे म्हणून नव्हे. तें गुप्त नाहीं, प्रगट आहे, उघड आहे पण त्याकडे पाहण्याची आपली दृष्टि नीट नाहीं. बुद्धीची तर्कप्रणाली सरळ नाहीं. हळवा आणि घायकुता माणूस जसा सदैव विपरीत कल्पनाच करीत असतो, घटनांचे अर्थ प्रतिकूलच पाहतो, तसें आपलें आपल्या सांस्कृतिक ठेव्याच्या संबंधांत होतें. तर्कबुद्धी शुद्ध असेल, विश्वास दृढ असेल तर असें होणार नाहीं.

**पुढें पाहतां सर्व ही कोंदलेंसे ।**
**अभाग्यास हें दृश्य पाषाण भासे ।।**
**अभावें कदा पुण्य गांठीं पडेना ।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।।१३९।।**

आपले तत्त्वज्ञान सांगतें कीं हें सगळें ब्रह्मच आहे. ''सर्व खलु इदं ब्रह्म'' पाहणारा, विचार करणारा जो मी तो, आणि त्या मीच्या दृष्टिपथांत, विचारपथांत येणारें आणि न येणारें, परमाणूपासून खगोलांतील प्रचंड ग्रहताऱ्यांनीं भरलेलें, सूक्ष्मतम कृमिकीटकापासून मनुष्यापर्यंतच्या नानाविध जीवांना समाविष्ट करून घेणारे, अनेक प्रकारच्या विविधतेनें नटलेलें, हें विशाल ब्रह्मांड म्हणजे ब्रह्मच

आहे, ब्रह्माचा एक आविष्कार आहे. विचार करणाराहि ब्रह्म आणि ज्याचा विचार करतो तेंहि ब्रह्मच. पण अभाग्याला, करंट्याला, अज्ञान जोपासून त्यांतच रमणाऱ्या पामराला, मात्र वास्तवतेचें हें भान येत नाहीं. तो हें सर्व जड मानतो, पाषाण मानतो, उपभोगाचें एक साधन मानतो.

श्रद्धेनें संस्कारित अशी बुद्धि नाहीं किंवा विचारानें, विवेकानें, सरळ प्रामाणिक तर्कानें परिष्कृत अशी भावना नाहीं त्यामुळें हें असें होतें. इंद्रियें जें अनुभवतात, मनाला जें पटतें, बुद्धीला जें वाटतें, तें प्रामाणिक यथार्थ वा वास्तवपणानें सत्य असतेंच असें नाहीं. इंद्रिय, मन, बुद्धि हीं ज्ञानसाधनें खरीं पण तीं कार्यक्षम, शुद्ध, निर्मल असावीं लागतात. तसें नसेल तर त्यांच्या आश्रयानें असणारे दोष माणसाला सत्याच्या साक्षात्कारापासून दूर नेतात. हें जेव्हां अज्ञानानें घडेल, निरागस अज्ञानानें घडेल, अविकसित अवस्थेंतील बालभावानें घडेल, तेव्हां ते क्षम्य असेल. कारण त्यावेळीं सुधारणा होण्याची पूर्ण शक्यता असते. पण जेव्हां मूलभूत अज्ञानावर, भ्रमावर अहंकाराने बुद्धिवादाचीं पुटें चढतात व तेंच खरें मानण्याचा दुराग्रह बळावतो तेव्हां मात्र हें क्षम्य नसते. समर्थ त्याला अभागी, करंटा म्हणतात तें यासाठीं. जेथें शक्यता नाहीं, संभव नाहीं, तेथें कुणी जाणता माणूस फारसा दोष देत नाहीं.

पांच वर्षांच्या लहान अजाण बालकाकडून, त्यानें उपनिषदें वाचलीं पाहिजेत, समजून घेतलीं पाहिजेत अशी अपेक्षा कुणी करीत नाहीं; पण मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष जर 'ज्ञानेश्वरी मी वाचली नाहीं' असें भूषणानें मिरवीत असेल तर त्याला अभागी वा करंटा म्हणण्यावांचून दुसरें काय म्हणणार? ज्ञानेश्वरी मी वाचली नाहीं म्हणण्यामागें, आजच्या विज्ञानयुगांतील प्रगत कालाच्या दृष्टीनें अंतराळांत संचार करणाऱ्या, चंद्रावर जाऊन पोंचलेल्या मानवाच्या दृष्टीनें, ज्ञानेश्वरींत उपयोगी पडणारें कांहीं नांहीं, म्हणून ती वाचण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें जाणून मी ती वाचली नाहीं, असें या प्रथितयश साहित्यिकांना म्हणावयाचें असतें. कोठेंहि, कशावरहि भाव नसलेले हे अश्रद्ध तर्कटी स्वत:च्या आणि इतरांच्याहि कल्याणाची हानि करीत असतात. त्यांचा बुद्धिवाद मोठा विलक्षण असतो. हें सगळें ब्रह्म आहे ना ! सच्चिदानंद आहे ना ! मग जगांत जडता कशी? दु:खें कां ? भयानक विषमता कां आढळून येते? ब्रह्म जर सर्वव्यापक आहे तर शिल्पकार जिला पायाखालीं धरून घडवितो त्या दगडाच्या मूर्तीला देव म्हणून वंदनीय कां मानावयाचें? तिची पूजा कशाला करावयाची? ब्रह्म जर सर्वत्र ओतप्रोत भरून आहे तर पाप-पुण्याची कल्पना थोतांड नाहीं काय? पाप-पुण्याच्या कल्पनेवर आधारलेले विधिनिषेध जीवनाचे मार्गदर्शक म्हणून कशासाठीं



मानावयाचे? **''आत्मवत् सर्वभूतानि यः पश्यति स पश्यति''** हें ब्रह्माच्या व्यापकतेवर आधारलेलें तत्त्वज्ञान खरें असेल तर भारतीय संस्कृतीनें भीषण अशा जातिभेदाचा पुरस्कार कशासाठीं केला ? इत्यादि इत्यादि आक्षेप घेतले जातात.

अवस्थाक्रम लक्षांत न घेतल्यानें हें असें तर्कट केलें जातें. जगतांतील सगळ्या वस्तू धन-ऋण विद्युत्कणांनीं भरलेल्या आहेत. त्यांच्यावांचून दुसरी वस्तुसत्ता नाहीं. असें आजचें प्रगत विज्ञान सांगतें. आणि तरी विज्ञानवादी, विज्ञानाचे मान्य पदवीधर वस्तूंची उपयोगिता वा मूल्य एकच मानीत नाहींत. हिरा आणि कोळसा यांच्या उपयोगांत आणि मूल्यांत आकाश-पाताळाचें अंतर राहतें. मूल घटक विद्युत्कण असूनहि त्यांच्या उण्याअधिक प्रमाणांनीं अत्यंत विभिन्न गुणधर्मांचे पदार्थ निर्माण होतात. त्यांच्या क्रिया-प्रतिक्रिया अगदीं वेगवेगळ्या असतात. मानवी शरीरहि अंतीं त्याच मूल घटकांचें असतें. तरी त्याच मूल घटकांच्या विविध वस्तू शरीरावरील परिणामाच्या दृष्टीनें अन्न, औषध आणि विष अशा भिन्न भिन्न गटांत समाविष्ट होतात. मूलभूत एकता आणि एकरूपता, अंतिम सत्य असतांनाहि, त्याची यथार्थता अबाधित असतांनाहि, शरीराच्या पातळीवर अन्न आणि विष हें कधीं सारखेंच मानतां येईल काय? भूमितींतल्या बिंदुला लांबी, रुंदी, जाडी कांहीं नाहीं तरी तो जागा व्यापतो. आणि आपण कितीही सूक्ष्मपणें काढलेला कोणताहि बिंदू लांबी, रुंदी, जाडीच्या, विरहित नसतो. मूळांतील व्याख्येचें आतां काय करावयाचें? विज्ञाननिष्ठ म्हणविणाऱ्या आपल्या नित्याच्या व्यवहारांत अशा कितीतरी गोष्टी आहेत. त्या खपवून घेणाऱ्यानें परमार्थांतील साधकोपयोगी व्यवहारावर आक्षेप घेणें अडाणीपणाचें आहे.

कार्यक्षम इंद्रियांच्या बुद्धिमान् माणसालाहि शरीराच्या म्हणून कांहीं मर्यादा असतात त्या गृहित धरूनच त्यानें मार्ग काढावयाचा असतो. यासाठींच परब्रह्म, ईश्वर, अवतार, श्रेष्ठ व्यक्ति, अशा अवस्थांचा विचार करणें भाग होतें. दागिना म्हणजे सोनें नव्हे पण सोन्याचा स्वीकार करतांना तें कोणत्या ना कोणत्या आकारांत असावयाचेंच. आकाराला महत्त्व नाहीं हें तत्त्वत: मान्य करूनहि दागिन्याची उपयुक्तता काढून घेतां येत नाहीं, प्रतिष्ठा नाकारतां येत नाहीं. म्हणून सोनें ओळखावें, दागिना स्वीकारावा. ब्रह्म जाणावें, जगांत राहावें, ईश्वर मानावा, मूर्तिपूजा करावी.

सौंदर्य ही काय वस्तु आहे ? ती वस्तुच्या ठिकाणीं आहे कां द्रष्ट्याच्या भावांत राहते, याचा तात्त्विक आणि यथार्थ निर्णय बुद्धिवादाच्या पातळीवर करतां येईल काय? प्रगत विज्ञानयुगाला शोभण्यासारखें निश्चित नियम या प्रकरणांत सांगतां येतील काय? आणि तरी जाणत्या रसिकाला वाङ्मय, चित्र, शिल्प,

नृत्य, संगीत, या कलांचा आस्वाद घेऊन आनंदाचा अनुभव मिळतो कीं नाहीं ? पतिव्रतेचें प्रेम, मातेचे वात्सल्य, देशभक्ताची भावना, चारित्र्यसंपन्नांचे व्यवहार, यांना भौतिक नियमांची कसोटी लावतां येईल काय? केवळ जडवादाचा स्वीकार केला तर शोषितांविषयीं, दलितांविषयीं सहानुभूति वाटणें शक्य आहे काय ? राष्ट्राचा ध्वज, पक्षाचें प्रतीक, मतांच्या घोषणा, यांना खराच अर्थ उरतो कां ? रसायन आणि पदार्थविज्ञान शास्त्रांपेक्षां मानसशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र वेगळेपणानें स्वीकारावें लागतें कीं नाहीं ? जीवशास्त्राचे नियम केवळ रसायनशास्त्राच्या आणि पदार्थविज्ञानाच्या चौकटीत बसवता येतील काय? यातले जर काहीच होत नसेल आणि तरी पदार्थविज्ञानशास्त्र किंवा त्याहिपेक्षां सूक्ष्म असे परमाणूविज्ञानशास्त्र जर मूलभूत सत्य असेल तर 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या वेदान्तावर आक्षेप घेता येणार नाहींत.

राज्यशासन आणि परमाणूविज्ञान यांचा जितका संबंध आहे, त्यापेक्षां मूर्तिपूजादि साधनांचा वा पापपुण्य कल्पनेवर आधारलेल्या विधिनिषेधांचा 'सर्वं खलु इदं ब्रह्म' या तत्त्वज्ञानाशीं अधिक निकटचा संबंध आहे. तो समजावून घ्यावयाचाच नाहीं वा तो जाणून घेण्यांत अर्थ नाहीं, असें ठरविलें असल्यानें आपल्या परंपरागत आचार-विचारांचें वास्तव महत्त्व लक्षांत येत नाहीं.

श्रद्धेला, भावनेला, विश्वासाला, बुद्धीइतकेच, तर्काइतकेच, किंबहुना थोडें अधिक मूल्य आहे. बुद्धि त्याज्य नाहीं पण भावना अधिक उपयुक्त आहे. आरंभापासून शेवटपर्यंत साथ देणारी आहे. बुद्धीनें भावनेचा तोल राखावा. श्रद्धेचा रस्ता स्वच्छ करावा. भावनेची सेविका व्हावे, सखी व्हावे. स्वामिनी होण्याची अपेक्षा धरूं नये. केवळ बुद्धिवादानें कांहीं पदरांत पडत नाहीं. चांगलें वाईट ठरवितां येत नाहीं. पदरांत पाडून घेण्यासाठीं चांगलें काय, हें समजून घेण्यासाठीं भावनेचाच आधार घेतला पाहिजे. त्याविना गति नाहीं. भावना ही संस्कारांतून पोसली जाते. तिला परंपरेचा, स्वकर्माचा, दीर्घकालाचा आधार असतो. आवडी-निवडी, हवें-नको, केवळ बुद्धिवादानें ठरत नाहीं. त्यांतील इष्टानिष्ट समजून घेण्यासाठीं शास्त्रांचा म्हणजेच निःस्पृह आणि जाणत्या पुरुषांच्या, दीर्घकालीन अनुभव व्यक्त करणाऱ्या, शब्दांचा आधार घ्यावा लागतो.

शास्त्रवचनांवर, संतवचनांवर विश्वास ठेवला नाहीं आणि अंतःकरणांत भाव नसेल तर काहींहि चांगलें म्हणून घडणें शक्य नाहीं. हिताचा मार्ग दिसणार नाहीं. समर्थ ''अभावें कदा पुण्य गांठी पडेना'' म्हणतात तें यासाठींच.

आपलें आपल्यालाच पहावयाचें असते, पण त्यासाठीं आरसा चांगला आणि स्वच्छ असावा लागतो. आरशाची कांच समतल नसली, त्यांत जर उंच-



सखलपणा असला किंवा आरशावर मळ सांचला असला, तेलकटपणामुळें तो पक्का झाला असला, तर आरशांत दिसणारें आपलेंच प्रतिबिंब जसें दिसावयास पाहिजे तसें दिसत नाहीं. म्हणून आरशाची कांच निर्दोष असावी लागते आणि तिच्यावरचा मळ कांहीं रासायनिक चूर्णे वा औषधी द्रव्यें यांनीं काढावा लागतो.

आपल्या अंतःकरणाचें तसेंच आहे. तें यमनियमांनीं समतल होतें आणि ध्यानपूजनादि साधनांनीं स्वच्छ होतें. मग ''अहं ब्रह्मास्मि''चा साक्षात्कार होतो आणि ''सर्व खल्विदं ब्रह्म'' अनुभवास येतें.

**''आदौ ब्रह्माहमस्मीत्यनुभव उदिते खल्विदं ब्रह्म पश्चात् ।''** असें श्रीमत् शंकराचार्यांनीं म्हटलें आहे. ध्यानादि साधनेनें मी ब्रह्म आहे असा साक्षात्कार झाला कीं मग भोंवती दिसणारें, भासणारें जगत्‌हि ब्रह्मावांचून वेगळें नाहीं, तें सर्व जसेंच्या तसें ब्रह्मरूपच आहे, ब्रह्मच आहे, असें प्रत्ययास येतें, असे आचार्य म्हणतात.

साधना ही साधना आहे, सिद्धि नव्हे. त्या मार्गानें प्रयत्न केल्यास सिद्धि मिळूं शकते. प्रतिबिंब दिसतें तें आरशांत. आरसा स्वच्छ करणाऱ्या चूर्णांत प्रतिबिंब दिसत नाहीं. तसें पाहूं जाणारा वा दिसत नाहीं म्हणून चूर्ण निरुपयोगी मानणारा खुळा ठरतो. ब्रह्मज्ञानापर्यंत नेऊन पोंचविणाऱ्या साधनांकडेहि त्याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे. हा विवेक केला कीं मग जगताला जड समजण्याचा वा मूर्तीला एक पाषाण मानण्याचा अभागीपणा, करंटेपणा, हातून घडणार नाहीं.

परंतु असें घडण्यासाठीं अहंकार सोडून, नम्रपणें, परंपरापूत विचार, जुने ठेवणें, जाणून घेतलें पाहिजे.

**जयाचें तया चूकलें प्राप्त नाहीं ।**
**गुणें गोंविलें जाहलें दुख देहीं ।।**
**गुणावेगळी वृत्ति ते ही वळेना ।**
**जुनें ठेवणें मीपणें आकळेना ।।१४०।।**

तत्त्वज्ञान, ब्रह्मज्ञान, आत्मज्ञान हे कांहीं इतर पदार्थजाताच्या ज्ञानाप्रमाणें बाहेरून मिळणारें उपरें ज्ञान नाहीं. आत्मा काय, ब्रह्म काय किंवा ईश्वर काय, हे कुठें तरी बाहेर विशिष्ट स्थलीं, दूर अंतरावर आहेत असें नाहीं. शास्त्र सांगतें– ''तत्त्वमसि'' तेंच तूं आहेस. ज्याला मी म्हणजे जीव समजतोस तो आत्मा म्हणजे ब्रह्मच आहे. भगवंत स्वतःच गीतेंत सांगत आहेत कीं– **ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।'** (भ. १८।६१) ईश्वर हा प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयांत वास करतो. त्या हृदयस्थ ईश्वराचें वर्णन नारायणोपनिषदानें तर फारच सुंदर

आणि प्रत्ययकारी भाषेनें केलेले आहे. हृदयांतल्या दहराकाशांत, निळ्या मेघातून तळपणाऱ्या विजेप्रमाणें तेजस्वी आणि नीवारशूकाप्रमाणें सूक्ष्म, अशी एक ज्योत, सुवर्णप्रकाशानें तेवत असते. त्या ज्योतींत परमात्मा वास करतो. **''तस्या शिखायामध्ये परमात्मा व्यवस्थितः ।''** प्राणिमात्रांच्याच काय पण भूतमात्राच्या, वस्तूजाताच्या संबंधांत हें सत्य आहे. या वस्तुस्थितीचा केवळ साक्षात्कार करून घ्यावयाचा असतो, पण तेंच घडत नाहीं. म्हणून तर समर्थ म्हणतात- ''जयाचें तया चूकलें प्राप्त नाहीं.''

**''तुझें आहे तुजपाशीं । परि तूं जागा चुकलासी ।।''** अशी माणसाची स्थिति होते. 'काखेंत कळसा आणि गांवाला वळसा' ही म्हणहि तत्त्वत: हाच अर्थ सांगते. खरें म्हणजे असें होऊं नये; पण असें होतें हें खरें. अगदीं व्यावहारिक, इंद्रियगम्य अशा गोष्टींतहि या विस्मृतीचा अनुभव येतो. आपण नेमकी सांपडावी म्हणून आवर्जून एखादी वस्तु ठेवलेली असते आणि पाहिजे तेव्हां शोध करूनहि ती सांपडत नाहीं.

नाकाला जरा जड वाटू लागलेली नथ लग्नकार्याच्या गडबडींत कुठेंतरी काढून ठेवण्यापेक्षां लागेल तेव्हां लगेच घालतां यावी म्हणून मंगळसूत्राला अडकवून ठेवली, आणि मग पुण्याहवाचनाला बसण्याच्या वेळीं ती सांपडेना. अंगभर पदर घेण्याच्या पद्धतीमुळें इतर कोणालाहि गळ्यांत अडकविलेली नथ दिसणें शक्य नव्हतें. नथ खऱ्या हिऱ्याची, भारीची. त्यामुळें लग्नघराचें गोंधळघरांत रूपांतर झालें. संशय, कावाकाव, आरडाओरडा यांना उधाण आलें.

असें कितीदां तरी होतें. कपाळावर सरकविलेला चष्मा कुठें ठेवला म्हणून हुडकणारीं माणसें वारंवार आढळतात.

वेड्याची अवस्था तर या दृष्टीनें निश्चितच विचारांत घेण्यासारखी आहे. एकदां एक मुख्यमंत्री, एक वेड्याचें रुग्णालय पाहावयास गेले. बरा होत आलेला एक वेडा बागकाम करीत होता. पुढारीपणाला आवश्यक तो जिव्हाळा दाखविण्याच्या दृष्टीनें मंत्र्यांनीं त्या वेड्याच्या पाठीवर हात ठेवून आपुलकीच्या रसांत बुडविलेल्या शब्दांनीं त्याची चौकशी केली. वेडा चमकून, हातातलें काम टाकून, सरळ उभा राहिला आणि त्यानें मंत्र्याला विचारले- ''तुम्ही कोण?'' ''मी या राज्याचा मुख्यमंत्री.'' मंत्र्यांनीं डौलांत उत्तर दिलें. ''लौकरच बरे व्हाल. मीहि स्वत:ला असेंच समजत होतो. येथें आलात तें बरें झालें'' -वेडा म्हणाला. मंत्री ओशाळले. काय बोलावें तें त्यांना सुचेना. छायाचित्रकारांनीं तो भाव नेमका टिपला.

माझा स्वत:चाहि अनुभव मोठा विचित्र आहे. पुण्याच्या आयुर्वेद महाविद्यालयांत अध्यापक असतांना मी विद्यार्थ्यांना येरवड्याचें वेड्यांचें रुग्णालय दाखविण्यासाठीं गेलों होतों. आम्हांला मार्गदर्शन करणारे तेथील चिकित्सक कांहीं कामांत गुंतले होते. म्हणून त्यांची वाट पहात वाचनालयकक्षांत मी थांबलों होतों. मुलें इकडेतिकडे हिंडत होतीं. माझ्या समोरच एक गृहस्थ नीटनेटक्या कपड्यांतले, सभ्य दिसणारे, वृत्तपत्र वाचीत होते. थोड्याच वेळांत ते माझ्याशीं बोलूं लागले. मी कोण, कुठला याची चौकशी केली. मी विचारल्यावरून आपलें नांव, गांव, व्यवसाय त्यांनीं सांगितला. ५-७ मिनिटें आमचें संभाषण व्यवस्थित चाललें होतें. मध्येंच त्यांनीं मला विचारलें ''इथल्या अधिकारी चिकित्सकाची तुमची ओळख आहे ना?'' ''हो! आहे थोडी.'' ''माझें एक काम करतां कां? कराच.'' ''काय बरें?'' ''मला सोडून द्यायला सांगा. मला येथें उगीच अडकवून ठेवले आहे, वेडा समजून.'' माझ्या डोक्यांत तेव्हां प्रकाश पडला. हा गृहस्थ वेडा असेल असें तत्पूर्वीं मला वाटलें नाहीं. वेड्याची सुद्धां प्रत्येक कृति वेड्यासारखीच असते असें नाहीं. एरवीचें वागणें पुष्कळसें सर्वसामान्यांसारखेंच असतें, पण तरीहि तीं माणसें वेडींच असतात.

आपण वेडे आहोंत हें न कळणें, हे वेडाचें मोठेंच लक्षण आहे. माणसाचें आत्म्याविषयीचें अज्ञान या वेडासारखेंच आहे. ब्रह्म मायेनें आवृत आहे. पुरुष प्रकृतीच्या पाशांत गुंतलेला आहे. भगवान् स्वत:च म्हणतात, **''नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः । मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ।।''** (भ. ७-२५). ईशावास्योपनिषदानें सत्याचें मुख सोन्याच्या झांकणानें झांकलेलें राहतें असें वर्णन केलें आहे. चांगला बुद्धिमान् माणूसहि मूढ ठरतो तो यामुळेंच. तो मायेच्या प्रभावांतून दूर होऊं शकत नाहीं. प्रकृतीच्या अंगभूत अशा सत्त्व-रज-तमांचा पडदा त्याच्या ज्ञानशक्तीला कुंठित करतो. सत्यापेक्षां त्याच्या झांकणाचेंच आकर्षण त्याला वाटते, जशी पुष्कळ तेलें बाटलीचा सुंदर आकार आणि चित्रविचित्र रंगांचे सुरेख वेष्टण यामुळेंच अधिक खपतात. तेलांतले गुण विचारांत घेतले जातच नाहींत.

मनुष्य आत्मज्ञानापासून दुरावतो तो हा असा. वेड्यासारखी त्याला आत्मविस्मृति झालेली असते. खुळ्या गिऱ्हाइकासारखा तो वेष्टणाला भुलतो. सत्यापर्यंत पोंचू शकत नाहीं. कांहीं वेगळें सत्य यामागें आहे आणि तें जाणून घेतलें पाहिजे असेंहि त्याला वाटत नाहीं. ज्ञानाचीं साधनें असलेलीं इंद्रियें, मन, बुद्धि हीं सर्व उण्याअधिक प्रमाणांत सत्त्वरजतमांनीं व्यापलेलीं राहतात, म्हणून दूषित असतात. ती सत्याचें यथार्थज्ञान करून देऊं शकत नाहींत. खरें हित कशांत, खरें सुख कशांत, तें कळत नाहीं, आणि मग स्वाभाविकपणेंच नानाप्रकारचीं दु:खें भोगावीं लागतात.

ज्याचा त्याग केला पाहिजे तें टाकावेसे वाटत नाहीं, घेऊं नये ते स्वीकारावेसें वाटतें, करूं नये तें केलें जातें. आणि मग दु:ख भोगण्यावांचून गति नसते. अंत:करणाची, अंत:करणवृत्तींची, या गुणांच्या पाशांतून सुटका झाली तरच खरें काय ते कळेल, आणि दु:ख टळेल, पण हेंच अवघड आहे. भगवंतांनीं अर्जुनाला निस्त्रैगुण्य हो असें सांगितलें आहे तें यादृष्टीनेंच.

वृत्तीवरील गुणांचे संस्कार इतके बलवान् असतात कीं त्यांतून सुटण्यासाठीं केलेल्या जाणत्या माणसाच्या प्रयत्नांनाहि यावें तसें यश येत नाहीं. ईश्वराच्या कृपेची, भगवत्प्रसादाचीच, त्यासाठीं अपेक्षा असते. सत्यदर्शनासाठीं भगवंताचीच करुणा भाकावी लागते, प्रार्थना करावी लागते कीं-हे भगवन् ! अत्यंत आकर्षक असल्यानें, सत्याला लपविणाऱ्या या सोन्याच्या झांकणाला दूर करणें, काढून टाकणें, आमच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. आपणच प्रसन्न व्हा आणि दयाळूपणानें हें झांकण काढून द्या. तरच सत्य पाहण्याची इच्छा असणाऱ्या आम्हांला सत्याचें दर्शन होईल.

ही प्रार्थना ईश्वरानें ऐकावी असा उत्कट भाव हृदयांत नसतो, नम्रता नसते, अहंकारानें प्रार्थनेचें महत्त्व समजत नाहीं, आणि मग आपलीच जुनी ठेव आपल्याला गवसत नाहीं.

**म्हणे दास सायास त्याचे करावे ।**
**जनीं जाणता पाय त्याचे धरावे ।।**
**गुरु अंजनेंवीण तें आकळेना ।**
**जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ।।१४१।।**

जुनें ठेवणें म्हणजे आपली परंपरा, आपलें धर्मशास्त्र, आपलें अध्यात्म, आपला अर्थकामाचा विचार, आपल्या भारतवर्षामध्यें मान्यता प्राप्त असलेली समाजविषयक धारणा, आपले नीतिनियम, आपलें तत्त्वज्ञान, आपला प्राचीन इतिहास, वेद, उपनिषदें, रामायण, महाभारत, हें आपलें वाङ्मय माणसाला पशुत्वांतून देवत्वाच्या पदवीवर नेऊन सोडणारें, नराचा नारायण करणारें सामान्यालाहि सत्पुरुषाच्या पदावर चढण्याची संधी देणारें, सर्वांची सोय करून हितापर्यंत पोंचविणारें, हें सगळें आपलें जुनें ठेवणे आहे. ते फार जुनें आहे, वेदांइतकें, महाभारताइतकें प्राचीन आहे. इतिहास संशोधकांना चक्कर यावी इतक्या पूर्वीचा हा काळ आहे, आणि त्यामुळेंच माणसाला ऐश्वर्यशाली बनविणारा हा समृद्ध ठेवा सहजासहजी ओळखतां येत नाहीं. समर्थ म्हणतात-त्यासाठीं सायास केले पाहिजेत, प्रयत्न केले पाहिजेत, दक्षतेनें, विवेकानें, सातत्यानें श्रम केले पाहिजेत. आळस



करतां कामा नये, दीर्घकालपर्यंत कराव्या लागणाऱ्या कष्टांना कंटाळतां कामा नये. आंब्याच्या झाडाचीं फळें रोप लावतांच चार सहा महिन्यांत हातीं पडत नाहींत, ५-१० वर्षे त्याकरितां वाट पहावीं लागते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

हें सगळें माणसाच्या नीटपणें ध्यानांत येत नाहीं, म्हणून त्याला कोणाचें तरी मार्गदर्शन पत्करावें लागते. माणसाचें हें वैशिष्ट्य आहे. पाहिजे तर वैगुण्यहि म्हणावें. माणसाला शिकविणारा, समजावून देणारा लागतोच लागतो. नैसर्गिक प्रेरणेनें त्याला फारच थोडें साधणें शक्य आहे, त्यादृष्टीनें तो पशुपक्ष्यांइतका किंवा कृमिकीटकांइतकाहि स्वतंत्र नाहीं. सर्व जीवकोटीमध्यें मनुष्य श्रेष्ठ खरा पण हें श्रेष्ठत्व अनुभविण्यासाठीं त्याला पदोपदी मार्गदर्शन पत्करावे लागतें. म्हणून समर्थ म्हणतात आपलें हित, आपलें कल्याण, आपली प्रगति, आपली उन्नति साधावयाची असेल तर माणसानें जाणत्याचें, ज्ञात्याचे, तज्ज्ञाचे पाय धरले पाहिजेत. आपल्या बुद्धिमत्तेचा अहंकार दूर सारून अनुभवी पुरुषाला शरण गेलें पाहिजे. ज्ञान देणारा सत्पुरुष नि:स्पृह, उदार, कनवाळू असला तरी ज्ञान घेणाराची पात्रता सिद्ध व्हावी लागते. ती विनम्रपणें नमस्कार करण्यानें, जिज्ञासेनें, विनयानें पुन्हां पुन्हां प्रश्न विचारल्यानें आणि आळस न करतां केलेल्या सेवेनें सिद्ध व्हावयाची असते. यासाठींच गीतेनें **'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया''** । मग **''उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनः तत्त्वदर्शिनः''** (भ. ४।३४) असें म्हटलें आहे. समर्थांनींहि ''पाय त्याचे धरावे'' म्हणून सांगितलें आहे. त्यात हा इतका भाव आहे.

आपण शिष्टाचार म्हणून, एक रूढी म्हणून किंवा मनांत नसलें तरी लौकिकामध्ये नम्रता सिद्ध व्हावी म्हणून, नमस्कार करणें, जमिनीवर डोकें टेकणें, पायांवर डोकें ठेवणें, साष्टांग दंडवत घालणें, असें नमस्काराचे अनेक प्रकार करतो. पण त्यांत खरा विनय, खरा भाव, खरी श्रद्धा नसते. पंढरपुरामध्यें पायांवर डोकें ठेवून परस्परांना नमस्कार करण्याची पद्धत अद्यापीहि रूढ आहे. ''पंढरीच्या लोकां नाहीं अभिमान । पाया पडे जन एकमेकां ।।'' या संतवचनाचा तो परिणाम असावा. पण ते खरोखरीच निरहंकारी वृत्तीनें घडतें काय ? ज्याच्या पायावर डोकें ठेवून नमस्कार करावयाचा, त्याच्या विषयीं नमस्कार करणाराच्या अंत:करणांत जर द्वेष, मत्सर, निंद्यतेची भावना असेल तर पायावर डोकें ठेवणें या क्रियेला कांहीं अर्थ राहात नाहीं. पाय हे शरीरावयवांमध्यें निकृष्ट. डोकें हे शरीरावयवांमध्यें उत्कृष्ट. म्हणून त्याला उत्तमांग असें म्हणतात. माझें हें मस्तकहि तुमच्या पायांपेक्षा कमी योग्यतेचें आहे, अशी परमादराची भावना वंदनकर्त्याच्या मनांत असावयास हवी. पण तशी बहुधा नसते. त्यामुळे असा हा नमस्कार एक उपचार मात्र ठरतो. आमचे ती. दादा एकदां थट्टेनें म्हणाले होते, ''पंढरपूरचा हा नमस्कार निदान

कांहीं लोक तरी तूं माझें सांगू नकोस, मी तुझें सांगत नाहीं, यासाठीं करतात.'' भावनाशून्यतेवरची ही टीका आहे. ज्ञानसंपादनासाठीं ज्यानें नमस्कार करावयाचा त्या जिज्ञासूच्या अंत:करणांत त्यावेळीं आदर नि नम्रता हे भाव असलेच पाहिजेत. श्रद्धा, विश्वासाचींच तीं अंगें आहेत. ज्ञान मिळवावयाचें तर जिज्ञासू श्रद्धायुक्त, तत्पर आणि संयमशील असावाच लागतो तरच ज्ञान मिळतें. **''श्रद्धावान् लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।''** (भ. ४।३९) असें गीतेनें स्पष्टपणें म्हटलें आहे.

ज्ञान मिळवावयाचें तर गुरूची त्यासाठी नितांत आवश्यकता आहे. गुरुवाचून प्राप्त झालेलें ज्ञान असावें तसें यथार्थ असत नाहीं. म्हणून आपल्याकडे अगदी प्राचीन कालापासून गुरूची आवश्यकता स्वीकारलेली आहे. **''तद्विज्ञानार्थ गुरूमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ।''** ब्रह्माचें ज्ञान विशेषरीतीनें प्राप्त करून घेण्यासाठीं ब्रह्मनिष्ठ आणि श्रोत्रिय अशा गुरूला हातामध्यें समिधा घेऊन शरण गेलें पाहिजे. ''समित्पाणि'' हें शिष्याचें विशेषण मोठे मार्मिक आहे. समिधा जशा वाळलेल्या असतात, तसा हा विरक्त असला पाहिजे. समिधा आहुतीसाठीं असतात. तशी याची त्यागाचीं सिद्धता असली पाहिजे. वाक्यांतील 'एव' कार महत्त्वाचा आहे. गुरूलाच शरण गेलें पाहिजे आणि गुरूला शरण गेलेंच पाहिजे इतका अर्थ त्या 'एव' काराचा आहे. ''आचार्यवान् पुरुषो वेद ।'' गुरु केल्यानंतरच पुरुषाला ज्ञान मिळूं शकतें असेंहि उपनिषदानें सांगितलें आहे. जगद्गुरु श्रीशंकराचार्यानीं ज्ञानदात्या सद्गुरूला देण्यासारखी तुल्यबळ उपमाच सांपडू शकत नाहीं, असें निश्चयानें सांगितलें आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजहि **''म्हणोनि भाग्य जें सानुकूळ । जालिया केलें उगम सदा सफळ । तैसें श्रुताधींत सकळ । गुरुकृपा साच ।। कां इंद्रियें वाचा प्राण । या जालियांचें तैचि सार्थकपण । जै चैतन्य येउनि आपण । संचरे माजि ।। तैसें शब्द जात आलोडिलें । अथवा योगादिक जें अभ्यासिलें । तें तैचि म्हणों ये आपुलें । जै सानुकूल गुरु ।।** (ज्ञाने-१०।१६८, ७१, ७२) अशीच श्रीगुरूची आवश्यकता प्रतिपादन करतात.

आमच्या ती. दादांनीहि **''आत्मस्वरुपा पाहणें असल्या दर्पण घ्या गुरु हातीं । हें नच केल्या पाहूं गेल्या होईल अवघी फजिती ।।''** असेंच म्हटलें आहे.

श्रीतुकाराममहाराजहि **''सद्गुरुवांचोनि प्रेतरूपी वाणी''** असेंच गुरूचें महत्त्व सांगतात आणि ज्यानें गुरू केला नाहीं त्याचा **''निगुरा अखंड सुतकाळा ।''** असा निषेध करतात.

समर्थांनीहि दासबोधांत **''असो जयासी मोक्ष व्हावा । तेणें सद्गुरु करावा । सद्गुरूविण मोक्ष पावावा । हें कल्पांतीं न घडे ।।''** असें सांगितलें आहे. (दासबोध ५।१।४४)



अध्यात्ममार्गांत सद्गुरूचें असें निरपवाद महत्त्व असल्यानें **''गुरू अंजनेंवीण तें आकळेना''** असें समर्थ या श्लोकांत सांगत आहेत. विशिष्ट रीतीनें मंत्रसिद्ध केलेलें अंजन डोळ्यांत घालतांच भूमिगत द्रव्य पाहण्याचें सामर्थ्य डोळ्यांत येतें, असें म्हणतात; तोच प्रभाव गुरुकृपेचा आहे, असा निश्चय समजावा. सत्यदर्शनासाठीं गुरुकृपेची नितांत आवश्यकता आहे म्हणून तर ज्ञानेश्वरांसारखे, बुद्धिमत्तेच्या आकाशांतील सूर्यासारखे तेजस्वी असलेले, प्रज्ञावान् महापुरुषहि, गुरुभक्तीनें वेडे होतात. गुरूचें स्तवन करतांना त्यांच्या दिव्य प्रतिभेला विलक्षण स्फुरण चढतें. प्रत्यक्ष परब्रह्मापेक्षां गुरु कोणी वेगळा आहे असें ते मानीतच नाहींत.

अलीकडे मात्र या गुरुपरंपरेला तुच्छ लेखण्याची विचारधारा प्रसार पावत आहे. एका अधिकारी थोर पुरुषाच्या व्याख्यानाचा हा एक महत्त्वाचा विषय असतो. ते म्हणतात - गुरु मानूं नका, ग्रंथांवर विश्वास ठेवूं नका, तुमचा तुम्हीं विचार करा.

तुमचा तुम्हीं विचार करा या आदेशाला, बुद्धीला चालना देण्याच्या दृष्टीनें, कांहीं महत्त्व निश्चित आहे. समर्थांनींहि **''सर्व शोधून पाहे''** असें सांगून विवेकाला, विचारालाच, जागृत केलें आहे. पण कोणाचेंहि ऐकू नका हा पूर्वार्ध मात्र योग्य नाहीं. तो पूर्णपणे आचरणांत आणावयाचें ठरविलें तर माणसाला एकहि पाऊल पुढें टाकतां येणार नाहीं. हित कळणें आणि हित मिळविणें या दोन्हीं दृष्टींनीं त्याचा घातच होईल. तुमचा तुम्हीं विचार करा, कोणाचेंहि ऐकूं नका म्हणणाराचें तरी ऐकलेंच पाहिजे ना ! हें विधानच अंतर्विरोधी आहे. बरे ! हें एवढें एक वाक्य उच्चारून भागतें काय? तुमचा तुम्हीं विचार करा या सिद्धांताच्या प्रतिपादनासाठीं एके दिवशीं दीड तास अशी ५-७ दिवसांची व्याख्यानमाला आयोजित केली जाते. ही अशी आकर्षक, प्रभावी भाषेने सांगितलेली व्याख्यानें ऐकणाराचें मन, स्वतंत्रपणें विचार करण्याइतकें मोकळें राहूं शकणार नाहीं.

''तुमचा तुम्हीं विचार करा'' हें तरी माणसाला सांगावें लागतें, पटवून द्यावें लागतेंच ना? मग **''सद्गुरुवांचोनि सांपडेना सोय''** असें म्हणणाराची अवहेलना काय म्हणून करावी? गुरूवर विश्वास ठेवावा, ग्रंथांचें मनन करावें, म्हणजे साधकबाधक विचार न करतां आंधळेपणानें चालावें असें नाही. उपनिषदांतील प्रजापति विरोचनाची कथा या दृष्टीनें लक्षणीय आहे. गुरुवचन आंधळेपणानें स्वीकारणाऱ्या शिष्याचा तेथें स्वत: गुरूनेंच उपहास केला आहे.

अर्जुनाच्या अंत:करणात कृष्णभक्ती अत्यंत उत्कट असूनहि त्यानें श्रीकृष्णाच्या अनेक विधानांवर आक्षेप घेऊन त्यांना आडवे-तिडवे प्रश्न विचारले आहेत आणि सद्गुरुनिष्ठ ज्ञानेश्वरांनी अर्जुनाचें हें बुद्धिकौशल्य गौरविलें आहे. तेव्हां

गुरूपदेश स्वतंत्र विचाराला घातक असतो असें समजण्याचें काहींच कारण नाहीं. गुरु हा सर्वदाच मार्गदर्शक असतो, सहाय्यक असतो, आणि तसे सहाय्य प्रगतीची इच्छा असणारांनीं घेतलेंच पाहिजे. घेत नाहीं म्हणणें हा अहंकार आहें. अगदीं बालवर्गापासून ते पदव्युत्तर परीक्षेच्या प्रबंधासाठीं शिक्षकाची आणि मार्गदर्शकाची आवश्यकता असतेच. मार्गदर्शकावांचून, विद्यापीठ अत्यंत उच्च परीक्षेचा प्रबंधहिं स्वीकारीत नाही. एका रीतीनें ही निगुरा म्हणून केलेली अवहेलनाच आहे. तेव्हा माणसानें आपल्या हिताचें जुने ठेवणें काय आहे, कुठें आहे; हें समजून घ्यावयाचें असेल तर मला सगळें कळतें हा मीपणा बाजूला ठेवून तज्ज्ञांचें मार्गदर्शन नम्रपणानें पत्करलेंच पाहिजे.

**कळेना कळेना कळेना, ढळेना ।**
**ढळे, नाढळे, संशयो ही ढळेना ।।**
**गळेना गळेना अहंता गळेना ।**
**बळें आकळेना मिळेना मिळेना ।।१४२ ।।**

'द्विर्बद्धं सुबद्धं भवति' असा एक नियम आहे. दोनदां बांधलें कीं नीट बांधलें जातें. सुटूं नये म्हणून गांठ मारावयाची असली तर एकावर एक २-३ गांठी माराव्या लागतात. तसें, सांगावयाचा विचार दृढपणानें ठसावा म्हणून समर्थ त्याच त्याच क्रियापदाचा तीन तीन वेळां उपयोग करून अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या जुन्या ठेवण्याचें, पारंपरिक मूल्याचें आकलन होणें, अहंता सोडल्याशिवाय कठिण आहे हे सांगत आहेत.

मनुष्याला खरोखरीच पुष्कळवेळां जें नेमके कळावयास हवें ते चांगलेंसे कळत नाहीं. त्याच्या अंत:करणांतील संशय नाहीसे होत नाहीत. नाना कारणांनीं, निमित्तानी ते पुन:पुन्हां येतच राहतात. याचें महत्त्वाचें कारण आहे अहंकार नाहींसा न होणें हें. आपली विद्वत्ता, आपली बुद्धिमत्ता, आपले निर्णयकौशल्य, आपलें चातुर्य, आपली आकलनशक्ति, आपली स्मरणशक्ति, कामें करण्यांतील स्वत:चे कौशल्य यावर माणसाचा फार विश्वास असतो आणि त्यामुळें आपल्याला वाटतें त्यांपेक्षां वेगळें काहीं सत्याला आणि हिताला अधिक जवळचें असूं शकतें हें त्याला पटतच नाहीं. सत्याचें ज्ञान होण्यासाठीं बुद्धीचा धसमुसळा हट्ट उपयोगीं पडत नाहीं. बुद्धीला भावनेचें, तर्काला थोरांच्या मान्यतेचें, विवेकाला विश्वासाचे पाठबळ असावें लागतें, तरच सत्य, हित यथार्थपणें समजतें. अन्यथा प्रयोगावारी चांचपडत, वैतागत जीवन कंठावें लागतें.



**अविद्यागुणें मानवा ऊमजेना ।**
**भ्रमें चूकलें हीत तें आकळेना ।।**
**परीक्षेविणें बांधलें दृढ नाणें ।**
**परी सत्य मिथ्या असें कोण जाणें ।।१४३।।**

माणसाला इंद्रियें, मन, बुद्धि हीं ज्ञानग्रहणाचीं सगळीं साधनें उपलब्ध आहेत. पण त्यावर अविद्येचें, मायेचें, रजतमांचें आवरण असल्यानें सत्य म्हणून जें कांहीं वस्तुत: आहे तें माणूस पाहूं शकत नाहीं.

अविद्या, अध्यास, माया यांचा वेदान्ताच्या परिभाषाशास्त्रांत प्रक्रियांच्या दृष्टीनें वेगवेगळा विचार केलेला आहे. पण उपयोगाच्या दृष्टीनें तितक्या खोलवर जाऊन, काथ्याकूट करण्याचें आपणांस कारण नाहीं. आपल्या व्यवहारांतील अनुभवाचा विचार केला म्हणजे आपण सत्यापासून दुरावलों आहोंत, आणि आपलें हित झालेलें नाहीं एवढी समज थोडासा विचार करणाऱ्या कोणालाहि येऊं शकते. हें असेंच असावयाचें, हा काळाचा प्रभाव आहे. परिस्थितीचा परिणाम आहे, असें म्हणून कोणाला निराशावाद पसरवायचा असेल तर गोष्ट निराळी. रोग आहे पण त्याचें दु:ख ज्याला जाणवत नाहीं तो रोगी बरा होण्यांतला नाहीं असें जाणावें हें वैद्यकशास्त्र सांगतें.

सगळें एक असतांना वेगळेंपणा भासणें आणि तोच खरा वाटणें हें अज्ञानाचें, अहंकाराच्या रूपानें प्रगट होणारें, पहिले स्वरूप. हा अहंकार जो जो बलवान होत जाईल, तो तो वासना, विकार वाढत जातात, आणि त्याप्रमाणांत भ्रमहि होत राहतो. म्हणून आपलें हित दिसावें यासाठीं माणसानें अहंकाररूप अज्ञानाला दूर ठेवून आपल्या दिसण्याचें, वाटण्याचें, परीक्षण करीत गेले पाहिजे. ते नि:स्पृह ज्ञात्याच्या मताशीं ताडून पाहिलें पाहिजे. आपण ज्याला शास्त्र-शास्त्र असें म्हणतो तो प्रामाणिकांच्या दीर्घकालीन अनुभवांचा संग्रह असतो. म्हणून आपलें वाटणें हें शास्त्राच्या कसोटीला उतरणारें नसेल तर ते अयोग्य आहे, त्यासंबंधीचा विचार पुन्हां नव्यानें केला पाहिजे, एवढी तरी जाणीव मनुष्यास व्हावयास हवी.

न तपासतां स्वीकारलेले खोटें नाणें शेवटीं स्वत:चाच तोटा करतें, व अडचणींत टाकतें. मी बँकेत भरावयास नेलेली नोट खोटी निघाली तर ती भरली जात नाहीं व त्यामुळें माझा तोटा तर होतोच आणि वर ही तुमच्याजवळ कोठून आली, कशी आली, यासंबंधांत विचारल्या जाणाऱ्या आडव्या तिडव्या प्रश्नांना उत्तरें देत बसावें लागतें, म्हणून नोटा घेतांना, निदान अधिक किंमतीच्या नोटा

घेतांना त्या पारखून घेतल्या पाहिजेत. खोटी नोट ही खेळांतल्या नोटेसारखी सहजासहजी वेगळेपणानें ओळखतां येत नाहीं. ती खऱ्या नोटेसारखी जशीच्या तशीच दिसते. सत्य, मिथ्याचें तसेंच होतें. जे सत्य आहे तें पटत नाहीं. जें मिथ्या आहे तें उमगत नाहीं. परिणामी हित लाभत नाहीं. इंद्रियांच्या अनुकूल प्रतिकूल संवेदना या अगदीं तात्कालिक असल्यानें त्यांवरून जीवनाच्या रक्षणाचे नियम बांधू गेलें तर अपाय घडतो. ताडाच्या झाडाखालीं बसून एखादा दूध पीत असला तरी आपण त्याला ताडी पितो असें समजणार आणि देवीचें तीर्थ या नांवाखाली कुणी दारू पीत असला तर आपण त्याला धार्मिक मानणार. आपले हें दोन्ही निर्णय अगदीं उथळ आणि फसवे आहेत, सत्याच्या कसोटीला टिकणारे नाहींत. सगळीकडे बहुधा असेच होतें. म्हणून सावध राहिले पाहिजे.

**जगीं पाहतां साच तें काय आहे ।**
**अती आदरें सत्य शोधूनि पाहें ।।**
**पुढें पाहतां पाहतां देव जोडे ।**
**भ्रमे भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे ।।१४४।।**

असणें आणि दिसणें एकरूप नाहीं. असणें आणि भासणेंच नव्हे तर दिसणें आणि भासणेंहि वेगळे राहते. म्हणून सत्याचा ज्ञानासाठीं शोध घ्यावा लागतो, प्रयत्न करावे लागतात, सातत्यानें श्रमावें लागतें आणि हें साधण्यासाठीं अंत:करणांत सत्याविषयींची ओढ असावी लागते, शास्त्रवचनांविषयींचा आदर असावा लागतो. तसे नसेल तर भ्रमाला बळी पडावें लागतें.

**अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः । प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ।''** (भ. १५।१४) या वाक्याचा उपयोग जर कुणी शिजवणें टाळण्यासाठी केला तर चालावयाचे नाहीं. पोटांत घालांवयाचें अन्न शिजवूनच घातले पाहिजे. जठराग्नीचें कार्य हें चुलींतील जाळापेक्षां निराळ्या स्वरूपाचें आहे. वस्तू विनाश पावत नाहीं, matter cannot be destroyed, याचा उपयोग एकाद्या वेंधळ्या व्यक्तीनें हातून कांचेचीं पात्रें फुटली म्हणजे करूं नये, शोधून पहावें लागतें तें यासाठीं.

आज आपल्याला आश्चर्यचकित करणारी विज्ञानाची प्रगति एका दिवसांतहि झालेली नाहीं आणि अचानकहि झालेली नाहीं. शेंकडों संशोधकांनीं एकेक बारीक बारीक गोष्ट शोधून काढण्यासाठीं तहानभूक विसरून परिश्रम केले आहेत. प्रयत्नाला यश आलें नाहीं तरी निराश न होतां नव्या उत्साहानें ते दीर्घकालपर्यंत शिणले आहेत. आपल्याला सत्यापर्यंत, ईश्वरापर्यंत, पोंचावयाचे आहें तेव्हां घाई



चालणार नाहीं, उत्कट भावानें धैर्य धरून, सतत साधनं केलीं पाहिजे. **''अर्थं वा साधयेत् देहं वा पातयेत् ।''** असा आग्रह असला पाहिजे. बुद्धि शुद्ध पाहिजे, भावना उत्कट पाहिजे. भाव प्रामाणिक हवा. मग मात्र प्रत्येक पाऊल देवाच्या जवळ नेतें आणि उलट प्रत्येक पावलागणिक भ्रम, भ्रांति, अज्ञान हे विकार उणावत जातात, शिथिल होतात, गळून पडतात.

**सदा वीषयो चिंतितां जीव जाला ।**
**अहंभाव अज्ञान जन्मासि आला ।।**
**विवेकें सदा सस्वरूपीं भरावें ।**
**जिवा ऊगमी जन्म नाहीं स्वभावें ।।१४५।।**

अज्ञानाने अहंभाव धारण करून जीव बहिर्मुख होतो आणि अखंड विषयाचें चिंतन करतो, व त्यामुळें विषयोपभोगाविषयींची वासना त्याला पुन्हां पुन्हां जन्म घेण्यास भाग पाडते. जीवाची जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून सुटका होत नाही. यासाठी माणसानें विवेक करावा. सत्य काय, मिथ्या काय, शाश्वत काय, चंचल काय, हितकर काय, अहितकर काय तें जाणून घ्यावें, प्रयत्नपूर्वक समजावें, आणि सत्य, शाश्वत हित असें जें आपलें मूळ स्वरूप तेथेंच लीन होऊन रहावें. या आत्मज्ञानांतच स्थिर रहावें.

ही संसाररूप माया नदी मुळांत जेथून उगम पावली तेथें जाऊन पोंचावें, म्हणजे लक्षांत येईल कीं त्या मूळ शुद्ध ठिकाणीं जें आहें तें सारें स्वच्छ आहे, निर्मल आहें. तेथें विविधताच नसल्यानें विकारांचे आणि विषमतेचें गदळ मुळींच नाहीं. सारें कसें शांत, सात्त्विक, पवित्र आहे. वेगळा असा जीवभावच नसल्याने त्या ठिकाणीं जन्म नाहीं अर्थात् मरणहि नाहीं.

सृष्टीच्या मुळाशीं, विश्वाच्याहि आरंभीं जे काही शांत, शिव, अद्वैत, अनिर्वचनीय, अखंडैकरूप, असें जें कांहीं होतें तेंच ब्रह्म. त्याला कां कोणास ठाऊक पण ''एक: अहं'' मी एकटाच आहे असें जाणवलें. ही जाणीव हेंच मायेचें रूप आहे. एकट्याला चैन पडत नाहीं (एकाकी न रमते) म्हणून त्याला पुष्कळ व्हावेसें वाटलें (बहुस्याम्) आणि तो तसा झाला (प्रजायेय) अशारीतीनें सृष्टीचा प्रवाह वाहूं लागला.

कोणताहि जलप्रवाह जेथें उगम पावतो, तेथें तो शुद्ध निर्मल असाच असतो. पण जसा जसा पुढें वाहूं लागतो तसेतसे त्या जलप्रवाहामध्यें इतरहि ओघ मिसळतात. नदी मोठी होत जाते, पण जलाची मलिनताहि वाढत जाते. गंगेचें स्वरूप गंगोत्रीशीं आणि त्याहि वर गोमुखाशीं स्फटिकाप्रमाणें स्वच्छ आणि

निर्मल आहे. पण तेंच पुढें कलकत्त्याजवळ आलें कीं चूळ भरण्याचीहि इच्छा होऊं नये असें मलिन झालेलें असते. म्हणून स्वच्छता, शुद्धता, निर्मलता यांची अपेक्षा असेल तर प्रवाहाच्या उलट दिशेनें उगमाकडे अधिकाधिक वरवर गेलें पाहिजें.

आपण ज्या व्यवहारी जीवनांत वावरतो तो कलकत्याजवळचा गंगेचा प्रवाह आहे. यासाठीं उगमाचा वेध घेत घेत वाटचाल केली पाहिजे. ईश्वराचें दर्शन, ब्रह्माचा साक्षात्कार होईपर्यंत साधनारूपीं यात्रा केली पाहिजे. तेथें जाऊन पोंचलें म्हणजे लक्षांत येईल कीं आपलें स्वरूप, स्वस्वरूप हेंच आहे. हें लक्षांत आलें कीं मग इतर कांहीं आकर्षक वाटणारच नाहीं, जीव तेथेंच रमून राहील.

**दिसें लोचनी तें नसे कल्पकोडी ।**
**अकस्मात आकारलें काळ मोडी ।।**
**पुढें सर्व जाईल कांही न राहे ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहें ।।१४६।।**

येथून पुढें पांच श्लोकांत समर्थ एकप्रकारें ब्रह्मज्ञानाचा प्रवास घडवीत आहेत. ज्याला खरें संतत्व आहें, म्हणजे सत्ता आहे, अस्तित्व आहे, तें तत्त्व अविनाशी आहे, अनंत आहे, अमर्याद आहे. कोणत्याहि मर्यादेनें, सीमेनें तें बद्ध होत नाहीं. हें जे मूलतत्त्व, जें त्रिकालातीत आणि सर्वव्यापक आहे, स्थल आणि कालहि जेथें गळून पडतात, तें तत्त्व शोधलें पाहिजें आणि त्याचा साक्षात्कारहि करवून घेतला पाहिजे.

जें डोळ्यानें दिसतें तें दीर्घकालपर्यंत टिकत नाहीं. **''यद् दृष्टं तन्नष्टं ।''** दिसतें तें केव्हां ना केव्हां तरी नाहींसें होणारें असतें. आधीं कांहीं नसतें तिथें तें एकाएकी आकाराला येतें. हीं आकाररूपें नाना प्रकारच्या विकारांना निमित्त होतात. उदाहरण म्हणून एका गोष्टीचा विचार करतां येईल.

ग्रीष्मामध्यें भूमि कोरडी, रखरखीत, रूक्ष दिसते. मृगाची पहिली सर कोसळली कीं मृद्‌गंध सगळीकडे दरवळतो आणि मग दोनचार दिवसांतच नाना प्रकारच्या अंकुरांनीं सृष्टी हिरवी होते. ही हिरवळ विविधतेनें भरलेली असतें. त्यांत कांटेरी झुडपें असतात, विषारी वनस्पती असतात, वड-पिंपळासारख्या महावृक्षांचे कोंब असतात, गुरांना मानवणारें गवत असतें. माणसाला रुचि देणारी भाजी असते. सुंदर रंगाचीं फुलें असतात. आकर्षक आकाराचीं पानें असतात, शेतें तरारतात, पिकें डुलूं लागतात. २-४-६ महिने हें ऐश्वर्य टिकतें. मग वनस्पती वाळूं लागतात. त्यांची विविधता आणि सौंदर्य हीं लोप पावतात. शिशिराच्या वावटळीनें हें सुकलेलें उडून जातें आणि पुन्हां उजाडलेलें रान पावसाची प्रतीक्षा करीत



ओठंगून राहतें.

उण्या-अधिक प्रमाणात सर्व सृष्टीचें आणि तिच्यातील भूतजातांचें असेंच होतें. कृमि-कीटकांसारख्या कांहीं भूतांचें आयुष्य क्षणभरांत संपतें तर कांहीं प्राणी शंभराहून अधिक वर्षें जगतात. महावृक्षांचें आयुष्य पांच-सहा शतकांचें असूं शकतें, तर डोंगर आणि पर्वत अनेक सहस्रकांचा काल पाहतात पणं प्रत्येकाला केव्हां ना केव्हां तरी फार लौकर किंवा उशिरा नाहींसें व्हावें लागतेंच.

सृष्टीचें स्वरूप हें असें असल्यानें विचारवंतांनीं, विषयाभिलाषा आणि इंद्रियांची सुखें यांच्या मोहांत न गुंततां, आपलें आयुष्य अनंताचा शोध घेण्यांत कारणीं लावलें पाहिजे.

**फुटेना तुटेना चळेना ढळेना ।**
**सदा संचलें मीपणें तें कळेना ।।**
**तया येकरूपासि दूजें न साहे ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे ।।१४७।।**

सर्व सृष्ट पदार्थ, विश्वांतील वस्तुजात जरी नश्वर असले, क्षणभंगुर असलें, केव्हां ना केव्हां तरी नाहींसे होणारें असलें तरी त्याच्या मुळाशीं असलेलें शुद्ध तत्त्व, ज्याला सत्य किंवा ब्रह्म या नांवानें ओळखलें जातें तें मात्र कधीं फुटत नाहीं, तुटत नाहीं, चळत नाहीं वा ढळतहि नाहीं. तें आपल्या निर्गुण, निराकार, सर्वव्यापक, अखंड, अशा स्वरूपांत सदा सर्वदा पूर्णपणे भरून राहतें. माणूस स्वत:च्या ठिकाणीं असलेल्या अहंकारामुळें त्याची निर्गुणता, निराकारता, व्यापकता वा अखंडता जाणूं शकत नाहीं. त्या मूलतत्त्वाची एकरूपता, केवलता, सत्तामात्रता आधीं जशी होती तशीच आतांहि आहे आणि पुढेंहि राहणार आहे. त्याच्या ठिकाणीं त्या एकाशिवाय दुसरें कांहींहि खऱ्या अर्थानें संभवतच नाहीं. अनंत असा संत जाणून घ्यावयाचा आहे तो याच दृष्टीनें.

पाण्यावर अनेक प्रकारचे लहानमोठे तरंग उमटतात. सोसाट्याच्या वादळी वाऱ्यानें त्यांना महाभयानक अशा लाटांचेंहि स्वरूप येतें. त्यांच्या तडाख्यानें विशालकाय नौका उलट्या होऊन बुडतात. तीरावरची घरेंच काय पण दारेंहि होतीं कीं नव्हतीं अशी होऊन जातात. पण या कोणत्याहि स्थितींत पाण्याच्या पाणीपणांत कांहींहि अंतर पडत नाहीं. तरंग नसतांनाच्या शांत स्थितींत, तरंग उमटत असतांना त्या रूपांत किंवा मोठमोठ्या लाटा वेगानें उसळत असतांना त्या आकारांत, पाण्याचा पाणीपणा जसाच्या तसाच असतो. लाटांच्या होण्याजाण्यानें त्यांत कांहीं अंतर पडत नाहीं. पाणीपणा विचारांत घेतला तर लाट आणि तरंग

या शब्दांना त्या पातळीवर कांहीं अर्थच राहात नाहीं.

चूल, रांजण, बोळकें, मांठ, परळ, वीट, बाहुली वा कौल या स्वरूपांतील माती उपयोगाच्या दृष्टीनें विविध कामीं येत असली तरी मातीपणानें एकरूपच असते. दागिन्याच्या रूपांत सोन्याचे असेच होते. पेटी, पाट, चौरंग, पलंग, दांडा, नाट वा किलचण, फळी वा खांब या रूपांत लाकूडहि असेंच राहते.

म्हणून विविधतेच्या मुळाशीं असलेल्या एकरूपतेचा विचारच महत्त्वाचा मानला पाहिजे. ''तया एकरूपासी दूजे न साहे'' असे समर्थ म्हणतात तें या दृष्टीनेंच.

विश्वामध्यें भासणारी विविधता ही जरी अस्थिर, पालटणारी, सापेक्ष संबंधावर आधारलेली म्हणून मिथ्या असली तरी तिच्या मुळाशीं असलेलें तत्त्व मात्र स्थिर, निरपेक्ष आणि म्हणूनच सत्य असें आहे. कांहीं विद्वान, शाश्वत, त्रिकालाबाधित अंतिम असें सत्य म्हणून कांहीं आहे हेंच मान्य करीत नाहींत. पण तें योग्य नाहीं. लहानमोठ्या होऊं शकणाऱ्या परिघाच्या मध्याशीं जसा निश्चित आणि न पालटणारा असा केंद्रबिंदू असतो, तसेंच विश्वाच्या मुळाशीं असलेल्या सत्याचें आहे. त्रिज्येच्या अपेक्षेनें परिघ पालटतो तसें अहंच्या अपेक्षेनें विविधता साकारते. हा अहं ज्याक्षणीं नाहींसा होईल, त्याक्षणीं केंद्र उपलब्ध झालेलें असेल.

**निराकार आधार ब्रह्मादिकांचा ।**
**जया सांगतां सीणली वेदवाचा ।।**
**विवेकें तदाकार होऊनि राहें ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहें ।।१४८।।**

मूल तत्त्व ज्याला सत्य किंवा ब्रह्म असें म्हणावयाचें तें अवाङ्मनसगोचर आहे. वाणीनें त्याचें वर्णन करतां येत नाहीं. मनाला त्याचें आकलन होत नाहीं. बुद्धीला त्यासंबंधीं विचार करतां येत नाहीं, निर्णय घेतां येत नाहीं. वेद ही परमेश्वराची जगत्कल्याणासाठीं अवतीर्ण झालेली अपौरुषेय अशी दिव्य वाणी, पण वेदालाहि ब्रह्माचें वर्णन समाधानकारकरीत्या करतां आलें नाहीं. त्यालाहि ''नेति नेति – असं नाहीं'' इतकेंच सांगतां आलें.

वर्णन करून सांगण्यासाठीं मर्यादितपणा आणि द्वैत या गोष्टी गृहींत धराव्या लागतात. जी जी गोष्ट मला समजते, पाहतां येते वा वर्णन करून सांगतां येते, ती ती प्रत्येक जाणणारा जो मी त्याच्यापेक्षां वेगळी असते. ती एकमेकीपेक्षांहि वेगळी असते. म्हणजेच तिला सीमा, मर्यादा असते. ब्रह्म हे सर्वच दृष्टीनें अत्यंत विलक्षण अशी वस्तु आहे. तें निस्सीम आहे, अनंत आहे, निर्गुण आहे, निराकार आहे, अखंड आहे, एकरस आहे, तेंच तें एकटें केवळ आहे. त्याच्यापेक्षां भिन्न



कांहींहि, कोठेंहि, केव्हांहि नाहीं. म्हणून त्याचें वर्णन करतां येत नाहीं. ब्रह्मा, विष्णु, महेशादि देवता, खगोलामध्यें दिसणारीं नक्षत्रें, भूगोलावर दिसणारीं विविध द्रव्यें, सजीव-निर्जीव, जड-चेतन, चल-अचल, स्थूल-सूक्ष्म असें वस्तुजात हे सर्व त्या ब्रह्माच्या आधारावरच नांदत आहे.

समजावून सांगण्यासाठीं सांगणारांनीं स्वत:च्या धारणेप्रमाणें विवर्तवादाचा वा परिणामवादाचा आश्रय करावा. या वादांचे निरनिराळ्या दृष्टिकोनांतून आणखी प्रकार पाडावेत. त्याला आपल्या रुचीप्रमाणें मायावाद, अनध्यस्त विवर्तवाद, अविकृत परिणामवाद, चिद्विलासवाद अशीं नांवें द्यावींत. वचनांचे कीस काढावेत. शब्दांचे ध्वनी शोधावेत आणि चर्चा करावी. फल शेवटीं एकच. आणि तें म्हणजे निश्चित कांहीं सांगतां येत नाहीं हें. विचाराला चालना मिळविण्यासाठीं या चर्चेचा थोडाबहुत उपयोग होतो. नाहीं असें नाहीं. प्रकृतिभेदानें प्रत्येकाची पातळी आणि रुचि वेगवेगळी असल्यानें त्यांना मानवेल अशी मतप्रणाली या विविध प्रकारच्या चर्चेतून उपलब्ध होते. तेव्हां साधकानें आपल्या प्रवृत्तीला जें भावतें तें निवडून घ्यावें. हाच विवेक. आणि मग एकनिष्ठेनें सतत प्रयत्नशील राहून आपल्या ध्येयाशीं एकरूप होतां येईल अशी साधना करावी.

कोणतेहि तत्त्व केवळ शब्दाच्या बळावर कधींहि जाणलें जात नाहीं. तें अनुभवासच यावें लागतें. तेंच ब्रह्माच्या संबंधांतहि होतें. एक जुनें वचन आहे ''कसें बोटाने दाखवूं तुला । घे अनुभव गुरुच्या मुला.'' बोटानें दाखवितां येण्यासारखी, ही अमुक अमुक म्हणून वर्णन करून सांगण्यासारखी, ब्रह्म ही वस्तु नाहीं. ती अनुभवास येऊं शकते. गाढ झोपेसारखें हें आहे. म्हणून तर शास्त्रकारांनीं निद्रेला ब्रह्मानंदसहोदर असें विशेषण दिलें आहे. सामान्यत: प्रत्येक मनुष्य रोज गाढ झोंप अनुभवत असूनहि, ती असते तेव्हां तिची जाणीव नसते. कशी येते, आली म्हणजे काय होतें वा तिचें स्वरूप काय ? याचें निश्चित वर्णन करतां येत नाहीं. ब्रह्मानंदाचें तसेंच आहे. गाढ झोप लाभावी म्हणून जसें सर्व जीवन कांहीं नियमानें नियंत्रित करावे लागते, तसेंच ब्रह्मानंदाच्या अनुभवासाठींहि साधना करावी लागते. झोंप हा शरीराचा नैसर्गिक असा जड विकार असूनहि हवें तसें करीन, हवा तसा वागेन, हवें ते खाईन वा खाणार नाहीं असें म्हणून चालत नाहीं. यांतल्या अनेक गोष्टींमुळें झोप दुरावते आणि रात्ररात्र तळमळत काढावी लागते वा निद्रानाशाचा हा विकार टाळण्यासाठीं अधिक घातक अशा विषारी द्रव्याचा उपयोग करावा लागतो. म्हणून निद्रेचें सुख अनुभवावयाचें असेल तर जीवन हें आरोग्यशास्त्राचे नियम सांभाळून जगावें लागतें. आळस वा अतिश्रम, उपासमार वा अजीर्ण, आत्यंतिक अभिलाषा, क्रोध, चिंता, भय, शोक यांचा त्याग करावा लागतो.

जे सहजप्राप्त असावयाचे त्या विषयांतसुद्धां इतकी दक्षता घ्यावी लागते तर जन्मजन्मान्तरींच्या अनिष्ट संस्कारांनीं विकृत झालेल्या अंत:करणवृत्तींना, ब्रह्मज्ञानाच्या अनुभवास मुकावें लागेल, यांत कांहींच आश्चर्य नाहीं. स्वत:च्या जीवनक्रमांत, इंद्रियांच्या प्रवृत्तींत, अंत:करणाच्या धारणेंत, ब्रह्मज्ञानाच्या दृष्टीनें अनुकूल परिवर्तन झाल्यावांचून ब्रह्मज्ञान होणें दुरापास्त आहे. वर उल्लेखिलेल्या जुन्या वचनामध्यें अनुभव घेण्यासाठीं गुरुपुत्र व्हावें लागतें असें अपेक्षिलें आहे. कारण हें करून घ्यावयाचें अनुकूल परिवर्तन, मार्गदर्शनाशिवाय होणें दुर्घट आहे. यासाठींच समर्थांनी कदाचित् अनंत शोधून पाहण्याआधी संत शोधून पाहिला पाहिजे असा ध्वनि काढतां येईल अशी शब्दरचना केली असावी.

ब्रह्माशी तदाकारता यावयाची, **ब्रह्मरूप** व्हावयाचे, म्हणजे माझें आणि मी हे दोन्ही भाव सुटावे लागतात. ''मी'' मुळें ''माझें'' वाढत जातें आणि ''माझे'' मुळें ''मी'' पुष्ट होत जातो. यामुळें साधनक्रमांत 'माझें' कमी व्हावें या उद्देशानें अस्तेय, अपरिग्रह, संयम, वैराग्य या गुणांचा स्वीकार करावयास सांगितला आहे. हे गुण चांगले जोपासले, इंद्रिय-मन-बुद्धीच्या पातळीवरहि ते चांगले बाणले म्हणजे 'मी' सुटणे सोपें जातें, शक्य होतें. हा साधनाक्रम व्यक्तिपरत्वें नेमकेपणानें सांगण्यासाठीं अनुभवी मार्गदर्शक लागतो. संत तसा असतो. तो मिळाला कीं अनंताचा शोध घेणें सुकर होते.

**जगीं पाहतां चर्मचक्षीं न लक्षें ।**
**जगीं पाहतां ज्ञानचक्षीं न रक्षे ।।**
**जगीं पाहतां पाहणें जात आहे ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे ।।१४९।।**

उपनिषदामध्यें ब्रह्माचें वर्णन करतांना ''यत् चक्षुषा न पश्यति येन चक्षूंषि पश्यति । तदेव ब्रह्म त्वं विद्धि'' (केन. १।६) असें वर्णन केले आहे. डोळे ज्याला पाहूं शकत नाहींत पण डोळ्याला पाहण्याचें सामर्थ्य ज्याच्यामुळें प्राप्त होतें, तें ब्रह्म आहे, असें तूं जाण असा उपदेश तेथे आहे. त्याच्याच पुढें मनानें ज्याचें चिंतन होऊं शकत नाहीं पण मनाला चिंतन करण्याचे सामर्थ्य ज्याच्या शक्तीनें मिळतें तेंच ब्रह्म म्हणून ओळखावें असेंहि तिथें सांगितलें आहे. उपनिषदाच्या या सिद्धांताचा अनुवादच समर्थांनीं पहिल्या दोन ओळींत केला आहे.

जो अनंत शोधावयाचा आहे. तो चर्मचक्षूंनीं दिसण्यासारखा नाहीं वा इतर इंद्रियांनींहि त्याचें ज्ञान होण्यासारखें नाहीं. डोळे येथें उपलक्षणासारखें आहेत. डोळ्यांनीं दिसणार नाहीं, म्हणजे कोणत्याच इंद्रियांनीं समजणार नाहीं असें येथें



सांगावयाचें आहे.

मन बुद्धी ही कान, नाक, डोळे या इंद्रियांच्यापेक्षां अधिक तीक्ष्ण सूक्ष्म, व्यापक आणि दूरगामी सामर्थ्य असलेलीं ज्ञानसाधनें आहेत. त्यांनाहि ब्रह्माचें ज्ञान करून घेण्याच्या विषयांत फारच थोडें साधतें. खरें म्हणजे कांहींच साधत नाहीं. क्वचित् समजल्यासारखें वाटतें पण तें फसवें असतें.

डोळे, नाक, कान, जीभ, त्वचा हे चर्मचक्षू आणि मन बुद्धि हे ज्ञानचक्षू. हे दोन्ही ब्रह्मापुढें पांगुळतात. समर्थांनीं दासबोधांत 'चर्मचक्षु ज्ञानचक्षु । हा तों अवघा च पूर्वपक्षु । निर्गुण ठाईचा अलक्षु । लक्षवेना ।।' (दासबोध १३।२।१६) असें स्पष्टच म्हणून दोन्हीं ज्ञानसाधनांचीं अपूर्णता स्पष्ट केली आहे. तेव्हां दुसऱ्या ओळींत 'ज्ञानचक्षीं निरीक्षे' असा पाठभेद स्वीकारणें वा 'न रक्षे' पद जोडून त्याचा अर्थ 'निरक्षे करणे' किंवा 'न रक्षे' या पदांतून ज्ञानचक्षूंनीं ब्रह्माचें ज्ञान होतें पण राखलें जात नाही, टिकत नाही, असा अर्थ करणें, अनवश्यक वाटतें. तें अर्थात् हे असे अर्थ करण्यासाठीं ''दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या'' या उपनिषद्‌वचनाचा कांहीं आधार आहेच.

या श्लोकाची तिसरी ओळ मोठी अद्‌भूत आहे. ब्रह्माला पाहूं गेले म्हणजे पाहणेंच नाहींसें होतें. ज्ञाता आणि ज्ञेय असें कांहीं उरतच नाहीं. मिठाच्या बाहुलीनें समुद्राचा तळ शोधण्याचा प्रयत्न करावा म्हणजे जसें होईल तसेंच ब्रह्म पाहाणाराचें होतें. पाहण्यासाठीं पाहणारा आणि जें पाहावयाचें तें वेगळे असावे लागतात, वेगळे रहावे लागतात. फार जवळीक सुद्धा पाहण्याच्या क्रियेला प्रतिकूल असतें. डोळ्यांत घातलेलें काजळ यामुळेंच दिसूं शकत नाहीं. येथे नुसती जवळीक नाहीं तर एकरूपताच असते. तेव्हां कोण कोणाला पाहणार? 'तत्र केन कं पश्येत्' असा हा पाहणेपणा गळून पडतो असें जेथें घडतें. तेथें जाऊन पोंचणें म्हणजेच ब्रह्माचा शोध घेणें आहे.

**नसे पीत ना श्वेत ना शाम कांहीं ।**
**नसे वेक्त आवेक्त ना नीळ नाहीं ।।**
**म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे ।**
**मना संत आनंत शोधूनि पाहे ।।१५०।।**

संत असा अनंत किंवा संत आणि अनंत शोधून पहावा असे सांगणाऱ्या श्लोक-पंचकांतील हा शेवटचा श्लोक आहे. ब्रह्माच्या अनिर्वचनीयतेचें कारण आणि ब्रह्माच्या प्राप्तीचें अधिक सोपें साधन असें दोन्हीहि या श्लोकांत स्पष्टपणें दाखविलें आहे. ब्रह्म निर्गुण, निराकार आहे हें स्पष्ट करतांना समर्थांनीं येथें रूप

या गुणाचा विशेषत: उपयोग केला आहे. त्यावरून हेंच इतर गुणांच्या संदर्भातहि जाणून घ्यावें असें त्यांना अपेक्षित असावें. इतर इंद्रियांच्यापेक्षां रूप या विषयाचें ग्रहण करणारें नेत्र हें इंद्रिय, हें अधिक व्यापक कार्यक्षेत्रांत प्रभावी ठरत असल्यानें त्याच्या विषयांत जें सत्य आहे तें इतरहि इंद्रियांना लागू पडण्यासारखें असल्यानें वर्ण हा विषय प्रधान मानून त्याचा ऊहापोह केला आहे असें समजावें. ब्रह्माला कोणताहि रंग नाहीं, तें पिवळें नाहीं, पांढरें नाहीं, सांवळें नाहीं, निळें नाहीं आणि असें असल्यामुळें तें व्यक्त वा अव्यक्त कांहींच सांगता येत नाहीं.

वस्तूची लांबी-रुंदी-जाडी किंवा उंची वा खोली म्हणजेच वस्तूचा आकार डोळ्यांनीं दिसतो असें आपण मानीत असलों तरी वस्तूचा रंग तेवढाच डोळ्यांना दिसत असतो. भिन्न पार्श्वभूमीवर किंवा छायाप्रकाशाच्या साहाय्यानें आपणांस आकारादि गोष्टीचें ज्ञान होतें. ज्याला रंगच नाहीं, त्याचें रूप दिसणें शक्यच नाहीं. म्हणून वर्णहीन ब्रह्म व्यक्त होऊं शकत नाहीं असें समर्थ म्हणतात. ब्रह्माला अस्तित्व आहे. दृश्य जगताचा तें आधार आहे. अनेक प्रकारच्या विविधतेचें तें अधिष्ठान होऊं शकतें. त्यामुळें ब्रह्म हें संपूर्ण अव्यक्त आहे असेंहि म्हणतां येत नाहीं. म्हटलें तर आहे म्हटलें तर नाहीं ही वर्णनाची शुद्धिपत्राप्रमाणे पुणेरी प्रथा माणसाला घोटाळ्यांत पाडते. नेमकें ज्ञान देऊं शकत नाही. पण ब्रह्माची वस्तुस्थितीच अनिर्वचनीय असल्यानें, नाना प्रकारचे सिद्धांत त्याच्या आधारावर नांदतात, मतप्रणाली जन्मास येतात, संप्रदाय उभे राहतात, द्वैत, द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत, अद्वैत अशीं तत्त्वज्ञानें साकारतात. ज्याला कांहींच करावयाचें नसते त्या बुद्धिवाद्याला हा गोंधळ वाटतो.

जिची झेप ब्रह्मापर्यंत पोंचण्याची शक्यता नाहीं अशा केवळ बुद्धीचा आधार घेतला म्हणजे असेंच व्हावयाचें. आंधळ्यानें चित्राचें मूल्य ठरवावें, बहिऱ्यानें संगीताचा सुरेलपणा निश्चित करावा, तसेंच हें आहे. ब्रह्म ही तर्कानें कळणारी वस्तु नाहीं. नि:स्पृह जाणत्यांवर, कनवाळू संतांवर, दृढ विश्वास ठेवून त्यांच्या आदेशाचें श्रद्धेनें पालन केलें तरच ब्रह्मापर्यंत पोंचतां येईल. मुक्त होता येईल. विश्वास हाच कुठेंहि कार्याचा प्रेरक असतो. अंत:करणांत विश्वास नसता तर शास्त्रज्ञांनीं प्रयोग केलेच नसते. पुन्हां पुन्हां अपयश येऊनहि नवीन नवीन प्रयोग करावेसे वाटतात, ते विश्वासाच्या बळावरच. साधना अशीच करावयाची असते. तिचें मार्गदर्शन शास्त्र, संत सद्‌गुरु करीत असतात. त्यांच्यावर भरंवसणें आणि उपासना करीत राहणें हाच अनंत अशा संताला, निस्सीम अशा सत्याला, सर्वव्यापक अशा ब्रह्माला शोधण्याचा मार्ग आहे.



**खरें शोधितां शोधितां शोधताहे ।**
**मना बोधितां बोधितां बोधताहे ।।**
**परी सर्व ही सज्जनाचेनि योगें ।**
**बरा निश्चयो पाविजे सानुरागें ।।१५१।।**

सारखे सारखे शोधीत गेलें म्हणजेच शोध लागतो. पुन्हां पुन्हां बोधाचें ग्रहण केलें म्हणजेच बोध होतो. एकदां ऐकून वा रोज नवें-नवें ऐकून वा वाचून मनाला बोध होत नाहीं. सगळें नीटपणें आकळत नाहीं, उलगडत नाहीं. जें ऐकलें वाचलें त्यावर चिंतन-मनन-निदिध्यासन सातत्यानें घडलें पाहिजे. ''श्रुतं हरति पापानि'' हा अगदींच प्राथमिक विचार आहे. खेदाची गोष्ट अशी कीं फक्त हा एवढाच विचार कार्यवाहीत आहे.

कीर्तने-प्रवचने-व्याख्याने यांना श्रोत्यांच्या आवडीनुरूप आणि वक्त्याच्या कौशल्यानुरूप पुष्कळ माणसें जमतात, खूप दाटी होते. पण एवढेंच होतें. वक्त्यानें काय सांगितलें म्हणून थोड्या वेळानें विचारलें तर तें नीटपणें कुणी सांगूं शकत नाहीं. थट्टा, विनोद गोष्ट क्वचित् लक्षांत राहते. वक्त्यानें हा आपल्याला टोमणा मारला आहे असें श्रोत्याला वाटलें तर तोहि लक्षांत राहतो. पण कोणत्या सिद्धांताच्या वा साधनेच्या संदर्भात हें आलें आहे, तें कोणाच्या लक्षांत नसतें याचें खरें कारण असें कीं श्रवण हा कांहीं लोकांचा मनोरंजनाचा, वेळ घालविण्याचा किंवा पुण्य लागते या कल्पनेचा विषय असतो. सिद्धांत समजून घेतले पाहिजेत आणि तदनुसार साधना केली पाहिजे, या महत्त्वाच्या गोष्टीकडे लक्षच नसते. म्हणून त्या लक्षांत राहत नाहींत. श्रवणाचें असें होऊं नये म्हणून समर्थांनीं ''मना बोधितां बोधितां बोधिताहे'' असें सांगून चिंतनमननावर भर दिला पाहिजे हें सुचविलें आहे.

शोध लागणें किंवा बोध होणें, या सहजासहजीं होणाऱ्या, साधणाऱ्या गोष्टी नव्हेत. त्याकरितां प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. इहलोकाशीं संबद्ध असलेल्या जड अशा विज्ञानांतील सृष्टीचे नियम शोधतानांहि संशोधक शास्त्रज्ञांनीं आपली आयुष्येच्या आयुष्यें वेंचलीं आहेत. आपल्या सर्वशक्तीनिशीं दीर्घकालपर्यंत चिंतनाचे आणि प्रयोगाचे कष्ट उपसले आहेत. वेड्याप्रमाणें इतर सर्व विसरून एकेका गोष्टीचाच पाठपुरावा केला आहे. इहलोकींच्या जड विज्ञानांत असें होतें तर परात्पर चैतन्याचें आकलन होण्यासाठीं ''असेल माझा हरी । तरी मज देईल खाटल्यावरी ।'' म्हणून कसें चालेल? त्यासाठीं आपल्या सर्व शक्तीनिशीं सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे.

सत्याचा शोध घेणें असो वा त्या तत्त्वाचा मनाला बोध व्हावयाचा असो, दोन्हींसाठीं अनुभवी जाणत्याचें मार्गदर्शन वरचेवर मिळालें पाहिजे. म्हणून समर्थांनीं ''परी सर्वहि सज्जनाचेनि योगें'' असे तिसऱ्या चरणांत म्हटलें आहे. सत्पुरुषाच्या संगतीचा महिमा समर्थांनीं यापूर्वीं अनेक श्लोकांतून गायिलेला आहेच. त्याचें यथाशक्ति विवरणहि त्या त्या ठिकाणीं केलेलें आहे. ''धुंडितां धुंडितां देवो सत्संगें सांपडे जनीं ।'' असे समर्थांनीं या संदर्भात इतरत्रहि म्हटलें आहे.

सत्संगतीचा लाभ होण्यासाठीं केवळ यांत्रिक साहचर्य उपयोगी पडत नाहीं. साधकाच्या अंत:करणांत, साधनेविषयीं, सत्याच्या ज्ञानाविषयीं आणि ज्याच्या संगतींत राहावयांचें त्या सत्पुरुषाविषयीं, सद्गुरुविषयीं अनुराग असला पाहिजे. प्रेम असलें पाहिजे, भक्ति असली पाहिजे. तरच सत्याचा निश्चय करतां येईल किंवा बोध स्थिरावेल. अन्यथा अखंड पाण्यांत राहूनहि आंतून कठिण व वरून कोरडा असलेल्या नर्मदेतल्या गोट्यासारखी स्थिति होईल.

**बहूतां परीं कूसरी तत्त्वझाडा ।**
**परी पाहिजे अंतरीं तो निवाडा ।।**
**मना सार साचार तें वेगळें रे ।**
**समस्तांमधें येक तें आगळें रें ।।१५२।।**

तत्त्वाचा झाडा देण्याचें चातुर्य जरी पुष्कळ असलें तरी अंत:करणाची साक्ष पटेपर्यंत, सत्याचा निर्णय केवळ शब्दपांडित्यानें होऊं शकत नाहीं. घटपटाची खटपट किंवा अवच्छेदकावछिन्नाची लटपट यांच्या सहाय्यानें, दुर्बोध पारिभाषिक संज्ञांच्या आधारावर, प्रक्रियांचें प्रतिपादन पुष्कळ कौशल्यानें केलेलें आढळतें. जगद्गुरू श्रीशंकराचार्यांनीं प्रतिपादलेल्या अद्वैत मतांतहि ''सर्वं खलु इदं ब्रह्म'' हा सिद्धांत सिद्ध करणाऱ्या निरनिराळ्या १२८ प्रक्रिया आहेत असें म्हणतात. एखाद्यानें त्या सर्वांचा खूप परिश्रमपूर्वक अभ्यास केला तर तो विद्वान् म्हणून मान्यता पावेल पण साक्षात्कारी होऊं शकणार नाहीं. हें सर्व वक्तृत्वामुळें वा प्रबंधामुळें लौकिकाचें साधन ठरेल, पण त्यांतून अनुभव उपलब्ध होऊं शकणार नाहीं, त्यासाठीं अंत:करणानेंच निवाडा व्हावयास हवा, बुद्धीनेंच विवेक केला पाहिजे.

ज्याची चर्चा केली जाते, ज्याविषयीं खूप बोललें जाते, वादविवाद रंगतात, तें मूळ सत्य वा तत्त्व साररूपानें खरोखरींच या शब्दांच्या पसाऱ्यापेक्षां वेगळेंच राहतें. सगळ्या दिसणाऱ्या, भासणाऱ्या, विविधतेंत तें भेदातीतपणें एक असेंच राहतें. विविधतेंतील कोणत्याहि गुणाचा स्पर्श त्याला होत नाहीं. त्याचें स्वरूप वर्णनातीत असें आगळेंच आहे. म्हणून तर अनुभवासाठीं फार परिश्रम करावे



लागतात. वरवरच्या शाब्दिक ज्ञानानें तें साधत नाहीं.

**नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्त्वज्ञानें ।**
**समाधान कांहीं नव्हे तानमानें ।।**
**नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें ।**
**समाधान तें सज्जनाचेनि योगें ।।१५३।।**

खरोखरीचें समाधान प्राप्त करून घ्यावयाचें असेल, अंत:करण सर्वदा तृप्त, शांत, प्रसन्न राहावें असें वाटत असेल तर वरवरचे उपचार त्यासाठीं पुरेसे नाहींत. हें, समर्थ या श्लोकांत अधिक स्पष्टपणें सांगत आहेत.

पिंडज्ञान म्हणजे शरीरासंबंधीचें ज्ञान. यांत पांच कोशांचा विचार येतो. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय, असे एकाच्या आंत एक असलेले, अधिक सूक्ष्म आणि तरल होत जाणारे, हे पांच कोश आहेत. शरीर, इंद्रिये, मन, बुद्धि, यांच्या सखोल विचार या पिंडज्ञानात समाविष्ट होतो. शरीर आणि तदंतर्गत इंद्रियादि भाव हे, आचरणारा, कर्ता या दृष्टीने उपासनेचें एक महत्त्वाचें अंग असल्यानें त्यांच्याविषयींचें ज्ञान करून घेणें आवश्यक होतें. तत्त्वज्ञान या शब्दानें येथें पिंडाव्यतिरिक्त सृष्टिचा विचार केला आहे. सृष्टीची उत्पत्ति, तेथील क्रम, उत्पत्तीची मूळ प्रेरणा, उत्पत्तीचें अधिष्ठान या सर्वांचा विचार येथें येतो. पंचमहाभूतांचा विचार हा त्यांतील महत्त्वाचा भाग. हे पिंडज्ञान आणि तत्त्वज्ञान दोन्हीं जरी एक जिज्ञासू म्हणून कोणी जाणून घेतलें असलें तरी केवळ तेवढ्याने समाधान प्राप्त होत नाही.

शरीराची रचना जाणून घेतली, शरीराचे व्यापार कसे चालतात तें कळलें आणि आरोग्यशास्त्राचा अभ्यास केला तरी केवळ तेवढ्याने मनुष्य निरोगी, स्वस्थ होण्याची शक्यता नाहीं. परीक्षेपुरतें आरोग्यशास्त्राचे नियम पाठ करून आरोग्यसंपन्नता येत नाहीं. तीच स्थिति तत्त्वज्ञानाची. नित्य काय आणि अनित्य काय, टिकणारे कोणतें-मरणारें कोणतें, आपल्या हिताच्या दृष्टीने काय घ्यावे, काय टाकावे, हें कळावें, त्या दृष्टीने उत्पन्न होणाऱ्या इच्छा, आकांक्षा, वासना या पारखून घेता याव्यात म्हणून तत्त्वज्ञान उपयोगी पडतें. तत्त्वज्ञानाधारें वर्तन घडले नाहीं तर मग हे शाब्दिक तत्त्वज्ञान समाधान देऊं शकणार नाहीं. आरोग्याचे नियम चांगले ज्ञात असलेला वैद्यहि अपथ्य करील तर व्याधीने पीडला जाईलच; तसेच तत्त्वज्ञानाचा विद्वान् जर निरिच्छ, संयमी, सदाचरणी नसेल तर तोहि शोकमोहग्रस्त होऊन दु:खानें तळमळणारच.

कांहीं लोक चित्ताच्या समाधानासाठीं नृत्य, गायन, वादनादि वा त्यांच्या उपलक्षणेनें काव्य, कथा नाटकादि ललितकलांचा आश्रय घेतात. या कलांच्यामुळें

कांहीं मनोरंजन होईल पण तेवढेच होईल. हे तात्पुरते बरें वाटणें म्हणजे कांहीं खरें समाधान नव्हे. या निरनिराळ्या कलांमध्यें चतुर असलेले ख्यातनाम कलावंतहि परस्परांविषयींच्या द्वेषमत्सरांनी भरलेले असतात आणि वैयक्तिक जीवनांत कामक्रोधांनीं व तज्जन्य नानाप्रकारच्या व्यसनांनीं किडलेले राहतात. पुवाळलेल्या गंभीर व्रणावर केवळ बाहेरची मलमपट्टी जशी उपयोगी पडत नाहीं, तसेंच मन:स्वास्थ्याच्या प्रकरणीं या ललितकलांचे होतें.

तत्त्वज्ञानाच्या आधारावर शास्त्रानें मनुष्याच्या चित्तशुद्धीसाठीं योगयागादि साधनें सांगितली आहेत. त्यांचा अवलंबहि कुठे कुठे बऱ्याच प्रमाणावर होतो. योगाचा अर्थ आहे, चित्तवृत्ति-निरोध. वासना नियंत्रित करून चित्तशुद्धी होण्यासाठी यज्ञयागाचा उपयोग होतो. पण हे दोन्ही उद्देश योगायागांचा अवलंब करणाऱ्या मनांत किती प्रमाणांत असतात तें सांगणें कठिण आहे. योगाचा अभ्यास करणारे बहुधा, आरोग्यासाठीं उपयुक्त असलेल्या आसन प्राणायामांचा विचार करतात. योगांचीं अगदी प्राथमिक अंगें असलेलें यम-नियम यांकडे त्यांचें लक्ष नसतें. प्रत्याहारहि ते ओळखीत नाहींत. क्वचित् कांहीं लोक आसन-प्राणायामांतून ध्यानावर झेंप घेऊं शकतात.

कांहीं योगाभ्यासी योगमार्गांतून प्राप्त होणाऱ्या सिद्धींची अभिलाषा बाळगतात. स्वत: योगशास्त्रकारांनीच सिद्धी या **समाधीला** विघ्नभूत आहेत असें निश्चयानें सांगितले आहे. योगमार्गातील सर्व क्रमांचा विचारहि कुणी सातत्यानें, दृढ निश्चयाने करीत नाहीं. योगमार्गातील आवश्यक असलेले विधिनिषेध पाळणेंही बहुतेकांना शक्य होत नाहीं. सर्वसामान्यांची प्रकृति आणि प्रवृत्तींहि योगाच्या दृष्टीनें अनुकूल नसते. म्हणून ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात. त्याप्रमाणें- **म्हणोनि योगाचिया वाटा । जे रिगाले गा सुभटा । तयां दुःखाचाचि वांटा । भागा आला ।।** (ज्ञा. १२।६९) अशी स्थिति साधकाची होते.

शक्तिपातानें कुंडलिनी जागृत होऊन योगांतील समाधीचा लाभ होऊं शकतो. त्यासाठीं यमनियमादींची पूर्वसिद्धता असण्याचे कांहीं कारण नाही, असें कांहीं लोक आग्रहानें प्रतिपादितात. येथें त्याविषयीं चर्चा न करणें बरे, साधकानें या विषयांत फार सावध राहिले पाहिजे, एवढें मात्र आग्रहानें सुचवावेसें वाटतें. श्रीज्ञानेश्वरमहाराजांसारखा योगयोगेश्वर योगाला लोखंडाच्या चण्याचीं उपमा देतो, या मार्गानें जाणाराला नित्य नवा अग्निप्रवेश सोसावा लागतो, असें धमकावतो, ते लक्षांत घेणें आवश्यक आहे. या मार्गानें अविवेकानें जाणाराची स्थिति ''हुरळली मेंढी, लागली लांडग्यापाठीं'' या म्हणीप्रमाणें होते.

यज्ञयागादींचा प्रकारहि पडावा तसा उपयोगीं पडत नाहीं. यज्ञयागातील



कर्मकांड अत्यंत किचकट आहे. यज्ञाची साधनसामग्री जमविणें अवघड आहे. चित्तशुद्धि हा प्रधान उद्देश ठेवून हें कुणी करीत नाहीं. हीं कृत्यें बहुतेक लौकिकासाठीं तरी असतात वा सकाम तरी असतात. अर्थातच त्यांतून खरें समाधान लाभत नाहीं.

नानाविध विषयांचा रसिकतेनें उपभोग घेणें, विपुल संपत्तीनें प्राप्त होणाऱ्या ऐश्वर्यांत विलासीपणें राहणें, याला समाधानाचा उपाय समजून वागणारे लोक आहेत. त्यांचें जीवन तशी सोय नसणाऱ्या इतरांना, मोठें सुखाचें आणि आकर्षकहि वाटत असतें. प्रत्यक्षांत मात्र या श्रीमंतांना बहुधा झोंपेच्या गोळ्या नियमानें घ्याव्या लागतात. विलासांत रमणाऱ्या अनेकांचीं शरीरें रोगांनीं पोखरलेलीं असतात आणि मन नाना प्रकारच्या ताणांमुळें विकृत झालेले राहतें. खरें समाधान, खरा संतोष, तेथें क्वचितच आढळतो. साध्या शांत जीवनालाहि ते बापडे पारखे झालेले असतात. भोगांच्या अभिलाषेंतून निर्माण झालेलें सुख हे, वेश्या जसे प्रेम करते, त्यासारखे आहे. कुलशीलवती साध्वीच्या उज्वल प्रेमाची सर त्याला कशी येणार? शेवटीं भोगासक्त पुरुषाला शरीराच्या आणि मनाच्याहि दृष्टीनें पश्चाताप करण्याचाच प्रसंग येतो.

कांहीं लोकांना त्यागामुळें समाधान लाभेल असें वाटतें ते संसाराच्या व्यापानें वैतागतात आणि तापटपणानें जणूं अंगाला राख फासून रानावनात निघून जातात. पण वासनाबीज तसेंच राहिल्यानें, तें नाहींसें करण्याचा क्रमबद्ध प्रयत्न न केल्यानें, अशी त्यागी माणसें हेकट, घायकुती, एवढ्या-तेवढ्यानें संतापणारीं, नेहमी डोकें चढलेलीं, आसपासच्या लोकांनाहि वैताग आणणारीं अशीं राहतात, किंवा त्यागाचें भांडवल करून दंभाने महंती वाढवितात. त्यामुळें त्यांचीहि मनोवृत्ति अस्वस्थच असते. सरळ मार्गानें पैसा न मिळविणाऱ्या व्यापाऱ्यांप्रमाणें ते भयग्रस्त असतात.

मनाच्या समाधानासाठीं लौकिकांत मान्यता पावलेले बहुतेक सर्व उपाय असे फलप्राप्तीच्या दृष्टीनें निरूपयोगी ठरतात, म्हणून समर्थांनीं सत्पुरुषाची संगत धरावी हा प्रभावी उपाय सांगितला आहे. सत्पुरुष हा आपल्या प्रत्यक्ष जीवनांत शांत, सात्त्विक, नीतिमान्, निस्पृह, प्रेमळ, ईश्वरनिष्ठ असा असल्यानें, तो आदर्श डोळ्यापुढें असल्यामुळें, सहवासांतील साधकाला वर्तनाचें तसेंच वळण लागतें. त्यांतून अनेक प्रश्न सहजपणें सुटतात. अनुभवी संताला साधकाच्या प्रकृति-प्रवृत्तीप्रमाणें काय करावें, काय करूं नये, कोणत्या क्रमानें जावें हें नेमकें सांगतां येतें. त्यामुळें पुष्कळ कष्ट वाचतात. अडचणी कोणत्या येतात आणि त्यावर उपाय काय हेंहि कळतें. साधनेचा उत्साह वाढतो. संयमाचें महत्त्व पटतें. पवित्र वातावरणामुळें मन प्रभावित होतें. हें सर्व सत्पुरुषाच्या सहवासांत घडतें. म्हणून अंत:करणाच्या समाधानासाठीं भरंवशाचा असा तोच एक उपाय आहे असें समर्थ सांगतात.

**महावाक्य तत्त्वादिकें पंचिकर्णें ।**
**खुणें पाविजे संतसंगें विकर्णें ।**
**द्वितीयेसि संकेंत जो दाविजेतो ।**
**तया सांडुनि चंद्रमा भाविजेतो ।।१५४।।**

ध्येयभूत अशा सत्याची यथार्थ ओळख पटवून देणारें जें ज्ञान, त्यांचें अपरोक्ष ज्ञान आणि परोक्ष ज्ञान असे दोन भेद व्यवहाराच्या दृष्टीनें करतां येतात. यांतील अपरोक्ष ज्ञान हें साक्षात्काराशीं, अनुभवाशीं संबद्ध असतें. महावाक्यें हें ज्ञान करून देतात अशी धारणा आहे. **'तत्त्वमसि,' 'अहं ब्रह्मास्मि,' 'प्रज्ञानं ब्रह्म,' 'अयमात्मा ब्रह्म'** ही, चार वेदांचीं, चार महावाक्यें, सर्व वेदान्त तत्त्वज्ञानाचें अधिष्ठान म्हणून आहेत. अधिकारी गुरु जेव्हां आपल्या योग्यताप्राप्त शिष्याला या महावाक्याचा उपदेश करतो तेव्हां शिष्याला अपरोक्ष ज्ञान प्राप्त होतें. तो ब्रह्मसाक्षात्कारी होतो. या ब्रह्मसाक्षात्काराव्यतिरिक्त जें कांहीं ज्ञान आहे तें परोक्ष ज्ञान होय. परोक्ष म्हणजे अप्रत्यक्ष. साक्षात् नव्हें तें. हें ज्ञान तत्त्वाची माहिती करून देतें. सृष्टीचा विचार, ईश्वर आणि जगत्, जीव आणि जगत् यांचें संबंध, ईश्वर, जीव, जगत् यांचें स्वरूप इत्यादि इत्यादि. ज्ञान-विज्ञान हा परोक्ष ज्ञानाचाच भाग आहे.

जीव-जगताशीं संबद्ध अशीं मूलतत्त्वें कुणी दोन, कुणी तीन, कुणी पांच, कुणी चोवीस, कुणी छत्तीस, अशीं मानलेलीं आहेत. संप्रदायभेदानें या पदार्थांची संख्या आणखीहि निरनिराळी आहे. सात, सोळा, पंचवीस, एकतीस, सदोतीस, असेंहि त्यांचें प्रमाण उणें-अधिक आहे. या संख्येच्या संबंधांत सर्वसामान्य जिज्ञासूनें फारसा आग्रह धरण्याचें प्रयोजन नाहीं. कुणी मतवादी ज्याला एक म्हणून मोजतो त्यांत भेद कल्पून दुसरा मतवादी ती संख्या वाढवितो. हेंच उलटेंहि होतें. त्यामुळें या संख्यांच्या विविधतेची कांहींएक व्यवस्था लागू शकते.

पंचीकरण ही अशीच एक सृष्टीचा विचार करणारी व्यवस्था आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं क्रमानें अधिकाधिक सूक्ष्म आणि व्यापक होत जाणारीं पांच भूतें. या प्रत्येक भूतांतून एका भूताचा अर्धा भाग, इतर चारांचा मिळून अर्धा भाग असें महाभूत तयार होतें. उदाहरणार्थ-पृथ्वी महाभूत म्हणजे अर्धा भाग पृथ्वी आणि आप, तेज, वायु, आकाश, या चारांचा एकेक अंश मिळून अर्धा असे सर्व मिळून पृथ्वी हें महाभूत बनतें. इतर चारी महाभूतांच्या संबंधांत असेंच समजावें. मात्र या पंचमहाभूतांच्या नांवावरून पृथ्वी महाभूत म्हणजे माती, आप म्हणजे आपण पिण्याधुण्याकरितां वापरतों तें पाणी, तेज म्हणजे शिजविण्यासाठीं वापरण्यांत येणारा अग्नि, वायु म्हणजे वारा, आकाश म्हणजे पोकळी असा स्थूल अर्थ वरवर पाहतां दिसतो, तसा घेऊं नये. ही महाभूतांची कल्पना स्थूल नसून सूक्ष्म आहे. गंध हा गुण आणि जडता हा धर्म ज्या सूक्ष्म द्रव्याच्या आधारें राहतो तें पृथ्वी हें भूत. रस हा गुण आणि पिंडीभाव हेतुत्व (दोन किंवा अधिक कणांना परस्परांशीं जोडून ठेवण्याची शक्ति) हा धर्म ज्याच्या आश्रयानें राहतो तें आप हें भूत. रूप हा गुण आणि पचन, परिवर्तन हा धर्म ज्याच्या आश्रयानें राहतो तें तेज हें भूत. स्पर्श हा गुण आणि गति, प्रेरणा हा धर्म ज्याच्या आश्रयानें राहतो तें वायु हें भूत. शब्द हा गुण आणि अवकाश देणें, रचनाविशेषास सहाय्य देणें हे धर्म ज्याच्या आश्रयानें राहतात तें आकाश हें भूत. अशीं ही महाभूतांचीं स्वरूपें आहेत. त्यांच्या संयोगांतून सृष्टींतील सर्व वस्तुजात निर्माण होतें. पंचीकरण शब्दानें ही भूतसंयोगाची कल्पनाच अभिप्रेत आहे. हें सर्व नीट समजलें म्हणजे अध्यात्माच्या उपयोगाच्या दृष्टीनें सृष्टीचा विचार पूर्ण होतो. आजचें प्रगत विज्ञानहि या पंचभूतांचाच निराळ्या वर्गीकरणांतून, निराळ्या दृष्टीनें विचार करीत असतें. घनरूप, द्रवरूप, वायुरूप, शक्तिरूप आणि अवकाशरूप हें वर्गीकरण स्थूलमानानें विज्ञानानें स्वीकारलें आहे. त्यासंबंधीचें विस्तृत विवेचन आपणांस येथे अभिप्रेत नाहीं.



हीं 'महावाक्यें' तत्त्वसंख्या आणि पंचीकरणाची प्रक्रिया, यांचें सांगोपांग विवरण अनुभवी पंडिताच्या, ज्ञानी सत्पुरुषाच्या सहवासांतून होतें. सुदैवानें ''शाब्दे परे च निष्णातं'' अशा सत्पुरुषाची गांठ पडल्यास ब्रह्मज्ञानापर्यंत जाऊन पोंचण्याच्या दृष्टीनें या ज्ञानाचा सविस्तर ऊहापोह होत जातो आणि त्यांतील मर्म नेमकें लक्षांत येतें, खूण पटते.

मात्र हें सर्व ज्ञान, परोक्ष ज्ञान आहे. प्रत्यक्ष ब्रह्मसाक्षात्काराशीं त्याचा तसा संबंध नाहीं. व्यवहारामध्यें लहान मुलाला आकाशामधें दिसणारी द्वितीयेची चंद्रकोर दाखविण्यासाठीं जसा एखाद्या झाडाच्या फांदीचा उपयोग होतो, तसेंच ब्रह्माची ओळख पटविण्यासाठीं या तत्त्वज्ञानाचें, परोक्ष ज्ञानाचें होतें. याला 'शाखाचंद्रन्याय' अशी संज्ञा आहे. आकाशांतील चंद्राचें स्थल लक्षांत येऊन त्याची ओळख पटणें हें महत्त्वाचें. आतां यावेळीं दिग्दर्शनासाठीं एकाद्या फांदीचा उपयोग होत असला तर ती फांदी महत्त्वाची नाहीं. उद्या किंवा आणखी थोड्या वेळानें तो चंद्र त्या फांदीवर दिसणार नाहीं. चंद्र दाखविण्यास उपयोगी म्हणून फांदीप्रमाणें, एकाद्या मंदिराचें शिखर, एकादा खांब, एकाद्या उंच घराच्या गच्चीचा कोपरा, इत्यादि वस्तूहि उपयोगी पडूं शकतील. ओळख पटवून घ्यावयाची असते ती चंद्राची, या ठिकाणी महत्त्व आहे तें चंद्रविषयक ज्ञानाला, तें झाल्यानंतर तटस्थ लक्षण म्हणून उपयोगीं पडणाऱ्या शिखर, फांदी, यांची आवश्यकता लागेलच असें नाहीं. ब्रह्मज्ञान आणि प्रक्रियेचें पांडित्य यांचें असेंच आहे.